**Meeting No.** **116** **Meeting Date** **18-Aug-1**

**Item No.** **1** **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दि. १५-७-१९९२ रोजी झालेल्या ११५ व्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे.

ठराव :

**Item No.** 2 **Resolution No.** 3028

विषय : महाप्रकल्प गृहनिर्माण अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या महाप्रकल्पाच्या ओशिवरा व गोरेगाव येथील विकासकांच्या मागण्या व त्यावरील शिफारशी.

ठराव : कंत्राटदार योजनेचे ठिकाण योजनानिहाय मुदतवाढीचा अंतिम दिनांक - गाळ्यांची संख्या दिनांक मागवाढीच्या संदर्भात निर्देशांक गोठविण्याचा दिनांक सुसज्जता अग्रिमाची रक्कम पूर्ण वसूल करणे निष्फळ ठरले तर बँक हमीपत्राच्या रोखीकरणाचा दिनांक इतर अटी

१ २ ३ ४ ५ ६ ७

युनिटी कन्स्ट्रक्शन मजासवाडी १५६५ ३०.९.९२ ३०.११.९२ यापूर्वी वसूल करण्यात आला. १५० गाळ्यांचे बांधकाम सुरू करण्यास मुंबई महानगरपालिकेने परवानगी दिल्यानंतर या गाळ्यांच्या बांधकामाकरिता ५ महिन्यांचा कालावधी देण्यात यावा.

५४० ३१.१२.९२

१६० ३१.३.९३

अबोड कन्स्ट्रक्शन चांदिवली ८४० ३१.१०.९२ ३०.११.९२ प्रत्येक टप्पा पूर्ण होण्याअगोदर ३ महिने (मुदत वाढ, दिलेल्या तारखेनुसार) करारानुसार सुसज्जता अग्रिम पूर्ण वसूल होईपर्यंत प्रतिवर्षी १५ टक्के दराने व्याज आकारावे.

९६० ३१.१२.९२

७२२ २८.२.९३

बी. जी. शिर्के अँ. कं. ओशिवरा (१ व २) २७२ २२४ ३१.३.९३ ३०.११.९२ प्रत्येक टप्पा पूर्ण होण्याअगोदर ३ महिने (मुदत वाढ दिलेल्या तारखेनुसार) दिनांक १४.५.९२ पर्यंत झालेल्या विलंबासहित अग्रिम वसूल करण्यासाठी पूर्वी कंत्राटदाराने ठरलेल्या इतर ठेकेदारांप्रमाणेच १५ टक्के द.सा.द.शे. व्याज व त्यानंतरच्या म्हणजे १४.५.९२ नंतरच्या अग्रिम रकमेच्या तफावतीवरील वसूलीसाठी आजच्या बँक व्याज दराने प्रतिवर्षी २२.७५ टक्के दराने प्राधिकरणास व्याज द्यावे लागेल.

ओशिवरा (III) १९२ ३१.१२.९२

गोरेगाव १२१२ ३१.३.९३

पुढील अटींचे पालन करण्यात आले तरच वरील मुदतवाढ मान्य करता येईल.

१) हा सर्व मागण्यांचा पूर्ण व अंतिम समझोता आहे आणि कोणत्याही कारणास्तव काहीही झाले तरी पुढे वाढीव मुदतीसाठी ठेकेदार मागणी करणार नाही असे प्रत्येक ठेकेदार लेखी मान्य करील आणि असे वचनपत्र स्टँप पेपरवर लिहून देतील.

२) वर दिलेल्या वाढीव मुदतीत काम पूर्ण करण्यासाठी प्रत्येक महिन्यात करावयाच्या कामाचा सुधारित तक्ता प्रत्येक ठेकेदाराने आठ दिवसांच्या आत प्रकल्प व्यवस्था सल्लागार व मुख्य अभियंता/मुंबई मंडळ यांचेकडून मंजूर करून घ्यावयाचा आहे. म्हणजे विहित समयसूचीनुसार कामाची प्रगती होत आहे याबद्दल खात्री होऊ शकेल. दि. ३०.९.९२ नंतर कामात विलंब होत असल्याचे लक्षात आले तर दंड (पेनल्टी) लागू करण्यात येईल आणि ती मुख्य अभियंता/मुंबई मंडळ यांनी ठरविल्याप्रमाणे प्रत्येक दिनी रु. ५०००/- पेक्षा कमी असणार नाही. दिनांक १.१०.९२ नंतर प्रत्येक महिन्याच्या शेवटी प्रगतीचा आढावा घेतल्यावर जर कामाची प्रगती बारचार्टमध्ये दर्शविलेल्या प्रगतीच्या तुलनेत मागे पडल्याचे दिसून आले तर वरील दंडात योग्य प्रमाणात वाढ करण्यात येईल.

३) वसूल केलेली दंडाची रक्कम परत दिली जाणार नाही आणि अशा दंडाची रक्कम आकारणी होत असतानाच्या कालावधीत एस्कलेशन (वाढीव दर) दिले जाणार नाही. परंतु वरीलप्रमाणे अंतिम मुदतवाढीत काम पूर्ण केल्यास वसूल केलेला दंड परत करणेबाबतचा विचार करता येईल.

४) वरील मुद्द्यांच्या अनुषंगाने जर सुसज्जता अग्रिम जरुरीपेक्षा जास्त वसूल करण्यात आला तर अतिरिक्त वसूल रक्कम त्यावर कोणत्याही प्रकारचे व्याज न देता त्याचे समायोजन करावे किंवा त्याचा परतावा ठेकेदारांना देण्यात यावा असे ठरविण्यात आले. परंतु जादा वसूल केलेल्या रकमेवर विकासकास कुठलेही व्याज देण्यात येणार नाही. तथापि, सुसज्जता अग्रिमाची वसूली देय रकमेपेक्षा कमी झाली तर त्यावर १५ टक्के या दराने मे. अबोड कन्स्ट्रक्शन व मे. युनिटी कन्स्ट्रक्शन यावर व्याज आकारणी करावी आणि मे. बी. जी. शिर्के आणि कंपनी यांच्यावर २२.७५ टक्के दराने व्याज आकारणी करावी. अशा प्रकारे संपूर्ण सुसज्जता अग्रिमाची वसूली न झाल्यास वसूल करावयाच्या राहिलेल्या मोबिलायझेशन अग्रिमाची रक्कम व तफावतीवरील व्याजाची रक्कम याप्रीत्यर्थ विकासकाने दिलेले बँक हमीपत्राचे रोखीकरण करणेत येईल.

गृहनिर्माण महाप्रकल्पांतर्गत बांधण्यात येत असलेल्या गाळ्यांच्या विक्रीच्या किंमतीमध्ये वरीलप्रमाणे निर्णयामुळे वाढ झाल्यास परिणामी गाळ्यांच्या विक्रीच्या किंमतीमध्ये मुख्य अधिकारी/मु. मं. यांनी सुधारणा करावी अशी नोंद घेण्यात आली.

५) शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने निर्गमित केलेल्या दिनांक १०.१.९२ च्या बीडीजी-१०९१/सीआर-१२/बीएलडीजी-२ या क्रमांकाच्या शासन निर्णयाचा अंगिकार यापूर्वीच्या वेगळ्या निर्णयाद्वारे करण्यात आलेला आहे. त्यातील सिमेंट व पोलादाच्या किंमतीमधील भाववाढीच्या संदर्भात विशेष सहाय्य देणेबाबतचे उपवाक्य (क्लॉज) वगळून इतर सर्व उपवाक्ये लागू होतील. तसेच अशी दखल घेण्यात आली आहे की, याच दिवशी निर्गमित झालेला दुसरा शासन निर्णय बीडीजी-१०९१/सीआर/१७२/बीएलडीजी-२ हा प्राधिकरणाने अंगिकारलेला नाही. कारण हे आदेश यापुढील नवीन निविदांसाठी आहेत म्हणून तो लागू करण्यात आलेला नाही असे प्राधिकरणाच्या १४.५.९२ च्या सभेत ठरविले होते परंतु विशेषतः फेब्रुवारी १९९२ मध्ये पोलादावरील निर्बंध उठविल्यानंतर सिमेंट आणि पोलादाच्या भावामध्ये सातत्याने होत असणारी लक्षणीय भाववाढ लक्षात घेऊन आला असे मान्य करण्यात आले की, ठेकेदारांना ही भाववाढ अदा करण्यापूर्वी सिमेंट आणि पोलादाचा दर महिन्याच्या शेवटी प्रसिद्ध झालेला निर्देशांक दर विचारात घ्यावा आणि प्राधिकरणाच्या दप्तराप्रमाणे प्रत्येक ठेकेदाराने वापरलेल्या सिमेंट आणि पोलादाच्या भाववाढीच्या ५० टक्के इतकी रक्कम ठेकेदारास अदा करता येईल. सिमेंट व पोलादाच्या किंमतीवरील ५० टक्के दरवाढीची भरपाई त्यांना देण्यात येत असेल तर दर भाववाढीबद्दलचा आणि विशेष सहाय्याबद्दलचा रकमेपुरता लाभ त्यांना देण्यात येऊ नये, असेही पुढे ठरविण्यात आले. जर ठेकेदारांनी वरील अटी पूर्ण तथा मान्य केल्या आणि याकरिता त्यांनी तसे वचनपत्र लिहून दिले आणि त्यांना याबाबत खंडशः (पीस-मील) लाभ उपभोगू दिला नाही, तरच या बैठकीमधील निर्णयाचा लाभ ठेकेदारांनफा देण्यात यावा असे पुन्हा निक्षून ठरविण्यात आले आहे. ही वस्तुस्थिती सुद्धा ठेकेदारांना स्पष्टपणे तोंडी विशद केलेली आहे. वरील सर्व अटी मान्य असल्याचे त्यांनी लेखी कळवावे आणि त्यानंतरच या निर्णयाचा लाभ त्यांना द्यावा.

मजासवाडी प्रकल्पामधील नाल्याच्या बांधकामासाठी आणि जलवाहिनी टाकण्याच्या

कामी मे. युनिटी कन्स्ट्रक्शन यांना अतिरिक्त रकमेची मागणी केली होती. त्यांच्या या मागणीबाबत असे ठरविण्यात आले की, मुख्य अधिकारी/मुंबई मंडळ व मुख्य अभियंता/मुंबई मंडळ या बाबीकरिता एक वेगळी टिप्पणी तयार करून ती प्राधिकरणाच्या मान्यतेकरिता सादर करावी.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाने मान्य केलेल्या दिनांक १०.१.९२ च्या शासन निर्णयाचा लाभ आपणासही मिळावा अशी विनंती मे. अब्रोड कन्स्ट्रक्शन यांनी केलेली होती या बाबीवर पुरेसा विचार विनिमय करण्यात आला आणि अखेरीस असे ठरविण्यात आले की, प्राधिकरणाने यावर विचार करण्याकरिता मुख्य अधिकारी/मुंबई मंडळ आणि मुख्य अभियंता/मुंबई मंडळ हे वेगळी टिप्पणी तयार करतील.

**Item No.** 3 **Resolution No.** 3027

विषय : गृहनिर्माण महाप्रकल्पाचे जाहिरात प्रसिद्ध करण्याबाबत रुपरेषा ठरविण्याबाबत.

ठराव : १) मे. इमेज ॲडव्हरटाईजिंग या कंपनीची गृहनिर्माण महाप्रकल्पाच्या जाहिरातीसाठी एजन्सी म्हणून नेमणूक करण्यात यावी आणि गृहनिर्माण महाप्रकल्पाच्या छपाई व बाजारपेठ मिळविणे या उद्देशासाठी अंदाजे रुपये १५ लाख पर्यंत एकूण खर्च करावा.

२) अर्ज विक्री व स्वीकृतीचे काम बँक ऑफ इंडिया व देना बँक यांचेकडे संयुक्तपणे सोपविण्यात यावे.

३) १५ वर्षे महाराष्ट्रात वास्तव्य सिद्ध करण्याबाबतची कागदपत्रे प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी छाननी करण्याऐवजी अर्जदाराने सक्षम महसूल अधिकाऱ्याकडून असे दाखले आणावेत व अर्जासोबत सादर करावेत.

४) गाळेवाटपासंबंधी वर नमूद केलेल्या विविध कामाच्या अनुसूचीचे अनुपालन करण्यात यावे.

५) महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाकडून घर मिळविण्यासाठी वाटपाच्या विहित अटी पूर्ण करून यशस्वी व पात्र ठरलेल्या अर्जदारास वाटपास झालेल्या उशीराबाबत महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाने उशीर झालेल्या पूर्ण महिन्याच्या कालावधीकरिता दिनांक १.५.९३ पासून दर महिना १ टक्का दराने व्याज द्यावे.

**Item No.** 4 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र राज्यात 'ब' व 'क' वर्ग नगरपरिषदा/नगरपालिका/ग्रामपंचायती असलेल्या छोट्या शहरात म्हाडामार्फत गृहनिर्माण योजना हाती घेण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 5 **Resolution No.**

विषय : खाजगी जमिनीवरील म्हाडाचा प्रस्तावित संयुक्त क्षेत्रातील गृहनिर्मिती प्रकल्प.

ठराव :

**Item No.** 6 **Resolution No.**

विषय : प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना लागू करण्यात आलेल्या सक्तीच्या सेवानिवृत्ती योजनेची अंमलबजावणी करण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 7 **Resolution No.** 3029

विषय : 'विद्युत पर्यवेक्षक' या पदावर पदोन्नती देण्याच्या संदर्भातील शासन निर्णय स्वीकारणे. पंपचालक/तारतंत्री संवर्गातील कर्मचाऱ्यांना सदर पदावर पदोन्नती देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
विद्युत पर्यवेक्षक या पदासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दिनांक ५ नोव्हेंबर, १९५८ च्या बीसीएस-१३५८-ई (१) या क्रमांकाच्या शासन निर्णयातील सेवाप्रवेश नियम अद्यापि अंमलात असल्याचे शासनाने दिनांक ६.४.१९९० च्या एमएचए-१०९०/सीआर-११/का.३, या क्रमांकाच्या पत्रान्वये कळविले आहे. सदर शासन निर्णयातील तरतुदी प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना लागू करण्यास मान्यता देण्यात येत आहे. हा धोरणात्मक निर्णय समजून भविष्यात अशी प्रकरणे या तरतुदींच्या आधारे निकालात काढावीत. त्यानुसार प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील कनिष्ठ अभियंत्यांची ३३ राखीव पदावरील ३ पदे बिगर राखीव करून त्यांचे नामकरण 'विद्युत पर्यवेक्षक' या पदामध्ये करावे आणि आवश्यक गुणवत्ता आणि योग्य अर्हता धारण करणाऱ्या आणि किमान शालांत परीक्षा उत्तीर्ण झालेल्या पंपचालक/तारतंत्री संवर्गातील सेवेची १० वर्षे पूर्ण केलेल्या कर्मचाऱ्यांना पदोन्नतीची प्रचलित पद्धती अनुसरून विद्युत पर्यवेक्षक या पदावर पदोन्नती देण्यासही मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** 8 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या अखत्यारीत असलेल्या बृहन्मुंबईतील झोपडपट्टी सुधारण्याचा सर्व कार्यक्रम राजीव गांधी झोपडपट्टी सुधार व निवारा प्रकल्प यांचेकडे सुपूर्द करण्याबाबत आणि

ठराव :

**Item No.** 9 **Resolution No.**

विषय : गृहनिर्माण महाप्रकल्पाचा दिनांक १५.७.१९९२ पर्यंतचा प्रगती अहवाल.

ठराव :

**Item No.** 10 **Resolution No.**

विषय : श्री. एफ. एस. एच. खतिब, विशेष कार्यकारी अधिकारी (मू व प्रशासन)/मुंबई मंडळ यांना विशेष अधिकार प्रदान करणेबाबत.

ठराव :

**Item No.** 11 **Resolution No.** 3031

विषय : मोवाड प्रकल्पांतर्गत काम करणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांना मंजूर करण्यात आलेल्या विशेष भत्त्याचा कालावधी वाढविण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
मोवाड प्रकल्पांतर्गत काम करणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांना दैनंदिन १०/- रुपये भत्ता देणेऐवजी प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला की, हा भत्ता १०/- रुपयांऐवजी २५/- रुपये करण्यात यावा व त्याची अंमलबजावणी दिनांक २३.४.१९९२ च्या ठराव क्र. २०५८ नमूद केलेल्या कालावधीपासून काम संपेपर्यंत अंमलबजावणी करण्यात यावी. प्राधिकरणाच्या दिनांक २३.४.१९९२ च्या ठराव क्रमांक २०५८, अन्वये मोवाड प्रकल्पांतर्गत काम करणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांना विशेष भत्ता दिनांक १५.६.१९९२ पासून दिनांक १४.९.१९९२ पर्यंत या ३ महिन्यांसाठी वाढविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** 12 **Resolution No.**

विषय : श्री. ओ. आर मावे, वरिष्ठ सहाय्यक, जा. बँ. प्र. यांना जनसंपर्क अधिकारी (वर्ग -२) या पदाचा अतिरिक्त कार्यभार सांभाळल्याबद्दल अतिरिक्त वेतन मंजूर करणे.

ठराव :

**Item No.** 13 **Resolution No.** 3030

विषय : मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ आणि गलिच्छ वस्ती सुधारणा मंडळ वेगळे स्थापन करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
मुंबईकरिता शासन वेगळ्या गलिच्छ वस्ती सुधारणा मंडळाची निर्मिती करण्यास इच्छुक असेल तर महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाची त्याबाबत काहीही हरकत नाही. तथापिन मा. मुख्यमंत्री यांनी फेब्रुवारी १९९२ मध्ये घेतलेल्या बैठकीत तत्वतः मान्य केल्याप्रमाणे शासनाने संपूर्ण महाराष्ट्राकरिता गलिच्छ वस्ती सुधारणा मंडळाची स्थापना करावी असे वाटते. तथापि त्यांचे प्रारंभिक कार्यक्षेत्र मुंबईपुरते मर्यादित असावे आणि तद्नंतर कायद्यामध्ये सुधारणा न करता प्रशासकीय आदेशाद्वारे इतर शहरांचा समावेश करावा. मुंबईमध्ये वेगळे दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ स्थापन करण्याच्या शासनाच्या प्रस्तावाशी प्राधिकरण सहमत आहे. मुंबई मंडळाचे विभाजन करून त्याऐवजी खालील ३ स्वतंत्र मंडळे स्थापन करण्यात यावीत.
१. मुंबई गृहनिर्माण मंडळ
२. मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ
३. महाराष्ट्र गलिच्छ वस्ती व सुधारणा व पुनर्रचना मंडळ
या मंडळांच्या स्थापनेसाठी पुरेसा आर्थिक खर्च होणार नाही, याची नोंद घेण्यात आली. गलिच्छ वस्ती मंडळाच्या सुमारे १००० कर्मचारी-वृंदासाठी प्रतिवर्षी अंदाजे रुपये ५ कोटींचा खर्च येईल, तर दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या सुमारे ६२० कर्मचारी-वृंदासाठी अंदाजे रु. ३.२० कोटी खर्च येईल. ही दोन्ही मंडळे स्थापन करण्याकरिता प्रारंभीचा खर्च म्हणून ५० लाख रुपयांची अधिक आवश्यकता लागेल.

**Item No.** 14 **Resolution No.**

विषय : गृहनिर्माण महाप्रकल्पाचा दिनांक ३१.७.१९९२ पर्यंतचा प्रगती अहवाल.

ठराव :

**Item No.** 15 **Resolution No.** 3032

विषय : मंडाले सर्व्हे क्र. ८० व मानखुर्द सर्व्हे क्र. १५२, तुर्भे, मुंबई ८८ येथील जमिनीवर भूखंड विकसित करावयाच्या (पाणीपुरवठा, मल:निस्सारण, रस्ते, गटारे व वीजपुरवठा इ.) कामाच्या निविदा स्वीकारणेबाबत. - विभाग (१)

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
मंडाले सर्व्हे क्र. ८० व मानखुर्द जवळील सर्व्हे क्र. १५२, तुर्भे, मुंबई ४०० ०८८ येथील जमिनीवर भूखंड विकसित करावयाच्या कामाची मेसर्स आर. एस. गुप्ता कंपनी अंदाजपत्रकाच्या किंमतीवर (रु. ८६,४२,४८१/-) ८.०० टक्के अधिक असलेली आणि ४.०० टक्के सूट असलेली (रु. ८९,६०,५२४/-) प्रथम निम्नतम निविदा पुढील शर्तीवर स्वीकारण्यात येत आहे. महानगरपालिकेने सदर कामाविषयीचे सर्व प्रस्ताव मंजूर केल्यानंतर व नौसेना युद्धसामुग्रीयांनी ना हरकत दिल्यानंतरच काम सुरू करण्याकरिता आदेश (वर्क ऑर्डर) देण्यात येईल, अशा शर्तीवर कंत्राटदारांना स्वीकृती पत्र देण्यात यावे.

**Item No.** 16 **Resolution No.** 3033

विषय : मंडाले, सर्व्हे क्र. ८०, मानखुर्द जवळील सर्व्हे क्र. १५२, तुर्भे, मुंबई ८८ येथील जमिनीवर भूखंड विकसित करावयाच्या (पाणीपुरवठा, मलनि:स्सारण, रस्ते व गटारे, वीजपुरवठा इ.) कामाच्या निविदा स्वीकारणेबाबत. - विभाग (२)

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
मंडाले, सर्व्हे क्र. ८० व मानखुर्द जवळील सर्व्हे नं. १५२, तुर्भे, मुंबई ८८ येथील जमिनीवर भूखंड विकसित करावयाच्या कामाची मेसर्स आर. एस. गुप्ता आणि कंपनीची अंदाजपत्रकाच्या किंमतीवर (रु. ७८,३८,६९१/-) ८ टक्के अधिक असलेली आणि ४ टक्के सूट असलेली (रु. ८०,२३,३९१/-) प्रथम निम्नतम निविदा पुढील शर्तीवर स्वीकारण्यात येत आहे. महानगरपालिकेने सदर कामाविषयीचे सर्व प्रस्ताव मंजूर केल्यानंतरच व नौसेना युद्धसामुग्री भांडार यांनी 'ना-हरकत' दिल्यानंतरच काम सुरू करण्याकरिता आदेश (वर्क ऑर्डर) देण्यात येईल, अशा शर्तीवर कंत्राटदारांना स्वीकृती पत्र देण्यात येते.

**Item No.** 17 **Resolution No.** 3034

विषय : मंडाले, सर्व्हे क्र. ८०, मानखुर्द जवळील सर्व्हे क्र. १५२, तुर्भे, मुंबई ८८ येथील जमिनीवर भूखंड विकसित करावयाच्या (पाणीपुरवठा, मलनि:स्सारण, रस्ते व गटारे, वीजपुरवठा इ.) कामाच्या निविदा स्वीकारणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
मंडाले, सर्व्हे क्र. ८० व मानखुर्द जवळील सर्व्हे नं. १५२, तुर्भे, मुंबई ८८ येथील जमिनीवर भूखंड विकसित करावयाच्या कामाची मेसर्स आर. एस. गुप्ता आणि कंपनीची अंदाजपत्रकाच्या (रु. ८४,१५,२६०/-) ८ टक्के अधिक असलेली आणि ४ टक्के सूट असलेली रु. ८७,२५,९२०/- प्रथम निम्नतम निविदा पुढील शर्तीवर स्वीकारण्यात येत आहे. महानगरपालिकेने सदर कामाविषयीचे सर्व प्रस्ताव मंजूर केल्यानंतर व नौसेना युद्धसामुग्री भांडार यांनी 'ना-हरकत' दिल्यानंतरच काम सुरू करण्याकरिता आदेश (वर्क ऑर्डर) देण्यात येईल, अशा शर्तीवर कंत्राटदारांना स्वीकृती पत्र देण्यात येते.

---

**Item No.** 18 **Resolution No.** 3035

विषय : जागतिक बँक प्रकल्पाने माध्यमिक शाळेसाठी भाडेपट्ट्याने देण्याकरिता दिलेल्या सात भूखंडाच्या जाहिरातीबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
आतापर्यंत करण्यात आलेल्या समग्र वाटपाचे पुनर्विलोकन करावे आणि महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या विहित पद्धतीनुसार सदर वाटप काटेकोरपणाने करावे. जुलै १९९१ मध्ये जागतिक बँक प्रकल्पाकडून जाहिरात करण्यात आलेले सात भूखंड महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या विहित नियम आणि विनियमानुसार अर्जदारांची काटकोरपणे पात्रता ठरवून आणि सोडत काढून काटेकोरपणे वाटप करावे.

---

**Item No.** 19 **Resolution No.** 3036

विषय : नागरी नूतनीकरण योजना -

१८-२२-२६-३० अंधारे चाळ, अनंत गणपत पवार मार्ग (टप्पा - १) योजनेअंतर्गत इमारतींची पुनर्बांधणी.
इमारतीच्या बांधकामाच्या निविदाबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
सदरहू इमारतीतील जागा, भाडेकरू संक्रमण शिबिरात मे, १९९१ पासून रहाण्यास गेल्यामुळे सोकळी पडून आहे व भाडेकरू नवीन इमारतीत जाण्यास उत्सुक असल्याने व आर्थिक दृष्ट्या मे. आर. एस. गुप्ता आणि कंपनीची निविदा प्राधिकरणास फायदेशीर असल्यामुळे व बाब टिप्पणीत नमूद केलेली परिस्थिती विचारात घेऊन ही निविदा न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे मंजूर करण्यात येत आहे.

---

**Item No. 20 Resolution No. 3037**

विषय : प्राधिकरणाच्या मुंबई येथील वसाहतीमधील शैक्षणिक व वैद्यकीय कारणासाठी राखून ठेवलेल्या भूखंडाच्या वाटपाबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
शैक्षणिक व वैद्यकीय उद्देशासाठी आणि क्रिडांगणे/बालवाडी इत्यादी मुंबई येथील भूखंड वाटपाच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे असाव्यात.

शैक्षणिक आदी सुविधासाठी राखून ठेवलेल्या भूखंडाच्या किंमतीबाबत धोरण दर्शविणारी अनुसूची.

| अ. क्र. | राखीव सुविधांचा प्रकार | अधिमूल्याचा दर | वार्षिक भूईभाडे हप्त्याची टक्केवारी ३०वर्षां पर्यंत | ३०-६० | ६०-९० | विल्हेवाटीची पद्धत |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. |
| १. | बालवाडी/केजी/ नर्सरी | चालू बाजार भावाच्या १० टक्के | ५टक्के | १०टक्के | २०टक्के | संस्थांकडून अर्ज मागवून व पात्र ठरलेल्या संस्थांमधून सोडत काढून. |
| २. | शैक्षणिक उद्देशासाठी राखून ठेवलेल्या भूखंडाशी संलग्न असलेले खेळाचे मैदान | -"- | -"- | -"- | -"- | मुख्य भूखंडाशी संलग्न असल्याप्रमाणे. |
| ३. | प्राथमिक शाळा | चालू बाजार भावाच्या १० टक्के | -"- | -"- | -"- | जर स्थानिक संस्थेसाठी राखून ठेवलेला असेल तर अशा संस्थेस प्रथम भाडेपट्ट्याने देऊ करावा. त्या संस्थेने तो नाकारला तर अ. क्र. ४ प्रमाणे |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | अशा भूखंडाची विल्हेवाट करावी. |
| ४. माध्यमिक शाळा | चालू बाजार भावाच्या १५ टक्के | ५ टक्के | १० टक्के | २० टक्के | अ. क्र. १च्या स्तंभ क्रमांक ५ प्रमाणे |
| मुंबई नागरी विकास प्रकल्प आराखड्यातील अ. क्र. १ ते ४ साठी | जागेची प्रत्यक्ष किंमत भू-विकास आणि समोवतालच्या बांधकामाचा खर्च व्याजासहित. | | | | |
| ५. कॉलेज/तांत्रिक /संस्था वर्ग/आय. टी.आय. इतर प्रशिक्षण संस्था, इत्यादी | चालू बाजार भावाच्या ५० टक्के | १० टक्के | २० टक्के | ४० टक्के | -"- |
| ६. दवाखाना, वैद्यकीय केंद्रे आणि प्रसूतीगृह, पॉलिक्लिनीक हॉस्पिटल इ. | चालू बाजार भावाने | १ टक्का | २ टक्के | ४ टक्के | स्थानिक संस्थेकरिता राखून ठेवलेला असेल तर असा भूखंड अशा संस्थेस प्रथम प्रचलित चालू भावाने व प्रस्तावित भाडेपट्ट्याने देण्यात यावा, आणि जर स्थानिक संस्थेने तो स्वीकारला नाही तर तो भूखंड इतर संस्थांकडून अर्ज मागवून व पात्र ठरलेल्या संस्थांमधून सोडत काढून वितरित करावा. |

---

ज्या शैक्षणिक संस्था आणि सार्वजनिक विश्वस्त शैक्षणिक उद्देशास्तव संबंधित कायद्यानुसार नोंदविल्या आहेत आणि त्यांचे पंजीकरण महाराष्ट्र राज्यामध्ये झालेले आहे आणि ज्यांचे कार्यक्षेत्र महाराष्ट्रामध्ये आहे, अशा संस्थांकडून शैक्षणिक भूखंडांकरिता अर्ज मागवावे. त्या संस्थांमध्ये इतर अन्य भाषेच्या माध्यमाशिवाय मराठी शिकवण्याचे एक माध्यम असलेच पाहिजे. प्राप्त झालेल्या अर्जांची पडताळणी जसे प्रकरण असेल त्याप्रमाणे सचिव किंवा शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य,

सचिव/संचालक, तांत्रिक शिक्षण व उच्च शिक्षण खात्याकडून करून घेण्यात येईल. त्याचप्रमाणे नोंदणीकृत संस्था/सार्वजनिक विश्वस्त, वैद्यकीय कॉलेजे, हेच मूळ उद्दिष्ट आहे. आणि महाराष्ट्र राज्यात पंजीकृत झालेल्या आहेत, अशा संस्थांकडून वैद्यकीय सुविधांकरिता अर्ज आले पाहिजेत. शाळेकरिता केलेल्या अर्जासोबत किमान रु. ५०००/- आणि/कॉलेज/ वैद्यकीय सुविधांकरिता केलेल्या अर्जासोबत किमान रु. १०,०००/- इसान्याची रक्कम म्हणून मरावे लागतील.

वरील तक्त्यात दिसून येणारी भाडेपट्ट्याची रक्कम लाभार्थींना हप्त्याच्या रकमेशिवाय आणि भाडेपट्ट्याच्या रकमेत ३० वर्षांनी वाढ होईल. ती भरावी लागेल. लाभार्थी संस्थेला वाटपपत्र दिल्यानंतर दिनांकापासून ३० दिवसांच्या आत ५० टक्के रक्कम भरली पाहिजे. उर्वरित रक्कम ९० दिवसांच्या आत भरली पाहिजे. अन्यथा त्यांना कोणत्याही प्रकारची सूचना न देता त्यांना करण्यात आलेले भूखंडाचे वाटप रद्द होईल. ज्या ठिकाणी एकापेक्षा अधिक अर्ज असतील तर महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या जमिनीची विल्हेवाट विनियमानुसार त्याचे वाटप सोडत काढून करण्यात येईल.

वेगवेगळ्या ठिकाणी असलेल्या जमिनीच्या किंमती मान्य करीत असताना असे निदर्शनास आले की, वित्त नियंत्रक आणि विविध विभागाचे मुख्य लेखाधिकारी आणि त्यांचे वास्तुशास्त्रज्ञ यांच्यामध्ये एकत्रित चर्चा होऊन किंमत विषयक शिफारशी उपाध्यक्ष/प्रा. यांच्याकडून मान्य करून घेण्यात आल्या आहेत. हे दर बाब टिप्पणीतील परिशिष्ट - ३ मध्ये सादर केल्याप्रमाणे प्राधिकरणाने मान्य केले आहेत. वरील दरांची शिफारस करताना वरील गट समूहाने विचार विनिमय केला आणि वरील पद्धती भविष्यातही अनुसरली जावी आणि उपाध्यक्ष/प्रा. यांच्याच स्तरावर यापुढे प्रत्येक भूखंडासाठी संमती मिळविण्यात यावी असा निर्णय घेण्यात आला. अनिवासी भूखंड वाटप करण्याबाबतचे प्राधिकरणाचे दिनांक २०.७.१९८३ चे एलडीआर/१० ९१३२/इएस-१३ या क्रमांकाचे आदेश मुंबई मंडळापुरते मागे घेण्यात येत आहेत व मुंबई शहरातील मुंबई मंडळ, जागतिक बँक प्रकल्प व राजीव गांधी प्रकल्प यांच्या अखत्यारित असणारे अनिवासी भूखंडाचे वाटप प्राधिकरणाच्या मान्यतेनेच यापुढे करण्यात येईल.

बाब टिप्पणीतील परिशिष्ट - २ प्रमाणे भूखंड वितरणाबाबतची मार्गदर्शक तत्वे प्राधिकरणाने मान्य केली व त्याप्रमाणे अशा भूखंडांच्या वाटप अटी व शर्ती मध्ये त्याचा समावेश करण्यात आला.

बाब टिप्पणीत सुचविलेल्या दवाखाने व हॉस्पिटल इत्यादींबाबत निविदा प्रस्तावावर सविस्तर चर्चा करण्यात आली. त्यामध्ये ५० टक्के चालू बाजार भावाने निविदा मागविण्यात येऊ नयेत. तथापि १०० टक्के चालू बाजार भावाच्या अधिमूल्य दराने अर्ज मागवून पात्र संस्थांमधून सोडत काढून वितरण पद्धतीस मान्यता देण्यात आली.

राजीव गांधी प्रकल्पाकडे असलेल्या अनेक बालवाड्यांच्या संदर्भात असा विचार करण्यात आला की, बालवाडीच्या कार्यासाठी फारशा जागेची आवश्यकता नसल्यामुळे बालवाडीकरिता असलेले क्षेत्र काहीशा प्रमाणात कमी करावे आणि अशापैकी प्राप्त झालेले क्षेत्र प्राथमिक शाळांसाठी उपलब्ध करून द्यावे. संचालिका/राजीव गांधी प्रकल्प यांनी सूचनेस सहमती दर्शविली. बाब टिप्पणीतील सुधारित परिशिष्ट - २ सोबत जोडण्यात येत आहे.

**Item No.** 21 **Resolution No.** 3038

विषय : महाराष्ट्र राज्य पोलिस कर्मचारी गृहनिर्माण (नियोजित) संस्था यांना पोईसर कांदिवली येथील सुमारे २.७२ हेक्टर जमिन प्राधिकरणाच्या विविध अटी व शर्तींना अधिन राहून वितरण करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

१. मे. युनिटी कन्स्ट्रक्शन यांची निविदा रद्द करण्यात यावी. त्यांना देण्यात आलेले इरादा पत्र मागे घेण्यात यावे.
२. मुख्य अधिकारी, मुंबई मंडळ ह्यांनी शिफारस केलेल्या जमिनीची किंमत विचारात घेऊन पोयसर येथील २हे.७२ आर जमिनीस रू. २,३३५ चौ.मि. ह्या दराने किंमत आकारण्यात यावी. ही किंमत या क्षेत्रातील सध्याच्या बाजारभावाने मोकळ्या भूखंडासाठी बांधलेल्या घरासाठी होणाऱ्या किंमतीच्या दरांशी तुलनात्मकदृष्ट्या अनुकूल आहेत.
३. विहित अटींची पूर्तता व किंमतीचा भरणा केल्यावर शासनाने दिनांक ३०.७.९२ रोजी निर्गमित केलेल्या आदेशान्वये पोलिस गृहनिर्माण सहकारी संस्थेस पोयसर येथील जमिनीतील २हे.७२ आर क्षेत्राचा ताबा देण्याबाबतचे अधिकार मुख्यअधिकारी/मु.मं. यांना देण्यात यावेत.
४. प्राधिकरणाकडे जमिन उपलब्ध नसल्यामुळे शासनाच्या गृहनिर्माण विभागास त्याचे दिनांक ३१.७.१९९२ च्या आदेशाप्रमाणे सर्व ठेकेदारांशी वाटाघाटी करुन निविदा अंतिम करणे शक्य नाही, असे शासनास सखेद कळविण्यात यावे.

---

**Item No.** 22 **Resolution No.** 3039

विषय : वर्धा येथील ३१६ गाळ्यांची गळती थांबविण्यासाठी होणाऱ्या रू. ४.०० लाखाच्या खर्चास म्हाडाच्या मंजूरीबाबत.

म्हाडा निधी शीर्ष १६०.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, बाब टिप्पणात नमूद केलेल्या वस्तुस्थितीचा विचार करुन वर्धा येथील ३१६ गाळे भाडेखरेदी तत्वावर आहेत, व त्यांची अंतिम विक्री किंमत निश्चित झालेली आहे. त्यामुळे रहिवाश्यांकडून आणखीन रक्कम वसूल करता येणे शक्य नाही, म्हणून विशेष दुरुस्तीपोटी रू. ४.०० लाख जादा खर्च येणार आहे, तो म्हाडाने निधी शीर्ष १६० मधून खर्च करण्यास मान्यता देण्यात येत आहे. प्राधिकरणाच्या आगामी बैठकीत कार्यवृत्त स्थायी होण्यापूर्वी संबंधितांनी

**Item No.** 23 **Resolution No.** 3040

विषय : कुर्ला येथील जुन्या इमारतीतील भाडेकरूंना २ वर्षांकरिता संक्रमण शिबिरात जागा देणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
कुर्ला येथील मोडकळीस आलेली जुनी इमारत दुरुस्त होईपर्यंत त्या इमारतीमधील भाडेकरुंना पर्यायी जागा म्हणून संक्रमण शिबिरातील गाळे २ वर्षांच्या कालावधीसाठी देण्यास मान्यता देण्यात येते. प्राधिकरणाच्या आगामी बैठकीत कार्यवृत्त स्थायी करण्याची वाट न पाहता कार्यवाही करावी असेही ठरले.
बैठकीच्या विषयसूचीवरील विषय संपल्यानंतर उपस्थितांनी मा. अध्यक्ष/प्राधिकरण, यांचे आभार मानून बैठकीचे कामकाज संपल्याचे जाहीर करण्यात आले.

**Meeting No.** 117 **Meeting Date** 18-Sep-19

**Item No.** 1 **Resolution No.** 3041

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दि. १२, १७ व १८.८.९२ रोजी झालेल्या ११५ व्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे.

ठराव : "श्री. अजय दुआ यांनी लिहिलेला प्रबंध व त्याकरिता वापरलेली प्राधिकरणासंबंधी माहिती याला मान्यता देण्यात येते".
२. पवई कामाचे निविदा प्रदान करण्याबाबतच्या शासनाच्या पत्राचे सुध्दा अवलोकन केले. या पत्रावर पुढील बैठकीत तपशीलवार चर्चा करण्यात यावी, असे ठरले.
३. पोलीस गृहनिर्माण सोसायटीस पोईसर येथील जागेकरिता जी किंमत आकारावयाची आहे, त्याबाबतही शासनाने समासदांना लिहिले होते. या बाबीवर आज झालेल्या बैठकीत वेगळी चर्चा झाल्यामुळे त्यावर पुढील कार्यवाहीची आवश्यकता नाही.
४. शासनाचे दि.१७.९.९२ चे पत्र अध्यक्ष/प्राधिकरण यांनी बैठकीत आल्याचे सांगितले. हे पत्र गृहनिर्माण महाप्रकल्पांतर्गत सदनिकांची विक्री किंमतीबाबतचे आहे. याबाबत बैठकीत चर्चा होऊन पुढीलप्रमाणे इंग्रजीत एकमताने ठराव करण्यात आला व शासनाकडे पाठविण्यात आला.

**Item No.** 2 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दि.१९.६.१९९२ रोजी झालेल्या ११४ व्या बैठकीस घेतलेल्या निर्णयावरील कार्यवाहीचा अहवाल.

ठराव :

**Item No.** 3 **Resolution No.** 3043

विषय : श्री. के.जी. बोरकर, सेवानिवृत्त न्यायाधीश यांची सक्षम प्राधिकारी म्हणून कंत्राटी पध्दतीवर नियुक्ती करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, श्री.के.जी. बोरकर, सेवानिवृत्त न्यायाधीश, लघुवाद न्यायालय, मुंबई यांची प्राधिकरणातील सक्षम प्राधिकारी या पदावर कंत्राटी पध्दतीने प्राधिकरणाच्या आदेश क्र. एमएच एपीटी-१५९२/३४३/प्र-१०, दि. ७.९.९२ अन्वये सक्षम प्राधिकारी (१) ह्या पदावर दि. ९.९.९२ (म.पू.) पासून कंत्राटी पध्दतीने प्रथम १ वर्षाच्या कालावधीसाठी नेमणूक करण्यात बाब टिप्पणीतील अटी व शर्तीच्या अधीन राहून कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे.

**Item No.** 4 **Resolution No.** 3044

विषय : विशेष कार्य अधिकारी (दु.व.पु.)/मुं.मं. या पदास मुदतवाढ देणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, प्रस्तावित केल्याप्रमाणे विशेष कार्य अधिकारी (दु.व.पु.)/मुं.मं. या पदाची उपयुक्तता विचारात घेऊन ह्या पदास पुढील ६ महिन्यासाठी म्हणजेच दि. ३१.३.१९९३ पर्यंत मान्यता देण्यात येते. त्याप्रमाणे मंजूरीसाठी शासनाकडे शिफारस करण्यात यावी.

**Item No.** 5 **Resolution No.** 3045

विषय : जागतिक बँक प्रकल्प विभागाच्या आस्थापनेवरील मुख्य अभियंता हे पद प्रत्यार्पित करण्याबाबत प्राधिकरणाने घेतलेल्या निर्णयाच्या फेरविचाराबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, जागतिक बँक विभागाच्या आस्थापनेवरील मुख्य अभियंता हे पद प्रत्यार्पित करण्याचा प्राधिकरणाने दिनांक १९.६.१९९२ रोजी झालेल्या बैठकीत केलेला ठराव क्र. २०९९ फेरविचारांती रद्द करुन मुख्य अभियंता, जा.बँ.प्र. हे पद पुर्नजिवित करुन प्राधिकरणाच्या आस्थापनेवर वळते करण्यात यावे, व त्याचे नामाभिकरण मुख्य अभियंता/प्रा. (प्रकल्प) करण्यात यावे, या कार्यान्वित केलेल्या पदावर श्री. एस.के.सानप यांची मुख्य अभियंता/प्रा.(प्रकल्प) म्हणून प्रतिनियुक्तीवर नियुक्ती केली आहे, त्यास मंजूरी देण्यात येते.

**Item No.** 6 **Resolution No.** 3046

विषय : मुख्य अधिकारी, नाशिक मंडळ व मुख्य अधिकारी/अमरावती मंडळ यांना अधिकार प्रदान करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, बाब टिप्पणीमध्ये सोबत जोडलेल्या परिशिष्टाप्रमाणे नवनिर्मित नाशिक गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ तसेच, अमरावती गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या मुख्य अधिकाऱ्यांना अधिकार प्रदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तथापि, तांत्रिक विषयात त्यांचे अधिकार कार्यकारी अभियंता पदास प्रदान केलेल्या अधिकारापुरतेच मर्यादित रहातील.

**Item No.** 7 **Resolution No.** 3047

विषय : श्री. ए.आर. भावे, व.स. जागतिक बँक प्रकल्प यांना जनसंपर्क अधिकारी (वर्ग-२) या पदाचा अतिरिक्त कार्यभार सांभाळल्याबद्दल अतिरिक्त वेतन मंजूर करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, श्री. ऐ.आर. भावे, वरिष्ट सहाय्यक/जा.बँ.प्र./प्रा. यांना जनसंपर्क अधिकारी वर्ग (२)/जा.बँ.प्र. या पदाचा अतिरिक्त कार्यभार दिनांक १४.२.१९९२ पासून पुढे एक वर्षाने अथवा जागतिक बँक प्रकल्प विभागाची कालमर्यादा विहित मुदतीच्या आत संपल्यास किंवा पर्यायी व्यवस्था यापैकी जो कालावधी कमी असेल त्या कालावधीपर्यंत वाढविण्यास तसेच त्यांना त्यांच्या संभाव्य वेतनाच्या १० टक्के दराने किंवा दरमहा रू. ५००/- प्रमाणे एवढ्या मर्यादेपर्यंत अतिरिक्त वेतन मंजूर करण्यास मान्यता देण्यात येत आहे, तथापि, ह्या बाबतची तरतूद पुन्हा तपासून घ्यावी व नंतर अंमलबजावणी करावी.

**Item No.** 8 **Resolution No.**

विषय : प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना लागू करण्यात आलेल्या सक्तीच्या सेवानिवृत्तीच्या योजनेची अंमलबजावणी करण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 9 **Resolution No.**

विषय : प्राधिकरणाचे अधिकारी/कर्मचारी यांना वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती दरवर्षी रू. १२००/- याप्रमाणे करणेबाबत.

ठराव :

**Item No.** 10 **Resolution No.** 3048

विषय : नाशिक व अमरावती मंडळाच्या समापतींना सुविधा पुरविण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, समापती, नाशिक गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ यांचे दिमतीसाठी एक नवीन डिझेल ॲम्बासिडर गाडी खरेदी करण्यास व त्यासाठी येणाऱ्या अंदाजित खर्च रू. ३ लाख रकमेस मंजूरी देण्यात येत आहे.
२. समापती, नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ यांच्या दिमतीसाठी मागील वर्षी डिझेल कार खरेदी केलेली आहे. ती योग्य प्रकारे दुरूस्त करून समापती, अमरावती गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ यांना देण्यात यावी व मोवाड प्रकल्पाच्या कामासाठी नव्याने खरेदी केलेली डिझेल कार समापती, नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ यांना कार्यालयीन कामासाठी देण्यात यावी. तसेच बाब टिप्पणात दर्शविल्याप्रमाणे इतर सोई-सवलती नवनिर्मित अमरावती व नाशिक मंडळाच्या समापतींना देण्यास मान्यता देण्यात येते.

**Item No.** 11 **Resolution No.** 3049

विषय : इमारत क्र. ९-अ व ९-ब, वाणी चाळ, जगन्नाथ मातणकर मार्ग, फ/द विभाग, परेल-शिवडी निविदा स्विकृतीबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, इमारत क्र. ९-अ व ९-ब वाणी चाळ, जगन्नाथ मातणकर मार्ग, फ/द विभाग, परेल/शिवडी येथील इमारतीच्या संयुक्त पुनर्बांधणीसाठी मे. विरल बिल्डर्स यांची निविदा दर्शविलेल्या अंदाजित किंमतीवर म्हणजे रू. १,२८,८६,९२२/- वर ९ टक्के अधिक दराची निम्नतम निविदा स्विकारण्यात आली. त्यानुसार निविदा रक्कम ठेकेदारास वाटाघाटी केल्यानंतरची टक्केवारी मिळवून रू. १,४०,४६,७४४/- (रू.एक कोटी, चाळीस लक्ष, सेहेचाळीस हजार, सातशे चव्वेचाळीस फक्त) ह्याकरिता मंजूरी देण्यात आली. कामाच्या निविदेचा विधी ग्राह्यता काल ३०.९.१९९२ रोजी संपली म्हणून कार्यवृत्त स्थायी होण्याची वाट न पाहता कार्यवाही करावी.
तांत्रिक समितीने प्रशासकीय मान्यता रू. १०७ लक्ष करिता दिलेली आहे. निम्नतम निविदेची रक्कम रू. १४० लाख आहे म्हणून सुधारीत प्रशासकीय मान्यतेची जरुरी आहे. तेव्हा मुंबई मंडळात काम सुरु करण्यापूर्वी तांत्रिक समितीकडून योजनेस लवकरात लवकर सुधारीत प्रशासकीय मान्यता घ्यावी.

**Item No.** 12 **Resolution No.**

विषय : सन १९९२-९३ च्या अंदाजपत्रकामील मुंबई मंडळाची खर्चाची तरतुद वाढवून मिळणेबाबत.

ठराव :

**Item No.** **13** **Resolution No.** **3050**

विषय : भिवंडी येथील ४७ मध्यम उत्पन्न गट अंतर्गत बांधलेल्या गाळ्यांच्या देखभालीचा (चौकीदाराचा) खर्च देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, भिवंडी येथील ४७ मध्यम उत्पन्न गट अंतर्गत बांधलेल्या गाळ्यांच्या देखभालीच्या एकूण रू. ९६,०००/- (रू. शहाण्णव हजार फक्त) ह्या ऑक्टोबर, ८९ ते मार्च ९२ या कालखंडासाठी खर्चास मुख्य अधिकारी/कोंकण मंडळ यांनी गाळ्यांचे वाटप लवकरात लवकर करावी, या अटीवर मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** **14** **Resolution No.**

विषय : चिकणघर, कल्याण येथील ८०० अल्प उत्पन्न गटाखालील गाळ्यांची किंमत गोठविण्याबाबत.

ठराव :

**Item No. 15 Resolution No. 3051**

विषय : मुंबई उपनगर विद्युत पुरवठा कंपनीस सर्व्हे क्र. १२० मधून त्यांच्या सब-स्टेशनसाठी भूखंड देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, म्हाडाच्या मालकीची वर्सोवा, मुंबई येथील स.क्र. १२० (पैकी) रहिवाशी क्षेत्रातील २.३० हेक्टर व नो-डेव्हलपमेंट झोनमधील १.६२ हेक्टर मिळून ३.९२ हे. जमीन खालील अटी व शर्तीच्या ३० वर्षाच्या भाडेपट्टयाने देण्यास मान्यता देण्यात येते.

१) बी.एस.ई.एस.कंपनीला ३.९२ हे. जमीन आज आहे त्या स्थितीत ३० वर्षाच्या भाडेपट्टयाने दिली जाईल.

२) या जमीनीचा विकास करण्यासाठी जसे की. भरणी, पोहोचमार्ग, नाल्याची बांधणी व इतर सर्व बाह्य सुविधा या कंपनीने स्वतःच्या खर्चाचे उपलब्ध करुन द्यावयाच्या आहेत.

३) या भूखंडासाठी तात्पुरते रु. १०००/- चौ. मी. या दराने अधिमूल्य कंपनीला मुंबई मंडळाकडे एकरकमी तत्वावर भरावे लागेल. कंपनीने या जागेवरील उपलब्ध चटईक्षेत्र प्राधिकरणाकडे वर्ग करण्याची हमी द्यावी.

४) वार्षिक भाडेपट्टा, अधिमूल्याच्या १ टक्का दराने आकारण्यात येईल.

५) भूखंड विकासाबाबत मुंबई महानगरपालिकेने पत्र क्र. डीपीडब्लुएस, दिनांक १६.१.१९९२ मधील अटी व शर्तीची पूर्तता बी.एस.ई.एस.ला करावी लागेल.

६) जमिनीच्या विकासावर तसेच रस्ता, नाला व इतर बाह्य सुविधांवर बी.एस.ई.एस.कडून करण्यात येणाऱ्या खर्चाची परतफेड म्हाडाला टी.डी.आर. मिळाल्यास करण्यात येणार नाही.

७) वितरित करण्यात यावयाच्या भूखंडावरील अनुज्ञेय उर्वरित चटईक्षेत्र म्हाडाच्या अभिन्यासात वापरण्याचे किंवा या भूखंडासाठी, म्हाडासाठी टी.डी.आर. प्राप्त करून घेण्याचे संपूर्ण अधिकार म्हाडाकडे राहतील. यासाठी कोणताही मोबदला दिला जाणार नाही.

८) सुधारित विकास नियंत्रण नियमानुसार बी.एस.ई.एस. कंपनीला देऊ करण्यात आलेल्या भूखंडासाठी टी.डी.आर. प्राप्त करून घेण्याबाबत शासन व मुंबई महानगरपालिकेने घालून दिलेल्या अटी व शर्ती बी.एस.ई.एस.वर बंधनकारक राहतील.

९) भूखंड वितरणाच्या नेहमीच्या अटी व शर्ती लागू करण्यात येतील.

१०) बी.एस.ई.एस. कंपनीने तयार केलेल्या विकास आराखड्याच्या नकाशापुढे नमूद केलेल्या या जागेवरील चटईक्षेत्राचा वापर यापुढे प्राधिकरणाकडून करण्यात येईल, किंवा या भूखंडासाठी टी.डी.आर. म्हाडाला प्राप्त करून देण्यात येईल, अशी मुंबई महानगरपालिकेकडून हमी कंपनीने आणून दिली पाहिजे.

**Item No.** 16 **Resolution No.** 3052

विषय : विशेष नियोजन प्राधिकरण, सोलापूर येथील दुरुस्ती करणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाब टिप्पणीसोबतच्या परिशिष्ट (१) व (२) मध्ये नमूद केलेल्या फेरबदलास मान्यता देण्यात येते व याबाबत एस.आर.टी.पी. कायद्यानुसार पुढील कार्यवाही करण्याबाबतच्या कार्यवाहीस मान्यता देण्यात आली.

---

**Item No.** 17 **Resolution No.** 3053

विषय : सहकार क्षेत्रातील साखर कारखान्यांना घरे बांधून देण्याबाबत - अकलूज, जिल्हा सोलापूर येथे गृहनिर्माण योजना राबविणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
"बाब टिप्पणीतील परिशिष्ट (२) मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तीमध्ये कर्जपरतफेडीबाबत कारखान्यांनी बँक गॅरंटी द्यावी व त्यासाठी आस्थापना खर्च ७.५ टक्के ऐवजी ५.५ टक्के आकारण्यात यावा." ही अट समाविष्ट करून अकलूज येथे सहकारी साखर कारखाना व अकलूज येथील सहकारी संस्थांच्या कर्मचारी वर्गाकरिता गृहनिर्माण योजना प्रयोगात्मक प्रकल्प म्हणून राबविण्यास मंजूरी देण्यात येते.

---

**Item No.** 18 **Resolution No.** 3054

विषय : नागरी नूतनीकरण कार्यक्रमाखाली उपलब्ध असलेल्या अतिरिक्त गाळ्यांचे वाटप.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
१) उपलब्ध होणारे अतिरिक्त क्षेत्र मूळ भाडेकरूंना बाजारभावाने जास्तीत जास्त विकावे व त्यासाठी केवळ ९० चौ. फूट. न देता १८० चौ. फू. पर्यंत बाजारभावाने विकावे. त्याप्रमाणे १८.१२.९१ च्या शासन निर्णयामध्ये योग्य ते बदल करण्यासाठी प्रस्ताव शासनास पाठवावा. मात्र अतिरिक्त क्षेत्र दिल्यानंतर एखाद्या भाडेकरूंचे एकूण क्षेत्रफळ ६८ चौ. मीटरपेक्षा जास्त होता कामा नये.
२) याशिवाय काही गाळे राहतील, ते प्राधिकरणाने दि. २६.३.१९९२ च्या बैठकीत ठरविलेल्या बाजारभावाने शासकीय/निमशासकीय संस्थांना किंवा बँकांना देऊ करावेत.
३) यामधून काही गाळे शिल्लक राहिल्यास ते सर्वसाधारण जनतेला अतिरिक्त बाजारभावाने देऊ करण्यात यावेत.

---

**Item No.** 19 **Resolution No.** 3055

विषय : राजीव गांधी प्रकल्पांतर्गत मालकी हक्क तत्वावर राबविण्यात येणाऱ्या योजनेमध्ये नोंदणीकृत संस्थांना कार्यालयीन कामासाठी जागा देणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाब टिप्पणीमध्ये असलेल्या अटींना अधीन राहून नोंदणीकृत सहकारी संस्थेच्या कार्यालयीन कामकाजासाठी १८० चौ. फूटाचा एक गाळा, बांधकामाच्या किंमतीमध्ये देण्यात यावा. बांधकामाची किंमत संचालक, राजीव गांधी प्रकल्प ठरवतील.

**Item No.** 20 **Resolution No.** 3056

विषय : राजीव गांधी प्रकल्पांतर्गत मालकी हक्क तत्वावर राबविण्यात येणाऱ्या नागरी नूतनीकरण योजनेतील नोंदणीकृत संस्थांना थकबाकी व हप्ते वसूली करण्याकरिता उत्तेजनार्थ रक्कम देणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
सध्याची वसूली ही पुरेशी नसल्यामुळे नोंदणीकृत सहकारी संस्थेने वसूली करावी व त्या बदल्यात त्यांना उत्तेजनार्थ रक्कम द्यावी. संस्थेने ओळीने १० महिन्यांचे हप्ते व्यवस्थित भरल्यास त्यांना २ महिन्यांचे हप्ते भरावे लागणार नाहीत व ती रक्कम त्यांना इमारतीच्या देखभालीसाठी वापरता येईल. वसूली संस्थेमार्फत केल्यामुळे वसूली करणाऱ्या कर्मचाऱ्यांना खर्च कमी होईल.

**Item No.** 21 **Resolution No.** 3057

विषय : पोलीस वेल्फेअर हाऊसिंग कार्पोरेशन यांना धारावी येथील एका इमारतीची विक्री करणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाब टिप्पणीत नमूद केलेल्याप्रमाणे रु. १,५८,१६,१८२/- एकरकमी घेऊन धारावी येथील सी. सर्व्हे क्र. ३४३, कल्याणवाडी इमारत क्र. १४ ही महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळास विक्री करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** 22 **Resolution No.** 3058

विषय : महाराष्ट्र शासनाच्या स्वेच्छ निर्णयानुसार रा.गां.झो.सु. व नि.प्रकल्पाचे विकसित केलेल्या भूखंडापैकी २ टक्के भूखंडाचे आरक्षणाबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
शासनाकडे याबाबत संदर्भ करून असे कळविण्यात यावे की, भूखंड विक्रीमधून राजीव गांधी प्रकल्पाला निधी मिळणार आहे व या निधीतून या प्रकल्पाची पुढील कार्य चालू ठेवण्यास मदत मिळणार असल्यामुळे शासनाने २ भूखंड त्यांच्या अधिकारात वाटप करू नयेत, असे कळविण्यात यावे. विशेषत: राज्य शासनाने त्यांचेसाठी स्वेच्छाधीन वाटपासाठी राखीव ठेवलेले २ टक्के गाळे अथवा भूखंड अद्यापि घेतलेले नाहीत. अद्यापपावेतो निर्माण केलेल्या भूखंडाची संख्या ९ असल्यामुळे त्यांचे २ टक्के प्रमाण हे १.०८ किंवा त्यापेक्षाही कमी म्हणजे दुर्लक्षित करण्याइतपत आहे ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन सहकारी संस्थांना २ टक्के भूखंड वाटप करण्याबाबत शासनाकडून सहकारी संस्थांना देण्यात आलेले इरादापत्र मागे घेण्यात यावे, अशी शासनास विनंती करण्यात यावी. या भूखंडासह इतर भूखंडांची विक्रीसाठी जाहिरात देण्याबाबत राजीव गांधी प्रकल्पास अनुमती देण्यात यावी, असे ठरले.

**Item No.** 23 **Resolution No.**

विषय : गृहनिर्माण महाप्रकल्पाच्या दिनांक ३१.८.१९९२ पर्यंतच्या कामाचा प्रगती अहवाल.

ठराव :

**Item No.** 24 **Resolution No.** 3059

विषय : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण या संस्थेस प्राधिकरणाची सेवानिवासस्थाने भाडे तत्वावर देणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाब टिप्पणीतील परिच्छेद ३ मध्ये नमूद केलेल्या अटींवर गुलमोहर इमारतीमधील गाळा क्र. २/२७, बी.एम.आर.डी.ए. या संस्थेस भाड्याने देण्यात यावा.

---

**Item No.** 25 **Resolution No.**

विषय : चेंबूर येथील डुप्लेक्स गाळ्यांपैकी डॉ. श्रीमती मोना प्रभाकर राव यांना भाडेतत्वावर देण्यात आलेल्या गाळ्याबाबत.

ठराव :

---

**Item No.** 26 **Resolution No.**

विषय : भू-भाडे तत्वावर वांद्रे येथील जाहिरात फलक (साईन बोर्डस्) देण्याबाबत..

ठराव :

---

**Item No.** 27 **Resolution No.** 3060

विषय : शिक्षकांसाठी व इतर योजनांसाठी मुंबई मंडळाकडून जाहिरातींवर करण्यात आलेल्या खर्चाबाबत अंदाजपत्रकात तरतूद करणे व हा खर्च संबंधित कामावर लावणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाब टिप्पणीमध्ये नमूद केलेली बाब विचारात घेऊन ३.७८ लाख शिक्षकांसाठी केलेल्या व गृहनिर्माण महाप्रकल्पाच्या जाहिरातीवर रु. १५ लाख खर्च करण्यास मान्यता देण्यात येते.

---

**Item No.** 28 **Resolution No.**

विषय : गाळे हस्तांतरण नियमित करणेबाबत.
मार्गदर्शक तत्वे निश्चित करणे.

ठराव :

---

**Item No.** 29 **Resolution No.** 3061

विषय : मुंबई मंडळांतर्गत असलेले एकसर येथील गाळे भारतीय संरक्षण दलाच्या समुद्र तळ विभागास वितरित करणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाब टिप्पणीमध्ये नमूद केलेले गाळे संरक्षण दलाच्या समुद्र तळ विभागास एकरकमी किंमतीवर विक्री करण्यात यावेत. गाळ्यांच्या किंमती अध्यक्ष/प्रा. वा उपाध्यक्ष/प्रा. ठरवतील.

---

**Item No.** 30 **Resolution No.**

विषय : शासनाकडून उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्ती व पुनर्रचना योजनेअंतर्गत निधी उपलब्ध होत नसल्याने काम बंद करणे.

ठराव :

**Item No.** 31 **Resolution No.** 3062

विषय : भगवा महल मधील भाडेकरूंना संक्रमण शिबिरात निवारा देणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
भगवा महल मोडकळीस आलेली जुनी इमारत दुरुस्त होईपर्यंत त्या इमारतीमधील भाडेकरूंना पर्यायी जागा म्हणून संक्रमण शिबिरातील गाळे २ वर्षांच्या कालावधीसाठी देण्यास मान्यता देण्यात येते. प्राधिकरणाच्या आगामी बैठकीत कार्यवृत्त स्थायी करण्याची वाट न पाहता कार्यवाही करावी, असेही ठरले. तसेच बांधकामाची पूर्ण तयारी झाल्यावरच संक्रमण शिबिरातील गाळ्यांचा ताबा द्यावा व सदरहू ताबा २४ महिन्यांपेक्षा अधिक कालावधीसाठी देण्यात येऊ नये. त्याचप्रमाणे बिगर उपकर इमारतीमधील भाडेकरूंना संक्रमण शिबिरातील गाळ्यांचे वितरण करण्यापूर्वी न चुकता प्राधिकरणाची पूर्व परवानगी घ्यावी.

**Item No.** 32 **Resolution No.**

विषय : वसई येथील महाप्रकल्प गृहनिर्माणकरिता वापरण्यात येणाऱ्या व्ही. जी. शिर्के आणि कंपनीच्या '३-एस' बांधकाम पद्धतीस आय.आय.टी. पवईने सुचविलेल्या शिफारसी मान्य करण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 33 **Resolution No.**

विषय : मेसर्स युनिटी कन्स्ट्रक्शन व अब्रोड यांची गृहनिर्माण महाप्रकल्पाबाबतची प्रलंबित प्रकरणे.

ठराव :

| **Item No.** | **34** | **Resolution No.** | **3063** |
|---|---|---|---|

विषय : पोयसर येथील पोलीस गृहनिर्माण संस्थेस देण्यात आलेल्या जमिनीची किंमत कमी करणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
या विषयाबाबत सर्व सभासदांनी श्री. व्ही. के. सराफ, निवृत्त पोलीस महासंचालक यांचेशी पूर्णतया चर्चा केली व भूखंडाची किंमत कमी करून रु. २००/- प्र. चौ. फू. याप्रमाणे निश्चित करण्याचे मान्य केले. भूखंडाचे वितरण संबंधित संस्थेस औपचारिकरित्या देणे शक्य व्हावे या दृष्टीकोनातून वरील शर्तीनुसार त्यांना आवश्यक ती रक्कम भरणे शक्य व्हावी म्हणून ठराविक मुदत देण्यासाठी त्याच दिवशी पत्र पाठविण्याचे ठरविण्यात आले. रक्कम भरण्यास उशीर केल्यास त्यांना १६ टक्के प्रमाणे व्याज आकारण्यात यावे असेही ठरले. रु. १ कोटी भरल्यावर त्यांना भूखंडाचा काल्पनिक ताबा देण्यात यावा, जेणेकरून त्याबाबतचे नियोजन व बांधकामाची तयारी करता येईल. रकमेचा पूर्ण भरणा केल्यानंतर औपचारिक ताबा देण्यात यावा. पुढे असे ठरविण्यात आले की त्याप्रमाणे शासनाला कळविण्यात यावे.

| **Item No.** | **35** | **Resolution No.** | |
|---|---|---|---|

विषय : खाजगी वास्तुशास्त्रज्ञांचे व्यावसायिक शुल्क ठरविण्याबाबत.

ठराव :

**Item No. 36 Resolution No. 3064**

विषय : १) स. नं. ३८६, मुलुंड (पू) येथील क्लासिक कन्स्ट्रक्शन प्रा. लि. तर्फे राजीव गांधी प्रकल्पाच्या इमारतीची कामे.
२) सि. स. नं. ३४३, धारावी येथील नेताजी नगर, धारावी येथील सहानी कन्स्ट्रक्शन कंपनी यांचे इमारतीचे काम.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
पूर्वीच्या संचालक, रा. गां. झो. सु. व नि. प्र. यांनी सर्व्हे क्र. ३८६, मुलुंड (पू) येथील मे. क्लासिक कन्स्ट्रक्शन प्रा. लि. यांच्या कामाबाबत दि. २०.४.९२, २९.४.९२, ६.६.९२ व ३०.६.९२ रोजी बैठकीच्या कार्यवृत्तांताद्वारे दिलेल्या आदेशाचे पालन करून निर्णय घेऊ नयेत. सध्याच्या संचालक, रा. गां. झो. सु. व नि. प्र. यांनी निविदेमध्ये असलेल्या तरतुदीनुसारच कार्यवाही करावी.
प्राधिकरणाने असाही ठराव केला की, पूर्वीच्या संचालक/राजीव गांधी प्रकल्प यांनी धारावी येथील सी. सर्व्हे क्र. ३४३ वरील कामे व नेताजी नगर त्याच सी.सर्व्हे क्र. ३४३ वरील कामांबाबत दि. १०.४.९२, दि. १८.४.९२ व दि. ३०.४.९२ रोजीच्या बैठकीच्या कार्यवृत्तांताद्वारे दिलेल्या आदेशाचे पालन करून निर्णय घेऊ नयेत.
प्राधिकरण या ठरावान्वये संचालक/राजीव गांधी प्रकल्प यांना मुलुंडच्या मे. क्लासिक कंपनी यांच्या कामाबाबत मुख्य अभियंता/प्राधिकरण व मुख्य अभियंता/राजीव गांधी प्रकल्प आणि उपमुख्य अभियंता (झो. श्रे. यो.) राजीव गांधी प्रकल्प यांच्या मदतीने निविदांमध्ये असलेल्या तरतुदीनुसारच सुनावणी करण्याचे अधिकार देत आहे. अंतिम निर्णय घेण्यापूर्वी प्राधिकरणाच्या निदर्शनास ही बाब आणावी, असे ठरले. प्रकल्पाची बंद पडलेली कामे सुरू करण्यासाठी वर उल्लेख केलेल्या कंत्राटदारांनी दाखल केलेल्या न्याय प्रविष्ट प्रकरणे निकाली काढण्यासाठी नामांकित वकीलाची मदत घेण्यास प्राधिकरण मान्यता देत आहे.

**Item No. 37 Resolution No. 3065**

विषय : जागतिक बँक प्रकल्पाचे माध्यमिक शाळेसाठी भाडेपट्ट्याने देण्याकरिता दिलेल्या सात मूखंडांच्या जाहिरातीबाबत प्राधिकरणाच्या दि. १८.८.९२ च्या ११६/१८ क्रमांकाच्या बैठकीमध्ये ठेवण्यात आलेल्या प्रस्तावात सुधारणा करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
अर्जदार संस्थांच्या क्रमांक ठरविण्यासाठी पात्रतेच्या जाहिरातीत दिलेल्या अटींच्या अनुषंगाने खालील मार्गदर्शक तत्वांची अंमलबजावणी करावी. सदरहू निर्णय जाहिरात दिलेल्या ७ मूखंडांपुरताच मर्यादित राहील.

१) माध्यमिक शाळेला मूखंड वाटप करण्यात यावा. तथापि त्याबाबतचा उद्देश मूळ अर्जामध्ये स्पष्टपणे नमूद करण्यात यावा.

२) संस्थांमध्ये मराठी माध्यम असावे.

३) संस्था पंजीकृत असावी व संस्था चालवित असलेल्या शाळांपैकी एकातरी शाळा/कॉलेजला शासनाचे अनुदान प्राप्त असावे.

४अ) संस्थेमार्फत चालविण्यात येणाऱ्या शाळा/महाविद्यालयाचा वार्षिक निकाल मागील ३ वर्षांत किमान ७० टक्के असावा.

ब) जर अशा संस्था आदिवासी अनुसूचित जाती/जमाती यासाठी शाळा/कॉलेज चालवित असेल तर अशा संस्थांचा निकाल मागील ३ वर्षात ४० टक्के असावा.

क) जर अशा संस्थांमार्फत नेहमीच्या शिक्षण व्यवस्थेशिवाय तांत्रिक शिक्षण देण्यात येत असेल तर त्या संस्थेचा निकाल मागील ३ वर्षांत ५० टक्के असावा.

असे ठरविण्यात आले की, या मार्गदर्शक तत्वानुसार जागतिक बँक प्रकल्पाने जाहिरात दिलेल्या मूखंडाचे माध्यमिक शाळेसाठी वाटप करण्याबाबतची अंतिम कार्यवाही करावी. बैठकीचे कामकाज संपल्यानंतर उपस्थितांनी मा. अध्यक्ष/प्रा. यांचे आभार मानल्यानंतर बैठक संपल्याचे जाहीर करण्यात आले.

**Meeting No.** 118 **Meeting Date** 12-Oct-19

**Item No.** 26 a **Resolution No.** 3066

विषय :

ठराव : नुसार निर्णय घेतला.
सदर ठरावाचे प्रारुप दि. १२.१०.१९९२ रोजी झालेल्या बैठकीत सर्व उपस्थित सदस्यांना प्रसृत करण्यात येऊन त्याचे स्थायीकरण करण्यात आले. ठरावाचे प्रारुप खालीलप्रमाणे आहे.
बैठकीच्या विषयसूचीवरील व आयत्यावेळी विचारार्थ आलेल्या प्रस्तावावर चर्चा झाल्यानंतर उपस्थितांनी मा. अध्यक्ष/प्राधिकरण यांचे आभार मानून बैठकीचे कामकाज संपल्याचे जाहीर करण्यात आले.

**Item No.** 1 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दि. १८ सप्टेंबर १९९२ रोजी झालेल्या ११७ व्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे.

ठराव :

**Item No.** 2 **Resolution No.**

विषय : अ) मेसर्स युनिटी कन्स्ट्रक्शन व अबोड कन्स्ट्रक्शन यांची गृहनिर्माण महाप्रकल्पाबाबतची प्रलंबित करणे.
ब) मजासवाडी येथील प्रकल्पाकरिता बांधण्यात आलेल्या नाल्याचा ५० टक्के खर्च प्राधिकरणाने करण्याबाबत.
क) मेसर्स युनिटी कन्स्ट्रक्शन व अबोड कन्स्ट्रक्शन यांची गृहनिर्माण महाप्रकल्पाबाबतची प्रलंबित करणे.

गृहनिर्माण महाप्रकल्पात हस्तांतरणीय विकास हक्क (टीडीआर) चा उपयोग करण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 3 **Resolution No.**

विषय : गृहनिर्माण महाप्रकल्पाच्या कामासंबंधीच्या प्रगतीचा अहवाल.

ठराव :

**Item No.** 4 **Resolution No.**

विषय : मास हौसिंग प्रोजेक्ट/पोईसर येथील निविदांबाबत.

ठराव :

| **Item No.** | **5** | **Resolution No.** |
|---|---|---|

विषय : पवई येथील महाप्रकल्प गृहनिर्माणाकरिता वापरण्यात येणाऱ्या बी. जी. शिर्के आणि कंपनीच्या '३-एस' बांधकाम पद्धतीस आय.आय.टी. पवईने सुचविलेल्या शिफारशी मान्य करण्याबाबत.

ठराव :

| **Item No.** | **6** | **Resolution No.** | **3067** |
|---|---|---|---|

विषय : अत्यावश्यक बाब म्हणून ४,०००/- मे. टन सिमेंट अल्प मुदतीची निविदा बोलविणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
मुंबई मंडळाच्या स्तरावर मुख्य अभियंता/मुं. मं. यांनी २,००० मे. टन सिमेंट खरेदी केलेल्या कार्यवाहीस बाब टिप्पणीमध्ये नमूद केलेली परिस्थिती विचारात घेऊन कार्योत्तर मंजूर देण्यास मान्यता देण्यात येते.

| **Item No.** | **7** | **Resolution No.** |
|---|---|---|

विषय : मुंबई नागरी सुधारणा प्रकल्प.

ठराव :

| **Item No.** | **8** | **Resolution No.** |
|---|---|---|

विषय : राजीव गांधी झोपडपट्टी सुधार व निवारा प्रकल्पांतर्गत पुनर्रचित इमारतीमधील अनधिकृतपणे विक्री केलेले गाळे नियमित करण्याबाबत.

ठराव :

| **Item No.** | **9** | **Resolution No.** | **3068** |
|---|---|---|---|

विषय : डॉ. मोना प्रभाकर राव यांना टिळक नगर या वसाहतीमध्ये पर्यायी जागा म्हणून ८ जोडबंगल्यापैकी १ जोड बंगला तात्पुरता देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
तुर्त नॅशनल हौसिंग बँकेला चेंबूर येथील टिळक नगर मधील ८ जोड बंगल्याऐवजी ७ जोडबंगले विक्री तत्वावर देण्यात यावेत व त्याचप्रमाणे उच्च न्यायालयात दाखल केलेल्या सहमतीपत्राच अनुषंगाने न्यायालयाचा अवमान होऊ नये म्हणून श्रीमती मोना प्रभाकर राव यांना एक जोड बंगला भाडेतत्वावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात देण्यास मान्यता देण्यात येते. तथापि या प्रकरणाची चौकशी करण्यात यावी असे ठरले.

| **Item No.** | **10** | **Resolution No.** |
|---|---|---|

विषय : भू-भाडे तत्वावर वांद्रे येथील जाहिरात फलक (लाईन बोर्डस्) देण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 11 **Resolution No.** 3069

विषय : गाळे हस्तांतरण नियमित करणेबाबत मार्गदर्शक तत्वे निश्चित करणे.

पुनर्रचित इमारतीतील निवासी गाळ्यांची अनधिकृत हस्तांतरणे नियमित करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाब टिप्पणीसोबत जोडलेल्या मार्गदर्शक तत्वांमध्ये अ. क्र. १ मध्ये वरीलप्रमाणे सुचविण्यात आलेली दुरुस्ती करून मार्गदर्शक तत्वास मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** 12 **Resolution No.** 3070

विषय : शासनाकडून उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्ती व पुनर्रचना योजनेअंतर्गत निधी उपलब्ध होत नसल्याने कामे बंद करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
पुनर्रचित इमारतीचे संरचनात्मक दुरुस्तीसाठी जेवढा निधी उपलब्ध होऊ शकेल तेवढ्याच प्रमाणात उपकरप्राप्त इमारती दुरुस्ती व पुनर्रचनेसाठी घेण्यात याव्यात. तसेच मुंबई महानगरपालिकेकडून उपकरापोटी येणे असलेली रक्कम वसूल करण्यासाठी शासन स्तरावरून प्रयत्न करण्यात यावेत व सदर निधी इमारतींच्या दुरुस्तीसाठी प्राधिकरणास उपलब्ध करून देण्यात यावा.

**Item No.** 13 **Resolution No.**

विषय : हुडको कर्जाकरिता शासनाकडून बँक गॅरंटी मिळण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 14 **Resolution No.**

विषय : मुंबई महानगरपालिकेने गलिच्छ वस्ती सुधारणेबाबत देय असलेली रक्कम व मुंबई महानगरपालिकेकडून उपकराची रक्कम मिळणेबाबत.

ठराव :

**Item No.** 15 **Resolution No.**

विषय : कोपरी-पवई येथील शाळा व क्रीडांगणासाठी आरक्षित असलेला भूखंड ब्रट्स संघ, मुंबई या संस्थेस महाविद्यालयाकरिता वितरण करण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 16 **Resolution No.**

विषय : श्री. डी. टी. सावंत, मुख्य लेखाधिकारी/मुं. मं. यांची सेवा निवृत्तीनंतर वित्त नियंत्रक/प्राधिकरण म्हणून ५ महिन्यांसाठी कंत्राटी पद्धतीवर नेमणूक करण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 17 **Resolution No.**

विषय : संचालक, जा. बँ. प्र. व रा. गां. प्र./प्रा. यांना अधिकार प्रदान.

ठराव :

**Item No.** 18 **Resolution No.** 3071

विषय : चिकणघर, कल्याण येथील अल्प उत्पन्न गटातील गाळ्यांची किंमत गोठविणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
तूर्त १०० गाळ्यांची यथायोग्य दुरुस्ती करण्यात यावी व तळमजल्यावरील गाळ्यांची किंमत रु. ७५,०००/- व पहिल्या मजल्यावरील गाळ्यांची किंमत रु. ७०,०००/- याप्रमाणे निश्चित करून त्याप्रमाणे पुनश्च जाहिरात देऊन अर्ज मागविण्याची प्रक्रिया त्वरित कार्यवाहीत आणावी.

**Item No.** 19 **Resolution No.**

विषय : औरंगाबाद मंडळामध्ये उपमुख्य अधिकारी (भू. व प्रशासन) या नामाभिधानाने श्री. मुंढे, उपजिल्हाधिकारी यांची प्रतिनियुक्तीवर नियुक्ती करणेबाबत.

ठराव :

**Item No.** 20 **Resolution No.**

विषय : प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना लागू करण्यात आलेल्या सक्तीच्या सेवानिवृत्तीच्या योजनेची अंमलबजावणी करणेबाबत.

ठराव :

**Item No.** 21 **Resolution No.** 3072

विषय : म्हाडामार्फत गाळे विक्रीची जाहिरात देताना गाळ्यांचे जोतेक्षेत्र नक्की करण्याचे पद्धतीत सुधारणा करणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
गाळ्यांची विक्रीसाठी जाहिरात देताना व विक्रीबाबतच्या सर्व देकार व करारपत्रात गाळ्यांचे जोते क्षेत्र काढण्याच्या सध्याच्या पद्धतीमध्ये खालीलप्रमाणे दुरुस्ती करावी.

| | |
|---|---|
| १. स्टील्ट भागासाठी | ५० टक्के क्षेत्र सर्व गाळ्यांच्या जोते क्षेत्रात त्यांच्या चटई क्षेत्राच्या प्रमाणात अंतर्भाव करावा. |
| २. पॅरेपेटसह सर्वांच्या वापरण्यात येणारी गच्ची | ३३.३३ टक्के क्षेत्र सर्व गाळ्यांच्या जोते क्षेत्रात त्यांच्या चटई क्षेत्राच्या प्रमाणात अंतर्भाव करावा. |
| ३. इतर सर्वांच्या वापरण्यात येणारे बांधकाम उदा. जीना, लॉ बी, लिफ्टची जागा सोसायटी कार्यालय नोकरांसाठी प्रसाधनगृह पंप हाऊस, चौकी, इ. | १०० टक्के क्षेत्र सर्व गाळ्यांच्या जोते क्षेत्रात त्यांच्या चटईक्षेत्राच्या प्रमाणात अंतर्भाव करावा. |
| ४. बाल्कनी | गाळ्याच्या क्षेत्रफळात १०० टक्के अंतर्भाव करावा. |

जोतेक्षेत्र सुपरबिल्ट आहे असा स्पष्ट उल्लेख जागोजागी करावा.

वरील सुधारित जोतेक्षेत्र ठरविण्याची पद्धत दिनांक १.११.१९९२ पासून अंमलात आणावी. कार्यवृत्तांत स्थायी होण्यापूर्वीच असे आदेश निर्गमित करावी.

**Item No.** 22 **Resolution No.** 3073

विषय : गलिच्छ वस्ती सुधारणा कार्यक्रम -

गलिच्छ वस्त्यामंध्ये परिसर सुधारण्याचे कामाकरिता विशेष मूलभूत सुविधांसाठी कमाल खर्चाची मर्यादा ठरविणे व गलिच्छ वस्ती सुधारणा कार्यक्रमास नवीन दिशा देणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
गलिच्छ वस्ती सुधारणा कार्यक्रमांतर्गत शासनाने ठरवून दिलेल्या कमाल खर्चाच्या रु. ५००/- मर्यादा बाब टिप्पणीत निर्देशित केलेल्या विभागणीप्रमाणे व नमूद केलेल्या अटींनुसार करण्यास हरकत नाही. या निधीचा विनियोग प्राधिकरणाने गलिच्छ वस्ती सुधारणा कार्यक्रमासाठी ठरविलेल्या मार्गदर्शक सूचनांच्या अधीन राहून करण्यात यावा.

**Item No.** 23 **Resolution No.** 3074

विषय : म्हाडाच्या निविदांमधील भाववाढीच्या बदलासंबंधी शासनाचे आदेश लागू करण्यासंबंधी (एस्कलेशन)

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्र. बीडीजी-१०९१/सीआर-१२/बीएलडीजी, क्र. २, दि. १०.१.१९९२ आखाती देशात झालेल्या युद्धामुळे अचानक जी भाववाढ झाली त्यासंबंधी प्राधिकरणातील ठेकेदारांना खास सवलत देण्याबाबतचा निर्णय प्राधिकरणाने अवलंबवावा व त्यातील पृ. क्र. ६ वरील अट क्र. ३ (१०) प्रमाणे प्राधिकरणाच्या ज्या कामावर शेड्यूल "ए" वर सिमेंट स्टील गृहनिर्माण योजनांना संबंधित मुख्य अभियंत्यांनी प्रस्ताव पाठविल्यास त्यावर विचार करून प्राधिकरण निर्णय घेईल. मेसर्स अबोड कन्स्ट्रक्शन यांना यापूर्वी रु. ८/- प्रमाणे जादा वाढ आखाती युद्धामुळे देण्यात आलेली आहे. विधी सल्लागार/प्रा. यांच्या मताप्रमाणे दि. १०.१.१९९२ च्या शासन निर्णयानुसार वाढ देताना यापूर्वी अबोड कन्स्ट्रक्शन यांना देण्यात आलेली रु. ८/- ही वाढ वजा करण्यात यावी.
२) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम खाते, शासन निर्णय बीडीजी-१०९१/सीआर-१७१/बीएलडीजी-२, दिनांक १०.१.१९९२ प्राधिकरणाने १.११.१९९२ पासून अवलंबवावा व तसा उल्लेख प्रारुप निविदेत करावा.

**Item No.** 24 **Resolution No.**

विषय : म्हाडामार्फत गृहनिर्माण योजनेसाठी खाजगी वास्तुशास्त्रज्ञांना द्यावयाच्या व्यावसायिक शुल्काबाबत.

ठराव :

**Item No.** 25 **Resolution No.** 3075

विषय : हुडकोने मंजूर केलेल्या ग्रामीण गृहनिर्माण योजनेसाठी हुडकोकडून कर्ज घेण्यास प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
गृहनिर्माण व नगरविकास महामंडळ, हुडको यांनी विहित केलेल्या अटीवर बाब टिप्पणीस जोडलेल्या तक्ता 'अ' मध्ये दर्शविल्याप्रमाणे वर्धा व लातूर जिल्ह्यातील बेघर भूमिहीनांकरिता अर्थसहाय्यित ग्रामीण गृहनिर्माण योजनांसाठी हुडकोकडून एकूण रु. ७.५६ लाख कर्ज घेण्यास अनुमती व अधिकृती देण्यात येते.

**Item No.** **26** **Resolution No.** **3076**

विषय : उत्सव अग्रिमात वाढ करणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
वर्ग (३) आणि वर्ग (४) मधील कर्मचाऱ्यांना ज्यांचे वेतन रु. २०५० च्या आत आहे अशा कर्मचाऱ्यांना उत्सव अग्रिम २००/- रुपयांऐवजी ४००/- रुपये देण्यात यावा. या ठरावाचे स्थायीकरण होण्याची वाट न पाहता अंमलबजावणी करण्यात यावी.
बैठकीतील सर्व विषय संपल्यानंतर गृहनिर्माण महाप्रकल्पातील कोड क्र. ०९४ व ०९६ मधील गाळ्यांची विक्री किंमत कमी करावयाच्या विषयाबाबत सर्क्युलेशस पद्धतीने दि. १९.९.९२ रोजी निर्णय घेण्यात आला त्यानुसार प्राधिकरणाने,

**Meeting No.** 119 **Meeting Date** 21-Oct-19

**Item No.** 2 (A) & **Resolution No.**

विषय : अ) मेसर्स युनिटी कन्स्ट्रक्शन यांची गृहनिर्माण महाप्रकल्पाबाबतची प्रलंबित करणे.

मजासवाडी येथील प्रकल्पांकरिता बांधण्यात आलेल्या नाल्याचा ५० टक्के खर्च प्राधिकरणाने करण्याबाबत व जलवाहिनीचा खर्च अदा करण्याबाबत.

ब) मेसर्स युनिटी कन्स्ट्रक्शन यांची गृहनिर्माण महाप्रकल्पाबाबतजी प्रलंबित करणे.

गृहनिर्माण महाप्रकल्पात हस्तांतरणीय विकास हक्क (टी.डी.आर.) चा उपयोग करण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 1 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दि. ११८ व्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे.

ठराव :

**Item No.** 3 **Resolution No.** 3077

विषय : मुंबई मंडळाच्या वसाहतीमधील बैठ्या इमारतीतील गाळ्यांच्या विक्री योजनेची अंमलबजावणी.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, शासनाने मे, १९८७ मध्ये मंजूर केलेली बैठ्या इमारतीतील गाळ्यांची विक्री योजना मुंबई मंडळाच्या वसाहतीपुरती बाब टिप्पणीच्या सोबत जोडलेल्या जोडपत्र 'अ' मधील शासन तरतुदींनुसार खालील पूरक मार्गदर्शक सूचनांनुसार मुंबई मंडळाने राबवावी.

१) (२) विक्री किंमतीतील २० टक्के सूट : अनधिकृत रहिवाशांना विक्री किंमतीतील २० टक्के सूट (रिबेट) लागू राहणार नाही. ही २० टक्के सूट 'सिलींग कॉस्ट' वर देण्यात यावी.

२) (४) उर्वरित चटईक्षेत्र निर्देशांक : देय असलेल्या उर्वरित चटईक्षेत्र निर्देशकांची विक्री किंमत सध्याच्या बाजारभावाच्या किंमतीच्या ५० टक्के रक्कम काढून ती आकारण्यात यावी.

२) (५) उर्वरित चटईक्षेत्र निर्देशांक निश्चित करताना फक्त अनधिकृत बांधकाम ग्राह्य धरण्यात यावे.

३) (७) भाड्याची थकबाकी : अधिकृत गाळेधारक व त्याचप्रमाणे अनधिकृत गाळेधारक यांचेकडून भाड्याची थकबाकीची रक्कम पूर्णपणे वसूल करण्यात यावी. ज्यांचेकडून भाड्यापोटी नुकसान भरपाई वसूल केली जाते त्यांचेकडून नुकसान भरपाईची रक्कम पूर्णपणे वसूल करण्यात यावी. प्रमाणित भाडे अधिकृत भाडेकरूंना लागू राहील. अनधिकृत व्यक्तींकडून नुकसान भरपाईच्या थकबाकीची रक्कम पूर्णपणे वसूल करण्यात यावी. सध्या ज्या दराने भाडे/नुकसान भरपाई आकारणी करण्यात येते त्याच दराने थकबाकीची वसूली करण्यात यावी.

४) (८) ५० टक्के जादा रक्कम : विक्री किंमतीतील २० टक्के सूट सोडून व शासन पत्र दि. २८.४.१९८८ मधील सूचनांना अंमल न करता अनधिकृत गाळेधारकांना विक्री योजनेमध्ये नियमित करण्याकरिता विक्री किंमतीच्या ५० टक्के जादा रक्कम दोन समान हप्त्यांमध्ये वसूल करण्यात यावी.

५) (९) विक्री किंमतीचे हप्ते - शासनाने ठरवून दिल्याप्रमाणे २ वर्षांच्या कालावधीत २ समान हप्त्यांत गाळ्यांची पूर्ण किंमत वसूल करण्यात यावी. पूर्ण रक्कम वसूल झाल्याशिवाय बांधकामाची परवानगी/ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात येऊ नये. शासन आदेशात पहिला हप्ता भरल्यानंतर अशी परवानगी देण्यात यावी, असे आहे. याबाबत शासनास योग्य रीतीने कळविण्यात यावे.

६) (१०) योजनेत सहभाग :

जे कोणी भाडेकरू विक्री योजनेत सामील होणार नाहीत त्यांच्याबाबत चालू बाजारभावाने भाड्याचे नवीन दर आकारण्यात येतील किंवा सहकारी संस्थांना त्यांचे भाडेकरू म्हणून वर्ग करण्यात येईल.

७) (११) अधिकृत व अनधिकृत रहिवासी :

शासन निर्णयामध्ये प्रस्तावित केल्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

८) (१२) सहमती दर्शविण्याचा कालावधी :

विक्री योजनेची अंमलबजावणी मार्च, १९९३ पर्यंत पूर्ण करावी. मुंबई मंडळाच्या स्तरावर करण्यात येणाऱ्या कार्यवाहीचा आढावा मा. उपाध्यक्ष/प्रा. यांनी २ महिन्यांतून एकदा घ्यावा.

९) (१३) सहकारी संस्थांची नोंदणी आणि निर्मिती :

बाब टिप्पणीच्या सोबत जोडलेल्या जोडपत्र 'अ' मध्ये प्रस्तावित केल्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

१०) (१४) सदनिकेची विक्री करण्यास मनाई :

बाब टिप्पणीच्या सोबत जोडलेल्या जोडपत्र 'अ' मध्ये अनुक्रमांक १४ (अ) बाबतची कार्यवाही प्रस्तावित केल्याप्रमाणे करण्यात यावी. १४ (ब) बाबत नमूद केलेली शासन निर्णयाची अट लागू करणे योग्य होणार नाही. कारण की, प्राधिकरणाच्या स्तरावर अव्याहत कार्यवाही करणे अभिप्रेत नाही. कारण सहकारी संस्था/गाळे विक्री केल्यानंतर संस्थांकडून परस्पर हस्तांतरण झाल्यास त्यावर प्राधिकरणाने नियंत्रण ठेवणे शक्य होणार नाही. त्यामुळे जोडपत्र 'अ' मधील परिच्छेद 'ब' मधील अटी लागू करणे आवश्यक होणार नाही, असे ठरले. तथापि, याबाबत कार्यवाही न थांबविता ही अट वगळण्यासाठी शासनाला कळविण्यात यावे, असे ठरले.

११) (१५) नगरपालिका कर आणि इतर कर :

बाब टिप्पणीच्या सोबत जोडलेल्या जोडपत्र 'अ' मध्ये अनुक्रमांक १५ नुसार कार्यवाही प्रस्तावित केल्याप्रमाणे करण्यात यावी.

१२) (१६) सदनिकेची देखभाल आणि दुरुस्ती :

बाब टिप्पणीच्या सोबत जोडलेल्या जोडपत्र 'अ' मधील अनुक्रमांक १५ नुसार प्रस्तावित केल्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

१३) (१७) सर्वसाधारण सेवा आणि सुविधा :

बाब टिप्पणीच्या सोबत जोडलेल्या जोडपत्र 'अ' मधील

अनुक्रमांक १७ नुसार प्रस्तावित केल्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

इतर (सर्वसाधारण) :

मुंबई मंडळाने प्रस्तावित केल्यानुसार इतर (सर्वसाधारण) या परिच्छेदामधील 'अ', 'ब' ('क' नव्हता) 'ग' आणि 'ह' मध्ये नमूद केलेल्या तरतुदी लागू करण्यात याव्यात. तथापि 'ई' व 'प' मधील तरतुदी एकत्रित कराव्यात व विक्री किंमतीच्या दुप्पट अधिमूल्य अनिवासी वापरासाठी आकारावे. मात्र 'ज' मधील वटावाचा (रिबेट) प्रस्ताव अमान्य करण्यात आला.

शासन निर्णयाची अंमलबजावणी करताना काही अडीअडचणी निर्माण झाल्यास त्याबाबतचे मार्गदर्शन/सूचना करण्याचे अधिकार उपाध्यक्ष/प्रा. यांना प्रदान करण्यात यावेत, असे ठरविण्यात आले.

**Item No. 4 Resolution No.**

विषय : गृहनिर्माण महाप्रकल्पाचा दि. ३०.९.१९९२ पर्यंतचा प्रगती अहवाल.

ठराव :

**Item No. 5 Resolution No. 3078**

विषय : राजीव गांधी निवारा प्रकल्पांतर्गत नागरी नूतनीकरण योजनेखाली बांधलेल्या गाळ्यांच्या थकीत हप्त्यावर व्याज आकारणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

ज्या गाळेधारकाकडे ३ महिन्यांपेक्षा जास्त थकीत भाडे आहे अशा भाडेकरुंना ३ महिन्यांनंतरच्या भाडे थकबाकीवर १६ टक्के दराने व्याज आकारण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** 6 **Resolution No.** 3079

विषय : खाजगी जमिनीवर संयुक्त क्षेत्रातील गृहनिर्मिती प्रकल्पात म्हाडाने सहभाग घेण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाब टिप्पणीच्या परि. क्र. ५ मध्ये सुचविल्यानुसार खालील अटी व शर्तीनुसार म्हाडाच्या पुणे विभागीय मंडळाने मंत्री असोसिएशन या खाजगी विकासकांच्यामार्फत पुणे येथे खाजगी जमिनीवर राबविण्यात येणाऱ्या गृहनिर्माण योजना प्रकल्पामध्ये प्रायोगिक तत्वावर सहभाग घेण्यात यावा. त्याबाबतच्या सुधारित अटी व शर्ती खालीलप्रमाणे -
१) म्हाडा विकासक व लाभार्थी यांच्यात होणाऱ्या करारामध्ये फक्त सनियंत्रक व लवाद म्हणून काम पाहील. विकासक व लाभार्थी यांच्यात होणाऱ्या करारपत्रात म्हाडाने लवाद म्हणून दिलेले निर्णय दोघांवरही बंधनकारक असतील, अशी अट नमूद करावी.
२) हा सर्व प्रकल्प हाती घेण्यासाठी म्हाडा अधिनियम कलम २८ (२) खाली शासनाचे आदेश प्राप्त करून घ्यावेत.
३) म्हाडामार्फत प्रकल्पाचे नकाशे तपासण्यात येतील व जरूर वाटल्यास त्यामध्ये फेरफार व दुरूस्ती सुचविण्याचे अधिकार म्हाडाला असतील.
४) लाभार्थी व विकासक यांच्यात होणारे करारपत्र म्हाडाने नियुक्त केलेल्या अधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीने करण्यात येतील, तसेच टप्प्याटप्प्यामध्ये लाभार्थीकडून हप्ता भरण्याची कार्यवाही म्हाडाच्या पुणे विभागीय मंडळाच्या सक्षम अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत करण्यात यावी.
५) प्रकल्प राबविण्याच्या वेगवेगळ्या टप्प्यामध्ये म्हाडामार्फत तांत्रिक सल्ला जरूर वाटल्यास दिला जाईल व म्हाडाचा सहभाग सनियंत्रक व लवाद म्हणून सिमित राहील.
६) प्रकल्पाची जाहिरात विकासकामार्फत दिली जाईल. परंतु प्रकल्पाची छाननी म्हाडाच्या मदतीने करण्यात आली आहे, असा उल्लेख करण्यात येईल.
७) वरीलप्रमाणे दिलेल्या सहकार्याबाबत म्हाडाला २ टक्के एजन्सी चार्जेस विकासकामार्फत ठरवून दिलेल्या टप्प्यानुसार द्यावे लागतील. श्री. भंडारी यांनी असे प्रतिपादिले की, लवादाची भूमिका स्वीकारताना म्हाडाने २ टक्के चार्जेस घेऊ नयेत.
८) या प्रकल्पामध्ये म्हाडामार्फत कोणतीही आर्थिक गुंतवणूक अथवा विकासक व लाभार्थी यांना इतर कोणतीही हमी देता येणार नाही.
वरील प्रकल्पात आलेला अनुभव लक्षात घेता अशा प्रकारच्या प्रकल्पामध्ये प्राधिकरणाने यापुढे सहभागी होण्याविषयीचे धोरण म्हाडामार्फत ठरविण्यात येईल आणि या प्रकल्पात पुणे मंडळाने केवळ प्रायोगिक तत्वावरच सहभाग घ्यावा व या संबंधीचे जरूर ते करारपत्र विधी सल्लागार/प्रा. यांच्यामार्फत तयार करून घ्यावेत. वरील अट क्र. २ नुसार शासनाचे आदेश प्राप्त करून घेण्याबाबत शिफारस करावी, असे ठरविण्यात आले.

**Item No.** 7 **Resolution No.**

विषय : डॉ. बाबासाहेब आंबेडकर रिसर्च इन्स्टिट्यूटला जागा मिळणेविषयी नालंदा चॅरिटेबल ट्रस्ट यांची विनंती.

ठराव :

**Item No. 8 Resolution No. 3080**

विषय : म्हाडामार्फत गृहनिर्माण योजनांसाठी खाजगी वास्तुशास्त्रज्ञांना द्यावयाच्या व्यावसायिक शुल्काबाबतचा सुधारित प्रस्ताव.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

म्हाडामार्फत गृहनिर्माण (निवासी), व्यावसायिक, कार्यालयीन व अशा प्रकारच्या योजनांसाठी खाजगी वास्तुशास्त्रज्ञांचे व्यावसायिक शुल्कासाठी प्रस्ताव 'अ' व प्रस्ताव 'ब' सोबत परिशिष्ट - ३ प्रमाणे मंजूर करण्यात आला व त्याप्रमाणे खाजगी वास्तुशास्त्रास व्यावसायिक शुल्क देण्याबाबत सर्व विभागीय मंडळांनी सदर प्रस्ताव अंमलात आणावा, असे ठरविण्यात आले.

व्यावसायिक शुल्क वेगवेगळ्या कामाच्या टप्प्यानुसार द्यावयाचे असून वेगवेगळे टप्पे खालीलप्रमाणे असावेत, असे ठरले.

टप्पा क्र. १ : सर्वेक्षण, जमिनीची चाचणी, प्रकल्प नियोजनाचे प्राथमिक
———— आराखडे (स्केच डिझाईन) तयार करणे.

टप्पा क्र. २ : स्थानिक प्राधिकरणाकडे नकाशे सादर करणे व प्रकल्पासाठी
———— प्रशासकीय मंजूरी मिळविणे.

टप्पा क्र. ३ : वर्कींग ड्रॉईंग, तपशीलवार अंदाजपत्रक, आर.सी.सी.
———— डिझाईन, तांत्रिक मंजूरी व स्थानिक प्राधिकरणाची मंजूरी मिळविणे.

टप्पा क्र. ४ : निविदा मागविण्याचा मसुदा व त्याबरोबर आवश्यक ते
———— आराखडे करणे, कंत्राटदार ठरविण्यास मंडळास जरूर ती मदत करणे.

टप्पा क्र. ५ : प्रकल्पाचे बांधकाम चालू असताना नियतकालिक
———— (पिरीऑडिकल) देखरेख किंवा प्रकल्पाचे बांधकाम चालू असताना दैनंदिन देखरेख व प्रकल्प व्यवस्थापन समंत्रकाप्रमाणे संपूर्ण देखरेख करणे.

वरील प्रस्ताव दुरुस्ती व पुनर्रचनेसाठी लागू होणार नाही, असे ठरविण्यात आले.
प्रकल्पाचे स्वरूप, आकारमान व व्याप्ती व त्यासाठी लागणारे व्यावसायिक वास्तुशास्त्रीय सेवा इ. बाबी विचारात घेता वरील शुल्क आकारणी वेळोवेळी सुधारणा करण्याचे अधिकार उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी/प्रा. यांना प्रदान करण्यात येत आहेत.

खाजगी वास्तुशास्त्रांबरोबर करावयाच्या कराराचा मसुदा विधी सल्लागार/प्रा. यांच्या सल्ल्याने मुख्य अभियंता/प्रा. यांनी तयार करून सर्व विभागीय मंडळास पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावा, असे ठरविण्यात आले.

| **Item No.** | **9** | **Resolution No.** | **3081** |
|---|---|---|---|

विषय : कोपरी/पवई येथे शाळा क्रीडांगणासाठी आरक्षित असलेला भूखंड बंटस् संघ, मुंबई या संस्थेस वितरण करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
कोपरी/पवई येथील मुंबई मंडळाच्या महाप्रकल्प गृहनिर्माण योजनेच्या मंजूरी प्राप्त आराखड्यामध्ये शाळा व क्रीडांगणासाठी आरक्षित असलेले अनुक्रमे ३,००० चौ. मी. व ४००३ चौ. मी. आकारमानाच्या भूखंडाचे वाटप शासनाच्या दिनांक १६.३.१९९२ च्या आदेशाप्रमाणे महाविद्यालयाऐवजी बंटस् संघ, मुंबई या संस्थेने विनंती केल्यानुसार शाळा व क्रीडांगणासाठी ३० वर्षाच्या भाडेपट्ट्याने प्राधिकरणाच्या नेहमीच्याच अटी व शर्तीवर करण्यात यावे. त्यासाठी प्राधिकरणाच्या सुधारित किंमतविषयक धोरणानुसार माध्यमिक शाळेच्या भूखंडासाठी चालू निवासी बाजारभावाच्या १५ टक्के दराने अधिमूल्य व अधिमूल्याच्या ५ टक्के याप्रमाणे प्रतिवर्षी भाडेपट्टी व क्रीडांगणाच्या भूखंडासाठी निवासी बाजारभावाच्या १० टक्के अधिमूल्य व अधिमूल्याच्या ५ टक्के याप्रमाणे प्रतिवर्षी भाडेपट्टी आकारावी. तसेच शासनाच्या आदेशामध्ये महाविद्यालयाऐवजी शाळा व क्रीडांगण असा बदल करण्यासाठी शासनास विनंती करणे.

| **Item No.** | **10** | **Resolution No.** | |
|---|---|---|---|

विषय : संत तुकाराम नगर, पिंपरी येथील आर. ए. एज्युकेशन सोसायटीस दिलेल्या जागेप्रित्यर्थ भरलेल्या रकमेतील नफ्याची रक्कम माफ करणेबाबत.

ठराव :

| **Item No.** | **11** | **Resolution No.** | **3082** |
|---|---|---|---|

विषय : मुख्य लेखाधिकारी, मुंबई मंडळ या पदाची वाढविण्यात आलेली वेतनश्रेणी त्या त्या पदाच्या मूळ वेतनश्रेणीत आणण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
१. मुख्य लेखाधिकारी, मुंबई मंडळ या पदाची प्राधिकरणाच्या दिनांक २५.४.१९८९ च्या ठराव क्र. १५५२ अन्वये रु. ३७००-५००० एवढी वाढविण्यात आलेली वेतनश्रेणी त्या पदाच्या रु. ३०००-४५०० या मूळ वेतनश्रेणीत आणण्यास मान्यता देण्यात येते.
२. वरीलप्रमाणे बदल करण्याची कार्यवाही दि. १५.१०.१९९२ पासून पूर्वलक्षी प्रभावाने करण्यात यावी.
३. याबाबत शासनाची मान्यता घेण्यात यावी.

| **Item No.** | **12** | **Resolution No.** | **3083** |
|---|---|---|---|

विषय : प्राधिकरणातर्फे राबविण्यात येणाऱ्या चांदिवली येथील गृहनिर्माण महाप्रकल्पाच्या टप्पा क्र. २ च्या कामाचे कार्यादेश देण्याबाबत.

ठराव : अबोड कन्स्ट्रक्शन कंपनी यांना हे काम ३३८/- रुपये प्रति चौ. फूट (जोते क्षेत्रफळ) दराने देण्याचे व दरवाढ नोव्हेंबर, १९९२ पासून देण्याचे ठरविण्यात आले. तसेच जी सखोल चर्चा झाली त्याचे सविस्तर इतिवृत्तही रेकॉर्डवर ठेवावे, असे ठरविण्यात आले.

**Item No.** 13 **Resolution No.**

विषय : प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना दिनांक १ जुलै, १९९१, १ जानेवारी, १९९२ तसेच १ जुलै, १९९२ पासून सुधारित दराने महागाई भत्ता देण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 14 **Resolution No.** 3084

विषय : प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना सन १९९१-९२ या वित्तीय वर्षासाठी तदर्थ बोनस देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
दीपावलीचा सण जवळ आल्यामुळे प्रथम प्राधिकरणाच्या स्तरावर शासनाच्या आदेशातील अटी व शर्तीच्या अधीन राहून प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना बोनस मंजूर करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तथापि याबाबतच्या कार्योत्तर मंजूरीसाठी शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात यावा, असे ठरविण्यात आले.

**Item No.** 15 **Resolution No.** 3085

विषय : महाराष्ट्र राज्यात 'ब' व 'क' वर्ग नगरपरिषदा/नगरपालिका/ग्रामपंचायी असलेल्या छोट्या शहरात म्हाडामार्फत गृहनिर्माण योजना हाती घेण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाब टिप्पणीच्या परिच्छेद क. (२) मधील शासनाने सुचविलेल्या पर्यायी योजना शासनाकडून अपेक्षित मदतीबाबत परिच्छेद (३) मध्ये सुचविल्याप्रमाणे हमी मिळाल्यावर हाती घेण्यात यावी. परिच्छेद (४) मध्ये सुचविलेल्या कार्यवाहीस मान्यता देण्यात यावी. म्हाडाने एजन्सीस चार्जेस म्हणून एकुण योजनेच्या किंमतीच्या २ ते ५ टक्के आकारणी सहकारी संस्थेकडून वसूल करावी. मात्र प्रकल्प नियोजन, स्थानिक संस्थांची मंजूरी व लाभार्थींना कर्जवाढ करण्याचे सर्व अधिकार उपाध्यक्ष/प्रा. यांना प्रदान करण्यात येत आहेत. सदर ठराव शासनास स्वयंस्पष्ट अहवाल पाठवून त्यास शासनाची मंजूरी मिळवावी.

**Item No.** 16 **Resolution No.** 3086

विषय : भू-संपादन/म्हाडा अधिनियमांतर्गत संपादित अगर नागरी जमीन कमाल धारणा कायद्यांतर्गत अतिरिक्त घोषित होऊन म्हाडास प्राप्त झालेल्या जमिनीवरील अनधिकृत बांधकामे नियमित करून घेण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, प्राधिकरणाच्या दि. ११.१२.१९९१ च्या १०६ व्या बैठकीमध्ये बाब क्रमांक १०६/७ अन्वये घेतलेल्या उप-समितीच्या गठनाबाबतचा निर्णय रद्द करून त्याऐवजी अशा प्रकारची प्रकरणे उपाध्यक्ष/प्रा. यांच्या शिफारशीनुसार प्राधिकरणाच्या निर्णयासाठी सादर करण्यात यावीत.

**Item No.** 17 **Resolution No.** 3087

विषय : पुणे, नाशिक व अमरावती गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या कार्यालयासाठी नवीन वाहने खरेदी करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
पुणे व नाशिक मंडळातील बाब टिप्पणीत नमूद केलेली जुनी वाहने निर्लेखित करून त्याऐवजी पुणे मंडळासाठी एक नवीन डिझेल कार खरेदी करण्यास मान्यता देण्यात येते व त्यासाठी येणाऱ्या खर्चासही मान्यता देण्यात येते.
जुनी वाहने निर्लेखित करून त्याऐवजी बदली नवीन वाहने खरेदी करण्याचा अधिकार उपाध्यक्ष/प्रा. यांना देण्यात यावेत. तथापि पूर्णपणे नवीन वाहने खरेदी करण्याच्या प्रस्तावास प्राधिकरणाची मंजूरी घ्यावी, असे ठरले.
वाहनांची खरेदी मान्यता प्राप्त एजन्सीकडून करण्यात यावे, असे ठरविण्यात आले.

**Item No.** 18 **Resolution No.** 3088

विषय : बिलावर असोसिएशन यांना शिधा वाटप कार्यालय, सांताक्रुझ लगतचा रिकामा भूखंड कम्युनिटी हॉलच्या बांधकामासाठी वितरण करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाब टिप्पणीत प्रस्तावित केल्याप्रमाणे शिधावाटप कार्यालय वगळता उर्वरित भूखंड बिलावर असोसिएशन, मुंबई या संस्थेस प्राधिकरणाच्या प्रचलित अटी व शर्तीस अधीन राहून म्हाडा अधिनियम १९८६ (जमीन वाटप) मधील विनियम १६ (२) अन्वये प्राधिकरणाच्या किंमत विषयक धोरणानुसार अधिमूल्य रक्कम व अग्रिम, वार्षिक भाडेपट्टा, रक्कम भरण्याविषयीचे पत्र वितरण करण्यात येईल व सदरहू रक्कम प्राप्त झाल्यानंतर जागेचा प्रत्यक्ष ताबा देण्याविषयीची कार्यवाही करण्यात येईल.
बैठकीच्या विषयसूचीवरील व आयत्यावेळी प्राधिकरणाच्या विचारार्थ सादर करण्यात आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेतल्यानंतर उपस्थितांनी मा. अध्यक्ष/प्रा. यांचे आभार मानल्यानंतर बैठकीचे कामकाज संपल्याचे जाहीर केले.

**Meeting No.** **120** **Meeting Date** **16-Nov-1**

**Item No.** **1** **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दि. २१-१०-१९९२ रोजी झालेल्या ११९ व्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे.

ठराव :

**Item No.** **2** **Resolution No.** **3089**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणातील उपमुख्य अभियंता या संवर्गातील प्रत्यार्पित करण्यात आलेली दोन पदे पुनर्जिवित करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
जागतिक बँक प्रकल्प व नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या आस्थापनेवरील उपमुख्य अभियंता संवर्गातील २ पदे प्रत्यार्पित करण्याचा प्राधिकरणाचा दिनांक १४.५.१९९२ चा ठराव क्रमांक २०८० रद्द करून ही दोन्ही पदे पुन्हा पुनर्जिवित करण्याबाबत केलेल्या कार्यवाहीस कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे.

**Item No.** **3** **Resolution No.** **3090**

विषय : प्राधिकरणांतर्गत स्वतंत्र उद्यान विभाग तयार करणे व त्यासाठी आवश्यक असणाऱ्या कर्मचारी वर्गाबाबत प्राधिकरणाने केलेला ठराव रद्द करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
प्राधिकरणांतर्गत स्वतंत्र उद्यान विभाग तयार करण्याचा प्राधिकरणाचा ठराव क. २०५७, दिनांक २३.४.१९९२ चा निर्णय रद्द करण्यात येऊन प्राधिकरणाच्या वसाहतीमध्ये उद्यान विकसित करणे, झाडे लावणे इ. कामे अशा वसाहतीमध्ये इतर मूलभूत सोयी पुरविण्याचे काम पूर्ण होण्यापूर्वीच हाती घेण्याच्या सूचना प्रादेशिक मंडळाच्या मुख्य अधिकाऱ्यांना देण्यात याव्यात व ही अट कामाच्या निविदेमध्ये देखील अंतर्भूत करण्यात यावी.

**Item No.** **4** **Resolution No.** **3091**

विषय : सेवेत असताना दिवंगत झालेल्या वैद्यकीयदृष्ट्या अपात्र ठरल्याने अकाली सेवानिवृत्त केलेला अथवा बेपत्ता कर्मचाऱ्यांना वारसदारांना अनुकंपा योजनेअंतर्गत नेमणूक देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
प्राधिकरणाचा ठराव क्रमांक १२५६, दिनांक ११.८.१९८६ रद्द करण्यात येऊन अनुकंपा योजनेअंतर्गत प्राप्त झालेल्या अर्जाची प्रशासकीय छाननी करून उपाध्यक्ष/प्रा. यांना निर्णय घेण्याबाबत पूर्ववत अधिकार प्रदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** 5 **Resolution No.** 3092

विषय : प्राधिकरणाने अधिकारी/कर्मचारी यांना वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती दरवर्षी रु. १,२००/- याप्रमाणे करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
महाराष्ट्र गृहनिर्माण कर्मचारी संघटनेच्या मागणीनुसार महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळ, वैद्यकीय लाभ योजना नियमावली १९६८, खंड (४) अनुसार प्राधिकरणाच्या अधिकारी/कर्मचारी यांना मिळणारी वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीची वार्षिक रु. ५००/- ची मर्यादा वाढवून सन १९९२-९३ या वित्तीय वर्षापासून रु. ९००/- याप्रमाणे वाढ करण्यास मान्यता देण्यात येत आहे. त्याचप्रमाणे वैद्यकीय नियमावली १९६८ खंड ६ अन्वये गंभीर आजारासाठी मिळणारी वैद्यकीय लाभ योजना प्राधिकरणाच्या दिनांक २२.४.१९९१ च्या आदेशासोबतच्या सहपत्र 'अ' मधील मार्गदर्शक तत्वाच्या अधीन राहून यापुढेही तशीच चालू ठेवण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** 6 **Resolution No.** 3093

विषय : महाराष्ट्रातील वास्तव्याबाबत द्यावयाचा दाखला तहसीलदार/महसूल अधिकारी यांच्याकडून प्राप्त करून घेण्यास इच्छुक अर्जदारांना येणाऱ्या अडचणीबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या जागतिक बँक प्रकल्पाव्यतिरिक्त विभिन्न गृहनिर्माण योजनेखाली गाळे/विकसित भूखंड याकरिता अर्ज करणाऱ्यांना प्राधिकृत महसूल अधिकाऱ्यांना दाखला सादर करणे शक्य न झाल्यास १५ वर्षे वास्तव्य ज्याद्वारे सिद्ध होऊ शकेल, असे खालील पर्यायी पुरावे यापैकी एक पुरावा अर्जासोबत सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१. जे अर्जदार महाराष्ट्रातील शासकीय विभाग, निमशासकीय संस्था, स्थानिक प्राधिकरणे, शासकीय उपक्रम, सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, कंपनी कायद्याखाली नोंदणी करण्यात आलेल्या संस्था, नोंदणीकृत विश्वस्त संस्था, सर्व बँका, नोंदणीकृत सहकारी उत्पादक संस्था, नोंदणीकृत सहकारी खरेदी-विक्री संघ, इ. ठिकाणी नोकरीचा सेवाकाल १५ वर्षापेक्षा जास्त असेल अशा नियोक्तांकडून नेमणुकीचा दिनांक दर्शविणारा दाखला.

किंवा

२. सलग १५ वर्षे वास्तव्य दाखविता येणारे शिधावाटप पत्रिकेचा पुरावा.

किंवा

३. १५ वर्षापासून महाराष्ट्र राज्यातील बँकेत बचत खात्यात सतत ठेवी असल्याबाबतचा बँकेचा दाखला,

किंवा

४. १५ वर्षापूर्वीपासूनच चालू असलेले ड्रायव्हिंग लायसन्स, पासपोर्ट, विम पॉलिसी इ. पुरावे,

किंवा

५. गलिच्छ वस्तीत रहात असल्यास १९७५ साली देण्यात आलेल्या फोटोपासचा पुरावा.

किंवा

६. तलाठी किंवा ग्रामसेवक यांनी दिलेल्या वास्तव्याबाबचा दाखला

किंवा

७. मतदान यादीमधील पुरावा जेणेकरून अर्जदार यांचे १५ वर्षांचे वास्तव्य सिद्ध होईल,

किंवा

८. एखाद्या कागदोपत्री पुरावा ज्यामुळे संबंधित मुख्याधिकारी/संचालक यांचे समाधान होऊ शकेल.

**Item No. 7 Resolution No. 3094**

विषय : म्हाडाच्या जमिनीच्या किंमतीविषयक धोरणात व गाळ्यांची किंमत निश्चित करताना आकारावयाच्या नफ्याबाबतचे धोरणात सुधारणा करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

१. म्हाडामार्फत बांधलेल्या गाळ्यांच्या किंमती निश्चित करताना आकारावयाच्या नफ्याबाबतचे धोरण सोबत परिशिष्ट ४ प्रमाणे व जमिनीच्या किंमतीविषयक धोरण परिशिष्ट क. ५ अनुसार अंमलात आणावे.

२. बांधलेल्या गाळ्यांसाठी नफ्याचे टक्केवारी प्रत्यक्ष बांधकाम, जमीन व जमीन विकासावरील करण्यात आलेल्या खर्चावर वसूली करावी व आस्थापना खर्चही वसूल करावा. आस्थापना खर्चावर नफ्याची टक्केवारी आकारण्यात येऊ नये. तसेच गाळ्यांची किंमत निर्धारित करीत असताना अनपेक्षित खर्च (अनफोरसिन लायबिलिटी) १ टक्का दराने वसूल करून त्याचा वेगळा फंड निर्माण करावा, यावर नफा, व्याज इ. आकारण्यात येऊ नये.

३. गाळे वितरण करताना वसूल करावयाची निर्गमित रक्कम सोबत परिशिष्ट क. ४ मधील रकाना ९ प्रमाणे ठेवण्यात यावी व ही रक्कम रु. १,०००/- ते १०,०००/- पेक्षा जास्त आकारण्यात येऊ नये.

४. गाळा विक्री किंमतीची वसुली, एकरकमी विक्री तत्वावरील गाळ्यांची विक्री किंमत देकार पत्राच्या दिनांकापासून ३० दिवसांचे आत पूर्णपणे एकरकमी भरण्यास विक्री किंमतीच्याी १ टक्का इतका वटाव (रिबेट) देण्यात यावे. तसेच एकरकमी विक्री तत्वावरील गाळ्यांची विक्री किंमत भरण्यासाठी मुदतवाढ द्यावयाची झाल्यास ती खालील अटींवर देण्यात यावी.

अ) गाळ्यांच्या किंमतीच्या २५ टक्के रक्कम वितरण देकार पत्र निर्गमित केल्यापासून ३० दिवसांचे आत भरणे आवश्यक आहे. न भरल्यास गाळ्यांचे वितरण देकार पत्र रद्द करावे.

ब) गाळ्यांच्या किंमतीचा सुरुवातीचा २५ टक्के हप्ता भरल्यानंतर उर्वरित ७५ टक्के गाळा विक्री रक्कम जास्तीत जास्त १८ महिन्यांचे कालावधीत ६-६ महिन्यांच्या ३ समान हप्त्यात भरण्याची सवलत द्यावी. त्यासाठी सरसकट १६ टक्के दराने व्याज आकारण्यात यावे. सहा महिन्यांचा हप्ता भरण्यास विलंब झाल्यास नंतरच्या विलंबाच्या कालावधीसाठी २४ टक्के दराने विलंबित रकमेवर (डिलेड पेमेंट) व्याज आकारण्यात यावे. अशा प्रकारे तीन हप्त्यांत उर्वरित रक्कम ७५ टक्के विक्री किंमत भरण्याची सवलत दिली असली तरी गाळ्यांची विक्री किंमत व त्यावरील व्याज पूर्णपणे वसूल केल्याशिवाय लाभार्थीस गाळ्यांचा ताबा देण्यात येऊ नये. माभ लाभार्थीस वित्त संस्थेकडून कर्ज प्राप्त होण्याकरिता लागणारे 'ना-हरकत' प्रमाणपत्र (ऑक्युपेसी मॉर्टगेज सर्टिफिकेट) देण्यास हरकत राहणार नाही. वरील तीन पैकी कोणत्याही हप्त्यात हप्ते भरण्यास ६ महिन्यांपेक्षा अधिक कालावधीचा विलंब झाल्यास गाळा मिळण्याचा हक्क संपुष्टात येऊन त्याने प्रथम भरलेला हप्ता (२५ टक्के) अनामत रकमेसह जप्त (फोरफीट) करण्यात यावी व बाकीची रक्कम असल्यास बिनव्याजी परत करण्यात यावी.

५. शैक्षणिक संस्था उदा. बालवाडी, प्राथमिक शाळा, महाविद्यालये म्हणजे परिशिष्ट ५ मधील अ. क्र. ३-अ, ब, क येथे सुचविलेल्या वापराबाबत अधिमूल्याचा भरणा करण्यासाठी काही जास्त कालावधी देणे जरुरीचे वाटते. आजच्या पद्धतीनुसार

अधिमूल्याची अर्धी रक्कम १५ दिवसांचे आत भरावी लागेल व उर्वरित रक्कम १ महिन्यात भरावी लागेल. त्यानंतर ६ महिन्यांचा कालावधी वाढवून देऊन १२ टक्के दराने व्याज आकारण्यात यावे, यामध्ये खालीलप्रमाणे सुधारणा सुचविण्यात येत आहेत.

६. अधिमूल्याची संपूर्ण रक्कम पहिला हप्ता सहा महिन्यांत २५ टक्के अधिमूल्य भरल्यानंतर २ वर्षांच्या कालावधीत वेगवेगळ्या हप्त्यांमध्ये वसूल करावी व ६ महिन्यांच्या कालावधीनंतरच्या हप्त्यामध्ये १६ टक्के दराने व्याज आकारावे. संपूर्ण रक्कम इमारतीला स्थानिक संस्थांकडून 'ऑक्युपेशन सर्टिफिकेट' देण्यापूर्वी वसूल करावी. त्यासाठी स्थानिक संस्थांना योग्य ती अट कळवावी. संपूर्ण रक्कम वसूल होईपर्यंत भूखंडाचा प्रत्यक्ष ताबा न देता अधिमूल्याचा पहिला हप्ता वसूलीनंतर मंडळाच्या मुख्याधिकाऱ्यांनी भूखंडावर संस्थेस इमारत बांधण्याबाबत ना-हरकत प्रमाणपत्र योग्य अटी व शर्तीवर द्यावे व संपूर्ण रक्कम २ वर्षांत वसूल झाल्यावर भूखंडाचा रीतसर ताबा संस्थेस द्यावा व त्याची नोंद मालमत्ता उताऱ्यामध्ये घेण्याबाबत ना-हरकत पत्र संस्थेस द्यावे. या सुधारित पद्धतीमुळे अशा प्रकारच्या संस्थांना एक तर सवलतीचे दर लागू होतील व मोठ्या आकारमानाचा हा भूखंड व त्यावरील संपूर्ण रक्कम भरण्यास कालावधी मिळू शकेल.

७. सोबत परिशिष्ट ५ मधील अ. क्र. १ (निवासी वापर) साठी भूखंडाच्या वितरणामध्ये एकूण अनुज्ञेय बांधकामाचे १० टक्के बांधकाम/गाळे तळमजल्यावर (संपूर्ण इमारती स्टिल्टवर असल्यास पहिल्या मजल्यावर) बांधकाम म्हाडाला प्रत्यक्ष बांधकाम खर्चाच्या दराने हस्तांतरण करण्याची अट असावी. म्हाडामार्फत असे बांधकामाच्या वितरणाबाबत स्वतंत्र धोरण सादर करण्यात येईल. ही अट फक्त ५०० चौ. मी. वरील मोठ्या आकाराच्या भूखंडांना असावी. १० टक्के बांधकामाची वरील अट फक्त मुंबई शहरापुरतीच व निवासी वापराखालील भूखंडांसाठीच मर्यादित ठेवण्यात यावी.

८. अधिमूल्याचा दर हा भूखंडाच्या क्षेत्रफळावर न आकारता अशा भूखंडावर अनुज्ञेय एकंदर बांधकामाच्या क्षेत्रफळावर (चटई निर्देशांक) आकारण्यात यावा.

९. अ) वार्षिक भाडेपट्ट्याने भांडवलीकरण खालील पद्धतीवर आकारण्यात यावे.

ब) भाडेपट्ट्याचा सुचविण्यात आलेल्या दरानुसार वार्षिक भाडेपट्ट्याच्या रकमेवर ८ टक्केप्रमाणे भांडवलीकरण रक्कम खालील दरानुसार काढण्यात यावी.

क) वार्षिक भाडेपट्ट्याच्या दरानुसार वार्षिक भाडेपट्टा गुणिले १०० भागिले ८ बरोबर भांडवलीकरणाची रक्कम. ही रक्कम अधिमूल्यासोबत वसूल करण्यात यावी व त्यानंतरच नाममात्र १ रुपया वार्षिक भाडेपट्टा आकारण्यात यावा.

१०. सहकारी गृहनिर्माण संस्थांना वितरित करावयाच्या भूखंडाचे किंमती विषयक धोरण वेगवेगळ्या मासिक उत्पन्नातील गट तसेच गाळे व त्याचे क्षेत्रफळानुसार सुचविण्यात आले आहे. मात्र ज्या भूखंडावर वेगवेगळ्या प्रकरची घरे व उत्पन्न गट संमिश्र होत असतील अशा भूखंडासाठी त्या त्या प्रमाणात अधिमूल्याचा दर आकारण्यात यावा. म्हणजेच छोट्या व मोठ्या आकारमानाचे भूखंड/गाळे व एकाच सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या भूखंडावर प्रस्तावित असल्यास अधिमूल्याचा दर अशा गाळ्यांच्या व मासिक उत्पन्नातील गट व त्यानुसार सुचविण्यात आलेल्या दराने त्या प्रमाणात वसूल करावा.

११. म्हाडाच्या गाळ्यांची वरीलप्रमाणे सुचविलेली किंमत निश्चित करताना

आकारावयाच्या नफ्याबाबतचे धोरण मुंबई शहरात राबविण्यात येत असलेल्या गृहनिर्माण महाप्रकल्पास लागू करण्यात येऊ नये.

१२. म्हाडाचे जमिनीच्या किंमतीविषयक धोरण तसेच वरीलप्रमाणे सुचविलेल्या अटी व शर्ती डिसेंबर, १९९२ नंतर लागू करण्यात याव्यात, तसेच ज्या भूखंडांचा अजूनही प्रत्यक्षात ताबा देण्यात आलेला नाही अशा सर्व भूखंडांना वरील धोरण लागू करण्यात यावे.

**Item No.** 8 **Resolution No.**

विषय : फिल्म रायटर्स असोसिएशन, मुंबई या संस्थेच्या कार्यालयासाठी जागा किंवा भूखंड देण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 9 **Resolution No.**

विषय : अ) मजासवाडी येथील प्रकल्पाकरिता बांधण्यात आलेल्या नाल्याचा ५० टक्के खर्च प्राधिकरणाने करण्याबाबत.
ब) गृहनिर्माण महाप्रकल्पात हस्तांतरित विकास हक्काचा (टी.डी.आर.) उपयोग करणेबाबत.

ठराव :

**Item No.** 10 **Resolution No.**

विषय : मुंबई शहरातील गाळ्यांच्या किंमती निश्चित करताना आकारावयाच्या नफ्याबाबत.

ठराव :

**Item No.** 11 **Resolution No.** 3095

विषय : डॉ. बाबासाहेब आंबेडकर रिसर्च इन्स्टिट्यूटला जागा मिळण्याविषयी नालंदा चॅरिटेबल ट्रस्ट यांची विनंती.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
विजय नगर, वांद्रे येथील इमारत क्र. ४ व ५ जवळील सुमारे ३६२.६३ चौ. मी. आकारमानाच्या भूखंडाचे वाटप नालंदा चॅरिटेबल ट्रस्ट या संस्थेस डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मरणार्थ लायब्ररी व रिसर्च इन्स्टिट्यूटसाठी ३० वर्षांच्या भाडेपट्ट्याने प्राधिकरणाच्या नेहमीच्या अटी व शर्तीच्या अधीन राहून करण्यास मान्यता देण्यात येते. त्यासाठी अधिमूल्य म्हणून प्राधिकरणाच्या जमिनीच्या किंमत विषयक धोरणानुसार जमिनीच्या प्रत्यक्ष किंमत व तिच्या विकासावरील खर्च एवढी रक्कम व या अधिमूल्याच्या १ टक्का एवढी रक्कम वार्षिक भाडेपट्टी म्हणून आकारण्यात यावी.

**Item No.** 12 **Resolution No.**

विषय : सर्व्हे क. ३८६ (भाग), मुलुंड (पू) येथील क्लासिक कन्स्ट्रक्शन प्रा. लि. यांच्या कामाबाबत.

ठराव :

**Item No.** 13 **Resolution No.**

विषय : डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राष्ट्रीय अभियंता संघटना यांची वाचनालय व रिडिंग रूमसाठी आझाद नगर, अंधेरी (प), इमारत क. ३२च्या बाजूला असलेली खुली जागा मिळण्याबाबतची विनंती.

ठराव :

**Item No.** 14 **Resolution No.** 3096

विषय : विकास आराखड्यांमध्ये गृहनिर्माणासाठी आरक्षित असलेल्या जमिनी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम १९७६ ऐवजी महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना कायद्याखाली भू-संपादन करण्यासाठी शासनास विनंती करण्यापूर्वी तसेच प्रादेशिक नगररचना कायद्याप्रमाणे भरपाई देण्यापूर्वी प्राधिकरणाची संमती घेणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
न्यायालयाचे निकाल लक्षात घेता विकास आराखड्यांमधील आरक्षित असलेल्या जमिनीचे नुकसान भरपाई म्हाडा अधिनियम १९७६ ऐवजी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ अन्वये करण्यास प्राधिकरणास परवानगी मिळावी याकरिता शासनास अशी विनंती करण्याकरिता मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** 15 **Resolution No.**

विषय : गृहनिर्माण महाप्रकल्पाचा दिनांक ३१.१०.१९९२ पर्यंतचा प्रगती अहवाल.

ठराव :

**Item No.** 16 **Resolution No.** 3097

विषय : नागरी नूतनीकरण योजना

ए. पी. मार्केट, एस. एस. गायकवाड मार्ग, 'सी' विभाग, दुसरा टप्पा (जोत्यावरील काम) इमारतीच्या बांधकामाच्या निविदा.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
नागरी नूतनीकरण योजनेअंतर्गत ए. पी. मार्केट, एस. एस. गायकवाड मार्ग, सी विभाग, दुसरा टप्पा (जोत्यावरील काम) या इमारतीच्या पुनर्बांधणी कामाची मे. अे. के. कन्स्ट्रक्शन कंपनी यांची रु. ८४,११,६०३.३१ (अंदाजित रकमेच्या म्हणजे ८४,९६,५६९/- च्या १ टक्का कमी) किंमतीची निविदा मंजूर करण्यात येत आहे.

**Item No.** 17 **Resolution No.** 3098

विषय : राजेंद्र प्रसाद नगर, धारावी येथील १३१ गाळे असलेल्या नियोजित जय गणेश सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या कंत्राटदारास मूळ निवेदित भरलेल्या दरापेक्षा अतिरिक्त रक्कम मिळणेबाबत.

ठराव : राजेंद्र प्रसाद नगर, धारावी येथील जय गणेश सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या वास्तुशास्त्रज्ञ व समासदांनी सुचविलेल्या इमारतीच्या बांधकामातील बदलासाठी १३१ समासदांसह प्रत्येकी रु. ८,०००/- प्रमाणे एकुण रक्कम रु. १०,४८,०००/- संस्थेने प्रकल्पाकडे भरणा करण्यास संचालिका, राजीव गांधी प्रकल्प/प्राधिकरण यांनी मंजूरी दिलेल्या प्रस्तावास कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे.

**Item No.** 18 **Resolution No.** 3099

विषय : श्री. व्ही. बी. गुंजोटीकर, अपील अधिकारी (२) यांचा कंत्राटी पद्धतीवरील पुनर्नेमणूकीचा कालावधी वाढविणेबाबत.

ठराव : श्री. व्ही. बी. गुंजोटीकर, अपील अधिकारी (२) यांचा पुनर्नेमणूकीचा कालावधी दिनांक ७.११.१९९२ पासुन पुनर्नेमणूकीच्या पूर्वीच्या अटी व शर्तीवर आणखीन १ वर्षाने वाढविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** 19 **Resolution No.** 4000

विषय : प्राधिकरणातर्फे राबविण्यात येणाऱ्या मजासवाडी येथील महाप्रकल्पाच्या टप्पा क्र. २ च्या कामाचे कार्यदेशाबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, प्राधिकरणातर्फे राबविण्यात येणाऱ्या मजासवाडी येथील महाप्रकल्पाचा टप्पा क्र. २ च्या कामाचे सुधारित कार्यादेश विकासकास देताना खालील शिफारसी करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१) निविदेतील शर्तीनुसार मे. युनिटी कन्स्ट्रक्शन कंपनी यांना १२ टक्के दरवाढ देय राहील.

२) टप्पा क्र. (२) अंतर्गत बांधण्यात येणाऱ्या गाळ्यांची किंमत रु. ७३,८६२/- प्रति गाळा राहील.
(मूळ किंमत रु. ६५,९४८/- अधिक १२ टक्के बरोबर रु. ७३,८६१.७६) व टप्पा क्र. २ ची एकूण किंमत रु. १,८३,९१,६३८/- राहील. (७३,८६२ गुणिले २४९ गाळे)

३) टप्पा क्र. २ चा कालावधी सुधारित कार्यादेश दिल्यानंतर ५ महिने राहील.

४) भाववाढ टप्पा क्र. २ च्या गाळ्यांच्या कामासाठी मूळ निविदेतील अटींप्रमाणे भाववाढ देय राहील, असे मे, १९९१ मध्ये प्रस्तुत केलेल्या कार्यादेशात नमूद केले आहे. परंतु प्राधिकरणाच्या गेल्या बैठकीत ठरविल्याप्रमाणे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दिनांक १०.१.१९९२ रोजीच्या भाववाढीचा शासन निर्णय क्रमांक १७२, दिनांक १०.१.१९९२ नुसार कार्यादेश दिल्यापासून भाववाढ द्यावी लागेल.

**Item No.** 20 **Resolution No.**

विषय : प्राधिकरणाचे १९९१-९२चे सुधारीत व १९९२-९३ चे अर्थसंकल्पित अंदाजपत्रक अतिरिक्त वेळेत तयार करणे.

ठराव :

**Item No.** 21 **Resolution No.** 4001

विषय : सोलापूर, नाशिक येथे उच्च उत्पन्न गटातील १८२ गाळ्यांच्या वसाहतीमध्ये ड्रेनेज लाईनच्या कामाबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, सोलापूर, नाशिक येथील उच्च उत्पन्न गटातील १८२ गाळ्यांच्या वसाहतीतील ड्रेनेज कामासाठी येणारा अर्धा खर्च रू.२.३५ लक्ष प्राधिकरण निधीतून करण्यास शासनाने मान्यता दिली असल्यामुळे ड्रेनेजच्या कामाची निवड लक्षात घेता सदर प्रस्तावित खर्च रू.२.३५ लक्ष (रू. दोन लाख पस्तीस हजार फक्त) म्हाडा निधीतून (निधीशीर्ष १६० प्राधिकरण निधी) करण्यास सन १९९२-९३ च्या सुधारीत अंदाजपत्रकात त्याप्रमाणे तरतूद करण्यास खास बाब म्हणून मान्यता देण्यात येते.

**Item No.** 22 **Resolution No.** 4002

विषय : रामनगर, जालना येथील म्हाडाच्या वसाहतीतील ड्रेनेज लाईनचे कामाबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, रामनगर, जिल्हा-जालना येथील ३९० गाळ्यांच्या (२७६ औद्योगिक कामगारासाठी अधिक ११४ आर्थिकदृष्टया दुर्बल गटासाठी) वसाहतीतील ड्रेनेजच्या नुतनीकरण कामासाठी येणारा अर्धा खर्च रू. २.२५ लक्ष प्राधिकरण निधीतून करण्यास शासनाने मान्यता दिली असल्यामुळे ड्रेनेजच्या कामाची निवड लक्षात घेता सदर प्रस्तावित खर्च रू. २.२५ लक्ष (रू. दोन लक्ष पंचवीस हजार फक्त) म्हाडा निधीतून (निधीशिर्ष १६०-प्राधिकरण निधी) करण्यास व सन १९९२-९३ च्या सुधारीत अंदाजपत्रक त्याप्रमाणे तरतूद करण्यास खास बाब म्हणून मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** 23 **Resolution No.**

विषय : "अ" वर्गातील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासासाठी "ना-हरकत" प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 24 **Resolution No.** 4003

विषय : सहाय्यक वास्तुशास्त्रज्ञ व नियोजनकार वर्ग-२ मधील पदांची वर्ग-१ मध्ये श्रेणीवाढ करण्यात येणाऱ्या पदावरील नेमणुकीसाठी ठरविण्यात आलेल्या निकषाबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, पदोन्नतीनंतर ३ वर्षांच्या आत पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण करण्याचा प्राधिकरणाचा ठराव क्र. ३००५, दिनांक १८.६.१९९२ अन्वये घेतलेल्या निर्णयाचा फेरविचार करून सदर ठरावात विहित केलेली अट रद्द करण्यास मान्यता देण्यात येत आहे. त्याचप्रमाणे सेवाभरती नियमातही वास्तुशास्त्रज्ञ नियोजनकार वर्ग (१) या पदावरील पदोन्नतीसाठी कर्मचारी वास्तुशास्त्रज्ञ विषयाचा पदवीधर अथवा पदविकाधारक असावा आणि त्याची पदोन्नती पूर्वीच्या संवर्गात कमीतकमी ५ वर्षे सेवा केलेली असावी या अटी अंतर्भूत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** 25 **Resolution No.** 4004

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण तांत्रिक कर्मचारी सेवाप्रवेश नियम.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
तांत्रिक विभागाच्या कर्मचारी सेवा-प्रवेशाबाबतचे बाब टिप्पणीसोबत जोडलेल्या प्रारुप नियमास मान्यता देण्यात येत आहे. सदर नियमास शासनाची मंजूरी आवश्यक असल्याचे शासनाकडे तसा प्रस्ताव मंजूरीसाठी पाठविण्यात यावा व कार्यवृत्तास मंजूरी मिळण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी, असे ठरले.

**Item No.** 26 **Resolution No.** 4005

विषय : पत्रकारांच्या घरांचा प्रश्न सोडविण्यासाठी शासनाने नियुक्त केलेली समिती.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास विनियम १९८१, विनियम ६ मधील पोट कलम १ पुन्हा प्रस्थापित करण्यासाठी व त्याचबरोबर महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (जमिनीचे वाटप नियम, १९८१) नियम १२ मध्ये सुधारणा करण्यासाठी विधी सल्लागार/प्रा. यांनी शासनास पाठविलेल्या प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** 27 **Resolution No.**

विषय : ज्ञानेश्वर नगर, शिवडी, वडाळा येथील माडेकरांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेस भूखंड देण्याबाबत.

ठराव :

**Meeting No.** 121 **Meeting Date** 22-Dec-19

**Item No.** 12 (A) **Resolution No.** 4012

विषय : अ) मजासवाडी येथील प्रकल्पाकरिता बांधण्यात आलेल्या नाल्याचा ५० टक्के खर्च प्राधिकरणाने करण्याबाबत.
ब) गृहनिर्माण महाप्रकल्पात हस्तांतरित विकास हक्काचा (टी.डी.आर.) उपयोग करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
अ) विकासकास बाब टिप्पणीत उल्लेख केल्यानुसार नाल्याच्या प्रत्यक्ष एकूण खर्चातून निविदेतील तरतुदीनुसार छोट्या ड्रेनेजसाठी करावयाचा प्रमाणित खर्च प्रकल्प व्यवस्थापन, समंत्रक व कार्यकारी अभियंता (महाप्रकल्प) यांच्याकडून तपासून घेतल्यानंतर वजा करून राहिलेल्या फरकाच्या ५० टक्के रक्कम विकासकास परत करण्यात यावी.
ब) मजासवाडी येथील विकासकास बाब टिप्पणीतील तपशीलाप्रमाणे ४५० मि.मि. व्यासाची लाईन टाकण्यासाठी येणाऱ्या खर्चापैकी ३०० मि.मि. व्यासाची पाईप लाईन टाकण्यासाठी येणारा खर्च विचारात घेऊन जादा येणारा खर्च मुंबई महानगरपालिकेने प्राधिकरणास अदा करावयाचा आहे तसेच ३०० मि.मि. व्यास पाईपलाईन टाकण्यासाठी येणाऱ्या खर्चापैकी ४० टक्के खर्च महानगरपालिकेने द्यावयाचा आहे. त्याप्रमाणे महानगरपालिकेने वरील रक्कम प्राधिकरणाकडे त्वरित भरावी. ही रक्कम महानगरपालिकेकडून मिळण्यास विलंब लगेल म्हणून कामाच्या प्रगतीच्या दृष्टीकोनातून वरीलप्रमाणे देय असलेल्या रकमेच्या ७५ टक्के आगाऊ रक्कम विकासकाला देण्यात यावी. विकासकाने केलेल्या कामाची दाखलापत्र व्यवस्थापन सल्लागाराने व कार्यकारी अभियंता (महाप्रकल्प) यांनी द्यावे. उर्वरित २५ टक्के देय रक्कम महानगरपालिकेशी याबाबत अंतिम समझोता झाल्यावर देण्यात यावी.
ही कार्यवाही (फुल अँड फायनल सेटलमेंट) या तत्वावर करण्यात यावी.

**Item No.** 1 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दि. १६-११-१९९२ रोजी झालेल्या १२० व्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे.

ठराव :

**Item No.** 2 **Resolution No.** 4006

विषय : प्रादेशिक मंडळे व मुंबई शहरातील मंडळात मुख्याधिकारी या पदावर भारतीय प्रशासन सेवेतील अधिकारी किंवा अतिरिक्त जिल्हाधिकारी संवर्गातील अधिकाऱ्यांची नियुक्ती करणे व नवीन पदे निर्माण करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, यापुढे प्रादेशिक मंडळाच्या कामाचा अधिभार लक्षात घेऊन आवश्यकतेनुसार भारतीय प्रशासन सेवेतील अधिकारी किंवा अतिरिक्त जिल्हाधिकारी या संवर्गातील अधिकाऱ्यांची प्रादेशिक मंडळाच्या मुख्याधिकारी या पदावर नियुक्ती करण्यासाठी उपाध्यक्ष/प्रा. यांनी निर्णय घ्यावा.
सदर प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात यावा, असे ठरविण्यात आले.

| **Item No.** | **3** | **Resolution No.** | **4007** |
|---|---|---|---|

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणातील विधी, लेखा व वास्तुशास्त्रज्ञ विभागातील अधिकारी/कर्मचारी तसेच नगररचनाकार व सहाय्यक संचालक नगररचनाकार यांच्या सेवा भरतीचे नियम.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाब टिप्पणीत प्रस्तावित केल्याप्रमाणे विधी, लेखा, वास्तुशास्त्रज्ञ व नगररचनाकार या संदर्भातील सेवाभरतीच्या नियमांचे प्रारुप शासनाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात यावा. तथापि शासनाकडे पाठविण्यापूर्वी दुरुस्त्या करावयाच्या असल्यास उपाध्यक्ष/प्रा. यांची मान्यता घेऊन पुढील कार्यवाही करावी.

| **Item No.** | **4** | **Resolution No.** | **4008** |
|---|---|---|---|

विषय : प्राधिकरणाच्या व प्रादेशिक मंडळाच्या कार्यालयाकडील -
अ) कार्यकारी अभियंता यांना मोटारकार खरेदी करण्यासाठी व
ब) उप-अभियंता, कनिष्ठ अभियंता व इतर क्षेत्रिय कर्मचारी यांना मोटारकार, स्कूटर, मोटार सायकल खरेदी करण्यासाठी अग्रिम मंजूर करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
मोटारकार अग्रिम मंजूर करण्यापूर्वी इतर सार्वजनिक उपक्रम, मंडळे यामध्ये कोणती पद्धत अवलंबिवण्यात येते याची प्रथम खात्री करून घ्यावी. तथापि मोटार सायकल व स्कूटर खरेदीसाठी तांत्रिक/अतांत्रिक संवर्गातील क्षेत्रिय कर्मचाऱ्यांना त्यांच्या मूळ वेतनाच्या १० पट रक्कम किंवा रु. २०,०००/- (रुपये वीस हजार फक्त) किंवा मोटार सायकल, स्कूटर खरेदीची प्रत्यक्ष किंमत यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढा अग्रिम अनुज्ञेय राहील. हा अग्रिम शासन वेळोवेळी व्याजाचा दर ठरवील त्या व्याजाच्या दरासह ५० लाख हप्त्यांमध्ये वसूल करण्यात यावा. मोटारकार, स्कूटर, मोटार सायकल खरेदी करण्यासाठी द्यावयाच्या अग्रिमासाठी सन १९९२-९३ या आर्थिक वर्षात ३ लाख रुपयांची तरतूद करण्यास मान्यता देण्यात येत आहे. वरील अग्रिम फक्त ज्या अधिकारी/कर्मचारी यांची प्राधिकरणात ५ वर्षे सेवा पूर्ण झाली आहे अशा अधिकारी/कर्मचाऱ्यांनाच अनुज्ञेय राहील. अग्रिम मंजूर करण्याचे अधिकार उपाध्यक्ष/प्रा. यांना देण्यात येत आहेत.

| **Item No.** | **5** | **Resolution No.** | |
|---|---|---|---|

विषय : सफाई कामगारांच्या ताब्यातील विखुरलेली घरे विक्री करण्याबाबत.

ठराव :

| **Item No.** | **6** | **Resolution No.** | **4009** |
|---|---|---|---|

विषय : मध्यम उत्पन्न गट योजनेअंतर्गत बांधलेल्या इमारतीत सेवानिवासस्थाने म्हणून दिलेल्या गाळ्यांची विक्री कर्मचाऱ्यांना करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
श्री. प्र. वा. चिंचाळकर यांना सेवानिवासस्थान म्हणून दिलेला रिंजरोड, नागपूर येथील मध्यम उत्पन्न गटातील गाळा क. ४/४ हा प्राधिकरणाच्या सेवानिवासस्थान विक्री विषयक दिनांक ५.६.१९८५ व दिनांक १६.१०.१९९१ च्या परिपत्रकातील अटी व शर्तीच्या अधीन राहून विशेष बाब म्हणून विक्री करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| **Item No.** | **7** | **Resolution No.** | **4010** |
|---|---|---|---|

विषय : प्राधिकरणाच्या कर्मचारी कल्याणकारी योजनेअंतर्गत भूखंड संपादन करून स्थापन केलेल्या कर्मचाऱ्यांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थांमधील सभासदांच्या पात्रतेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
प्राधिकरणाचा दिनांक १९.६.१९९२ चा ठराव क. ३००८ पूर्णत: रद्द करण्यात येऊन शासनाच्या दिनांक ३०.७.१९९१ च्या एससीएस-१०९०/सीआर-२७/का.३, क्रमांकाच्या आदेशानुसार कर्मचारी गृहनिर्माण सहकारी संस्थांच्या सभासदांची पात्रता ठरविण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी. तसेच को-ऑप-सोसायटीज ॲक्ट अधिनियम आणि रजिस्ट्रार ऑफ को-ऑप-सोसायटीज यांनी मान्य केलेल्या उपविधी मधील तरतुदीनुसार सभासदांची पात्रता ठरविताना ज्या कर्मचारी सभासदांना किंवा त्यांच्या पती/पत्नीला म्हाडाचे कर्मचारी म्हणून (२ टक्के म्हाडा कर्मचाऱ्यांसाठी असलेल्या कोट्यासहित) कोणत्याही प्रकारे व कोणत्याही प्रकारचे मिळालेले गाळे मालकी हक्काचे झाले असतील अशा कर्मचाऱ्यांना अपात्र ठरविण्यात यावे. तसेच या सदस्यांना किंवा त्यांच्या पती/पत्नीला म्हाडाचा कर्मचारी म्हणून भाडेतत्वावर किंवा सेवानिवासस्थान म्हणून गाळा मिळाला असेल त्यांनी तो गाळा म्हाडाला परत केल्याशिवाय त्यांना संस्थेने बांधण्यात आलेल्या गाळ्याचा ताबा देता येणार नाही, या अटीवर पात्र ठरविण्यास मान्यता देण्यात येते.

| **Item No.** | **8** | **Resolution No.** | |
|---|---|---|---|

विषय : निजामपूर-भिवंडी येथील गृहनिर्माण योजना -
अल्प उत्पन्न गट ३१७ गाळे व
मध्यम उत्पन्न गट ३४७ गाळे -
गाळ्यांची किंमत मर्यादित ठेवणेबाबत.

ठराव :

**Item No.** 9 **Resolution No.** 4011

विषय : शांतीनगर, नागपूर येथील मध्यम उत्पन्न गटातील ३० गाळ्यांपैकी शिल्लक असलेल्या ११ गाळ्यांच्या व २२ दुकानांपैकी १३ दुकानांच्या वाटपाकरिता किंमत कमी करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
उपरोक्त विषयाबाबत निर्णय घेण्याचे अधिकार उपाध्यक्ष/प्रा. यांना प्रदान करण्यास मान्यता देण्यात येते. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल प्राधिकरणाच्या बैठकीत सादर करण्यात यावा.

**Item No.** 10 **Resolution No.**

विषय : नागपूर मंडळाच्या विविध वसाहतीतील गैर कृषीकराची वसूली करण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 11 **Resolution No.**

विषय : प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना सेवानिवासस्थान म्हणून देण्यात आलेले गाळे कर्मचाऱ्यांना विक्री करण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 13 **Resolution No.** 4013

विषय : अपरिहार्य कारणास्तव योजना रद्द झाली किंवा योजना पूर्ण करण्यास विलंब झाला तर अर्जदारांना द्यावयाच्या व्याज भरपाईबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
१) प्राधिकरणाकडे नोंदी नोंदविण्यात आलेली मागणी पुरेशा व योग्य प्रमाणात नाही असे आढळून आले व योजना रद्द झाली आणि अर्जदाराची अनामत रक्कम तीन महिन्यांमध्ये परत केली नाही तर अर्जदाराच्या अनामत रकमेवर रक्कम भरलेल्या दिनांकापासून तीन महिन्यांनंतर द.सा.द.शे. १० टक्के दराने व्याज आकारण्यात यावे.
२) अर्जदारास गाळे हस्तांतर करण्याच्या दिनांकास गाळे हस्तांतरित करण्यास शक्य झाले नाही आणि गाळे हस्तांतरित करण्याच्या दिलेल्या दिनांकापेक्षा योजना पूर्ण होण्यास ३ महिन्यांपेक्षा जास्त कालावधी लागत असेल तर गाळे हस्तांतरित करण्याच्या दिनांकापासून ३ महिन्यांनंतर योजना पूर्ण होईपर्यंत अर्जदारास त्यांनी भरलेल्या रकमेवर द.सा.द.शे. १० टक्के दराने व्याज अदा करण्यात यावे.
३) अर्जदारांना गाळे हस्तांतरणाची तारीख योजना पूर्ण होण्याच्या अपेक्षित दिनांकाच्या ६ महिन्यांनंतरची तारीख कळविण्यात यावी.
४) अशा प्रकारे व्याज अदा करण्यामुळे होणारा खर्च प्राधिकरणास होणाऱ्या नफ्यातून घट समजून सोसावा.
५) क्रमांक १ च्या प्रस्तावामध्ये अदा होणारे व्याज त्या जमिनीच्या भविष्यकाळात होणाऱ्या योजनेवर आकारण्यात यावे.
५) निर्णय १ ते ५ हे मुंबई मंडळ, जागतिक बँक प्रकल्प, राजीव गांधी प्रकल्प याखेरीज इतर प्रादेशिक मंडळांनाही लागू होतील.

---

**Item No.** 14 **Resolution No.**

विषय : कोथरूड, पुणे येथील सर्व्हे क्र. ५०, (भाग) मधील विजयश्री सहकारी सोसायटीच्या जागेबाबत.

ठराव :

---

**Item No.** 15 **Resolution No.** 4014

विषय : हुडकोने मंजूर केलेल्या दुरुस्ती व नवीनीकरण योजनेसाठी हुडकोकडून कर्ज घेण्यास प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.
(अभ्युदय नगर, काळाचौकी, मुंबई)

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, बाब टिप्पणास जोडलेल्या तक्ता ''अ'' मध्ये दर्शविलेल्या दुरुस्ती व नवीनीकरण योजनेसाठी हुडकोकडून रु.२१.४७ लक्ष कर्ज घेण्यास अनुमती व अधिकृती देण्यात येते. प्रकल्पाची एकूण किंमत व हुडकोकडे कर्ज यामधील फरकाची रक्कम लाभार्थीकडून वसूल करण्यात यावी.

---

**Item No.** **16** **Resolution No.** **4015**

विषय : वॉर्ड क्र. अ-२६, सर्व्हे क्र. ४१, (भाग), ओशिवरा, जोगेश्वरी (प.) शॉपिंग सेंटर बांधण्याबाबत - (कालमर्यादेत निविदा स्विकृत न होऊ शकल्याने प्राधिकरणास ठेकेदारास जादा रक्कम द्यावी लागेल त्याबाबत)

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, प्रचलित कार्यपध्दतीपुढे निविदा ठरविलेल्या कालमर्यादेत मंजूर होऊ शकली नाही. तसेच, निविदा शॉपिंग सेंटर बांधण्याबाबत असल्यामुळे सुरुवातीस जरी ठेकेदारास जादा टक्केवारी द्यावी लागल्याने रू. ७.७० लक्ष जास्त द्यावे लागत असले तरी अंतिम ही रक्कम दुकानदाराकडून वसूल होऊन प्राधिकरणास फायदा होणार आहे. त्यामुळे प्राधिकरणास जादा टक्केवारी द्यावी लागल्यामुळे अंतिमत: अधिक भूखंड सहन करावा लागणार नाही.
१९९१-९२ या कालावधीत निविदा प्रकरणे प्राधिकरणाने कालमर्यादेत निकालात काढलेली आहेत. त्याची नोंद घेण्यात आली.
भविष्यामध्ये अशा प्रकारची चूक होणार नाही. निविदेची छाननी व प्राधिकरणाचा निर्णय एकूण ९० दिवसांच्या आत होण्याबाबतचे आदेश उपाध्यक्ष/प्रा., यांच्या सहीने निर्गमित करण्यात आले आहेत, त्याची नोंद घेण्यात आली.

**Item No.** **17** **Resolution No.** **4016**

विषय : डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राष्ट्रीय अभियंता संघटना यांची वाचनालय व रिडिंग रुमसाठी आझाद नगर, अंधेरी (प) इमारत क्र. ३२ च्या बाजूला असलेली खुली जागा मिळण्याबाबतची विनंती.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय अभियंता संघटना यांना आझाद नगर, अंधेरी (प) येथील इमारत क्र. ३२ जवळील ३२५ चौ.मि. क्षेत्रफळाचा भूखंड वाचनालय व रिडिंग रुमसाठी खालील शर्ती व अटींच्या अधीन राहून वितरीत करण्यात यावा.

१. सदरहू भूखंडावर बांधकाम करण्यासाठी महापालिकेची परवानगी मिळविण्याची सर्वस्वी जबाबदारी संस्थेची राहील.
२. भूखंडाचे अधिमूल्य, वार्षिक भुईभाडे आणि निधी आकार एकरकमी भरण्याची जबाबदारी अर्जदार संस्थेची राहील.
३. या भूखंडाचे प्रत्यक्ष वाटप मुंबई महानगरपालिकेच्या सदरहू उपयोगासाठी मंजूरीनंतरच करण्यात यावा.
४. प्राधिकरणाच्या प्रचलित विहित अटी व शर्तीस अधीन राहून तसेच, प्राधिकरणाच्या प्रचलित किंमत विषयक धोरणानुसार संस्थेकडून उक्त भूखंडाची अधिमूल्य रक्कम, वार्षिक भुईभाडे व विधी शुल्क वसूल करुन भूखंड हस्तांतरीत करण्यात येईल.

**Item No.** **18** **Resolution No.**

विषय : ज्ञानेश्वर नगर, शिवडी-वडाळा येथील भाडेकरुंच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेस भूखंड देण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 19 **Resolution No.** 4017

विषय : राजीव गांधी झोपडपट्टी सुधार व निवारा प्रकल्प, नागरी नुतनीकरण योजना इमारत क्र. १२९-जगुशेट चाळ, मुकर क्र. १८२, लोअर परेल, विभाग ज/दक्षिण, मुंबई-१३ येथील पुनर्बांधणी योजनेमधील कामाची विभागणीबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, नागरी नुतनीकरण योजनेअंतर्गत लोअर परेल येथील जगुशेट चाळीच्या पुनर्बांधणी कामाची प्रस्तावित केल्याप्रमाणे तीन विभागात विभागणी करण्याकरिता प्राधिकरण मान्यता देत आहे.

**Item No.** 20 **Resolution No.**

विषय : सर्व्हे क्र. ३८६ (भाग), मुलुंड (प), येथील मे. क्लासिक कन्स्ट्रक्शन प्रां लि. कंपनी यांच्या कामाबाबत.

ठराव :

**Item No.** 21 **Resolution No.** 4018

विषय : प्राधिकरणातर्फे राबविण्यात येणाऱ्या चांदिवली येथील गृहनिर्माण महाप्रकल्पाचा टप्पा क्र.२ च्या कामाचे कार्यादेश देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, मे. अबोड कन्स्ट्रक्शन कं. प्रा. लि. यांच्या टप्पा क्र. २ च्या रू.१७,८०,४०,१४७/- रकमेस मंजूरी देण्यात येत आहे. यामध्ये बाह्य सुविधासाठी होणारा खर्च रू. ४५,७५,१८७/- अंतर्भूत आहे. मे. अबोड कन्स्ट्रक्शन यांना त्याप्रमाणे सुधारित आदेश देण्यात यावे.

**Item No.** 22 **Resolution No.**

विषय : गृहनिर्माण महाप्रकल्पाचा दि. ३०.११.९२ पर्यंतचा प्रगती अहवाल.

ठराव :

**Item No.** 23 **Resolution No.** 4019

विषय : आदर्श नगर, वरळी येथे स्वातंत्र्य सैनिकांसाठी बांधण्यात आलेल्या स्वातंत्र्य सैनिक भवनाबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

आदर्श नगर, वरळी येथे स्वातंत्र्य सैनिक भवन म्हणून बांधण्यात आलेल्या इमारतीचा वापर करण्याबाबत प्राधिकरणाने केलेल्या ३०१३ क्रमांकाच्या ठरावातील पूर्वीच्या अटींऐवजी खालील अटी घालण्यास प्राधिकरण मान्यता देण्यात येत आहे.

१) विश्रामगृहातील १ खोलीत २ कॉटस् राहतील. त्यातील प्रत्येक कॉटचे १ दिवसांकरिता फक्त रु. २०/- भाडे आकारण्यात यावे.
२) एका वेळी विश्रांतीगृहात जास्तीत जास्त ३ दिवस राहता येईल.
३) स्वातंत्र्य सैनिकांसोबत त्यांच्याशिवाय आणखीन एक अन्य व्यक्तीस राहता येईल.
४) स्वातंत्र्य सैनिकांनी त्यांचे ओळखपत्र सोबत आणावे. म्हणजे आरक्षणाबाबत काही अडचण राहणार नाही.
५) स्वातंत्र्य सैनिक भवनातील विश्रांतीगृहात आवश्यक सामग्रीचा पुरवठा करून दिनांक १.१.१९९३ पासून ते सुरू करावे व त्याची व्यवस्था पहावी.
६) वाचनालयाबाबत स्वातंत्र्य सैनिक सभेकडून जो प्रस्ताव येईल त्यावर निर्णय घेण्याचे वरील अटींमध्ये आवश्यकतेनुसार बदल करण्याचे अधिकार मा. उपाध्यक्ष/प्रा. यांना प्रदान करण्यात येत आहेत. असेह ठरले की, या ठरावाची अंमलबजावणीकरिता पुढील सभेत कार्यवृत्त स्थायी करण्याची वाट पाहण्याची गरज राहणार नाही.

**Item No.** 24 **Resolution No.** 4020

विषय : स. नं. ७ आणि ७, ब्लॉक - सी, वांद्रे-कुर्ला समूह येथील जमिनीच्या विकासाबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

बाब टिप्पणीत प्रस्तावित करण्यात आलेली कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर सर्व्हे क्र. ७ व ८, ब्लॉक - सी, वांद्रे-कुर्ला समूह येथील जमिनीचे वितरण केंद्र व राज्य शासनाच्या सार्वजनिक उपक्रमांकडून दर मागविण्याकरिता जाहिरात देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बैठकीच्या विषयसूचीवरील व आयत्यावेळी घेण्यात आलेल्या विषयावरील चर्चा संपल्यानंतर उपस्थितांनी मा. अध्यक्षांचे आभार मानल्यानंतर बैठकीचे कामकाज संपल्याचे जाहीर करण्यात आले.

**Meeting No.** 122 **Meeting Date** 05-Feb-19

**Item No.** 2 (A) **Resolution No.** 4021

विषय : मालवणी सर्व्हे क. २६३, मालाड (प.) येथील जमिनीवर भूखंड विकसित करावयाच्या (पाणीपुरवठा, मलःनिस्सारण, रस्ते व गटारे, वीजपुरवठा इ.) कामाच्या निविदा स्वीकारण्याबाबत, विभाग - १

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाब टिप्पणीत नमूद केलेल्या माहितीनुसार मे. कर्मा कन्स्ट्रक्शन कंपनीची विषयात नमूद केलेल्या कामासाठीची प्राप्त निविदा ज्यांचा देकार किंमत रु. ९७,९३,४५५/- असून अधिक १.५० टक्के एवढ्या अंदाज पत्रकीय निविदा किंमत (रु. ९६,४८,७२५/-) पेक्षा जास्त आहे ती स्वीकारण्यास मान्यता देण्यात येत आहे.
जागतिक बँक प्रकल्पाचे काम तातडीने करावयाचे असल्यामुळे याबाबतची कार्यवाही जसे निविदा स्वीकार पत्र देणे इ. प्रक्रिया सत्वर करण्यात याव्यात. सबब ठराव व इतिवृत्त पुढील बैठकीत स्थायी करण्यापूर्वी याची अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

---

**Item No.** 2 (B) **Resolution No.** 4022

विषय : मालवणी सर्व्हे क. २६३, मालाड (प.) येथील जमिनीवर भूखंड विकसित करावयाच्या (पाणीपुरवठा, मलःनिस्सारण, रस्ते व गटारे, वीजपुरवठा इ.) कामाच्या निविदा स्वीकारण्याबाबत.

विभाग - २

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाब टिप्पणीत नमूद केलेल्या माहितीनुसार मे. चंदू कन्स्ट्रक्शन कंपनीची विषयात नमूद केलेल्या कामासाठीची प्राप्त निविदा ज्यांचा देकार किंमत रु. ८८,८६,५६६/- असून अधिक २.८५ टक्के एवढ्या अंदाज पत्रकीय निविदा किंमत (रु. ८६,४०,३१६/-) पेक्षा जास्त आहे ती स्वीकारण्यास मान्यता देण्यात येत आहे.
जागतिक बँक प्रकल्पाचे काम तातडीने करावयाचे असल्यामुळे याबाबतची कार्यवाही जसे निविदा स्वीकार पत्र देणे इ. प्रक्रिया सत्वर करण्यात याव्यात. सबब ठराव व इतिवृत्त पुढील बैठकीत स्थायी करण्यापूर्वी याची अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** 2 (C) **Resolution No.** 4023

विषय : मालवणी सर्व्हे क्र. २६३, मालाड (प.) येथील जमिनीवर भूखंड विकसित करावयाच्या (पाणीपुरवठा, मल:निस्सारण, रस्ते व गटारे, वीजपुरवठा इ.) कामाच्या निविदा स्वीकारण्याबाबत.

विभाग - ५

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाब टिप्पणीत नमूद केलेल्या माहितीनुसार मे. भारत कन्स्ट्रक्शन कंपनीची विषयात नमूद केलेल्या कामासाठीची प्राप्त निविदा ज्यांचा देकार किंमत रु. ८४,२१,३६७/- असून अधिक १०.७१ टक्के एवढ्या अंदाज पत्रकीय निविदा किंमत (रु. ९४,३१,४७९/-) पेक्षा जास्त आहे ती स्वीकारण्यास मान्यता देण्यात येत आहे.
जागतिक बँक प्रकल्पाचे काम तातडीने करावयाचे असल्यामुळे याबाबतची कार्यवाही जसे निविदा स्वीकार पत्र देणे इ. प्रकिया सत्वर करण्यात याव्यात. सबब ठराव व इतिवृत्त पुढील बैठकीत स्थायी करण्यापूर्वी याची अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** 2 (D) **Resolution No.** 4024

विषय : गोराई रोड टप्पा (२ ए) बोरिवली (प) येथील जमिनीवर भूखंड विकसित करावयाच्या (पाणीपुरवठा, मल:निस्सारण, रस्ते व गटारे, वीजपुरवठा इ.) कामाच्या निविदा स्वीकारण्याबाबत.

ठराव : बाब टिप्पणीत नमूद केलेल्या माहितीनुसार मे. रश्मीन कन्स्ट्रक्शन कंपनीची विषयात नमूद केलेल्या कामासाठीची प्राप्त निविदा ज्यांचा देकार किंमत रु. ८३,७९,३१६.८३ असून अधिक ४.५६ टक्के एवढ्या अंदाज पत्रकीय निविदा किंमत (रु. ९३,०८,३३७/-) पेक्षा जास्त आहे ती स्वीकारण्यास मान्यता देण्यात येत आहे.
जागतिक बँक प्रकल्पाचे काम तातडीने करावयाचे असल्यामुळे याबाबतची कार्यवाही जसे निविदा स्वीकार पत्र देणे इ. प्रकिया सत्वर करण्यात याव्यात. सबब ठराव व इतिवृत्त पुढील बैठकीत स्थायी करण्यापूर्वी याची अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्यात येत आहे.
सर्क्युलेशन पद्धतीने घेण्यात आलेल्या उपरोक्त निर्णयास मान्यता मिळण्यासाठी सादर करण्यात येत आहे. सदर निर्णय प्राधिकरणाच्या आगामी बैठकीत स्थायी करण्यासाठी सादर करण्यात यावेत.

**Meeting No.** 122 **Meeting Date** 20-Feb-19

**Item No.** 1 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दि. २२-१२-१९९२ रोजी झालेल्या १२१ व्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे.

ठराव :

**Item No.** 2 **Resolution No.**

विषय : जागतिक बँक प्रकल्पांतर्गत मालवणी (मालाड) व गोराई रोड (प) (२-ए) येथील अंतर्गत रस्त्यावरील सुविधांची कामे निविदा स्वीकारण्याबाबत प्राधिकरणाच्या सभासदाकडे सर्क्युलेट पद्धतीने पाठविण्यात आलेल्या बाब टिप्पणीचे कार्यवृत्त स्थायी करणे.

ठराव :

**Item No.** 3 **Resolution No.**

विषय : जागतिक बँक प्रकल्पांतर्गत मालवणी (मालाड) व गोराई रोड (प) (२-ए) येथील अंतर्गत रस्त्यावरील सुविधांची कामे निविदा स्वीकारण्याबाबत प्राधिकरणाच्या सभासदाकडे सर्क्युलेट पद्धतीने पाठविण्यात आलेल्या बाब टिप्पणीचे कार्यवृत्त स्थायी करणे.

ठराव :

**Item No.** 4 **Resolution No.**

विषय : सर्व्हे क्र. ३८६ (भाग), मुलुंड (पू), येथील क्लासिक कन्स्ट्रक्शन कंपनी प्रा. (लि.) यांच्या कामाबाबत.

ठराव :

**Item No.** 5 **Resolution No.** 4025

विषय : राजेंद्र प्रसाद नगर, धारावी येथील १३१ गाळे असलेल्या नियोजित जय गणेश सहकारी गृहनिर्माण संस्थेचे उर्वरित काम सदर गृहनिर्माण संस्थेमार्फत करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
राजेंद्र प्रसाद नगर, धारावी येथील १३१ गाळे असलेल्या नियोजित जय-गणेश गृहनिर्माण संस्थेच्या कामासाठी प्रकल्पातर्फे नेमण्यात आलेले कंत्राटदार मे. अलहिंद कार्पोरेटर यांचे सध्या अस्तित्वात असलेले कंत्राट रद्द करून त्याऐवजी सदर संस्थेच्या वरील इमारतीचे उर्वरित काम त्यांच्या गृहनिर्माण संस्थेमार्फत करण्याच्या प्रस्तावास मंजूरी देण्यात येत आहे. त्याचप्रमाणे ठरावाच्या स्थायीकरणाची वाट न पाहता याबाबतची कार्यवाही त्वरित करण्यात यावी, असे ठरविण्यात आले.

**Item No.** 6 **Resolution No.** 4026

विषय : नवीन चंद्रपूर शहराची विकास योजना तयार करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या तरतुदीनुसार नगर रचना अधिकाऱ्यांची नेमणूक करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

१) नवीन चंद्रपूर शहराचा विकास आराखडा महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २३ अन्वये तयार करण्याबद्दल आपला इरादा ठराव क्र. ४०२६, दिनांक २०/२/१९९३ द्वारे जाहिर केलेला आहे.

२) शासनाच्या नगर विकास विभागाची अधिसूचना क्र. टीपीव्ही-२४९२/८०९/सीआर-१४५/युडी/२७, दिनांक १.१०.१९९२ नुसार श्री. रहाटे, सहाय्यक संचालक, नगररचना यांची म्हाडाकडे प्रतिनियुक्ती केलेली आहे. नवीन चंद्रपूर शहराच्या अधिसूचित केलेल्या क्षेत्राची सर्वेक्षण करणे, जमिनीचा विद्यमान वापर दर्शविणारा नकाशा तयार करणे, प्रारुप विकास योजना तयार करणे व त्या संबंधित इतर सर्व कामे करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम १९५५ चे कलम २४ अन्वये श्री. रहाटे, सहाय्यक संचालक नगररचना यांची नगररचना अधिकारी म्हणून म्हाडाकडे नेमणूक करण्याबाबत संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांची मान्यता घेण्यासाठी योग्य ती कार्यवाही करण्यात यावी. स्थायीकरणाची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी असे ठरले.

**Item No.** 7 **Resolution No.** 4027

विषय : नवीन चंद्रपूर शहराची विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ च्या तरतुदीनुसार तयार करण्याचा इरादा जाहीर करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

ज्याअर्थी शासनाच्या नगरविकास विभागाकडील अधिसूचना क्र. टीपीएस-२२८४/१८२३/सीआर-१०५/नवि. ९, दिनांक २९.१२.१९८८ अन्वये नवीन चंद्रपूरच्या हद्दीत समाविष्ट असलेल्या क्षेत्राचा सुसंबद्ध नियोजन व विकास करण्यासाठी महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाची (यापुढे / म्हाडा असे संबोधित केलेले) महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ (महाराष्ट्र ३७ कायदा १९६६) चे कलम ४० (१) (एए) नुसार विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती केलेली आहे.

२. म्हाडाने उक्त अधिनियमाचे कलम ११३ (८) तथा ४० (३) (ए) (२) तथा २३ (१) तरतुदींनुसार म्हाडाच्या नवीन चंद्रपूरकरिता अधिसूचित केलेल्या क्षेत्रासाठी विकास योजना तयार करण्याचा आपला इरादा ठराव क्र. ४०२७ दिनांक २०/२/१९९३ अन्वये जाहीर करीत आहे. या ठरावाची प्रत तसेच म्हाडाचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांकासहित स्वाक्षरी असलेल्या नवीन चंद्रपूरकरिता लाल किनारीने अधिसूचित केलेल्या क्षेत्राचा नकाशा शासनास पाठविला आहे.

३. त्यावर ही सूचना महाराष्ट्र शासनाचे राजपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ६० दिवसांचे आत नागरिकांकडून सूचना व हरकती मागविण्यात आल्या आहेत.

४. त्याचप्रमाणे या ठरावाची प्रत आणि नवीन चंद्रपूर शहराच्या विकास योजनेत समाविष्ट असलेल्या अधिसूचित क्षेत्राची हद्द दर्शविणारा नकाशा शासनास पाठविण्याचे अधिकार म्हाडाचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्रदान करण्यात येत आहेत.

स्थायीकरणाची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी, असे ठरले.

**Item No.** 8 **Resolution No.** 4028

विषय : महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २१ (३) नुसार नवीन चंद्रपूर शहराचा विकास आराखडा तयार करण्यासाठी मुदतवाढ मिळण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चा कायदा अंमलात आल्यानंतर प्रत्येक नियोजन प्राधिकरणास या कायद्याचे कलम २१ (२), ११३ (८) व ४० (३-अ) नुसार अशा नियोजन प्राधिकरणाच्या नेमणूकीच्या दिनांकापासून ३ वर्षांच्या कालावधीत नवीन शहराच्या अधिसूचित क्षेत्रासाठी प्रारुप विकास आराखडा तयार करून शासनाच्या मंजूरीसाठी सादर करावयाचा असतो.

शासनाच्या नगरविकास विभागाची अधिसूचना क्र. टीपीएस-२२८४/१८२३/सीआर-१०५/नवि. ९, दिनांक २९.१२.१९८८ नुसार महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ४७ (१)(एए) नुसार म्हाडास नवीन चंद्रपूर शहरासाठी अधिसूचित केलेल्या क्षेत्राचा विकास आराखडा तयार करण्यासाठी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्त केले आहे व म्हाडाला या अधिसूचित क्षेत्राचा प्रारुप विकास आराखडा तयार करणे, त्यास प्रसिद्धी देणे व शासनाच्या मंजूरीसाठी विकास आराखडा दिनांक २८ डिसेंबर, १९९१ पर्यंत सादर करणे जरुरीचे होते. ही कालमर्यादा संपुष्टात आली आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम २१ (१) नुसार विशेष नियोजन प्राधिकरण चंद्रपूरकडून खालील कामे अपेक्षित आहेत.

१) अधिसूचित परिसरासाठी मूळ सर्वेक्षण नकाशा (बेसमॅप) तयार करणे.
२) अद्यावत जमीन वापराचा नकाशा व संपूर्ण परिसरासाठी सिटी सर्व्हे नकाशा तयार करणे.
३) प्रारुप विकास आराखडा तयार करणे व त्यास प्रसिद्धी देणे तसेच लोकांकडून हरकती मागविणे व अंतिम शिफारशींसह प्रारुप विकास आराखडा शासनास मंजूरीसाठी सादर करणे.
४) अधिसूचित क्षेत्रामध्ये पाडोळी (भाग), कोसारा, खुटाळा (भाग) व दाताळा ही ४ गावे समाविष्ट आहेत. या परिसराचा सिटी सर्व्हे झालेला नाही. तसेच हा परिसर उंचसखल स्वरुपाचा असल्याने खालील सर्वेक्षण जरुरीच होते. या कामासाठी अत्यावश्यक पदे नवीन मंजूर करणे, शासनाच्या काटकसरीच्या धोरणानुसार शक्य नव्हते. तसेच वेळोवेळी शासनास नगररचना अधिकारी यांची प्रतिनियुक्तीवर नेमणूक करण्याची विनंती करण्यात आली होती व नगररचना अधिकारी यांनी शासन आदेशानुसार दि. ९.१२.९२ रोजी कार्यभार स्वीकारला आहे.

वरील कारणांसाठी एकूण कामाचे स्वरुप लक्षात घेता या सर्व कामांसाठी कमीत कमी १ वर्षाचा कालावधी लागण्याची शक्यता आहे. या कारणांसाठी एकमताने असा निर्णय घेण्यात आला की, महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २१ (३) अन्वये दि. २८.१२.१९९१ रोजी संपुष्टात आलेली कालमर्यादा दिनांक २८.१२.१९९३ पर्यंत वाढवून देण्याची विनंती शासनास करण्यात यावी. स्थायीकरणाची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी, असे ठरले.

**Item No.** 9 **Resolution No.** 4029

विषय : दिनांक ५/६ फेब्रुवारी, १९९३ रोजी मुंबईत भरणाऱ्या नवीन इमारत साहित्य/सामान व तंत्रज्ञान या विषयावरील चर्चासत्रास म्हाडामार्फत वर्गणी देणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
दिनांक ५/६ फेब्रुवारी, १९९३ रोजी मुंबई येथे भरणाऱ्या नवीन इमारत/साहित्य/सामान व तंत्रज्ञान या विषयावरील चर्चासत्रासाठी म्हाडामार्फत रु. १०,०००/- वर्गणी देण्यास उपाध्यक्ष/प्रा. यांनी घेतलेल्या निर्णयास कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे.

**Item No.** 10 **Resolution No.** 4030

विषय : गाळ्याचे भाडे/भाडे खरेदी हप्ते विहित मुदतीत न भरल्यास वसूल करावयाचा दंड.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
गाळ्यांच्या संबंधातील भाडे/भाडे खरेदी हप्ता, सेवा आकार इ. मासिक देणी ज्या महिन्यात देय आहेत त्याच महिन्यात ती भरली नाहीत तर खालील कोष्टकाप्रमाणे दंड वसूल करण्यात यावा.

| अ.क्र. | मासिक भाडे इ.चा दर | आकारावयाचा दंड |
|---|---|---|
| १. | रु. ५०/- पर्यंत | रु. ५/- |
| २. | रु. ५१/- ते रु. १००/- | रु. १०/- |
| ३. | रु. १०१/- ते रु. १५०/- | रु. १५/- |
| ४. | रु. १५१/- ते रु. २००/- | रु. २०/- |

हा दंड एकदाच आकारण्यात यावा. एखाद्या विशिष्ट महिन्याचे भाडे भाडेकरूने त्याच महिन्यात भरले नाही तर त्यावर हा दंड आकारण्यात यावा. वरील दंड आकारून देखील ६ महिन्यांत दंडासहित मूळ रक्कम न भरल्यास २० टक्के वार्षिक दराने व्याज देखील आकारण्यात यावे.
हुडकोच्या कर्जातून बांधलेल्या गाळ्यांच्या बाबतीत भाडे खरेदी हप्त्याच्या थकबाकीवर हुडकोच्या दराने व्याज आकारण्यात येते तेथे हा दंड लावू नये. मात्र अशा गाळ्यांच्या बाबतीत सर्व भाडे खरेदी हप्ते वसूल झालेले असल्यास व इमारतीचे/गाळ्यांचे अभिहस्तांतरण झालेले नसल्याने सेवा आकार इ. वसूल केले जात असल्यास त्या रकमेच्या थकबाकीवर हा दंड आकारण्यात यावा. हे करीत असताना महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (एम.एल.आर.सी.) १९६६ च्या तरतुदीप्रमाणे सक्तीची कारवाई (कोइर्शिव मेजर्स) चालू राहील. या निर्णयाची अंमलबजावणी ठरावाचे स्थायीकरणाची वाट न पाहता दिनांक १.३.१९९३ पर्यंत करण्यात यावी, असे ठरले.

**Item No.** 11 **Resolution No.** 4031

विषय : नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या औद्योगिक कामगारांसाठी बांधलेल्या वसाहतीतील गाळेधारकांकडून वसूल करण्यात येत असलेल्या गैर कृषिकराच्या थकबाकीत सूट मिळण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
प्राधिकरणाच्या नागपूर मंडळाच्या वसाहतीतील गाळ्यापोटी शासनाकडून आकारण्यात आलेली गैरकृषीकराची रक्कम ही संबंधित गाळेधारकांकडूनच वसूल करणे योग्य होईल. गैरकृषीधारकाची आकारणी उशीरा झाला या कारणावरून ती गाळेधारकांना माफ केल्यास त्यामुळे प्राधिकरणास रु. १७.३५ लक्ष एवढे नुकसान सोसावे लागेल व ते सोसणे प्राधिकरणास शक्य होणार नाही. म्हणून गैरकृषीधारकापोटी शासनास भरण्यात आलेली रक्कम गाळेधारकांकडूनच वसूल करण्यात यावी. मात्र आतापर्यंत गैरकृषीप्रकारापोटी जेवढी रक्कम महसूल विभागास भरण्यात आलेली आहे तेवढी रक्कम शासनाने प्राधिकरणास अनुदान म्हणून द्यावी, अशी विनंती शासनास करण्यात यावी. जर शासनाने ही रक्कम अनुदान म्हणून प्राधिकरणास परत केली तरच त्याची परतफेड गाळेधारकास करण्यात यावी.

**Item No.** 12 **Resolution No.** 4032

विषय : व्ही.एस.व्ही. रोड, अमरावती येथे बांधलेल्या १०९ उच्च उत्पन्न गट योजनेतील शिल्लक गाळ्यांचे वाटपाकरिता अटी शिथिल करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
१) दिनांक ३१ मे, १९९० रोजी निर्धारित केलेली गाळ्यांची रु. १,२३,१००/- ही किंमत कायम ठेवण्यात यावी व त्या रकमेवर पुढे व्याज मांडवलीकृत करू नये.
२) गाळ्यांची सुरुवातीस भरावयाची रु. ४९,३२५/- ही रक्कम तशीच कायम ठेऊन त्यावर किंमत ठरविण्याच्या दिनांकापासून विलंबाच्या कालावधीचे व्याज आकारण्यात येऊ नये. या रकमेपैकी ५० टक्के रक्कम ताबा देण्यापूर्वी स्वीकारून उर्वरित ५० टक्के रक्कम मात्र दोन वर्षांत व्याजासहित वसूल करावी.
३) भाडे खरेदी हप्त्याचा कालावधी जून, १९९० पासून सुरू होत असल्याने त्याच्या थकबाकीची रक्कम भरण्यास लाभार्थी तयार होत नाहीत. त्याकरिता भाडे खरेदी हप्त्याचा कालावधी २ वर्षे पुढे ढकलून तो जून, १९९० ऐवजी जून, ९२ पासून वसूल करावा व तो ८१/२ वर्षेच म्हणजे २००१ पर्यंत ठेवावा.

**Item No.** 13 **Resolution No.**

विषय : पुणे मंडळाच्या वसाहतीमधील पानशेत पूरग्रस्तांसाठी बैठ्या इमारतीतील गाळ्यांच्या विक्री योजनेची अंमलबजावणी.

ठराव :

**Item No.** **14** **Resolution No.**

विषय : प्राधिकरण व प्राधिकरणांतर्गत विविध संवर्गातील अधिकाऱ्यांना दैनंदिन कामकाजात निर्णय घेण्याचे अधिकार प्रदान करण्याबाबत.

ठराव :

**Item No.** **15** **Resolution No.** **4033**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणातील प्रशासन विभागाचे अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवाभरतीचे नियम.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाब टिप्पणीत प्रस्ताव केल्याप्रमाणे प्रशासन विभागाचे अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवाभरतीचे प्रारुप नियम शासनाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात यावेत. तथापि शासनाकडे पाठविण्यापूर्वी काही किरकोळ दुरुस्त्या करावयाच्या असल्यास उपाध्यक्ष/प्रा. यांची मान्यता घेऊन पुढील कार्यवाही करावी. स्थायीकरणाची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी, असे सुचविण्यात आले.

**Item No.** **16** **Resolution No.**

विषय : प्राधिकरणाच्या व प्रादेशिक मंडळाच्या कार्यालयाकडील -
अ) कार्यकारी अभियंता यांना मोटारकार खरेदी करण्यासाठी अग्रिम मंजूर करण्याबाबत.

ठराव :

**Item No.** **17** **Resolution No.**

विषय : नालंदा महाकरुणिकाज एन. एस. के. एज्युकेशन इन्स्टिट्यूटला अभ्युदयनगर, काळाचौकी येथे इमारत क्र. १०, ७ व ३२ मधील गाळे वितरण करणेविषयी.

ठराव :

**Item No.** **18** **Resolution No.** **4034**

विषय : राजीव गांधी निवारा प्रकल्पांतर्गत बांधण्यात आलेल्या नोंदणीकृत संस्थांना वितरित केलेल्या गाळ्यांचा मालमत्ता कर महानगरपालिकेस परस्पर भरण्यास परवानगी देण्यासंबंधी.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
राजीव गांधी निवारा प्रकल्पांतर्गत बांधण्यात आलेल्या नोंदणीकृत संस्थांना वितरित केलेल्या गाळ्यांचा मालमत्ता कर महानगरपालिकेस परस्पर भरण्यास खालील अटींवर परवानगी देण्यास मान्यता देण्यात येत आहे.
१) सहकारी गृहनिर्माण संस्थांची विनंती मान्य करून त्यांना प्रकल्पाकडे प्रतिमहा रुपये १४५/- नियमितपणे भरावी लागतील व उरलेली रक्कम रु. ३५/- मालमत्ता कर म्हणून महानगरपालिकेकडे परस्पर भरण्याची जबाबदारी ही नोंदणीकृत संस्थेची राहील.
२) ज्या संस्था प्रस्तावित आहेत अशा संस्थांनी प्रकल्पाला तसे हमीपत्र दिल्यास त्यांनाही मालमत्ता कराची रक्कम परस्पर भरण्याची परवानगी देण्यास हरकत नाही.

---

**Item No.** **19** **Resolution No.**

विषय : गृहनिर्माण महाप्रकल्प -

दिनांक १५.१.१९९३ पर्यंतचा प्रगती अहवाल.

ठराव :

---

**Item No.** **20** **Resolution No.**

विषय : मजासवाडी येथील प्रकल्पाकरिता बांधण्यात आलेल्या नाल्याचा ५० टक्के खर्च प्राधिकरणाने करण्याबाबत.
गृहनिर्माण महाप्रकल्पास हस्तांतरणीय विकास हक्काचा (टी.डी.आर.) उपयोग करणेबाबत.

ठराव :

---

**Item No.** **21** **Resolution No.**

विषय : गृहनिर्माण महाप्रकल्प.
दि. ३१.१.१९९३ पर्यंतचा प्रगती अहवाल.

ठराव :

**Item No.** 22 **Resolution No.** 4035

विषय : सर्व्हे क्र. १३ (भाग) देवनार येथील स्थावर सुरक्षा एक वर्षापेक्षा जास्त कालाकरिता करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
सर्व्हे क्र. १३ (भाग) देवनार येथील स्थावर सुरक्षा व्यवस्थेचा कालावधी वाढवून देण्यास मान्यता देण्यात येत आहे. मात्र सध्याच्या एजन्सीचे काम योग्य नसल्याने दुसऱ्या एजन्सीची नियुक्ती पूर्वीच्याच अटी व शर्तीनुसार करण्यात यावी.

**Item No.** 23 **Resolution No.**

विषय : महाप्रकल्प गृहनिर्माण निविदेतील अटीनुसार उद्भवणाऱ्या विषयांवर निर्णय देण्याकरिता अधिकार प्रदान करणेबाबत.

ठराव :

**Item No.** 24 **Resolution No.**

विषय : मुंबई मंडळाच्या अखत्यारीतील स. क्र. ४१, ओशिवरा येथील ४२ भूखंडाच्या जमिनीवर गृहप्रकल्प - २ राबविण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 25 **Resolution No.**

विषय : नागपूर जिल्ह्यातील पूरग्रस्तांच्या कामाकरिता कंत्राटदारांना लावण्यात आलेली नुकसान भरपाई रक्कम परत करण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 26 **Resolution No.**

विषय : बैल्चा इमारतीतील गाळ्यांच्या विक्री योजनेची अंमलबजावणी.

ठराव :

**Item No.** 27 **Resolution No.**

विषय : पवई महाप्रकल्पाला मंजूर अभिन्यासात येणाऱ्या तळमजला अधिक १४ मजल्याच्या इमारतीस अतिरिक्त भाव देणेबाबत.

ठराव :

| **Item No.** | **28** | **Resolution No.** | **4036** |
|---|---|---|---|

विषय : राजीव गांधी निवारा प्रकल्पांतर्गत मुलुंड येथील सर्व्हे क्र. ३८६ (भाग-१) येथे ९५४ गाळ्यांच्या योजनेसाठी हुडकोकडून रु. १९०.८० लक्ष कर्ज घेण्यास प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती घेण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
मुलुंड येथील सर्व्हे क्र. ३८६ येथे ९५४ गाळ्यांच्या योजनेसाठी हुडकोकडून रु. १९०.८० लक्ष रुपयांचे कर्ज घेण्यास अनुमती व अधिकृती देण्यात येते.

| **Item No.** | **29** | **Resolution No.** | **4037** |
|---|---|---|---|

विषय : दंगलग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी मा. मुख्यमंत्री निधीसाठी मदत निधी उभारण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
दंगलग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी प्राधिकरणाने अधिकारी/कर्मचारी यांचे एक दिवसाचे वेतनामधून रु. १,२१,०९७/- इतकी रक्कम जमा होऊन प्राधिकरणातर्फे त्यामध्ये रु. २,५०,०००/- या रकमेस कमी पडतील एवढ्या रकमेची भर घालून प्राधिकरणातर्फे एकूण रु. २,५०,०००/- दंगलग्रस्त निधी म्हणून मुख्यमंत्र्यांचे निधीमध्ये जमा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.
बैठकीचे विषयसूचीवरील विषय संपल्यानंतर उपस्थितांनी मा. उपाध्यक्ष यांचे आभार मानल्यानंतर बैठकीचे कामकाज संपल्याचे जाहीर करण्यात आले.

**Meeting No.** **Special** **Meeting Date** **26-Feb-19**

**Item No.** **2 a** **Resolution No.** **4041**

विषय : पुणे मंडळाच्या वसाहतीमधील पानशेत पूरग्रस्तांसाठी बैठ्या इमारतीतील गाळ्यांच्या विक्री योजनेची अंमलबजावणी.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
गाळेधारकाने २ वर्षांत भरावयाची रक्कम दिलेल्या ठराविक मुदतीत एकदम भरल्यास त्या रकमेवर १० टक्के सूट देण्यात यावी. तसेच पूरग्रस्तांसाठी शासनाने ज्या गाळ्यांचे वाटप केलेले आहे त्यासाठी लीज ९० वर्षांकरिता देण्यात यावे. तथापि प्रत्येक ३० वर्षांना त्यांचे नूतनीकरण करावे व लीज भाडे २.५ टक्के ऐवजी १ रु. आकारण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

---

**Item No.** **1 a** **Resolution No.** **4040**

विषय : महाराष्ट्र व प्राधिकरणांतर्गत विविध संवर्गातील अधिकाऱ्यांना दैनंदिन कामकाजात निर्णय घेण्याचे अधिकार प्रदान करणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
सद्यस्थितीत व त्यासोबत जोडलेल्या परिशिष्ट १ व परिशिष्ट 'ब' मध्ये नमूद केल्याप्रमाणे उपरोक्त बदलासह अधिकार प्रदानतेच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते. ठरावाची अंमलबजावणी स्थायी करण्याची वाट न पाहता करायला हवी.

---

**Item No.** **1** **Resolution No.** **4038**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा सन १९९२-९३ चा सुधारित व सन १९९३-९४ चा अर्थसंकल्प.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या सन १९९२-९३ चा सुधारित व सन १९९३-९४ चा अर्थसंकल्प मंजूर करण्यात येत आहे.

---

**Item No.** **2** **Resolution No.** **4039**

विषय : स्टाफिंग पॅटर्न

प्राधिकरण व संचालनालये व प्रादेशिक मंडळे यांच्याकरिता कर्मचारी वर्ग, अनुसूची सन १९९३-९४.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाब टिप्पणीत नमूद करण्यात आलेल्या सन १९९३-९४ या वित्तीय वर्षाकरिता अधिकारी/कर्मचारी आकृतीबंधास, शासनाकडून निर्माण करण्यात आलेल्या उपसभापती, दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ हे एक पद समाविष्ट करण्यास मान्यता देण्यात येत आहे.
विशेष बैठकीच्या विषयसूचीवरील उपरोक्त दोन विषय संपल्यानंतर खाली नमूद केलेले पुरवणी विषय निर्णयासाठी घेण्यात आले.

---

**Item No.** 3 **Resolution No.**

विषय : नालंदा सहकरुणिकाज एम.एम.के. एज्युकेशन इन्स्टिट्यूट येथे इमारत क्र. १० व ३२ मधील गाळे वितरण करणेविषयी.

ठराव :

**Item No.** 4 **Resolution No.**

विषय : बैठ्या इमारतीतील गाळ्यांच्या विक्री योजनेची अंमलबजावणी.

ठराव :

**Item No.** 5 **Resolution No.**

विषय : मुंबई मंडळाच्या अखत्यारीतील स. क्र. ४१, ओशिवरा येथील ४२ भूखंडाच्या जमिनीवर गृहप्रकल्प-२ राबविण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 6 **Resolution No.**

विषय : अ) मजासवाडी येथील प्रकल्पाकरिता बांधण्यात आलेल्या नाल्याच्या ५० टक्के खर्च प्राधिकरणाने करण्याबाबत.
ब) गृहनिर्माण महाप्रकल्पात हस्तांतरित विकास हक्काचा (टी.डी.आर.) उपयोग करणेबाबत.

ठराव :

**Item No.** 7 **Resolution No.**

विषय : पवई महाप्रकल्पाला मंजूर अभिन्यासात येणाऱ्या तळमजला अधिक १४ मजल्यांच्या इमारतीस अतिरिक्त भाव देण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 8 **Resolution No.**

विषय : महाप्रकल्प गृहनिर्माण निविदेतील अटीनुसार उद्भवणाऱ्या विषयावर निर्णय देण्याकरिता अधिकार प्रदान करणेबाबत.

ठराव :

**Item No.** 9 **Resolution No.**

विषय : गाळ्यांत घुसखोरी करणाऱ्या विरुद्ध करावयाची कारवाई.

घुसखोरांकडून बाजारभावाने नुकसान भरपाई वसूल करणे.

ठराव :

**Item No.** **10** **Resolution No.**

विषय : शिक्षकांसाठी विशेष गृहनिर्माण व महागृहनिर्माण योजनांतील अर्जदारांना त्यांनी भरणा केलेली अनामत परत करण्याबाबत.

ठराव :

**Item No.** **11** **Resolution No.**

विषय : प्राधिकरणाच्या जमिनीच्या किंमतविषयक धोरणाबाबत.

ठराव :

**Item No.** **12** **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दि. २०.२.१९९३ रोजी झालेल्या १२२ व्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे.

ठराव :

**Item No.** **13** **Resolution No.**

विषय : एस. आय. डी. सी. नागपूर येथील मध्यम उत्पन्न गटांतर्गत ८० गाळे बांधणे - निविदा स्वीकृतीबाबत.

ठराव :

**Item No. 14 Resolution No. 4042**

विषय : निर्मिती केंद्र -
प्राधिकरणांतर्गत कामे निर्मिती केंद्रांना देणे, सदर कामाचे विभाजन करण्याबाबत विभागीय मुख्य अधिकाऱ्यांना अधिकार प्रदान करणे तसेच या कामासाठी निर्मिती केंद्रांना अग्रिम रक्कम प्रदान करणे व इतर तत्सत बाबींसंबंधी उपाध्यक्ष/प्रा. यांना संपूर्ण अधिकार देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
इमारत निर्मिती केंद्रामार्फत प्राधिकरणाने त्यांच्या अधिपत्याखालील योजना राबविण्याबाबत प्राधिकरणाची ही सभा उपाध्यक्ष/प्रा. यांना खालील अधिकार सर्वानुमते प्रदान करीत आहे.
१) इमारत निर्मिती केंद्राला काम देताना कामाची किंमत रु. ५० लाख पर्यंतच्या आर्थिक मर्यादेपर्यंत निविदा न मागविता मंजूर अंदाजपत्रकाप्रमाणे देण्याचे संपूर्ण अधिकार उपमुख्य अभियंता, विभागीय मंडळ किंवा त्यावरील दर्जाच्या अधिकाऱ्यांना प्रदान करणे.
२) इमारत निर्मिती केंद्रासाठी प्रकल्पाच्या ६० टक्के अग्रिम देण्यासंबंधी मुख्य अधिकारी, विभागीय मंडळ यांना संपूर्ण अधिकार देणे.
३) रु. ५० लाखापर्यंतच्या कामांना अ-१ व अ-२ करारपत्राच्या एकूण किंमतीची मर्यादा रु. ५० लाखापर्यंत सांभाळून कामाचे विभाजन करण्याचे अधिकार उपमुख्य अभियंता व त्यावरील दर्जाच्या अधिकाऱ्यांना देणे.
४) निर्मिती केंद्रासाठी प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील प्रस्तावित कर्मचारी संवर्ग १ वर्षाच्या कालावधीपुरता उपलब्ध करून देणे.

---

**Item No. 15 Resolution No. 4043**

विषय : स. नं. १०४/१, तिसगाव, औरंगाबाद येथील जमिनीवरील प्राधिकरणाच्या योजनेकरिता सिडकोला अदा करावयाच्या रकमेबाबत व गोळेवाडी येथील म्हाडाच्या ताब्यातील जमीन तिसगाव येथील जमिनीच्या बदल्यात सिडकोला देणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाब टिप्पणीमधील नमूद केल्याप्रमाणे तिसगाव येथील प्राधिकरणाच्या गृहनिर्माण योजनेच्या मंजूरीसाठी सिडकोने मागणी केल्याप्रमाणे रु. १,१७,९३,६७७/- इतकी रक्कम सिडकोला भरण्यास (पूर्वी भरलेली रक्कम वजा करून) तसेच तिसगाव येथील जमिनीच्या बदल्यात गट नं. ७९, गोळेवाडी येथील जमीन सिडकोला देण्याचे प्रस्तावास प्राधिकरण मान्यता देत आहे. सदर ठरावाची अंमलबजावणी तात्काळ करण्यात यावी.

---

**Item No.** 16 **Resolution No.** 4044

विषय : दंगलग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी मा. मुख्यमंत्री निधीसाठी मदत निधी उभारण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
दंगलग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी प्राधिकरणाचे अधिकारी/कर्मचारी यांचे एक दिवसाचे वेतनामधून रु. १,२१,०९७/- इतकी रक्कम जमा होऊन प्राधिकरणातर्फे त्यामध्ये रु. २,५०,०००/- या रकमेस कमी पडतील एवढ्या रकमेची भर घालून प्राधिकरणातर्फे एकूण रु. २,५०,०००/- दंगलग्रस्त निधी म्हणून मुख्यमंत्र्यांचे निधीमध्ये जमा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.
विशेष बैठकीचे विषय सूचीवरील व पुरवणी विषयसूचीवरील विषय संपल्यानंतर मा. अध्यक्ष यांचे आभार मानल्यानंतर बैठकीचे कामकाज संपल्याचे जाहीर करण्यात आले.

**Item No.** 16 **Resolution No.** 4044

विषय : दंगलग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी मा. मुख्यमंत्री निधीसाठी मदत निधी उभारण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
दंगलग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी प्राधिकरणाचे अधिकारी/कर्मचारी यांचे एक दिवसाचे वेतनामधून रु. १,२१,०९७/- इतकी रक्कम जमा होऊन प्राधिकरणातर्फे त्यामध्ये रु. २,५०,०००/- या रकमेस कमी पडतील एवढ्या रकमेची भर घालून प्राधिकरणातर्फे एकूण रु. २,५०,०००/- दंगलग्रस्त निधी म्हणून मुख्यमंत्र्यांचे निधीमध्ये जमा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.
विशेष बैठकीचे विषय सूचीवरील व पुरवणी विषयसूचीवरील विषय संपल्यानंतर मा. अध्यक्ष यांचे आभार मानल्यानंतर बैठकीचे कामकाज संपल्याचे जाहीर करण्यात आले.

**Meeting No.** 123 **Meeting Date** 05-Mar-19

**Item No.** 1 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दि. २६-२-१९९२ रोजी झालेल्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे.

ठराव :

**Item No.** 2 **Resolution No.** 4045

विषय : नालंदा महाकरवीराज म्हणजे एन. एम. के. एज्युकेशन इन्स्टिट्यूट या संस्थेस अभ्युदय नगर येथील इमारत क्र. ७ व १२ मधील गाळे वितरण करणेसंबंधी.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
१) अभ्युदय नगर वसाहतीतील इमारत क्र. ७ मधील ३६ गाळे व इमारत क्र. ३२ मधील ३ गाळे (अधिक एक) महानगरपालिकेस भाडे तत्वावर वितरित करण्यात आलेले परंतु महानगरपालिकेने त्याचा वापर न करता रिक्त ठेवलेले गाळे एन.एम.के. इन्स्टिट्यूट या शैक्षणिक संस्थेस महानगरपालिकेच्या 'ना-हरकत' पत्राच्या अधीन राहून मालकी तत्वावरा एक रकमी विक्री रक्कम घेऊन विक्री करण्यात यावी. बहुमजली इमारतीतील विक्री योजनेतील सुविधा अंतर्गत शाळा, पोस्ट ऑफिस अशा संस्थांना वितरित करण्यात आलेले गाळे मूळ किंमतीत देण्यात यावेत, असा प्राधिकरणाने धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे. महानगरपालिकेकडून 'ना-हरकत' पत्र प्राप्त करून ते मंडळास सादर करण्याची जबाबदारी मात्र संस्थेची राहील.
२) इमारत क्र. ७ व ३२ मधील गाळ्यांबरोबर इमारत क्र. १० मधील भाडे तत्वावरील गाळे हे एन.एम.के. इन्स्टिट्यूटने जसे आहेत तसे मालकी तत्वावर विकत घ्यावेत. तथापि गाळे दुरुस्तीबाबत इमारत क्र. १० च्या सहकारी संस्थेने जो दिवाणी दावा दाखल केलेला आहे त्यावर सहकारी न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे रु. १,९७,०००/- जर मंडळास सदरहू संस्थेस द्यावे लागले तर ती रक्कम व इतर खर्च लक्षात घेऊन त्या सर्व खर्चाचा अंतर्भाव विक्री किंमतीमध्ये समाविष्ट करण्यात यावा व तसे संस्थेकडून हमीपत्र घेण्यात यावे.
वर नमूद केलेल्या अटींच्या अधीन राहून एन. एम. के. शिक्षण संस्थेस मालकी तत्वावर ५२ गाळे वितरित करण्यात यावेत, असे ठरविण्यात आले.

**Item No.** 3 **Resolution No.** 4046

विषय : बैठ्या इमारतीतील गाळ्यांच्या विक्री योजनेची अंमलबजावणी.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
मे, १९८७ मध्ये शासनाने मंजूर केलेल्या बैठ्या इमारतीतील गाळ्यांच्या विक्री योजनेमध्ये रहिवाशांना वसाहतीतील उर्वरित चटईक्षेत्र बाजारभावाच्या ५० टक्के रक्कम आकारावी, अशी तरतूद आहे. जून, १९८८ मध्ये याप्रमाणे देकारपत्रे वितरित करण्यात आलेली होती. मध्यंतरी शासनाच्या स्थगिती आदेशामुळे योजनेची अंमलबजावणी झाली नाही व योजना नव्याने कार्यान्वित करण्यासाठी ही बाब प्राधिकरणाच्या दिनांक २१.१०.१९९२ च्या बैठकीसमोर आणण्यात आली. गाळे विक्रीच्या योजनेची नव्याने अंमलबजावाणी करताना सध्याच्या म्हणजे १९९२-९३ च्या बाजारभावाप्रमाणे दर काढून त्यावर चटईक्षेत्राची किंमत आकारावी, असा निर्णय दिनांक २१.१०.१९९२ च्या बैठकीत प्राधिकरणाने घेतला. रहिवाशांना १९८८ मध्ये चटईक्षेत्राची किंमत तात्कालिक बाजारभावाने कळविली असल्याने आताच्या बाजारभावाने किंमती आकारल्यास विक्री योजनेची अंमलबजावणी यशस्वी होणार नाही, हे लक्षात आणून दिल्याने प्राधिकरणाने फेरविचार करून १९८८ मध्ये निर्धारित केलेल्या व त्या अनुषंगाने कळविलेल्या दरावर १२ प्रतिशत सरळ व्याजाची आकारणी करून तदनंतर येणाऱ्या नव्या दराच्या ५० टक्के दराने येणाऱ्या किंमती कळवाव्यात असा निर्णय घेतला.
तसेच जे रहिवासी एक रकमी विक्री किंमत भरतील अशांना वटाव (रिबेट) देण्याबाबतही प्राधिकरणाने फेरविचार केला व किंमती कळविल्यापासून ३० दिवसांचे आत जे रहिवासी एकरकमी विक्री किंमत भरलीत अशांना प्रोत्साहन म्हणून विक्री किंमतीच्या ५ प्रतिशत वटाव (रिबेट) देण्यात यावा, असा निर्णय एकमताने घेण्यात आला. त्याचप्रमाणे बाब टिप्पणीसोबत जोडलेल्या परिशिष्टातील रकाना क्र. ४ (ब) मध्ये प्रस्तावित केलेल्या प्रस्तावासही मान्यता देण्यात आली. स्थायीकरणाची वाट न पाहता कार्यवाही करण्यात यावी.

**Item No.** 4 **Resolution No.** 4047

विषय : मुंबई मंडळाच्या अखत्यारीतील सर्व्हे क्र. ४१ ओशिवरा येथील ४२ भूखंडाच्या जमिनीवर महागृह प्रकल्प - (२) राबविण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

उपरोक्त विषयाबाबत मुंबई मंडळाने पूर्वी ४२ सहकारी संस्थांसाठी भूखंड अशी योजना जाहीर केली होती. ती योजना शासनाच्या आदेशानुसार रद्द करण्यात आली होती. याबाबत २ अर्जदार सहकारी संस्थांनी न्यायालयात अर्ज करून पूर्वीच्या अर्जदारांना प्राधान्य क्रमाने वाटपासाठी निर्णय कळविला होता. गाळे बांधण्याची योजना राबविण्याच्या दृष्टीने सदर निर्णयात बदल करण्यासाठी मंडळाने न्यायालयाची परवानगी मागितली होती. अशी परवानगी काही अटी व शर्तींना अधीन राहून न्यायालयाने दि. ९.२.१९९३ च्या सुनावणीच्या वेळी दिली. या बाबीची प्राधिकरणाने नोंद घेतली आणि त्यानुसार योजना राबविण्याचा मंडळाचा प्रस्ताव विचारात घेतला. सदर योजना राबविण्याचे दृष्टीने महागृहप्रकल्प-२ असा टर्न-की-पद्धतीने निविदा मागवून प्रकल्प हाती घेण्यास प्राधिकरणाने मंजूरी दिली.

सदर योजनेत प्रमुख्य वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे राहतील, याची प्राधिकरणाने नोंद घेतली.

१) ४२ भूखंडांवर ४२ इमारती बांधण्यात येतील.

२) २१ इमारती पूर्वीच्या अर्जदारांपैकी ५० टक्के अर्जदार सहकारी संस्थांना अर्ज केल्यास त्यांना प्राधान्य क्रमाने वाटपासाठी राखीव राहतील.

३) ४२ इमारती सात समूहात विभागल्या गेल्या असून त्याप्रमाणे सात स्वतंत्र निविदा मागविण्यात येतात.

४) इमारतीत तळमजला व पहिला मजला यामधील गाळे अनिवासी उपयोगाकरिता वितरित करण्यात येतील की ज्या योगे मंडळास जास्त उत्पन्न मिळेल.

५) गाळ्याचे बांधकाम क्षेत्रफळ सुमारे ६५ चौ. मी. ठेवण्यात येईल.

६) योजनेत पुनर्रचित भागांचा वापर करण्यात येणार नाही व बांधकाम पारंपरिक पद्धतीने करणे अनिवार्य राहील.

७) सदर योजनेकरिता सोबतच्या पद्धतीनुसार छाननी करून निवडलेल्या अधिकार उपाध्यक्ष/प्रा. यांना प्रदान करण्यात येत आहेत.

८) सदर योजनेकरिता प्रकल्प व्यवस्थापन समंत्रकांची नेमणूक करण्याबाबतचे अधिकार उपाध्यक्ष/प्रा. यांना प्रदान करण्यात येत आहेत.

९) सदर योजनेवरील प्रमुख वैशिष्ट्यांसह मुंबई मंडळामार्फत राबविण्यात यावी. निविदा सात समूहांसाठी स्वतंत्ररित्या मागवावयाच्या असल्यामुळे काही समूहांमधील निविदा स्वीकारण्याची शक्ती मंडळाकडे राहू शकते. परंतु सदर प्रकरणी समान तत्वावर निर्णय घेणे जरुरीचे असल्याने य निविदाबाबतचे सर्व हक्क प्राधिकरणाकडे राहतील.

**Item No.** 5 **Resolution No.**

विषय : मजासवाडी येथील प्रकल्पाकरिता बांधण्यात आलेल्या नाल्याचा ५० टक्के खर्च प्राधिकरणाने करण्याबाबत.
गृहनिर्माण महाप्रकल्पात हस्तांतरणीय विकास हक्काचा (टी.डी.आर.) उपयोग करणेबाबत.

ठराव :

**Item No.** 6 **Resolution No.** 4048

विषय : पवई महाप्रकल्पाला मंजूर अभिन्यासात येणाऱ्या तळमजला अधिक १४ मजल्यांच्या इमारतीस अतिरिक्त भाव देणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

१) बाब टिप्पणीतील परिस्थिती लक्षात घेता बदललेल्या वावानुसार सर्व ४६ सात मजली इमारतींचे बांधकाम मूळ निविदेतील अटी व शर्तीस अधीन राहून मे. बी. जी. शिर्के आणि कंपनी यांनी करावे.
२) बदललेल्या वावानुसार करावयाच्या कामासाठी १३ मार्च, १९९३ नंतर १८ महिन्यांची मुदतवाढ मंजूर करण्यात येत आहे.
३) यापूर्वी केलेला या कामावरील दंड माफ करणेत यावा. परंतु वसूल केलेली दंडाची रक्कम संपूर्ण काम पूर्ण झाल्यावरच परत करण्यात यावी.
४) मोबिलायझेशन ॲडव्हान्सपोटी दिलेल्या रु. ४.३३ कोटी रकमेची वसूली आतापर्यंत वसूल झालेली रक्कम वजा आता उर्वरित रक्कम बदललेल्या वावानुसार काम पूर्ण होण्यापूर्वी निविदेतील अटी व शर्तीनुसार वसूल करण्यात यावी.
५) मूळ निविदेतील वाव कमी झाल्यामुळे फारतर शेजारील भूखंडावरील ७ मजली व ९ इमारतींचेही बांधकाम आवश्यकता भासल्यास मूळ निविदेतील दरानुसारच मे. बी. जी. शिर्के आणि कंपनी यांना देण्यात यावे.

**Item No.** 7 **Resolution No.** 4049

विषय : महाप्रकल्प गृहनिर्माण योजनेतील अटींनुसार उद्‌भवणाऱ्या विषयावर निर्णय देण्याकरिता अधिकार प्रदान करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
महाप्रकल्प गृहनिर्माणाबाबत वेळोवेळी घ्यावे लागणारे निर्णय निविदेतील अटींप्रमाणे सक्षम अधिकाऱ्यांनी घ्यावी व निविदेतील अटींचे विचलन (डेविएशन) करावयाचे असल्यास त्यास प्राधिकरणाची मंजूरी घेण्यात यावी.

**Item No.** 8 **Resolution No.** 4050

विषय : गाळ्यात घुसखोरी करणाऱ्यांविरुद्ध करावयाची कारवाई.

घुसखोरांकडून बाजारभावाने नुकसान भरपाई वसूल करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
गाळ्यांची कुलपे तुडून किंवा अन्य प्रकारे गाळ्यांत घुसखोरी झाल्यास घुसखोरास गाळ्यांतून जोपर्यंत काढून टाकले जात नाही तोपर्यंतच्या कालावधीसाठी त्याला गाळ्यांच्या किंमतीचा बाजारभावाने नुकसान भरपाई आकारण्यात यावी. याप्रमाणे आकारलेली नुकसान भरपाई घुसखारे गाळेधारकाने भरली नाही तर महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम १९७६ मधील तरतुदीनुसार नुकसान भरपाईची वसूली महसूलाच्या थकबाकीची वसूली म्हणून करण्यात यावी.

**Item No.** 9 **Resolution No.** 4051

विषय : शिक्षकांसाठी विशेष गृहनिर्माण योजना व गृहनिर्माण महाप्रकल्प योजनेतील अर्जदारांना त्यांनी भरलेल्या अनामत रक्कम परत करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
सोडतीनंतर ज्या अर्जदारांनी ते गाळे वाटपास पात्र असूनही किंवा ज्यांना गाळे वाटप देणारे पत्र प्राप्त झाले आहे. परंतु त्यांच्या असमर्थतेमुळे ते योजनेतून माघार घेऊ इच्छितात अशा अर्जदारांनी भरलेल्या अनामत रकमेतून प्रशासकीय खर्चापोटी कमीत कमी १० प्रतिशत रक्कम ठेऊन उर्वरित अनामत रक्कम खाली दर्शविल्याप्रमाणे अर्जदारांना परत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अनामत रक्कम | १० प्रतिशत प्रशासकीय खर्चापोटी वळती करावयाची रक्कम | उर्वरित परत करावयाची अनामत रक्कम |
|---|---|---|
| १) रु. १०,०००/- | रु. १,०००/- | रु. ९,०००/- |
| २) रु. १५,०००/- | रु. १,५००/- | रु. १३,५००/- |
| ३) रु. २०,०००/- | रु. २,०००/- | रु. १८,०००/- |
| ४) रु. २५,०००/- | रु. २,५००/- | रु. २२,५००/- |

काही विशिष्ट परिस्थितीत १० प्रतिशतपेक्षा अधिक रक्कम कापून ठेवणे आवश्यक असेल तर त्याबाबतचे सर्व अधिकार गाळे वाटप विनियमातील तरतुदीनुसार प्रादेशिक मंडळाचे मुख्य अधिकारी यांनी राहतील.

**Item No.** 10 **Resolution No.**

विषय : प्राधिकरणाच्या जमिनीच्या किंमतीविषयक धोरणाबाबत.

ठराव :

**Item No. 11 Resolution No. 4052**

विषय : लक्ष्मी नगर, पुणे येथील उच्च उत्पन्न गटातील ८४ गाळ्यांना विद्युतीकरण करणाऱ्या कंत्राटदाराचा मृत्यू झाल्याने अट-१५ अंतर्गत कारवाईबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
लक्ष्मीनगर, पुणे येथील उच्च उत्पन्न गटातील ८४ गाळ्यांना विद्युतीकरण करणारे कंत्राटदार श्री. गर्दे हे दीर्घकाल आजारानंतर दिनांक २.११.१९९० रोजी स्वर्गवासी झाल्याने सदर काम पूर्ण करू शकले नाहीत. तरी मानवतावादी तत्व विचारात घेऊन निविदामधील कराराच्या अट ३-(ए) नुसार कार्यवाही न करता अट (१५) नुसार कार्यवाही करावी. जेणेकरून श्री. गर्दे यांच्या विधवा पत्नीला त्यांनी सदर कामासही भरलेली अनामत रक्कम परत मिळू शकेल.

**Item No.** 12 **Resolution No.** 4053

विषय : गोधनी रोड, यवतमाळ येथे नागपूर मंडळाद्वारे बांधण्यात आलेल्या मध्यम उत्पन्न गटातील (१३८ अधिक ५१) बरोबर १८९ गाळ्यांच्या वाटपासंबंधीच्या अटी शिथिल करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

अ) १३८ गाळे मध्यम उत्पन्न गट याबाबत खालील अटींच्या अधीन राहून प्रस्ताव मंजूर करण्यात आला.

१) या योजनेतील गाळ्यांचे वाटप मार्च, १९९१ पासून करण्यात आले आहे. परंतु गाळ्यांची किंमत दि. ३१.३.१९८८ रोजी रु. ५९,६५०/- इतकी ठरविण्यात आली आहे. हीच किंमत कायम ठेऊन शिल्लक राहिलेल्या गाळ्यांची किंमत ३१.३.१९९१ पर्यंत व्याजाची रक्कम घेऊन ती निर्धारित होईल, ती कायम करावी व त्या रकमेवर यानंतर व्याज मांडवलीकृत करू नये.

२) गाळ्यांची सुरुवातील भरावयाची रक्कम रु. ३३,२५०/- ही तशीच कायम ठेवावी व त्यावर किंमत ठरविलेल्या दिनांकापासून विलंबाच्या कालावधीचे व्याज आकारू नये. या रकमेपैकी ५० टक्के रक्कम ताबा देण्यापूर्वी स्वीकारून उर्वरित रक्कम मात्र २ वर्षात व्याजासहित वसूल करावी. तसेच गाळे वाटपापर्यंतच्या भाडे खरेदी हप्त्याच्या थकबाकीपैकी अर्धी रक्कम वितरणाच्या पूर्वी घ्यावी व ५० टक्के रक्कम व्याजासहित २ वर्षात वसूल करावी.

३) भाडे खरेदी हप्त्याच्या कालावधीतील एप्रिल, १९८८ ऐवजी सर्व गाळेधारकांना एप्रिल, १९९१ पासून ९ वर्षापर्यंत म्हणजे सन २००० पर्यंत करावी व त्यानुसार मासिक भाडे खरेदी हप्ते ठरविण्यात यावेत.

५१ गाळे मध्यम उत्पन्न गट याबाबत खालील अटींच्या अधीन राहून प्रस्ताव मंजूर करण्यात आला.

हे गाळे दुसऱ्या टप्प्यात बांधले असल्यामुळे बांधकामाच्या खर्चावर आधारित त्यांची किंमत १३८ गाळ्यांपेक्षा सुमारे रु. ४,०००/- ने जास्त आहे. परंतु हे गाळे एकाच योजनेतील व एकाच परिसरातील असल्याने त्यासाठी वेगवेगळी किंमत आकारणे योग्य होणार नाही. म्हणून या गाळ्यांना सुद्धा वरील १३८ गाळ्यातील शिल्लक गाळ्यांसाठी जी किंमत ठरविण्यात आली आहे व इतर सवलती देण्यात आलेल्या आहेत, तीच किंमत व सवलती देण्यात याव्यात.

**Item No.** **13** **Resolution No.** **4054**

विषय : बोरिवली येथे रेल्वे मार्गावरील उड्डाण पुलासाठी राजेंद्रनगर या मंडळाच्या वसाहतीतील जमीन मुंबई महानगरपालिकेस देण्याबाबत आणि त्यामुळे बाधित होणाऱ्या गाळ्यामधील भाडेकरूंचे पर्यायी जागेत पुनर्वसन करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
राजेंद्र नगर, बोरिवली (पू) या वसाहतीतील १८ बैठ्या गाळ्यांमधील रहिवाशांचे रेल्वे मार्गावरील उड्डाण पूल आणि जोडरस्ते यांनी बाधित झाल्यामुळे पुनर्वसन करण्यासाठी सदर वसाहतीतील ९३४.७४ चौ. मी. आणि ४६९ चौ. मी क्षेत्राचे भूखंड देण्याचा प्रस्ताव ठराव क्र. ११७०, दि. ११.९.१९७२ द्वारे मंजूर करण्यात आला होता. सदर निर्णयात भाडेकरूंच्या अडचणी लक्षात घेऊन काही बदल करण्याचे आवश्यक असल्याचे प्राधिकरणाच्या निदर्शनास आणण्यात आले. त्याबाबत विचार करून प्राधिकरणाने सदर भूखंडाचे क्षेत्र सध्याच्या गाळ्याच्या क्षेत्राच्या दुप्पट असले आणि अतिरिक्त गाळे बाजारात विकून बांधकाम किंमतीत अंशदान मिळविणे शक्य असले तरी मिळणाऱ्या नफ्यापैकी नियमानुसार अनुज्ञेय ५० टक्के हिश्श्यावरील आपला हक्क सोडण्यास अनुमती दिली. मात्र सदरहू भूखंडाच्या वाटपाबाबतच्या अन्य अटी व शर्ती नेहमीप्रमाणे राहतील. या निर्णयाची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी, असे ठरले.

---

**Item No.** **14** **Resolution No.** **4055**

विषय : पोईसर येथील गृहनिर्माण महाप्रकल्प रद्द झाल्यामुळे व्यवस्थापन सल्लागार मे. प्रेमनाथ आणि असोसिएट यांची सेवा समाप्त करणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
पोईसर येथील महाप्रकल्पाचे व्यवस्थापन सल्लागार मे. प्रेमनाथ आणि असोसिएट यांची प्रकल्पावरील सेवा समाप्त करण्यात येत आहे.
विषयसूचीवरील विषय संपल्यानंतर आयत्यावेळी खालील विषयांचा प्रस्ताव विचारार्थ घेण्यात आला.

---

**Item No.** **15** **Resolution No.** **4056**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणातील अनुरेखक, सहा. आरेखक, आरेखक व मुख्य आरेखक तसेच उपसमाज विकास अधिकारी, समाज विकास अधिकारी यांच्या सेवाभरतीचे नियम.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
प्राधिकरणातील अनुरेखक, सहाय्यक आरेखक, आरेखक व मुख्य आरेखक तसेच उपसमाज विकास अधिकारी, समाज विकास अधिकारी व मुख्य समाज विकास अधिकारी यांच्या सेवा प्रवेश भरतीचे बाब टिप्पणीसोबत जोडलेल्या प्रारुप नियमास मान्यता देण्यात येत आहे. सदर नियमास शासनाची मंजूरी आवश्यक असल्याने शासनाकडे तसा प्रस्ताव मंजूरीसाठी पाठविण्यात यावा व कार्यवृत्तास मंजूरी मिळण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी असे ठरविण्यात आले.
विषयसूचीवरील विषय संपल्यानंतर उपस्थितांनी मा. अध्यक्ष यांचे आभार मानल्यानंतर बैठकीचे कामकाज संपल्याचे जाहीर करण्यात आले.

---

**Meeting No.** 124 **Meeting Date** 08-Apr-19

**Item No.** 1 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दि. ५-३-१९९३ रोजी झालेल्या १२३ व्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे.

ठराव :

---

**Item No.** 2 **Resolution No.**

विषय : पवई महाप्रकल्पाला मंजूर अभिन्यासात येणाऱ्या तळमजला अधिक १४ मजल्यांच्या इमारतीस अतिरिक्त भाव देणेबाबत.

ठराव :

---

**Item No.** 3 **Resolution No.** 4057

विषय : ब-१ व ब-२ निविदा नमुन्यातील करारपत्रातील कामातील दोषांच्या दुरुस्तीचा कालावधी नमूद करणे. (डिफेक्ट लायाबिलिटी पिरियड)

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या योजनेअंतर्गत इमारतीचे बांधकाम पूर्ण झाल्यावर जे दोष आढळून येतील ते ठेकेदारांकडून दुरुस्त करून घेण्याचा कालावधी (डिफेक्ट लायाबिलिटी पिरियड) १ वर्ष ठेवण्यात यावा व तसा उल्लेख निविदा करारात करण्यात यावा.

---

**Item No.** 4 **Resolution No.** 4058

विषय : हुडकोने मंजूर केलेल्या नागरी गृहनिर्माण योजनांसाठी हुडकोकडून कर्ज घेण्यास प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाब टिप्पणीस जोडलेल्या तक्ता 'अ' मध्ये दर्शविलेल्या नागरी गृहनिर्माण/दुरुस्ती व नूतनीकरण योजनांसाठी हुडकोकडून एकूण रु. ५८.३३ लाख कर्ज घेण्यास अनुमती व अधिकृती देण्यात येत आहे. कर्जाव्यतिरिक्त रक्कम लाभार्थीकडून वसूल करण्यात यावी.
यापुढे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी/प्रा. यांना हुडको या वित्तीय संस्थेकडून प्राधिकरणांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध गृहनिर्माण योजनांसाठी लागणारा कर्ज पुरवठा मंजूर करून घेण्यासाठी अधिकार प्रदान करण्यात येत आहेत.

---

**Item No.** 5 **Resolution No.** 4059

विषय : प्राधिकरणाच्या गाळे/भूखंड यांच्या वाटपासाठी अर्ज स्वीकारताना अवलंबिण्यात येणारी सध्याची प्रक्रिया अधिक सुलभ करणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
प्राधिकरणाचे गाळे/भूखंड यांच्या वितरणासाठी प्राधिकरणाच्या घटकांकडून मागविण्यात येणाऱ्या अर्जासोबत अर्जदाराच्या पात्रतेबाबत प्रमाणपत्रे/दाखले स्वीकारण्याची पद्धत आहे. त्यामुळे अर्जदारांना प्रमाणपत्रे/दाखले मिळविण्यासाठी श्रम पडतात व जर अर्जदाराचा अर्ज सोडतीत यशस्वी झाला नाही तर अर्जदाराचे श्रम व वेळ नाहक व्यर्थ जातात. म्हणून यापुढे प्राधिकरणाच्या घटकांकडून प्राधिकरणाच्या विहित कार्यपद्धतीनुसार गाळे/भूखंडाच्या वितरणासाठी अर्ज स्वीकारताना अर्जासोबत स्वीकारावयाची रक्कम स्वीकारावी व पात्रतेबाबत स्टँप पेपरवर प्रतिज्ञापत्र घेऊन आवश्यक ती सर्व प्रमाणपत्रे, दाखले ठराविक मुदतीत सादर करण्यास कळवून ती नंतर स्वीकारावीत यास मान्यता देण्यात येते. तसेच अर्जासोबत घ्यावयाचा प्रतिज्ञापत्राचा नमुना प्राधिकरणाच्या विधी सल्लागार यांच्या सहमतीने मंडळांना देण्यात यावा, असेही ठरविण्यात आले.

**Item No.** 6 **Resolution No.** 4060

विषय : गृहनिर्माण महाप्रकल्प (२) करिता पूर्व पात्र विकासकांच्या यादीस मान्यता देणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
गृहनिर्माण महाप्रकल्प (२) करिता सहपत्र-२ मध्ये दिलेली विकासकांची कंत्राटदारांच्या यादीमधून मेसर्स अबोड कन्स्ट्रक्शन व बी. जी. शिर्के आणि कंपनी यांची नावे वगळून इतर कंत्राटदारांच्या नावाच्या यादीस अंतिम मान्यता देण्यात येत आहे. ठरावाच्या स्थायीकरणाची वाट न पाहता याबाबतची कार्यवाही त्वरित करण्यात यावी असे ठरविण्यात आले.

**Item No.** 7 **Resolution No.** 4061

विषय : शैलेंद्र नगर, दहिसर येथील २२०१.०८ चौ. मी. क्षेत्रफळाचा भूखंड भारत पेट्रोलियम (कार्पोरेशन) यांना एल. पी. गॅस गोडाऊनसाठी व मुंबई उपनगरे विद्युत पुरवठा उपक्रमास रिसिव्हिंग स्टेशनकरिता वितरण करणेविषयी.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
शैलेंद्र नगर, दहिसर येथील भूमापन क्र. १८० पैकी ६६९ चौ. मी. क्षेत्र भारत पेट्रोलियम कार्पोरेशनला एल. पी. गॅस गोडाऊनसाठी तसेच उर्वरित १५३८.०८ चौ. मी. क्षेत्र मुंबई उपनगरे विद्युत पुरवठा उपक्रमास रिसिव्हिंग स्टेशनसाठी प्राधिकरणाच्या प्रचलित अटी व शर्तीस अधीन राहून तसेच किंमत विषयक धोरणानुसार वितरण करण्यास मंजूरी देण्यात येत आहे. वरील बाबतीतील पुढील कार्यवाही मुख्य अधिकारी, मुंबई गृहनिर्माण मंडळाने करावी.

**Item No.** 8 **Resolution No.**

विषय : गृहनिर्माण महाप्रकल्पाचा कामाचा दि. १५.३.१९९३ पर्यंतचा प्रगती अहवाल.

ठराव :

**Item No.** 9 **Resolution No.** 4062

विषय : नवीन चंद्रपूर शहराच्या क्षेत्रातील विकास परवाने व नियंत्रण यासाठी सक्षम अधिकारी नेमण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाची चंद्रपूर शहरालगतच्या सुमारे १४०० हेक्टर क्षेत्राकरिता शासन निर्णय क. टीपीएस/१२८४/१३२३/सीआर-१०५/पुणे-९, दिनांक २९.१२.१९८८ अन्वये विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नेमणूक झालेली आहे. त्यानुसार महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियमानुसार विकास नियमन व नियंत्रणाबाबतची कार्यवाही प्राधिकरणास करावयाची आहे. प्राधिकरणाने यापूर्वी ठराव क. २००१, दि. ११.१२.१९९१ नुसार महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियमचे प्रकरण (४) चे अधिकार नागपूर मंडळास प्रदान केले आहेत.
विकास परवानगी विहित मुदतीत द्यावयाची असते. तसेच विकास नियंत्रणाची कार्यवाही तावडतोब करावयाची असते. त्यामुळे असे अधिकार विभागीय मंडळास न देता स्थानिक सक्षम अधिकाऱ्यास द्यावेत असे प्राधिकरणाने एकमताने ठरविले. त्यानुसार ठराव क. २००१ रद्द करून बाब टिप्पण्या सोबतच्या तक्त्यात महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ नुसार करावयाची कार्यवाही व ती अंमलात आणण्यासाठी सक्षम अधिकारी यांना अधिकार प्रदान करण्याच्या प्रस्तावास मंजूरी देत आहे.
सदर ठरावाच्या स्थायीकरणची वाट न पाहता याबाबतची कार्यवाही त्वरित करण्यात यावी, असे ठरविण्यात आले.
विषयसूचीवरील विषय संपल्यानंतर मा. अध्यक्ष/प्रा. यांच्या परवानगीने खालील प्रस्ताव प्राधिकरणाच्या विचारार्थ घेण्यात आले.

**Item No.** 10 **Resolution No.** 4063

विषय : ह्युमन सेटलमेंट मॅनेजमेंट इन्स्टिटयूट यांच्या सहकार्याने प्रशिक्षण कार्यक्रम तयार करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
ह्युमन सेटलमेंट मॅनेजमेंट इन्स्टिटयूट यांचे सहकार्याने प्राधिकरण एकत्रित सहकार्याने प्रशिक्षण कार्यक्रम दिनांक १.४.१९९३ ते ३१.३.१९९५ या कालावधीत अंमलात आणणार आहे. त्यासंबंधीच्या करारनाम्यास व प्रशिक्षण कार्यक्रमास प्राधिकरण मान्यता देत आहे.

**Item No.** 11 **Resolution No.** 4064

विषय : हुडकोने मंजूर केलेल्या नागरी गृहनिर्माण योजनेसाठी हुडकोकडून कर्ज घेण्यास प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती मिळण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाब टिप्पणीस जोडलेल्या तक्ता 'अ' मध्ये दर्शविलेल्या नागरी गृहनिर्माण योजनेसाठी हुडकोकडून एकूण रु. २१३.९७ लाख कर्ज घेण्यास अनुमती व अधिकृती देण्यात येत आहे. कर्जाव्यतिरिक्त रक्कम लाभार्थींकडून वसूल करण्यात यावी. याबाबत बाब क्र. १२४/४ मधील ठराव लागू करण्यात यावी, असे ठरले.

**Item No.** 12 **Resolution No.** 4065

विषय : गृहनिर्माण महाप्रकल्पातून शिल्लक राहिलेल्या गाळ्यांमधून काही गाळ्यांची बृहन्मुंबई महानगरपालिका व बेस्ट उपक्रमांची मागणी.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
मजासवाडी येथील गृहनिर्माण महाप्रकल्पातील छोट्या आकारमानाचे ७१७ गाळे व चांदिवली येथील ५३३ गाळे बृहन्मुंबई महानगरपालिका व बी.ई.एस.टी. उपक्रमास गाळे वाटप क्र. ६ (४) मधील तरतुदीचा अवलंब करून एकरकमी विक्री पद्धतीवर गाळे वाटपाच्या नियमाच्या अधीन राहून विक्री करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** 13 **Resolution No.** 4066

विषय : माहे डिसेंबर, १९९२ व जानेवारी, १९९३ या दोन महिन्यांमध्ये मुंबई शहर व उपनगरात उसळलेल्या दंगलग्रस्तांसाठी निवासी गाळ्यांची विशेष योजना.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
माहे डिसेंबर, १९९२ व जानेवारी, १९९३ मध्ये मुंबई शहर व उपनगरामध्ये उसळलेल्या दंगलीतील दंगलग्रस्तांसाठी शासनाने मंजूर केलेल्या 'दंगलग्रस्तांसाठी विशेष निवारा योजना' या विशेष गृहनिर्माण योजनेचे व त्यानंतर मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाने केलेल्या कार्यवाहीची प्राधिकरणाने नोंद घेतली. तसेच प्रस्तावित केल्याप्रमाणे दंगलग्रस्त कुटुंबप्रमुखाकडून अर्ज स्वीकृत करण्याची शेवटची तारीख १९.४.१९९३ ऐवजी १५/५/१९९३ पर्यंत वाढविण्यास प्राधिकरण मान्यता देत आहे. त्याचप्रमाणे दंगलग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी मजासवाडी येथील ९०० गाळे व मुलुंड येथील ६१८ विकसित भूखंड वितरित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** 14 **Resolution No.**

विषय : गृहनिर्माण महाप्रकल्पाच्या कामाचा दिनांक ३१.३.१९९३ पर्यंतचा प्रगती अहवाल.

ठराव :

**Item No.** **15** **Resolution No.** **4067**

विषय : नागरी नूतनीकरण योजनेअंतर्गत पुनर्रचित इमारतीत असलेल्या गाळ्यांच्या किंमतीमधील धोरणाबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
राजीव गांधी निवारा प्रकल्पातील नागरी नूतनीकरण योजनेच्या अंतर्गत काही इमारतीमधील अतिरिक्त गाळ्यांना जुना दर व २५ टक्के सूट देण्यात आली. मात्र त्याच सुमारास बांधकाम सुरू केलेल्या इतर इमारतींच्या बांधीसाठी नाही, या सबबीखाली जुना दर व २५ टक्के सूट नाकारण्याची प्रकल्पाची कार्यवाही ही नैसर्गिक न्याय तत्वाशी विसंगत असल्याने दि. १९.९.१९९१ ही तारीख आधारभूत मानून या तारखेपूर्वी बांधकाम सुरू झालेल्या इमारतीमधील अतिरिक्त गाळे मूळ भाडेकरूंना वितरित करताना पूर्वीच्या इमारतीप्रमाणेच २५ टक्के सूट देण्यात यावी, असे ठरविण्यात आले. सदर ठरावाची अंमलबजावणी स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यात यावी.

**Item No.** 16 **Resolution No.** 4068

विषय : मंडळाच्या वसाहतीतील सहकारी संस्थांना अन्य लाभधारकांना उर्वरित चटईक्षेत्र वाटपाबाबतची आणि अन्य तत्सम फुटकळ भूखंड वाटपाबाबतचे आणि अन्य प्रकारच्या विकासास परवानगी देण्याबाबतचे धोरण ठरविण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

म्हाडाच्या विभागीय मंडळामार्फत विकसित करण्यात आलेल्या बहुमजली इमारतींच्या सहकारी संस्थांना अथवा इतर संस्थांना वसाहतीतील अनुज्ञेय उर्वरित चटईक्षेत्र वितरित करण्याबाबत तसेच इमारतीच्या सहकारी संस्थांना फुटकळ भूखंड वितरित करण्याबाबत म्हाडाने खालील प्रस्तावास एकमताने मंजूरी दिली.

१) सहकारी गृहनिर्माण संस्थांना चटईक्षेत्रांतर्गत समाविष्ट न होणाऱ्या बांधकामासाठी ठराव क्र. १८५७, दिनांक ८.३.१९९१ नुसार आकारणी करून 'ना-हरकत' प्रमाणपत्र द्यावे. तसेच चटईक्षत्र वितरित करण्याचे प्रस्तावाचे छाननी शुल्क ठराव क्र. १८५७, दिनांक ८.३.१९९१ प्रमाणे आकारावे.

२) मंडळाच्या विविध वसाहतींचे सर्वेक्षण करून सुधारित भू-अभिन्यासास स्थानिक संस्थांतून मंजूरी मिळण्याची गरज असल्यास खाजगी वास्तुशास्त्रज्ञांचे पॅनेलवरील वास्तुशास्त्रज्ञांमार्फत हे काम मंडळाच्या मुख्याधिकाऱ्यांनी करून घ्यावे.

३) खाजगी वास्तुशास्त्रज्ञांचे व्यावसायिक शुल्क ठरविण्याचे अधिकार उपाध्यक्ष/प्रा. यांना प्रदान करण्यात येत आहेत. या कामासाठी लागणाऱ्या खर्चाची वसूली यापुढील अभिहस्तांतरण करावयाच्या गाळेधारकांकडून प्रत्येकी कमाल रु. २००/- आकारून करावी.

४) इमारतींचे अभिहस्तांतरण करीत असताना प्रत्यक्ष जागेवरील फुटकळ भूखंड कोणत्या सहकारी संस्थेस वितरित करावे याचा निर्णय मंडळाच्या मुख्याधिकाऱ्यांनी घ्यावा व त्याबाबतचे अधिमूल्य परिशिष्ट १ व २ नुसार वसूल करण्यात यावे. यामध्ये स्वतंत्रपणे विकसित किंवा वितरित न होणाऱ्या फुटकळ भूखंडाचाच समावेश करावा.

५) वसाहतीतील अनुज्ञेय उर्वरित चटईक्षेत्राचे वाटप गाळ्यांचे क्षेत्रफळाचे प्रमाणात दर्शविणारे भू-अभिन्यास मंडळाने तयार करावे व अशा उर्वरित चटईक्षेत्राचे वाटपाबाबत परिशिष्ट १ व २ नुसार आकारणी करून मंडळाचे मुख्याधिकाऱ्यांनी कार्यवाही करावी.

६) फुटकळ भूखंडाचे वितरण अथवा उर्वरित चटईक्षेत्राचे वाटप इमारतीच्या अभिहस्तांतरणापूर्वीच करण्यात यावे. तसे शक्य नसल्यास अशा सहकारी संस्थांना उर्वरित चटईक्षेत्र वापरण्याचे 'ना-हरकत' पत्र या धोरणानुसार आकारणी करून द्यावे.

७) उर्वरित चटईक्षत्र की ज्याचा वापर मंडळ आपल्या योजनांसाठी करू शकणार नाही अशाच उर्वरित चटईक्षेत्राचे वाटप करण्यात यावे.

८) परिशिष्ट २ मधील आकारणी दर मुंबई शहरापुरता मर्यादित आहे. या दरात प्रत्येक वर्षी १० टक्के याप्रमाणे सुधारणा करण्यात यावी. इतर विभागीय मंडळांनी आपापल्या वसाहतींबाबतचे दर उपाध्यक्ष/प्रा. यांचेकडून मंजूर करून घ्यावेत. त्यामध्ये वेळोवेळी सुधारणा करण्याचे अधिकार उपाध्यक्ष/प्रा. यांना प्रदान करण्यात यावेत.

९) या संदर्भात उर्वरित चटईक्षेत्राचे वाटपाबाबतच्या अधिमूल्याचा दर व यासंबंधीचा प्रस्ताव परिशिष्ट (१) व (२) मध्ये सादर केलेल्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** **17** **Resolution No.**

विषय : जागतिक बँक प्रकल्प/प्रा. यांच्या अधिपत्याखालील भूखंड मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाकडे वर्ग करण्याबाबत.

ठराव :

**Meeting No.** 125 **Meeting Date** 02-Jun-19

**Item No.** 1 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दि. ८-४-१९९३ रोजी झालेल्या १२४ व्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे.

ठराव :

**Item No.** 2 **Resolution No.** 4069

विषय : नागरी नूतनीकरण योजना -

१८-२२-२६-३०, अंधार चाळ, अनंत गणपत पवार मार्ग, (टप्पा - १) योजनेअंतर्गत इमारतींची पुनर्बांधणी इमारतींच्या बांधकामाच्या निविदांबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
मे. आर. एस. गुप्ता आणि कंपनी यांच्या अंधार चाळ (टप्पा - १) योजनेच्या निविदा दर सूची १९८६-८७ मधील सिमेंट, पोलादचे मूलभूत दर (ज्याप्रमाणे निविदा बनविण्यात आली आहे) व नियंत्रक/मुंबई मंडळ यांचेकडील सिमेंट व पोलाद साठीचे १९९२-९३ च्या दरातील फरक शासनाचा आदेश क्र. बीडीजी-१०९१/सीआर-१२, बीडीजी-२, दिनांक १०/१/१९९२ मधील परिच्छेद-३, कलम १० नुसार बांधकामासाठी वापरण्यात येणाऱ्या (ॲक्च्युल कन्सम्प्शन) सिमेंट व पोलादवर विशेष बाब म्हणून देण्यास मान्यता देण्यात येत आहे. सिमेंट व पोलादाची किंमत १९९२-९३ च्या दराने देत असलेले त्यावर २० टक्के निविदेचे अधिक्य लागू होणार नाही.

**Item No.** 3 **Resolution No.** 4070

विषय : जागतिक बँक प्रकल्पाची अंमलबजावणी जमिनीची पुर्नप्रापण व सुविधांच्या कामाचे विभाजन करून निविदा मागविणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाब टिप्पणीसोबत जोडलेल्या तक्ता 'अ' मध्ये मालवणी सर्व्हे क्र. २६३, मालाड (प) येथील विभाग क्र. १ व २ व विभाग क्र. ५ व नाला बनविण्याचे काम अशा विभाजनास निविदा स्वीकारल्यानंतर कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे व उर्वरित कामाचे तक्ता 'अ' मध्ये दर्शविल्याप्रमाणे विभाग ३ व विभाग ४ अशा विभागामध्ये विभाजनास कार्योत्तर परवानगी देण्यात येत आहे.
तसेच चारकोप, कांदिवली, सर्व्हे क्र. ४१ येथील सुविधांच्या कामाचे तक्ता 'ब' मध्ये दर्शविल्याप्रमाणे विभाग १ ते विभाग ५ व नाल्याचे काम अशा ५ विभागांमध्ये विभागण्यास कार्योत्तर परवानगी देण्यात येत आहे.

**Item No.** 4 **Resolution No.**

विषय : शांतीनगर, नागपूर येथील मध्यम उत्पन्न गटातील ३० गाळ्यांपैकी शिल्लक असलेल्या ११ गाळ्यांच्या व २२ दुकानांपैकी १३ दुकानांच्या वाटपाकरिता किंमत कमी करण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 5 **Resolution No.** 4071

विषय : ओ. डी. ए. या ब्रिटीश शासनाच्या योजनेतर्फे प्राधिकरणात 'व्यावसायिक विकास केंद्र' स्थापन करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, प्राधिकरणास स्वतःच्या अधिकारी/कर्मचारी वर्गासाठी तसेच निवारा क्षेत्रातील अन्य संस्थांसाठी प्रशिक्षण केंद्र असल्याची गरज लक्षात घेता ओ.डी.ए. संस्थेतर्फे प्रस्तावित केलेले अर्थसहाय्य घेण्यास मान्यता देण्यात येत आहे. स्थायीकरणाची वाट न पाहता ठरावाची अंमलबजावणी करण्यात यावी.

**Item No.** 6 **Resolution No.**

विषय : गृहनिर्माण क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल हुडकोतर्फे प्राधिकरणाचा गौरव.

ठराव :

**Item No.** 7 **Resolution No.** 4072

विषय : सर्व्हे क्र. ४१ (भाग) ओशिवरा येथील गृहनिर्माण महाप्रकल्प (२) च्या निविदा पूर्वपात्र विकासकांना देणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

१) मे. अबोड कन्स्ट्रक्शन कंपनी व मे. बी. जी. शिर्के आणि कंपनी यांना महाप्रकल्प (२) च्या कोऱ्या निविदा देण्यात याव्यात व त्याकरिता कोऱ्या निविदा देण्याची अंतिम दिनांक १७.५.१९९३ पर्यंत वाढविण्यात यावी.

२) ज्या तीन अतिरिक्त निवडक विकासकांच्या प्राधिकरणाने मान्यता दिल्यानुसार पूर्वपात्र विकासकांच्या यादीमध्ये अंतर्भाव करण्यात आला होता त्यांना या यादीमधून वगळण्यात यावे. तसेच जर त्यांना कोऱ्या निविदा पूर्वीच देण्यात आल्या असल्यास प्राधिकरणाने त्यांची नावे पूर्वपात्र विकासकांच्या यादीमधून वगळण्यात आलेली आहेत, असे पत्राव्दारे कळवावे. वरील विकासकांनी भरलेली निविदेची रक्कम त्यांना परत करण्यात यावी, असेही ठरविण्यात आले.

वरीलप्रमाणे घेतलेल्या निर्णयास प्राधिकरण कार्योत्तर मंजूरी देत आहे.

**Item No.** 8 **Resolution No.** 4073

विषय : पवई महाप्रकल्पाला मंजूर अभिन्यासात येणाऱ्या तळमजला अधिक १४ मजल्यांच्या इमारतीस अतिरिक्त भाव देणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
अ) एम. एच. पी. पवई येथील बदललेल्या वावानुसार बांधावयाच्या १४ मजली इमारतीसाठी निविदेतील प्रति गाळा किंमत व्यतिरिक्त रु. १,५०,०००/- प्रति गाळा अतिरिक्त रक्कम देण्यास मंजूरी देण्यात येत आहे.
२) बदललेल्या वावानुसार बांधावयाच्या इमारतीसाठी हा निर्णय कळविलेपासून १८ महिने अधिक ५ महिन्यांची मुदतवाढ देण्यात येत आहे. मात्र १८ महिन्यांच्या मुदतीनंतर भाववाढीचा निर्देशांक (इन्डायसेस) गोठविण्यात यावा.
३) विकासकास यापूर्वी केलेला दंड काढून टाकण्यात येत असून अशा प्रकारे वसूल केलेली दंडाची रक्कम परत करण्यात यावी.
४) विकासकास दिलेला मोबिलायझेशन अग्रिम रु. ४,२३,५९,९४५/- व त्यावर १५ टक्के दराने दिनांक १९.३.१९९१ ते ३१.७.१९९३ पर्यंतचे सरळ व्याज यांची वसूली ७५ टक्के प्रकल्पाचे काम पूर्ण होण्यापूर्वी अथवा २४ महिन्यांच्या कालावधीच्या ८० टक्के मुदतीत यापैकी जे पहिले घडेल चालू देयकामधून कामाच्या प्रमाणानुसार करावी.
सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायी होण्याची वाट न पाहता त्वरित करण्यात यावी, असे ठरविण्यात आले.

**Item No.** 9 **Resolution No.**

विषय : गृहनिर्माण महाप्रकल्पाचा कामाचा दिनांक ३०.४.१९९३ पर्यंतचा प्रगती अहवाल.

ठराव :

**Item No.** 10 **Resolution No.** 4074

विषय : पुनर्रचित इमारतीमधील निवासी गाळ्यांची अनधिकृत हस्तांतरणे नियमित करण्यासाठी म्हाडा विनियम १९८१ मध्ये दुरुस्ती करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
पुनर्रचित इमारतीमधील निवासी गाळ्यांची अनधिकृत हस्तांतरणे नियमित करण्यासाठी म्हाडा (मिळकत व्यवस्थापन, गाळे विक्री, गाळ्यांचे हस्तांतरण आणि गाळ्याची अदलाबदल) विनियम १९८१ मधील ३५ (अ) मध्ये बाब टिप्पणीसोबत जोडलेल्या मसुद्यामधील दुरुस्त्या करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** 11 **Resolution No.**

विषय : गृहनिर्माण महाप्रकल्पाच्या विकासकांना नुकसानभरपाई लावलेल्या कालावधीमध्ये द्यावयाच्या भाववाढीबाबत.

ठराव :

**Item No.** 12 **Resolution No.** 4075

विषय : दादाभाई नौरोजी नगर, अंधेरी (प) येथील के-३, इमारतीच्या दुरुस्ती/पुनर्बांधणी संक्रमण शिबिरात जागा देण्याबाबत.
२) इ. क्र. १४ अल्प उत्पन्न गट व इ. क्र. ८५ अर्थसहाय्यित औद्योगिक गाळे योजना, नेहरू नगर, कुर्ला (पूर्व) यातील गाळेधारकांना संक्रमण शिबिरात हलविण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
दादाभाई नौरोजी नगर, अंधेरी (प) येथील इमारत क्र. के-३ व इमारत क्र. १४, ८६, नेहरू नगर, कुर्ला (प) मधील रहिवाशांसाठी इमारतींची स्थिती धोकादायक झाल्याने इमारतींची पुनर्बांधणी होईपर्यंत संक्रमण शिबिरात हलविण्यास मान्यता देण्यात येत आहे. त्याचप्रमाणे चर्चेमध्ये ठरल्याप्रमाणे कलकत्ता इस्टेट या इमारतीतील भाडेकरूनाही संक्रमण शिबिरात त्यांच्या इमारतींची पुनर्बांधणी होईपर्यंत कालावधीपर्यंत विशेष बाब म्हणून जागा देण्याचे मान्य करण्यात येते.

**Item No.** 13 **Resolution No.** 4076

विषय : मंडळाच्या विविध वसाहतींमधील कार्यालयीन इमारतींच्या पुनर्विकास व विक्री धोरण ठरविण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
प्रादेशिक मंडळाच्या वसाहतीमधील कार्यालयीन इमारतींच्या विक्री योजना तसेच विक्री योजनेस समाविष्ट न झालेल्या व ज्या ठिकाणी बहुमजली इमारतींची योजना आर्थिकदृष्ट्या योग्य असल्यास त्यांच्या पुनर्रचनेबाबत बाब टिप्पणीतील परिच्छेद ५ मधील सुचविण्यात आलेल्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** 14 **Resolution No.** 4077

विषय : कांदिवली व मुलुंड येथील निवासी भूखंडासाठी मागविण्यात आलेल्या मोहोरबंद निविदांचा अहवाल.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
कांदिवली येथील सर्व्हे क्र. १५७, प्लॉट क्र. २ बाबत प्राप्त झालेल्या निविदा वगळता उच्च उत्पन्न गटातील सर्व अटी पूर्ण करणाऱ्या व सर्वात जास्त रक्कम दर्शविलेल्या निविदाधारकांचे (हायर लीगल बिडर) निविदा मंजूर करण्यास परवानगी देण्यात येत आहे व नियमानुसार सर्व रक्कम भरल्यानंतर त्यांना भूखंडाचे वितरण करण्यास कार्यवाही राजीव गांधी निवारा प्रकल्पाने करण्यास मान्यता देण्यात येत आहे. काही कारणाने उच्चतम निविदा मंजूर केल्यावरही निविदाधारकाने पैसे न भरल्यास पर्यायी निविदा स्वीकारण्याचे अधिकार मा. अध्यक्ष/प्रा. यांच्या सल्ल्याच्या अधीन राहून उपाध्यक्ष/प्रा. यांना प्रदान करण्यात येत आहेत. त्याचप्रमाणे कांदिवली येथील प्लॉट क्र. २ बाबत पुन्हा जाहिरात देऊन निविदा मागविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**Item No. 15 Resolution No. 4078**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाने 'सिटीनेट' संस्थेचे सदस्यत्व स्वीकारण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

म्हाडाच्या वेगवेगळ्या कार्यालयामध्ये सिटीनेट या संस्थेकडून मिळणाऱ्या ज्ञानाचा व सोयीचा फायदा लक्षात घेता सदर संस्थेचे सदस्यत्व स्वीकारावे व त्याकरिता लागणारे वार्षिक शुल्क वेळोवेळी भरण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

सदर संस्थेद्वारा आयोजित करण्यात येणाऱ्या प्रशिक्षण कार्यक्रम, कार्यशाळा, अभ्यास दौरे इ. कार्यक्रमात म्हाडाच्या अधिकाऱ्यांना नियुक्त करणे, त्यासंबंधी होणाऱ्या खर्चास मंजूरी देणे तसेच इतर बाबतीत वेळोवेळी निर्णय घेण्याचे संपूर्ण अधिकार उपाध्यक्ष तथा मु. का. अ./प्रा. यांना देण्यात येत आहेत.

**Item No. 16 Resolution No. 4079**

विषय : महाराष्ट्र राज्य पोलीस कर्मचारी गृहनिर्माण संस्था (नियोजित) यांना पोईसर/कांदिवली येथील सुमारे २.७२ हेक्टर जमीन प्राधिकरणाच्या विहित अटी व शर्तींना अधीन राहून वितरण करण्याविषयी-अधिमूल्य रक्कम व वार्षिक भाडेपट्टा रकमेच्या पुनर्मूल्यांकनाबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

महाराष्ट्र राज्य पोलीस कर्मचारी गृहनिर्माण संस्थेला पोईसर येथील २.७ हेक्टर जमिनीच्या अधिमूल्याचा सुधारित दर रु. १,६५०/- प्रति चौ. मी. (एकंदर जमिनीसाठी व वार्षिक १.५ प्रतिशत दराने भाडेपट्ट्याचा भांडवलीकरणासहित) आकारण्यास मंजूरी देण्यात येत आहे. या दराने जमिनीची किंमत वसूल करण्यात यावी व त्यानंतर संस्थेस वार्षिक नाममात्र रु. १/- या दराने भाडेपट्टा आकारण्यात यावा.

बैठकीच्या विषयसूचीवरील विषय संपल्यानंतर मा. अध्यक्ष/प्रा. यांच्या परवानगीने प्राधिकरणाच्या विचारार्थ आलेल्या आयत्या वेळचे खालील विषय घेण्यात आले.

**Item No.** 17 **Resolution No.** 4080

विषय : गाळ्यांचे भाडे/भाडे खरेदी हप्ते विहित मुदतीत न भरल्यास वसूल करावयचा दंड.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
प्राधिकरणाच्या दिनांक २०.२.१९९३ च्या क्र. ४०३० च्या ठरावामध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात यावी.
प्राधिकरणाच्या ठरावातील निर्णयानुसार गाळ्यांचे प्रत्येक महिन्याचे भाडे/भाडे खरेदी हप्ता इ. वसूल करावयाची रक्कम त्याच महिन्यात भरली पाहिजे. तशी ती भरली नाही तर थकबाकीच्या रकमेवर खाली निर्दिष्ट केलेल्या कोष्टकाप्रमाणे दंड आकारण्यात येतो.

| अ. क्र. | मासिक भाडे इ. चा दर | आकारावयाचा दंड |
|---|---|---|
| १. | रुपये ५०/- पर्यंत | रु. ५/- |
| २. | रुपये ५०/- ते रु. १००/- | रु. १०/- |
| ३. | रुपये १०१/- ते रु. १५०/- | रु. १५/- |
| ४. | रुपये १५१/- ते रु. २००/- | रु. २०/- |

रुपये २००/- च्या वर थकीत रकमेवर ५०/- रुपयाच्या पटीत वसूल करावयाच्या प्रत्येक ५०/- रुपयाला रु. ५/- या दराने दंड आकारण्यात यावा. तथापि दंडाची रक्कम पुढील महिन्याच्या अखेरच्या तारखेपर्यंत भरली नाही तर दंडाची रक्कम सदर ठरावाप्रमाणे आकारण्यात यावी. हा दंड प्रत्येकी ५०/- रुपयास ५/- रुपये व त्यावरील ५०/- रुपयांपर्यंत वसूल करावयाच्या रकमेस रु. ५/- या दराने आकारण्यात यावा. तसेच थकबाकीची रक्कम ५०/- रुपयांपेक्षा कमी असेल तरीही अशा रकमेवर रु. ५/- इतका दंड आकारण्यात यावा. स्थायीकरणाची वाट न पाहता ठरावाची अंमलबजावणी करण्यात यावी.

**Item No.** 18 **Resolution No.**

विषय : ज्ञानेश्वर नगर, शिवडी, वडाळा येथील भाडेकरूंच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेस भूखंड देण्याबाबत.

ठराव :

**Meeting No.** **126 Spcl** **Meeting Date** **30-Jul-19**

**Item No.** **1** **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दि. २-५-१९९३ रोजी झालेल्या १२५ व्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे.

ठराव :

**Item No.** **2** **Resolution No.**

विषय : सर्व्हे क्र. ७, ८ वांद्रे (प) येथील भूखंडाचे वितरण करण्याबाबत.

ठराव :

**Item No.** **3** **Resolution No.**

विषय : प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना दि. १ जानेवारी, १९९३ पासून सुधारित दराने महागाई भत्ता देण्याबाबत.

ठराव :

**Item No.** **4** **Resolution No.** **4081**

विषय : प्राधिकरण कर्मचाऱ्यांना शासनाने मंजूर केलेली सण अग्रिम मर्यादा वाढविणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
शासनाने राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना सण अग्रिमाची मर्यादा रु. ६००/- पर्यंत वाढविल्याप्रमाणे प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना शासनाच्या आदेशातील अटी व शर्तींना अधीन राहून देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** **5** **Resolution No.** **4082**

विषय : नळेगाव, जिल्हा लातूर येथे जय-जवान, जय-किसान सहकारी साखर कारखान्याच्या कर्मचाऱ्यांसाठी म्हाडामार्फत गृहनिर्माण योजना हाती घेण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
नळेगाव, जिल्हा लातूर येथे जय-जवान जय-किसान सहकारी साखर कारखान्याच्या कर्मचाऱ्यांसाठी म्हाडामार्फत गृहनिर्माण योजना हाती घेण्याबाबत बाब टिप्पणीत परिच्छेद क्र. ४ मध्ये सुचविण्यात आलेल्या "एजन्सी चार्जेसमध्ये थोड्या फार प्रमाणात सूट देण्याचे अधिकार उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी/प्रा. म्हाडा यांना प्रदान करण्यात यावे" वगळून प्रस्तावास मान्यता देण्यात येते. तसेच संस्थेबरोबर वाटाघाटी करताना बाब टिप्पणीतील अटी व शर्तींमध्ये सुधारणा करण्यास मंजूरी देण्यात येते. सदरहू बाब शासनाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात यावी.

**Item No.** 6 **Resolution No.** 4083

विषय : कुंदूर, जिल्हा नांदेड येथील मोहन नगर भाडेकरू मालकी गृहनिर्माण सहकारी संस्था यांचेकरिता महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणातर्फे गृहबांधणी योजना हाती घेण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
कुंदूर, जिल्हा नांदेड येथील मोहन नगर भाडेकरूंच्या मालकीची जमीन प्राधिकरणाने नाममात्र किंमतीत विकत घेऊन त्यावर या सहकारी संस्थेच्या सभासदांना हुडकोतर्फे म्हाडाच्या नावे कर्ज मिळवून गृहनिर्माण प्रकल्प राबविण्याबाबत बाब टिप्पणीतील परिच्छेद क्र. ३, ४ व ५ मध्ये सुचविण्यात आलेल्या प्रस्तावावर विचार केला तसेच सदर संस्थेबरोबर वाटाघाटी करताना बाब टिप्पणीतील अटी व शर्तीमध्ये सुधारणा थोड्या फार प्रमाणात सूट देण्याचे अधिकार उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी/प्रा. यांना प्रदान करण्याच्या प्रस्तावास मंजूरी देण्यात येत आहे.
तसेच अशा प्रकारच्या योजना यानंतर हाती घेण्याबाबत महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, जमिनीची विल्हेवाट विनियम १३ (२) अन्वये शासनाची संमती उपाध्यक्ष/प्रा. यांनी मिळवावी व त्यानुसार अशा प्रकारच्या योजना म्हाडामार्फत राबविण्यात याव्यात. शासनाकडे शिफारस करण्यासाठी मान्यता देण्यात येते.

**Item No.** 7 **Resolution No.** 4084

विषय : महाराष्ट्र हौसिंग बोर्ड एम्प्लॉईज को. ऑप. क्रेडिट सोसायटी लिमिटेड यांना कर्ज देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
महाराष्ट्र हौसिंग बोर्ड एम्प्लॉईज को. ऑप. क्रेडिट सोसायटी लि. यांना रु. १८ लाख ठेव १३.५० प्रतिशत दराने व्याज आकारून दहा समान हप्त्यांत परतफेड करण्याच्या तत्वावर वर नमूद केलेल्या अटींच्या अधीन राहून मंजूरी देण्यात येत आहे

**Item No.** 8 **Resolution No.** 4085

विषय : इंडियन बिल्डिंग कॉंग्रेसचे सदस्यत्व म्हाडाने स्वीकारण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
इंडियन बिल्डिंग कॉंग्रेस या संस्थेचे प्राधिकरणाचे सदस्यत्व स्वीकारावे, तसेच सदस्यत्व शुल्क रु. ५०,०००/- अधिक प्रवेश शुल्क रु. ५,०००/- या रकमेस प्राधिकरण मंजूरी देत आहे. दरवर्षी नवीकरण करण्याचे अधिकार मा. उपाध्यक्ष/प्रा. यांना प्रदान करण्यात येत आहेत.
सदर संस्थेद्वारे आयोजित करण्यात येणाऱ्या प्रशिक्षण कार्यक्रम, कार्यशाळा, अभ्यास दौरे इ. कार्यक्रमात म्हाडाच्या अधिकाऱ्यास नियुक्त करणे, त्यासंबंधी होणाऱ्या खर्चास मंजूरी देणे तसेच इतर बाबतीत वेळोवेळी निर्णय घेण्याचे संपूर्ण अधिकार उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी/प्रा. म्हाडा यांना प्रदान करण्यात येत आहेत. स्थायी करण्याची वाट न पाहता ठरावाची अंमलबजावणी करण्याचे मान्य करण्यात आले.

**Item No.** 9 **Resolution No.** 4086

विषय : मुंबई गलिच्छ वस्ती सुधारणा मंडळावर अतिरिक्त जिल्हाधिकारी (अतिक्रमण), मुंबई व मुंबई उपनगर जिल्हा यांची पदसिद्ध सदस्य म्हणून नियुक्ती करणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
मुंबई गलिच्छ वस्ती सुधारणा मंडळामार्फत मुंबई शहर व उपनगरातील अधिकृत झोपडपट्ट्यांना प्राथमिक सुविधा पुरविण्याच्या कामी मंडळास बहुमोल सल्ला व मार्गदर्शन प्राप्त होण्याच्या दृष्टीकोनातून अतिरिक्त जिल्हाधिकारी (अतिक्रमण) मुंबई शहर व उपनगर जिल्हा यांची मुंबई गलिच्छ वस्ती सुधार मंडळावर 'पदसिद्ध सदस्य' अथवा 'विशेष निमंत्रित' म्हणून नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर निर्णयाच्या अनुषंगाने शासनाकडे तसा प्रस्ताव मंजूरीसाठी पाठविण्यात यावा.

**Item No.** 10 **Resolution No.** 4087

विषय : पुणे व नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या कार्यालयासाठी २ नवीन वाहने खरेदी करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या कार्यालयासाठी व नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या कार्यालयासाठी प्रत्येक १ याप्रमाणे दोन नवीन डिझेल वाहने खरेदी करण्यास व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे खर्च रु. ६.०० लाख रकमेस मान्यता देण्यात येते.
हा खर्च भागविण्यासाठी संबंधित मंडळाने सुधारित अंदाजपत्रकात तरतूद करण्यासाठी मान्यता देण्यात येते. तसेच वाहनाची खरेदी नियमाप्रमाणे शासन मान्य विक्रेत्यांकडून करण्यासाठी मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** 11 **Resolution No.** 4088

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणावर संचालक, नगररचनाकार, महाराष्ट्र राज्य, पुणे यांची नियुक्ती करणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
सचिव, (२) महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग यांचे व्यतिरिक्त संचालक, नगररचना पुणे यांना 'विशेष निमंत्रित' म्हणून प्राधिकरणावर नियुक्त करण्यात यावे. सदरहू प्रस्ताव शासनाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात यावा.

| **Item No.** | **12** | **Resolution No.** | **4089** |
|---|---|---|---|

विषय : जागतिक बँक प्रकल्पाच्या जाहिरातीबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाब टिप्पणीतील नमूद केलेली परिस्थिती विचारात घेऊन श्री. पी. एस. भोगल, संचालक, जागतिक बँक प्रकल्प/प्रा. यांनी दिनांक २५.७.१९९३ किंवा दरम्यानच्या काळात विविध वृत्तपत्रात दिलेल्या भूखंड वितरणाच्या जाहिराती रद्द करण्यात येत आहेत. बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे सुधारित जाहिरात देण्यात यावी. यापुढे जागतिक बँक प्रकल्पाच्या संदर्भात देण्यात येणाऱ्या भूखंड वितरणाच्या जाहिराती उपाध्यक्ष तथा मु.का.अ./प्रा. यांचे परवानगीनेच देण्यात यावी. स्थायीकरणाची वाट न पाहता ठरावाची अंमलबजावणी करण्यात यावी.

| **Item No.** | **13** | **Resolution No.** | **4090** |
|---|---|---|---|

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण कर्मचारी कल्याण निधीला प्राधिकरणातर्फे द्यावयाचे अंशदान.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण कर्मचारी कल्याण निधी ही प्राधिकरणातील कर्मचाऱ्यांना त्यांच्या वा त्यांच्या कुटुंबियांच्या गंभीर आजार, अपंगत्व, अपघात प्रसंगी, शिक्षणासाठी तसेच क्रीडा/सांस्कृतिक कार्यासाठी आर्थिक सहाय्य करणे आदी उद्दिष्टे समोर ठेऊन स्थापन झालेली संस्था प्रत्येक वर्षी जेवढा निधी उभा करील तेवढा निधी प्राधिकरणातर्फे अंशदान म्हणून देण्यास मान्यता देण्यात येते. यापूर्वी प्राधिकरणातर्फे सदर संस्थेला मार्च, १९९१ मध्ये देण्यात आलेल्या रु. ५०,०००/- व जून १९९३ मध्ये देण्यात आलेल्या रु. ४०,०००/- अशा एकूण ९०,०००/- इतक्या अंशदानास कार्योत्तर मंजूरी देण्यात येते. तसेच यापुढे सदर संस्था मागणी करील तेव्हा प्राधिकरणातर्फे वर नमूद केल्याप्रमाणे देय होणारे अंशदान मंजूर करण्याचे अधिकार उपाध्यक्ष तथा मु.का.अ./प्रा. यांना देण्यात येत आहेत.

**Item No. 14 Resolution No. 4091**

विषय : नळेगाव, जिल्हा लातूर येथे जय-जवान, जय-किसान सहकारी साखर कारखान्याच्या कर्मचाऱ्यांसाठी व मौ. जामगाव, तालुका गंगापूर येथे गंगापूर सहकारी साखर कारखान्याच्या कर्मचाऱ्यांसाठी म्हाडामार्फत गृहनिर्माण योजना हाती घेण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
नळेगाव, जिल्हा लातूर येथे जय-जवान, जय-किसान सहकारी साखर कारखान्याच्या कर्मचाऱ्यांसाठी व मौजे जामगाव, तालुका गंगापूर येथे गंगापूर सहकारी कारखान्याच्या कर्मचाऱ्यांसाठी म्हाडामार्फत गृहनिर्माण योजना हाती घेण्याबाबत बाब टिप्पणीतील परिच्छेद क्र. ४ मध्ये सुचविण्यात आलेल्या प्रस्तावास मंजूरी देण्यात येत आहे. तसेच सदर संस्थांबरोबर वाटाघाटी करताना बाब टिप्पणीतील अटी व शर्तीमध्ये सुधारणा करण्याचे अधिकार उपाध्यक्ष तथा मु.का.अ./प्रा. यांना प्रदान करण्याबाबतच्या प्रस्तावात तसेच,
वरील दोन प्रस्तावांप्रमाणे म्हाडाला भविष्यात प्राप्त होणाऱ्या इतर प्रस्तावांबाबत निर्णय घेण्याचे व भविष्यात येणाऱ्या प्रकल्पाबाबत त्या त्या सहकारी संस्थांबरोबर वाटाघाटी करताना अटी व शर्तीमध्ये थोडया फार सुधारणा करण्याचे अधिकार उपाध्यक्ष तथा मु.का.अ./प्रा. यांना प्रदान करण्यात येत आहेत.

**Item No. 15 Resolution No.**

विषय : उच्च उत्पन्न गटाच्या सहकारी गृहनिर्माण योजनेसाठी भूखंड वितरण करताना आकारावयाच्या अधिमूल्य रक्कम व वार्षिक भाडेपट्टा रकमेच्या आकारणी विषयक पुनर्धोरण.

ठराव :

**Item No. 16 Resolution No. 4092**

विषय : सेलू, जिल्हा - परभणी येथील गट नं. १४ ही जमीन म्हाडा कायदा कलम ५२ अंतर्गत संपादन करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
मौजा सेलू, जिल्हा परभणी येथील सर्व्हे क्र. १४ मधील १० एकर खाजगी जमीन रु. ५५,०००/- प्रति एकर या दराने खरेदी करण्याविषयी औरंगाबाद मंडळाच्या म्हाडा अधिनियमातील कलम ५२ नुसारच्या प्रस्तावास प्राधिकरण मंजूरी देत आहे.

| **Item No.** | **17** | **Resolution No.** | **4093** |
|---|---|---|---|

विषय : म्हाडा अधिनियमातील कलम ५२ अंतर्गत मौजे परभणी येथील सर्व्हे क्र. ५२७ मधील २.५ हेक्टर खाजगी जमीन खरेदी करणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
म्हाडा अधिनियम १९७६ च्या कलम ५२ अन्वये मौजे परभणी येथील स. क्र. ५२७ मधील २.५ हेक्टर जमीन रु. १,४०,०००/- प्रति एकर दराने खरेदी करण्यास . प्राधिकरण मंजूरी देत आहे.
बैठकीच्या विषयसूचीवरील विषय संपल्यानंतर आयत्यावेळी खालील विषय विचारार्थ घेण्यात आला.

| **Item No.** | **18** | **Resolution No.** | **4094** |
|---|---|---|---|

विषय : म्हाडाच्या जमिनीच्या किंमतीविषयक धोरणाबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
ठराव क्रमांक ३०९४, दिनांक १६.११.१९९२ अन्वये ठरविण्यात आलेल्या जमिनीच्या किंमतीविषयक धोरणाप्रमाणे उच्च उत्पन्न गटांतर्गत (रु. ४,४५०/- व त्यावरील मासिक उत्पन्न गटासाठी) जमिनीचे थेट वाटप करण्यात आल्यास बाब टिप्पणीत नमूद केलेल्या परिच्छेद २ व ३ प्रमाणे कार्यवाही करण्यास मंजूरी देण्यात येत आहे. तसेच परिच्छेद ३ मध्ये नमूद केलेल्या मूळ परिशिष्ट ५ मध्ये १ (ड) च्या पुढे १(ड)(१) असा अंतर्भाव करावा व किंमतीविषयक धोरणात त्याचा अंतर्भाव करावा. त्यानंतर सर्वानुमते असे ठरविण्यात आले की प्राधिकरणाची आगामी बैठक औरंगाबाद येथे दिनांक २१/८/१९९३ रोजी आयोजित करण्यात यावी.
बैठकीच्या विषयसूचीवरील व आयत्यावेळचे सर्व विषय संपल्यानंतर अध्यक्षांचे आभार मानून बैठक समाप्त करण्यात आली.

**Meeting No.** **127 Spcl** **Meeting Date** **10-Aug-1**

**Item No.** **1** **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दि. ३०-७-१९९३ रोजी झालेल्या १२६ व्या विशेष बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे.

ठराव :

**Item No.** **1** **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दि. ३०-७-१९९३ रोजी झालेल्या १२६ व्या विशेष बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे.

ठराव :

**Item No.** **2** **Resolution No.**

विषय : प्राधिकरणाच्या व्यापारी स्वरूपाच्या गाळे/भूखंडाचे वाटप निविदा मागवून करताना या गाळे/भूखंडाच्या वाटपामध्ये २० टक्के जागा मागासवर्गीयांना राखीव ठेवणेबाबत.

ठराव :

**Item No.** **3** **Resolution No.**

विषय : मिळकत व्यवस्थापन विषयक विनियमांतील विनियम २ (एम) मधील 'मिळकत व्यवस्थापकाच्या' व्याख्येत सुधारणा करण्याबाबत जागतिक बँकेची विनंती.

ठराव :

**Item No.** **4** **Resolution No.**

विषय : म्हाडाच्या स. नं. ७ व ८ वांद्रे (प.) मुंबई या व्यापारी उपयोगाच्या भूखंडाच्या वितरणाबाबत.

ठराव :

**Item No.** **5** **Resolution No.**

विषय : निर्मिती केंद्र - नांदेड. कोटा, नांदेड येथील योजनेतील आराखड्यास निर्मिती केंद्रासाठी आरक्षित असलेल्या भूखंडास मंजूरी मिळण्याबाबत.

ठराव :

**Item No.** **6** **Resolution No.**

विषय : भोईवाडा गांव येथील नागरी नूतनीकरण योजना ग/दक्षिण विभाग.

ठराव :

**Meeting No.** **128** **Meeting Date** **21-Aug-1**

**Item No.** **1** **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दि. १०-८-१९९३ रोजी झालेल्या १२७ व्या विशेष बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणेबाबत.

ठराव :

**Item No.** **2** **Resolution No.** **4095**

विषय : प्राधिकरणाच्या व्यापारी स्वरूपाच्या गाळे/भूखंडाचे वाटप निविदा मागवून करताना या गाळ्यांच्या भूखंडाच्या वाटपामध्ये २० टक्के जागा मागासवर्गीयांना राखीव ठेवण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
प्राधिकरणांतर्गत विविध मंडळातील व्यापारी स्वरूपाचे गाळे/भूखंडाच्या वाटपामध्ये २० टक्के गाळे/भूखंड मागासवर्गीयांसाठी राखून ठेवावेत, व त्यासाठी केवळ मागासवर्गीयांकडून निविदा मागवाव्यात. मात्र त्यासाठी एक जाहिरात देऊनही मागासवर्गीयांसाठी प्रतिसाद न आल्यास त्या भूखंडाचे/गाळ्यांचे वाटप सर्वसाधारण जनतेसाठी करण्यात यावे. प्रथम सर्वसाधारण गाळ्यांचे/भूखंडांचे निविदा मागवून वाटप करावे, व त्यानंतर आरक्षित गाळ्यांचे/भूखंडांचे वाटप करण्यात यावे.

**Item No.** **3** **Resolution No.** **4096**

विषय : मिळकत व्यवस्थापन विषयक विनियमातील विनियम २ (एम) मधील 'मिळकत व्यवस्थापन' या व्याख्येत सुधारणा करण्याबाबत जागतिक बँक प्रकल्प/प्रा. ची विनंती.

ठराव : एकमताने निर्णय घेण्यात आला की,
म्हाडा तसेच म्हाडाचे विविध घटक यांनी नेमलेल्या अधिकाऱ्यांना म्हाडा अधिनियम ६६ खाली सक्षम अधिकाऱ्यांकडे निष्कासन कारवाई करण्यासंबंधीचे अधिकार तसेच कलम ६७ (१) खाली करावयाच्या जमीन महसुलाची वसूली या सदराखाली म्हाडाचे थकीत भाडे, दंड किंवा नुकसान भरपाई वसूल करण्याचे अधिकार प्रदान करण्याच्या दृष्टीने म्हाडा व्यवस्थापन विषयक विनियमांतील विनियम २ (एम) मधील 'मिळकत व्यवस्थापकाच्या' व्याख्येत बाब टिप्पणी सोबत जोडलेल्या अधिसूचनेप्रमाणे करावयास मान्यता देण्यात येते.
वरीलप्रमाणे शासनास प्रस्ताव पाठविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** 4 **Resolution No.** 4097

विषय : गाळ्यांची/भूखंडाची अंतिम विक्री किंमत ठरविण्यासाठी गठन केलेल्या समितीच्याबाबत पुनर्विचार करण्याबाबत.

ठराव : प्रस्तुत बाबींवर प्राधिकरणाने सर्वानुमते पुढीलप्रमाणे निर्णय घेतला.
१) प्राधिकरणाच्या अधिपत्याखाली असलेल्या प्रादेशिक मंडळातील अभिहस्तांतरणाची प्रकरणे शीघ्र गतीने निकालात काढण्यासाठी गाळ्यांची/भूखंडाची अंतिम विक्री किंमत तातडीने ठरविणे आवश्यक आहे. प्राधिकरणाने अंतिम विक्री किंमत ठरविण्यासाठी विभागवार समित्यांची स्थापना केली होती. परंतु प्रशासकीय अडचणीमुळे समितीच्या बैठका ठराविक वेळेत होऊ शकत नाहीत व त्यामुळे अंतिम विक्री किंमत ठरविण्याचे कामास विलंब होतो. हे लक्षात घेऊन प्राधिकरणाने ठरविलेल्या समित्या, या ठरावान्वये बरखास्त करून अंतिम विक्री किंमत ठरविण्याचे काम यापुढील परिच्छेदात नमूद केलेल्या पद्धतीने करण्यात यावे, असा ठराव संमत करीत आहे.
२) गाळ्यांची भूखंडाचे अंतिम विक्री किंमत प्रादेशिक मंडळातील मुख्यअधिकारी हे सभापतींच्या सहमतीने (कॉनकरन्स) ठरवतील. यासाठी प्रादेशिक मंडळाचे मुख्यलेखाधिकारी, प्राधिकरणाच्या मार्गदर्शक तत्वानुसार त्याची योग्य ती छाननी करून संबंधित मुख्यअधिकारी, प्रादेशिक मंडळाच्या सभापतींच्या मान्यतेनंतर निश्चित करतील. अंतिम विक्री किंमत निश्चित केलेल्या गाळ्यांचे/भूखंडाचे विवरणपत्र तपशिल मा. सभापती, प्रादेशिक मंडळे यांच्या सहमतीने (कॉनकरन्स) वित्त नियंत्रक/प्रा., यांच्याकडे अवलोकनार्थ पाठविण्यात येईल. असे प्रस्ताव वित्त नियंत्रक/प्रा., यांचे कार्यालयाकडे प्राप्त झालेल्या दिनांकापासून वित्त नियंत्रक/प्रा., यांनी ३० दिवसाच्या आत ह्याबाबत काही हरकत असल्यास प्रादेशिक मंडळाकडे कळवतील. अन्यथा ३० दिवसानंतर प्रादेशिक मंडळाने ठरविलेल्या अंतिम किंमती स्थायी असल्याने समजून प्रादेशिक मंडळे पुढील कार्यवाही करतील व तांत्रिक बाबतीत काही अडचणी उद्भवल्यास संबंधित मुख्यअधिकारी/प्रादेशिक मंडळे यांनी त्याबाबतची प्रकरणे मुख्य अभियंता/प्राधिकरण यांच्या सहमतीने निकालात काढण्यासाठीची कार्यवाही करतील व तदनंतर मुख्यअधिकारी अंतिम विक्री किंमत ठरविण्याची प्रक्रिया करतील.

**Item No.** 5 **Resolution No.**

विषय : म्हाडाच्या स. नं. ७ व ८ वांद्रे (पू.) मुंबई या व्यापारी उपयोगाच्या भूखंडाच्या वितरणाबाबत.

ठराव :

**Item No.** 6 **Resolution No.** 4098

विषय : निर्मिती केंद्र - नांदेड कौठा नांदेड येथील योजनेतील आरोखड्यास निर्मिती केंद्रासाठी आरक्षित असलेल्या भूखंडास मंजूरी मिळणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
कौठा, नांदेड येथील प्रस्तावित गृहनिर्माण योजनेतील निर्मिती केंद्रासाठी आरक्षित करण्यात आलेल्या ०.२५ हेक्टर जमिनीचा भूखंड इमारत निर्मिती केंद्राच्या संस्थेस इमारत निर्मिती केंद्राच्या उद्दीष्टांच्या परिपूर्तीकरिता हस्तांतरीत करण्याच्या औरंगाबाद मंडळाच्या कृतीस कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे.

**Item No.** 7 **Resolution No.** 4099

विषय : मोईवाडा गांव येथील नागरी नूतनीकरण योजना ग/दक्षिण विभाग.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, मोईवाडा गाव फ/द विभाग परेल येथील जुन्या इमारती बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मालकीच्या असून त्या विकसित करण्यासाठी म्हाडास सुपूर्द करण्यात आल्या आहेत. सदर योजनेची भौतिक व आर्थिकदृष्ट्या पडताळणी केली असता सदर योजना राबविण्याजोगी आहे. अतिरिक्त मिळणाऱ्या जादा चटईक्षेत्रानुसार उपलब्ध होणारे गाळे विकून होणाऱ्या फायद्याचा अर्धा हिस्सा महानगरपालिकेला देऊनही म्हाडास आर्थिकदृष्ट्या बराच फायदा होऊ शकतो. त्यामुळे सदर योजना राबविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** 8 **Resolution No.**

विषय : म्हाडा कायदा १९७६ मधील अधिनियम ५२ खाली भू-संपादनाच्या प्रस्तावास मंजूरी देण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 9 **Resolution No.** 5000

विषय : पुणे येथील विजयश्री संस्थेची जमीन वगळण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, सदर प्रस्तावाची संपूर्ण परिस्थिती विचारात घेऊन विजयश्री सहकारी संस्थेची जमीन वगळण्याबाबतचा प्राधिकरणाचा पूर्वीचा निर्णय स्थायी करण्यात येऊन त्याप्रमाणे पुणे महानगरपालिकेस तसे स्पष्ट कळविण्यात यावे, असे सर्वानुमते ठरविण्यात आले.

**Item No.** **10** **Resolution No.** **5001**

विषय : प्राधिकरणाचा अतिरिक्त निधी बँकामध्ये व वित्तीय संस्थांमध्ये गुंतविण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी/प्राधिकरण यांनी प्राधिकरणाचे हित लक्षात घेऊन एच. डी. एफ. सी. या संस्थेकडे १०.०० कोटी ११.५० टक्के दराने ३ महिन्याकरिता केलेल्या गुंतवणूकीस कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे.

तसेच यापुढे जेव्हा जेव्हा बँकेचा सी. ओ. डी. व्याजाचा दर एच. डी. एफ. सी. व्याजाच्या दरापेक्षा कमी असेल तेव्हा तेव्हा त्यावेळची परिस्थिती (वेज अँड मिन्स) विचारात घेऊन योग्य त्या कालावधीसाठी एच. डी. एफ. सी. कडे गुंतवणूक करण्याचे सर्व अधिकार प्राधिकरणाच्या बाबतीत उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी / प्रा., जागतिक बँक प्रकल्प व राजीव गांधी झोपडपट्टी सुधार व निवारा प्रकल्प यांच्या बाबतीत त्या त्या संचालकांना प्रदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** **11** **Resolution No.** **5002**

विषय : नवीन चंद्रपूर शहराची प्रारुप विकास योजना -

मंजूर करून जनतेच्या अवलोकनार्थ महाराष्ट्र प्रादेशिक व नगर योजना अधिनियम १९६६ चे कलम २६ (१) अन्वये प्रसिद्ध करणे.

ठराव : नगररचना अधिकारी, विशेष नियोजन प्राधिकरण, नवीन चंद्रपूर यांनी तयार केलेल्या नवीन चंद्रपूर प्रारुप विकास योजनेवर प्राधिकरणाने एकमताने खालील निर्णय घेतले.

१) नवीन चंद्रपूरच्या प्रारुप विकास योजनेवर महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २६ (१) नुसार लोकांच्या हरकती व सूचना मागविण्याकरिता प्रसिद्ध करण्यास मंजूरी देत आहे.

२) वरील विकास आराखडा प्रसिद्ध झाल्यावर येणाऱ्या लोकांच्या हरकती व सूचनांवर संबंधित लोकांचे म्हणणे ऐकून त्यावर अहवाल सादर करण्यासाठी नियोजन समितीवर खालील सदस्यांची नियुक्ती करण्यास मंजूरी देत आहे.

| | |
|---|---|
| १) सभापती, नागपूर मंडळ. | सभापती |
| २) मुख्य अभियंता - १/प्राधिकरण | सदस्य |
| ३) मुख्य अधिकारी, नागपूर मंडळ. | सदस्य |
| ४) वरिष्ठ वास्तुशास्त्रज्ञ/प्राधिकरण | सदस्य |
| ५) नगररचना अधिकारी/वि. नि. प्रा./चंद्रपूर | सदस्य सचिव. |

सदर समितीच्या अहवालावर विचार करून अंतिम योजना प्राधिकरणाच्या मान्यतेनंतर शासनास दिनांक २८-१२-१९९३ च्या आत सादर करण्यात येईल. त्याकरिता सदर समिती दिनांक १५ सप्टेंबर, १९९३ च्या पुढे कार्यान्वित करण्यात येईल.

३) या संदर्भात जरूर ती पुढील कार्यवाही करण्याचे अधिकार मा. उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी/प्रा., यांना प्रदान करण्यात येत आहेत.

सदरहू ठरावाची स्थायीकरणाची वाट पहाता कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** 12 **Resolution No.** 5003

विषय : मुंबई झोपडपट्टी वस्ती सुधार मंडळाच्या कार्यकक्षा वाढविण्याबाबत.

ठराव : वरील सर्व बाबींचा विचार करून प्राधिकरणाने एकमताने असे ठरविले आहे की, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळाच्या 'कार्यकक्षा' 'महाराष्ट्र झोपडपट्टी सुधारणा मंडळ' अशी करावी. इथप्रत सर्व प्रादेशिक मंडळे झोपडपट्टीबाबतचा पत्रव्यवहार प्राधिकरणाचे आदेशान्वये महाराष्ट्र झोपडपट्टी सुधारणा मंडळाशीच करतील व त्यांच्या मार्गदर्शनासाठी पुढील कार्यवाही करतील. सदरहू ठरावाप्रमाणे शासनाकडे शिफारस करण्यासाठी मान्यता देण्यात येते.

**Item No.** 13 **Resolution No.** 5004

विषय : संक्रमण शिबिरातील घुसखोर/अनधिकृत लोकांविरुद्ध दंडात्मक कारवाई म्हणून रुपये ६००/- दरमहा नुकसान भरपाई वसूल करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या अखत्यारीतील संक्रमण शिबिरातील गाळे शासकीय मालमत्ता असून जो कोणी अनधिकृतरित्या वास्तव्य वा घुसखोरी करील त्यांच्याविरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल केला जाईल तसेच अशा अनधिकृत कालावधीसाठी दरमहा रुपये ६००/- प्रमाणे दंडात्मक नुकसान भरपाई वसूल करावी. जर अनधिकृत घुसखोरांनी रु. ६००/- भरले नाही तर संबंधितांची स्थावर तसेच घरातील मालमत्ता जप्त करून वसूल करावी.

**Item No.** 14 **Resolution No.** 5005

विषय : हनुमान व्यायामशाळा प्रसारक मंडळ, अमरावती यांच्या प्रस्तावित विद्यार्थी वसतिगृहासाठी ३७ खोल्या बांधण्याची योजना हाती घेण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, अमरावती येथे हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ यांची विद्यार्थी वसतिगृहाची प्रस्तावित योजना हाती घेण्याबाबत बाब टिप्पणीमधील परिच्छेद क्र. ४ मध्ये सूचविण्यात आलेल्या प्रस्तावास मंजूरी देण्यात येत आहे. तसेच, सदर संस्थेबरोबर वाटाघाटी करताना बाब टिप्पणीमधील अटी व शर्तीमध्ये सुधारणा करण्याचे व एजन्सी चार्जेसमध्ये थोडीफार सूट देण्याचे तसेच बँक गॅरंटी उपलब्ध करून देण्याबाबत सूट देण्याचे अधिकार उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी/प्रा., यांना प्रदान करण्याचे प्रस्तावास म्हाडाने एकमताने मंजूरी दिली. परिशिष्टामध्ये पुढीलप्रमाणे दुरुस्ती करावी.
प्राधिकरणाच्या बैठकीच्या विषयसूचीवरील विषय संपल्यानंतर मा. अध्यक्ष/प्रा. यांच्या परवानगीने खालील विषयाचे प्रस्ताव आयत्यावेळी विचारार्थ घेण्यात आले.

**Item No.** 15 **Resolution No.** 5006

विषय : रमाबाई नगर, घाटकोपर (पूर्व), येथे पोलिसांच्या गृहनिर्माण संस्थेला जागा देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, रमाबाई नगर, घाटकोपर (पूर्व) येथील पोलिसांच्या गृहनिर्माण संस्थेला बाब टिप्पणीसोबत जोडलेल्या नकाशात दर्शविल्याप्रमाणे खालील अटींच्या अधिन राहून भूखंड देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१) संस्थेला पूर्वी देण्यात आलेला ३.०२ एकर अधिक १० टक्के (३.०२ च्या क्षेत्राचे) इतका भूखंड व संस्थेने अध्या मागणी केलेला भूखंड ह्यामधील वाढीव क्षेत्राचे प्राधिकरणाच्या प्रचलित धोरणानुसार जास्तीचे अधिमूल्य संस्थेकडून घेणे जरूरीचे ठरेल.

२) नकाशात दाखविल्याप्रमाणे रस्ता क्र. १, २ व ३ हे सदर संस्थेला देण्यात येऊ नयेत, मात्र रस्ता क्र. २ व ३ ह्यांच्या ३० फूट रुंदीकरणाची जबाबदारी संस्थेवर राहील.

३) संस्थेने मागणी केलेल्या भूखंडावर असणाऱ्या मंडळाच्या सुविधा संस्थेने त्यांच्या पुनर्विकासाच्या योजनेत अधिनियम - ९ च्या तत्वावर विकसित कराव्यात. सदर सुविधा रस्ता क्र. ४ च्या जवळ प्रस्तावित करण्यात याव्यात.

४) सदर संस्थेने १.२ चटईक्षेत्र निर्देशांक वापरावयाचा झाल्यास त्याचे वाढीव अधिमूल्य भरणा करावा.

५) सदर भूखंडातून जात असणाऱ्या विकास योजनेच्या रस्त्याच्या वगळण्यासंबंधीची कार्यवाही करण्याची संपूर्ण जबाबदारी सदर संस्थेवर राहील.

**Item No.** 16 **Resolution No.**

विषय : पवई महाप्रकल्पाला मंजूर अभिन्यासात येणाऱ्या तळमजला अधिक १४ मजल्याच्या इमारतीस अतिरिक्त माव देण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 17 **Resolution No.**

विषय : गृहनिर्माण महाप्रकल्पाचा दिनांक ३१-७-१९९३ पर्यंतचा प्रगती अहवाल.

ठराव :

**Meeting No.** **129** **Meeting Date** **29-Oct-19**

**Item No.** **1** **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दि. २१-८-१९९३ रोजी झालेल्या १२८ व्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे.

ठराव :

**Item No.** 2 **Resolution No.** 5007

विषय : प्राधिकरणामध्ये रिटेनर पद्धतीने नेमणूक केलेल्या डॉ. ए. टी. वागळे यांच्या मानधनामध्ये वाढ करणेबाबत.

ठराव : एकमताने खालीलप्रमाणे निर्णय घेतले.

१) प्राधिकरणाच्या दि. १-४-१९९१ च्या परिपत्रकान्वये डॉ. ए. टी. वागळे यांना प्रतिनियुक्तीवरील अधिकाऱ्यांची वैद्यकीय खर्चाची देयके प्रमाणित करण्यास प्राधिकृत केले आहे. त्याच धर्तीवर या योजनेचा लाभ प्राधिकरण व प्राधिकरणांतर्गत मुंबई येथील व मुंबई बाहेरील प्रादेशिक मंडळे/प्रकल्प यामध्ये कार्यरत असलेली म्हाडा अधिकारी/कर्मचारी आणि शासनाकडील प्रतिनियुक्तीवरील अधिकारी/कर्मचारी यांना मिळावा, या दृष्टीकोनातून विचार करून कुठल्याही रजिस्टर्ड सार्वजनिक रुग्णालयाचे प्राधिकृत वैद्यकीय अधिकारी/शासकीय रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी/शासकीय रुग्णालयात काम करणारे ऑनररी डॉक्टर्स/महापालिका/नगरपालिका रुग्णालयातील प्राधिकृत वैद्यकीय अधिकारी यापैकी कोणत्याही एका वैद्यकीय अधिकाऱ्याकडून वैद्यकीय खर्चाची देयके प्रमाणित करून घेतल्यास वैद्यकीय नियमावलीच्या विहीत अटी व शर्तीच्या अधीन राहून वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती अनुज्ञेय समजण्यास मान्यता देण्यात येते.

त्याचप्रमाणे डॉ. ए. टी. वागळे यांचेकडून प्राधिकरण आणि प्रादेशिक मंडळे/प्रकल्प यामधील अधिकारी/कर्मचारी यांची वैद्यकीय नियमावली खंड ६ खाली अंतर्भूत होणारी वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीच्या प्रकरणात सल्ला घेण्यात येतो की डॉ. वागळे हे त्यांचा वैद्यकीय व्यवसाय सांभाळून प्राधिकरणास वेळोवेळी वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीच्या प्रकरणास मार्गदर्शक सल्ला देतात. ही बाब विचारात घेऊन सदर अतिरिक्त कामाबद्दल त्यांना सध्या मिळणाऱ्या रु. २००/- या रिटेनर फी मध्ये वाढ करण्यात येऊन ती दरमहा रु. ५००/- अशी वाढवून देण्यास मान्यता देण्यात येते.

३) त्यानुसार डॉ. वागळे यांना वैद्यकीय खर्चाची देयके प्रमाणित करण्यासाठी दरमहा देण्यात येणारे मानधन रु. ५००/- व रिटेनर फी दरमहा रु. ५००/- याप्रमाणे एकूण रु. १,०००/- एवढा मोबदला देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

४) डॉ. ए. टी. वागळे यांची रिटेनर पद्धतीने केलेली नेमणूक पुढील २ वर्षांकरिता चालू ठेवण्यात यावी, व दोन वर्षानंतर त्याचा आढावा घेऊन पुढील कार्यवाही करण्याबाबत विचार करण्यात यावा, असे ठरविण्यात आले. श्री. रवींद्र कारखानीस, सदस्य प्राधिकरण यांनी नमूद केले की, ''रिटेनर पद्धतीने नेमण्यात येणाऱ्या डॉक्टरांची सेवा २ महिन्यांच्या नोटीसीने दोहो बाजूने समाप्त करण्यात येते.'' उपरोक्त अतिरिक्त खर्चाची तरतूद सन १९९२-९३ च्या अर्थसंकल्पात केलेली नसल्याचे वित्त नियंत्रक/प्रा., यांनी सदर खर्चाची तरतूद पुरवणी अर्थसंकल्पात करण्याबाबतची कार्यवाही त्वरीत करावी, आणि स्थायीकरणाची वाट न पहाता कार्यवाही करावी, असे ठरविण्यात आले.

**Item No.** 3 **Resolution No.** 5008

विषय : प्राधिकरण व प्राधिकरणांतर्गत विविध संवर्गातील अधिकाऱ्यांना दैनंदिन कामकाजात निर्णय घेण्याचे अधिकार प्रदान करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
दैनंदिन कामकाजाच्या दृष्टीकोनातून प्राधिकरणाचे आदेश क्र. एमएच/आरईजी - ११९२/१७७८७/प्र. ५, दिनांक २१-९-१९९३ अन्वये सोबत जोडलेल्या परिशिष्ट 'अ'मध्ये नमूद केलेले अधिकार प्रदानतेचे आदेश पुनर्जिवित करून पुनर्निगमित केलेल्या कार्यवाहीस कार्योत्तर मंजूरी देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** 4 **Resolution No.** 5009

विषय : राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र (एन. आय. सी.) यांना आरामनगर, वर्सोवा येथे गाळ्यांचे वितरण देणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
आरामनगर, वर्सोवा येथील २८ गाळ्यांच्या इमारतीतील ४ गाळे (प्रत्येकी ६९.७६ चौ. मी. क्षेत्रफळ) प्रति चौ. फूटास रु. १,२५०/- या दराने रु. ९,३८,२७२/- इतक्या किंमतीस राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र (एन. आय. सी.) यांना एक रकमी विक्री तत्वावर देण्यास व याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

**Item No.** 5 **Resolution No.**

विषय : आदर्श नगर, वरळी येथील स्वातंत्र्य सैनिक भवनाचा लाभ स्वातंत्र्य सैनिकांच्या पत्नींना/विधवांना मिळण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 6 **Resolution No.** 5010

विषय : राज्य राखीव पोलिस दल गट क्र. ८ मुंबई (प.), गोरेगाव (पू.), यांना संक्रमण शिबिरातील गाळे तात्पुरत्या निवासस्थानासाठी देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

१) मुख्यअधिकारी, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ यांनी राज्य राखीव पोलिस दल गट क्र. ८, मुंबई - ६५ यांना गोरेगांव (पू) येथील संक्रमण शिबिरातील २० गाळे (इ. क्र. १) मार्च १९९३ मध्ये भाड्याने दिले आहेत. याबाबत शासनाकडून कार्योत्तर परवानगी मिळण्यासाठी शासनास सत्वर कळविण्यांत यावे.

२) समादेशक राज्य राखीव पोलिस दल गट क्र. ८, मुंबई - ६५ यांनी त्यांचे दि. २२-७-१९९३ च्या पत्राव्दये पुनश्च या संक्रमण शिबिरातील १०५ गाळे तात्पुरत्या स्वरुपात उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे. त्यानुसार पुढील अटी व शर्तीवर शासनाची मान्यता घेऊन तात्पुरत्या कालावधीसाठी देण्याचा निर्णय प्राधिकरणाने घेतला आहे.

अ) राज्य राखीव पोलिस दल यांनी मागणी केलेल्या एकूण १०५ गाळ्यांबाबतची परवानगी शासनाकडून प्राप्त शासनाकडे सत्वर संदर्भ करावा.

ब) गाळ्यांचे आर्थिक भाडे रु. १६६ अधिक सेवाशुल्क रु. ३५ मिळून एकूण भाडे रु. २०१/- व प्रत्येक गाळ्यापोटी रु. २००१/- अनामत रक्कम घेण्याच्या मुंबई मंडळाच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

क) मागणी केलेले गाळे हे तात्पुरत्या स्वरुपात/कालावधीसाठी द्यावयाचे आहेत. तात्पुरता कालावधी हा स्पष्ट करण्यात आलेला नसल्यामुळे तो एक वर्षापर्यंत मर्यादित ठेवण्यात यावा, व प्राधिकरणाला जर या कालावधीत गाळ्यांची तातडीने आवश्यकता भासल्यास एक महिन्याच्या पूर्व सुचनेनुसार गाळे रिकामे करून देण्याच्या अटीवर देण्यात यावेत, तसेच यापूर्वी देण्यात आलेल्या गाळ्यांच्या अटीमध्ये ज्या अटी आहेत. उदा. प्रत्येक गाळ्यापोटी वीजपुरवठ्याची देयके, गाळ्यांचा वापर निवासासाठी करण्याबाबत व गाळ्यांची काही नासधुस झाल्यास त्यापोटी नुकसान भरपाई देण्याबाबतच्या अटीचाही समावेश करण्यात यावा. शासनाकडे मान्यतेसाठी प्रस्ताव पाठविण्यात यावा असे ठरले.

**Item No.** 7 **Resolution No.** 5011

विषय : म्हाडा (मि. व्य. विक्री, हस्तांतरण, गाळ्यांची अदलाबदल) १९८१ विनियम क्र. ६ (४) सुधारीत क्र. ६ (३) च्या सुधारणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

बाब टिप्पणात नमूद केल्याप्रमाणे विनियम ६ (४) (सुधारीत क्र. ६(३) ) मध्ये 'पूर्ण इमारत अथवा त्याचा भाग' अशा प्रकारची व तद्अनुषंगिक विनियम क्र. ६ (५) (सुधारीत ६ (४) ) दुरुस्ती करण्याच्या प्रस्तावास प्राधिकरण मान्यता देत आहे.

| **Item No.** | **8** | **Resolution No.** | **5012** |
|---|---|---|---|

विषय : नागपूर मंडळाने मामटी-परसोडी येथे मध्यम उत्पन्न गट योजनेअंतर्गत बांधलेल्या गाळ्यांच्या प्रारंभी भरलेल्या रकमेवर आकारण्यात आलेल्या व्याजाची रक्कम परत करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
१) मामटी-परसोडी येथील गाळेधारकास आय. डी. पी. (इनिशियल डाऊन डेव्हलपमेंट) वरील व्याज रद्द करून परत करण्याच्या माजी उपाध्यक्ष/प्रा., यांच्या निर्णयास कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे.
२) प्राधिकरणाच्या महसूली जमा करण्यात आलेल्या रकमा विशिष्ट परिस्थितीत परत कराव्या लागल्या तर ते परत करण्याचे अधिकार मा. उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी/प्रा., यांना प्रदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे.
३) यापुढे भविष्यात आय. डी. पी. (इनिशियल डाऊन डेव्हलपमेंट) वरील व्याज रद्द करावयाचे असल्यास अशी सर्व प्रकरणे प्राधिकरणाच्या स्तरावर निर्णयासाठी सादर करण्यात यावीत.

| **Item No.** | **9** | **Resolution No.** | |
|---|---|---|---|

विषय : राज्य शासनाने म्हाडा अधिनियम १९७६ च्या कलम १०३ (ए) अन्वये घोषित केलेल्या जुन्या इमारतींची पुनर्रचना योजना.

ठराव :

**Item No.** 10 **Resolution No.** 5013

विषय : झोपडपट्टी पुनर्विकास योजना राबविण्यासाठी संक्रमण शिबिरातील गाळे उपलब्ध करून देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, संक्रमण शिबिरातील ५०० गाळे खाली नमूद केलेल्या अटी व शर्तीवर देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१) संक्रमण शिबिरातील गाळ्यांची संख्या मर्यादित आहे. हे लक्षात घेता व झोपडपट्टी पुनर्विकास कार्यक्रमाच्या कामासाठी संक्रमण शिबिरातील गाळ्यांची मोठ्या प्रमाणावर मागणी लक्षात घेता अशा प्रकरणी संक्रमण शिबिरातील गाळे वितरणासंबंधी, प्रत्येक प्रकरणी गुणवत्तेनुसार निर्णय घेण्याचे अधिकार मा. उपाध्यक्ष/प्रा., यांचेकडे रहातील.

२) एखादा गाळा वितरीत केल्यानंतर पुन्हा बदली करून देता येणार नाही.

३) डेव्हलपरने इमारत बांधल्यानंतर ताबडतोब संक्रमण शिबिरातील गाळे रिकामे करून देणे त्यांचेवर बंधनकारक राहील.

४) संक्रमण शिबिरातील गाळ्यांचे आर्थिक भाडे व सेवाशुल्क अनुक्रमे रु. १६६/- अधिक रु. ३५/- मिळून प्रत्येकी गाळ्याचे दरमहा रु. २०१/- इतके भरावे लागतील. मंडळाने वेळोवेळी केलेल्या भाडे अथवा सेवाशुल्कातील वाढ भरावी लागेल. भाडे वसुलीचे सर्व नियम व अटी त्यांना लागू होतील. प्रत्येक गाळ्यामागे रु. ५,०००/- अनामत भरावे लागतील, व ते बिनव्याजी रहातील.

५) विजेचे बिल भाडेकरू किंवा डेव्हलपरने परस्पर भरावे व संक्रमण शिबिरातील गाळे रिक्त करतेवेळी विद्युत मंडळाचे कुठलेही देयक शिल्लक नाही, असा दाखला मिळेपर्यंत बिलाची संपूर्ण जबाबदारी भाडेकरूंची राहील, व तोपर्यंत अनामत रक्कम परत केली जाणार नाही.

५) विद्युत पुरवठा करण्याच्या मिटरसाठी अनामत रक्कम भाडेकरू किंवा डेव्हलपर यांनी परस्पर भरावी.

७) गाळ्याचा वापर फक्त निवासासाठीच केला पाहिजे व गाळ्याची नासधुस झाल्यास मंडळ ठरवील ती रक्कम त्यांना नुकसान भरपाई म्हणून भरावी लागेल.

८) त्यांच्या नावावर गाळ्याचे वितरण असेल त्यांनी व त्यांच्या कुटुंबियांनीच त्यात राहिले पाहिजे.

९) मंडळाला संपूर्ण सहकार्य करावे लागेल.

१०) वितरीत केलेला गाळा दुसऱ्या कोणालाही वापरता येणार नाही, वा विकता येणार नाही. तसे झाल्याचे कायदेशीर कारवाई केली जाईल.

११) कोणत्याही परिस्थितीत वितरीत केलेल्या गाळ्यामध्ये अनधिकृत वास्तव्य वा बदली करता येणार नाही. तसे आढळल्यास त्यांचेकडून गाळा रिक्त करून घेण्यात येईल.

१२) गाळ्याचा वापर फक्त निवासासाठीच केला पाहिजे, व आजूबाजूच्या लोकांना कुठल्याही प्रकारचा त्रास होता कामा नये, व भाडेकरूंकडून गैरप्रकारही केला जाऊ नये, तसे आढळल्यास त्यांचेकडून त्वरित गाळ्याचा ताबा घेण्यात येईल.

**Item No.** **11** **Resolution No.** **5014**

विषय : प्राधिकरणाचा अतिरिक्त निधी बँकामध्ये व वित्तीय संस्थांमध्ये गुंतविण्याबाबत - हुडकोकडे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी/प्रा., यांनी प्राधिकरणाचे हित लक्षात घेऊन हुडको, दिल्ली या संस्थेकडे रु. ५.०० कोटी १४ टक्के दराने व रु. ६४.०० कोटी १३ टक्के दराने गुंतवणूक केलेल्या कार्यवाहीस कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे. तसेच, यापुढे जेव्हा जेव्हा बँकांचा सी. ओ. डी. च्या व्याजाचा दर हुडकोच्या अथवा एच. डी. एफ. सी. (लि.) च्या व्याजाचा दरापेक्षा कमी असेल तेव्हा त्यावेळची परिस्थिती विचारात घेऊन योग्य त्या कालावधीसाठी हुडकोकडे अथवा एच. डी. एफ. सी. (लि.) या वित्तीय संस्थांकडे अधिकतम दराने गुंतवणूक करण्याचे सर्व अधिकार उपाध्यक्ष तथा मु. का. अ. /प्रा., यांना प्रदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** 12 **Resolution No.** 5015

विषय : मराठवाड्यातील लातूर व उस्मानाबाद जिल्ह्यात झालेल्या भूकंपामुळे पुनर्वसतासाठी हाती घ्यावयाचा गृहनिर्माण प्रकल्प.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

मराठवाड्यातील भूकंपग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी शासनातर्फे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणावर जी जबाबदारी सोपविण्यात येत आहे त्याबाबत प्राधिकरणातर्फे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी/प्रा., यांना खालील बाबींवर अधिकार प्रदान करण्यात येत आहेत.

१) बांधकामासाठी यंत्रसामग्री उपलब्ध करून देणे तसेच या यंत्रसामुग्रीवर वेळोवेळी होणाऱ्या खर्चास मान्यता देणे. तूर्त दोन नवीन जीप्स चालकासह देण्यात याव्यात.

२) शासनाने निर्देशित केलेल्या आदेशानुसार बांधकाम हाती घेणे.

३) या कामासाठी प्रा. तर्फे अधिकारी/कर्मचारीवर्ग उपलब्ध करून देणे.

४) या कामासाठी प्राधिकरणातर्फे अधिकारी/कर्मचारी वर्गास प्रतिमाह विशेष प्रकल्प भत्ता खालीलप्रमाणे मंजूर करणे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| कर्मचारी वर्ग | - | १ | - रु. १,५७५ | प्रतिमाह. |
| कर्मचारी वर्ग | - | २ | - रु. १,३५० | प्रतिमाह. |
| कर्मचारी वर्ग | - | ३ | - रु. १,२७० | प्रतिमाह. |
| कर्मचारी वर्ग | - | ४ | - रु. १,००० | प्रतिमाह. |

याशिवाय त्यांना कोणताही इतर भत्ता या कामाकरिता अनुज्ञेय असणार नाही. वरील भत्ता पुढे ठरविण्यात येणाऱ्या तारखेपासून देण्यात येईल. तसेच कर्मचाऱ्यांची बदली झाल्यास केलेल्या कामाच्या दिवसांच्या प्रमाणात त्यांना वरील भत्ता देण्यात येईल.

५) बांधकामाच्या आराखड्यास/खर्चास प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार उपाध्यक्ष/प्रा., यांना देण्यात येत आहे.

६) भूकंपग्रस्तांच्या पुनर्वसनाबाबत कार्यवाही हाती घेण्यासाठी आणि अनुषंगिक कामे मंजूर करण्याचे अधिकार उपाध्यक्ष/प्रा. यांना देण्यात येत आहेत. प्राधिकरणाचे अधिकार वापरताना मा. अध्यक्ष/प्रा. ह्यांना तात्काळ अवगत करावे.

सदरहू ठरावाचे स्थायीकरण होणाची वाट न पाहता तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी.

| **Item No.** | **13** | **Resolution No.** | **5016** |
|---|---|---|---|

विषय : हुडको अर्थसहाय्यित योजनांसाठी १-४-१९९३ पासून अंमलात आणलेली सुधारीत प्रमाणपद्धती.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
हुडको अर्थसहाय्यित योजनांसाठी १-४-१९९३ पासून अंमलात आलेली सुधारीत प्रमाणपद्धतीसंबंधी प्राधिकरणाने नोंद घेतली, व प्राधिकरण राबवित असलेल्या निरनिराळ्या उत्पन्न गटातील योजनांसाठी कौटुंबिक मासिक उत्पन्नाचे दर, गाळ्यांची/भूखंडाचे कमाल किंमत/कर्जाची कमाल रक्कम, व्याजाचा दर, परत करण्याचा कालावधी या संबंधी हुडकोशी १-४-१९९३ पासून अस्तित्वात आलेली प्रमाण पद्धती प्राधिकरणाने अवलंबन करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| **Item No.** | **14** | **Resolution No.** | |
|---|---|---|---|

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणांतर्गत प्रादेशिक मंडळांची कामे देण्यासाठी मंडळाने कंत्राटदार नोंदणी करून मंडळाच्या स्वतःच्या मान्यताप्राप्त ठेकेदारांची यादी तयार करण्याबाबत प्रादेशिक मंडळाला अधिकार प्रदान करणेबाबत.

ठराव :

| **Item No.** | **15** | **Resolution No.** | **5017** |
|---|---|---|---|

विषय : पूज्य विनोबाजी भावे यांचे जन्मग्राम गागोदे येथे महिलांसाठी बांधलेल्या १० स्वच्छतागृहाच्या खर्चास मंजूरी मिळणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
पू. विनोबाजी भावे यांचे जन्मग्राम 'गागोदे', ता. पेण जिल्हा-रायगड येथे महिलांसाठी १० स्वच्छतालये कोकण मंडळाच्या वतीने राबविण्यात आलेल्या धोरणात्मक कार्यक्रमास व त्यावर झालेल्या खर्च रु. ९०,०००/- यांस कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे.

| **Item No.** | **16** | **Resolution No.** | **5018** |
|---|---|---|---|

विषय : भंडारा निर्मिती केंद्राकरिता नागपूर मंडळाच्या ताब्यात असलेल्या भंडारा खास येथील जमिनीपैकी ०.४० हे जमीन उपलब्ध करून देणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
उदिष्टांच्या परिपूर्तीकरीता प्राधिकरणाच्या जमीन विषयक आकारावयाच्या विक्री किंमतीच्या धोरणाच्या अधीन राहून आणि नेहमीच्या अटी व शर्तीनुसार ०.४० हेक्टर जमीन भंडारा इमारत निर्मिती केंद्रास विक्री करून हस्तांतरीत केलेल्या कार्यवाहीस कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे.

| **Item No.** | **17** | **Resolution No.** | |
|---|---|---|---|

विषय : म्हाडाच्या सर्व्हे नं. ७ व ८ वांद्रे (प), मुंबई या व्यापारी उपयोगाच्या भूखंडाच्या वितरणाबाबत.

ठराव :

**Item No.** **18** **Resolution No.**

विषय : ज्ञानेश्वर नगर, शिवडी, वडाळा येथील माडेकरांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेस भूखंड देण्यासंदर्भात.

ठराव :

**Item No.** **19** **Resolution No.**

विषय : अभ्युदय नगर, काळाचौकी या वसाहतीतील अशासकीय कर्मचाऱ्यांच्या सेवानिवासस्थान इमारत क्र. २, ४, ५, ६, १३, १४, १७, १८, २३, २४, २६, २७, २९ ते ३३ मध्ये राहणाऱ्या औद्योगिक कामगारांना गाळ्यांची मालकी हक्काने विक्री.

ठराव :

**Item No.** **20** **Resolution No.**

विषय : मुंबई येथील स्वातंत्र्य सैनिक भवनाचे बांधकाम.

ठराव :

**Item No.** **21** **Resolution No.** **5019**

विषय : सर्व्हे नं. ४१ (पार्ट), ओशिवरा येथील ४२ भूखंडाच्या जमिनीवर गृहनिर्माण महाप्रकल्प - २ अंतर्गत उच्च उत्पन्न गटाकरिता बांधावयाच्या गाळ्यांच्या बांधकामाच्या निविदांबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

ओशिवरा येथील ४२ भूखंडाच्या जमिनीवर गृहनिर्माण महाप्रकल्प-२ अंतर्गत उच्च उत्पन्न गटाच्या निविदांच्या विकासकांबरोबर वाटाघाटी करणेस खालीलप्रमाणे समिती नेमण्यात येत आहे.

१) अध्यक्ष/प्राधिकरण
२) उपाध्यक्ष/प्राधिकरण
३) सभापती/मुंबई मंडळ
४) मुख्य अधिकारी/मुंबई मंडळ
५) श्री. विकास भंडारी/प्रा. सदस्य/प्रा.,

तसेच मुख्य अभियंता (प्राधिकरण) सर्वसामान्य व मुख्य अभियंता/प्राधिकरण (मुंबई) हे या समितीसाठी तांत्रिक सल्लागार असतील.

मुख्य अभियंता/प्राधिकरण/मुंबई हे समितीचे नियंत्रक असतील.

**Item No.** **22** **Resolution No.**

विषय : गृहनिर्माण महाप्रकल्याच्या कामाचा दिनांक ३०-९-९३ पर्यंतचा प्रगती अहवाल.

ठराव :

**Item No.** 23 **Resolution No.** 5020

विषय : पंतनगर, घाटकोपर (पू) येथील इमारत क्र. १८५ लगतच्या भूखंडावरील प्रस्तावित योजनेत तळमजल्यावरील जागा बँक ऑफ महाराष्ट्र यांना देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
पंतनगर, घाटकोपर (पूर्व) येथील इमारत क्र. १८५ लगतच्या भूखंडावरील प्रस्तावित योजनेअंतर्गत बांधण्यात येणाऱ्या या नवीन इमारतीच्या तळमजल्यावरील सुमारे ४०० चौ. मी. क्षेत्राची जागा बँक ऑफ महाराष्ट्र या संस्थेस बँकेच्या शाखेसाठी मंडळाने अध्या दिलेल्या इमारत क्र. १८५, पंतनगर, घाटकोपर (पूर्व) येथील जागेच्या बदल्यास देण्यास परंतु प्रस्तावित जागा मंडळाचे/प्राधिकरणाचे कोणतेही आर्थिक नुकसान न करता प्रचलित किंमतीस विक्री तत्वावर देण्यास प्राधिकरण मंजूरी देत आहे. तसेच, बांधकामासाठी प्रथम अनामत रक्कम घेण्याची सूचना केली व सदर रक्कम विना व्याज राहील. अन्य अटी व शर्ती प्रचलित किंमत धोरणानुसार रहातील. बँक ऑफ महाराष्ट्राला मंडळाने सध्या भाड्याने दिलेली ७२० चौ. फू. क्षेत्राची जागा जी मुंबई मंडळास बँक परत देणार आहे ती जागा पोस्ट ऑफीस करीता प्राधिकरणाच्या प्रचलित अटी व शर्तीनुसार तसेच, किंमत विषयक धोरणानुसार वितरण करण्यासाठी प्राधिकरण मंजूरी देत आहे.

**Item No.** 24 **Resolution No.** 5021

विषय : राजीव गांधी झोपडपट्टी सुधार व निवारा प्रकल्प, नागरी नूतनीकरण

मंडारी चाळ, खोपरशी जिवराज मार्ग, भूकर क्र. १७७, परेल-शिवडी विभाग, फ-दक्षिण विभाग या इमारतींच्या पुर्नबांधणीच्या कामाच्या निविदा मंजूरीबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
नागरी नूतनीकरण योजनेअंतर्गत मंडारी चाळ, खोपरशी जिवराज मार्ग, या इमारतीच्या पुनर्बांधणी कामाची मेसर्स स्वस्तीक कन्स्ट्रक्शन यांची रु. १,५१,६०,८४५.४९ (अंदाजित रकमेच्या म्हणजे रु. १,६६,७८,५९८/- च्या ९.१० प्रतिशत कमी) किंमतीची निविदा मंजूर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** 25 **Resolution No.**

विषय : जागतिक बँक प्रकल्पास सप्टेंबर, ९४ पर्यंत मुदतवाढीबाबत.

ठराव :

**Item No.** 26 **Resolution No.** 5022

विषय : मुंबई बेटावरील पुनर्रचित इमारतीतील गाळ्यांमध्ये अनधिकृतपणे रहाणाऱ्या रहिवाश्यांना नियमित करण्याबाबत. म्हाडा विनियम १९८१ मध्ये करण्यात आलेल्या दुरुस्तीबाबत.

ठराव : दिनांक १-११-१९९३ पासून दिनांक ३१-१२-१९९३ या दोन महिन्याच्या कालावधीत पुनर्रचित इमारतीतील गाळे अनधिकृत व्यक्तींच्या नावे नियमित करताना खाली दर्शविल्याप्रमाणे दंड आकारण्यात यावा. जे ह्या सवलतीचा फायदा घेणार नाहीत त्यांना पुन्हा संधी चालू ठेवण्याचा निर्णय घेतला तर दंडाची रक्कम जास्त आकारण्यात यावी.

| अ.क्र. | क्षेत्रफळ | दंडाची रक्कम |
|---|---|---|
| १. | १८० चौ. फू. किंवा त्यापेक्षा कमी क्षेत्रफळाचे गाळे. | रु. १५,०००/- |
| २. | १८१ चौ. फू. ते ३०० चौ. फू. क्षेत्रफळाचे गाळे | रु. २०,०००/- |
| ३. | ३०१ चौ. फू. पेक्षा जास्त क्षेत्रफळाचे गाळे | रु. २५,०००/- |
| ४. | नियमित मृत रहिवाश्यांच्या वारसांच्या संदर्भात (ब्लड रिलेशन रु. १,०००/-) इतकी हस्तांतरण फी आकारून गाळे नियमित करण्यात यावे. | |

पहिल्याच महिन्यात गाळ्यांची किंमत एकरकमी भरतील त्यांना २ टक्के सूट देण्यात यावी.

**Item No.** 27 **Resolution No.** 5023

विषय : स्थानिक विकासअंतर्गत कामावर लावण्यात येणारा पर्यवेक्षक भार

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळातर्फे राबविण्यात येणाऱ्या स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत कामावर पर्यवेक्षक भार २.५ टक्केऐवजी १५ टक्के आकारण्यात यावा. याबाबत शासकीय पातळीवर असा निर्णय घेण्यासाठी प्रस्ताव पाठविण्यात यावा.
बैठकीच्या विषयसूचीवरील विषय संपल्यानंतर मा. अध्यक्ष/प्रा., याच्या परवानगीने आयत्यावेळी खालील विषयाचा प्रस्ताव विचारार्थ घेण्यात आला.

**Item No.** **28** **Resolution No.** **5024**

विषय : अध्यक्ष/प्रा., यांचे दालनात व कार्यालयाचे नूतनीकरण करणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
अध्यक्ष/प्रा., यांच्या कार्यालय व दालनाच्या नूतनीकरणासाठी प्रस्तावित रु. ४,०२,५७५/- खर्चाला मंजूरी देण्यात येत आहे. सदरहू ठरावाचे स्थायीकरण होण्याची वाट न पहाता नियमाच्या अधिन राहून तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी.
बैठकीच्या विषयसूचीवरील विषय संपल्यानंतर उपस्थितांनी मा. अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त करण्यात आले.

**Meeting No.** 130 **Meeting Date** 31-Dec-19

**Item No.** 1 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृ. नि. व क्षे. वि. प्राधि. च्या दि. २९-१०-१९९३ रोजी झालेल्या १२९ व्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे.

ठराव :

**Item No.** 2 **Resolution No.**

विषय : प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना दिनांक १ जुलै, १९९३ पासून सुधारीत दराने महागाई भत्ता देणेबाबत.

ठराव :

**Item No.** 3 **Resolution No.** 5025

विषय : प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना सन १९९२-९३ या वित्तीय वर्षासाठी तदर्थ बोनस देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाब टिप्पणात नमूद केल्याप्रमाणे शासन सूत्राप्रमाणे सन १९९२-९३ या वित्तीय वर्षासाठी राज्य शासकीय कर्मचारी आणि इतर यांना २९ दिवसांचा वित्तलब्धी एवढा तदर्थ बोनस प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना शासनाच्या आदेशातील अटी व शर्तींच्या अधीन राहून मा. उपाध्यक्ष/प्रा. यांच्या मान्यतेने तदर्थ बोनस वाटप करण्यात आला आहे. शासनाने दि. १२-११-९३ च्या निर्णयाद्वारे बोनस वाटपास मान्यता दिली आहे. केलेल्या कार्यवाहीस कार्योत्तर मंजूरी देण्यात आली.

**Item No.** 4 **Resolution No.** 5026

विषय : शासनाकडून भूकंपग्रस्त भागात घर बांधणीच्या संदर्भात देण्यात आलेल्या जाहिरातीचा खर्च अंदाजे ३ लाख रु. म्हाडाने करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, कामाची निकड विचारात घेऊन भूकंपग्रस्तांच्या पुनर्वसनाबाबत शासनाकडून देण्यात आलेल्या जाहिरातीचा खर्च रु. ३ लाख शासनाकडे पाठविण्यात आलेला आहे. सदरहू खर्चास कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे.

**Item No.** 5 **Resolution No.** 5027

विषय : स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक संवर्ग निर्माण करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, शासनाच्या पाटबंधारे विभागाच्या दि. ३१-१-८९ च्या शासन निर्णयाच्या अधीन राहून प्राधिकरणात रु. १२००-१८०० या वेतनश्रेणीत 'स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक' संवर्ग निर्माण करण्यात तत्वत: मान्यता देण्यात येत आहे. या संवर्गासाठी आवश्यक असणाऱ्या अटी व शर्ती यांची सविस्तर रुपरेषा नंतर आखण्यात यावी.

**Item No.** 6 **Resolution No.** 5028

विषय : नागपूर बिनाकी येथील ३२४ गाळे या अल्प उत्पन्न गट योजनेखाली गाळेधारकांनी गाळ्यांच्या किंमतीच्या प्रारंभिक हप्त्याची उर्वरित ५० टक्के रक्कम २ वर्षांच्या मुदतीच्या आत भरणा न केल्याने त्यावर व्याज आकारण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, नागपूर बिनाकी येथील अल्प उत्पन्न गट योजनेतील ज्या गाळेधारकांनी गाळ्यांच्या किंमतीपोटी प्रारंभिक भरावयाच्या हप्त्यापैकी ५० टक्के रक्कम २ वर्षात भरणा दिली नाही. म्हणून त्यांना त्या रकमेवर १६ टक्के दराने व्याज आकारले आहे. त्याबाबत व्यवहारी दृष्टीकोन ठेऊन प्राधिकरणाचा खर्ची पडलेला निधी वेळेवर वसूल होण्याच्या दृष्टीने नागपूर मंडळाने प्रस्तावित केल्याप्रमाणे योजनेच्या दराने म्हणजेच १०.५ टक्के दराने व्याज आकारण्याची सवलत विशेष बाब म्हणून जे गाळेधारक ३१-३-९४ पर्यंत उर्वरित रक्कम भरतील त्यांनाच देण्यात यावी. इतरांना ती सवलत देण्यात येऊ नये.

**Item No.** 7 **Resolution No.** 5029

विषय : श्री. वसंतराव नाईक शशासकीय वैद्यकीय महाविद्यालय, यवतमाळ यांना विद्यार्थी वसतीगृहासाठी गोंधनी रोड, यवतमाळ या वसाहतीत भाड्याने दिलेल्या ३८ गाळ्यांच्या विक्रीबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, गोंधनी रोड, यवतमाळ येथे मध्यम उत्पन्न गट गृहनिर्माण योजनेअंतर्गत हुडकोच्या अर्थ सहाय्याने बांधण्यात आलेल्या (१३८ अधिक ५१) बरोबर १८९ गाळ्यांपैकी ३८ गाळ्यांचे वाटप श्री. वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, यवतमाळ यांना शासनाची पूर्वपरवानगी घेतल्यावर विक्री करण्यास मान्यता देण्यात येत आहे. या गाळ्यांच्या किंमतीपोटी महाविद्यालयाकडून प्रत्येकी रु. ८८,३५०/- याप्रमाणे ३८ गाळ्यांची किंमत रु. ३३,५७,३००/- अधिक दि. १/१/१९९२ पासून हे गाळे महाविद्यालयास प्रत्यक्ष विक्री करण्याच्या कालावधीपर्यंत या गाळ्यांचे जे भाडे महाविद्यालयास पूर्वी आकारण्यात आलेले होते, त्याप्रमाणे येणारी रक्कम महाविद्यालयाकडून घेण्यात यावी.

| **Item No.** | **8** | **Resolution No.** | **5030** |
|---|---|---|---|

विषय : व्ही. एस. व्ही. रोड, अमरावती येथे बांधलेल्या उच्च उत्पन्न गटातील १०९ गाळ्यांपैकी शिल्लक राहिलेल्या ५४ गाळ्यांच्या (इमारत ४ व ५) वाटपाकरीता अटी शिथील करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, व्ही. एस. व्ही. रोड अमरावती येथे बांधलेल्या उच्च उत्पन्न गटातील १०९ गाळ्यांपैकी, शिल्लक राहिलेल्या केवळ ६५ गाळ्यांच्या वाटपासाठी अमरावती मंडळाचे मुख्य अधिकारी यांनी सुचविलेल्या सवलतीनुसार सवलत देऊन वाटप करण्यास मान्यता देण्यात येते.

१) अस्तित्वात असलेली गाळ्यांची किंमत रु. १,२३,१००/- प्रती गाळा ही यापुढे दि. १-१-९४ पासून कायम ठेवण्यात यावी.

२) गाळ्यांची सुरुवातीला भरावयाची किंमत रु. ४९,३२५/- करण्यात यावी. यापैकी सुरुवातीला पहिल्या वर्षी रु. ३०,०००/- व राहिलेली रक्कम २ वर्षांत प्रत्येकी रु. १५,०००/- याप्रमाणे व्याजासहीत वसुल करण्यात यावी.

३) अनामत रक्कम रु. ४,०५१/- ऐवजी रु. ? आकारण्यात यावी.

४) भाडेखरेदी हप्त्याचा कालावधी साडेआठ वर्षांऐवजी जानेवारी १९९४ पासून २० वर्षांपर्यंत करण्यात यावा म्हणजे मासिक खरेदी हप्ता रु. १३५३/- ऐवजी रु. ८६६/- असा होईल.

५) मात्र या इमारतींच्या समोवतालचा परिसर आरोग्याच्या दृष्टीने योग्य करून त्या भागातील रोड व इमारतीसमोरील खड्डे भरण्याचे काम इत्यादी प्रकारावर मंडळाकडून खर्च करण्यात येणारी रक्कम गाळ्यावर आकारून ती सुरुवातीस भरावयाच्या रकमेसोबत वसूल करावी.

५) विनियमातील १४ (ओ) प्रमाणे 'प्रथम येणाऱ्यास प्रथम गाळा' प्रमाणे अंमलबजावणी करावी.

७) ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही सत्वर करावी.

| **Item No.** | **9** | **Resolution No.** | **5031** |
|---|---|---|---|

विषय : केंद्रिय आरोग्य, मंत्रालय, केंद्र शासन (हेल्थ ॲण्ड फॅमिली वेल्फेअर) नवी दिल्ली यांच्या अधिपत्याखालील केंद्र शासन, आरोग्य सेवा योजना यांना (सीजीएचएस) ओशिवरा, जोगेश्वरी (पश्चिम) येथील २८ गाळ्यांची एक इमारत वितरण करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, केंद्र शासनाच्या आरोग्य सेवा योजना (सी. जी. एच. एस.) या उपक्रमाच्या अधिकाऱ्यांसाठी सेवानिवासस्थानाच्या उपयोगाकरिता ओशिवरा जोगेश्वरी (प.) येथील ८४ उच्च उत्पन्न गट योजनेतील ७५१ चौ. फू. च्या २८ गाळ्यांची एक इमारत देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२) सदरहू गाळ्यांची विक्री ही एकरकमी खरेदी तत्वावर करावयाची असून गाळ्यांची विक्री किंमत रु. ६,७६,०००/- प्रतिगाळा अशी ठरविलेली आहे. या गाळ्यांची विक्री एकरकमी खरेदी तत्वावर प्रचलित अटी व शर्तींच्या अधीन राहून करण्यात यावी. सदर ठराव स्थायी होण्यापूर्वी त्याची अंमलबजावणी करण्यात यावी.

**Item No.** 10 **Resolution No.** 5032

विषय : विक्रोळी येथील कन्नमवारनगर वसाहतीमध्ये सुश्रुषा रुग्णालयास मोकळा भूखंड वितरण करणेविषयी.

ठराव : प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला की,

विक्रोळी, कन्नमवारनगर वसाहतीमध्ये सुश्रुषा रुग्णालयास सुमारे १८०० चौ. वार क्षेत्रफळाचा भूखंड वितरण करण्याविषयी १९८४ मध्ये देण्याचे ठरले होते. तद्नुसार मुंबई मंडळाने पत्र क्र. १५५२१ दि. ३-१०-१९८४ अन्वये उक्त संस्थेस दोन पर्याय दिलेले होते. त्यापैकी एक म्हणजे अधिमूल्य रक्कम, वार्षिक भाडेपट्टा रक्कम व दुसरा पर्याय म्हणजे वार्षिक भुईभाडे भरण्याचे दिलेले होते. संस्थेने दुसऱ्या पर्यायाप्रमाणे वार्षिक भुईभाडे मुंबई मंडळास जमा करण्याचा प्रस्ताव मान्य केलेला होता व त्या प्रस्तावानुसार त्यावेळी रु. १,९९,१९३/-मुंबई मंडळाकडे २ वर्षांची भुईभाड्याची अनामत व १ वर्षाच्या भुईभाड्याच्या रुपाने जमा केलेले होते. मात्र त्यावेळी भाडेपट्टा करार न झाल्याने भूखंडाचा प्रत्यक्षात ताबा संस्थेस देण्यास आलेला नव्हता.

२. तद्नंतर संस्थेने अधिमूल्य रक्कम न वार्षिक भाडेपट्टा रक्कम कमी करावी अशी विनंती प्राधिकरणास केलेली होती. त्या विनंतीनुसार प्राधिकरणाने ठराव क्रमांक १९०६ दि. १८.४.९१ नुसार शासकीय रुग्णालय, जिल्हा परिषदेचे दवाखाने यांना ज्या पद्धतीने अधिमूल्य रक्कम आकारण्यात येत तद्नुसार उक्त संस्थेकडून अधिमूल्य रक्कम व वार्षिक भाडेपट्टा रक्कम वसूल करावी असे पारित केलेले होते. मात्र उक्त संस्थेस तद्नुसार अधिमूल्याची रक्कम कळविण्यात आलेली नाही.

३. सदरहू संस्थेस प्राधिकरणाच्या १८-४-१९९१ च्या पारीत केलेल्या ठराव क्र. १९०६ नुसार १९८६ च्या जमिनीच्या किंमतीविषयक धोरणानुसार शासकीय रुग्णालयांना आकारावयाच्या दराप्रमाणे जमिनीची प्रत्यक्ष किंमत व विकसन खर्च (व्याजासह) आकारून वार्षिक भाडेपट्टा रुपया एक प्रमाणे अधिमूल्य आकारण्यात यावे. मात्र, संस्थेने १९८४ साली मंडळाकडे वार्षिक भाड्यापोटी अदा केलेल्या रकमेवर त्या त्या वेळच्या प्रचलित दराने व्याज देऊन ती रक्कम आता आकारण्यात येणाऱ्या एकूण अधिमूल्यातून वजा करण्यात यावी व याप्रमाणे उर्वरीत अधिमूल्य संस्थेने मुंबई मंडळाकडे जमा केल्यानंतर प्रचलित अटी व शर्तीची पूर्तता करून घेऊन भूखंडाचा ताबा देण्यात यावा तसेच या ठरावाची अंमलबजावणी पुढील ३ महिन्यात व्हावी.

४. रुग्णालयात किमान १० टक्के खाटी म्हाडाने शिफारस केलेल्या समाजातील दुर्बल घटकाकरिता आरक्षित ठेवाव्यात. रुग्णालयात किमान १० टक्के खाटा सदर वसाहतीतील आणि इतर दुर्बल घटकांकरिता आरक्षित ठेवण्यात याव्यात, व तशी नोंद करारपत्रात नमूद करण्यात यावी. त्याचप्रमाणे या खाटांसाठी रुग्णालयातील वैद्यकीय फी मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयातील दरपत्रकाप्रमाणे आकारण्यात यावी.

**Item No.** 11 **Resolution No.** 5033

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा सन १९९२-९३ या वित्तीय वर्षाचा लेखा प्राधिकरणाने स्वीकृत करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा सन १९९२-९३ या वित्तीय वर्षाचा वार्षिक लेखा स्वीकृत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** 12 **Resolution No.** 5034

विषय : मिरा टप्पा - १, जिल्हा ठाणे येथील संमिश्र गृहनिर्माण योजना.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
मीरा, भायंदर येथील संमिश्र गृहनिर्माण योजनेअंतर्गत बांधलेल्या सदनिका रिक्त राहू नयेत म्हणून खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येते.
१) उपलब्ध पाणीपुरवठा व मागणी यांचा विचार करून कोकण मंडळाने योजना टप्प्याटप्प्याने हाती घेण्यात यावी. प्रस्तुत टप्पा - १ हाती घेण्यास मंजूरी दिली.
२) एकाच प्रकारच्या सदनिका वेगवेगळ्या वेळी बांधल्याने त्यांच्या विक्री किंमतीत वाढ होईल, म्हणून कोकण मंडळाने प्रस्तावित केलेल्या पहिल्या टप्प्यातील कामाची मागणी व पाणीपुरवठ्याचा अनुभव पाहून सदर योजना कमीत कमी टप्प्यात व लवकरात लवकर राबविण्यात यावी असे सुचविण्यात येत आहे.

**Item No.** 13 **Resolution No.** 5035

विषय : औरंगाबाद येथील सिटी सर्व्हे क्र. २०७२१ या जमिनीवर बांधण्यात येत असलेल्या १६ उच्च उत्पन्न गटातील गाळे बांधण्याबाबत - अपूर्णावस्थेत असलेले बांधकाम पूर्ण करणेबाबत.

ठराव : विशेष बाब म्हणून एकमताने निर्णय घेतला की,
१) प्राधिकरणाचे हीत तसेच प्राधिकरणाची व्याजासह गुंतलेली मोठी रक्कम व १९८८ पासून अपूर्णावस्थेत पडलेले काम त्वरीत पूर्ण करण्याच्या दृष्टीने मूळ ठेकेदार आर. के. कन्स्ट्रक्शन औरंगाबाद यांना रु. ८६,२०१/- इतकी रक्कम अंतिम देय रक्कम नुकसान भरपाई म्हणून देऊन त्यांना त्वरीत करारमुक्त करावे.
२) आर. के. कन्स्ट्रक्शन यांना निविदेमधील तरतूदीनुसार दिलेली ३ सी खालील नोटीस औरंगाबाद मंडळाने रद्द करावी. तसेच ठेकेदाराने न्यायालयात दाखल केलेली बाब त्वरीत मागे घ्यावा.
३) ठेकेदारास नुकसान भरपाईपोटी मंजूर केलेली रक्कम देणे शक्य व्हावे म्हणून निविदामधील अट क्र. ३७ व अट क्र. १३ शिथील करण्यास मान्यता देण्यात येत आहे.
४) या प्रकरणात व्याजापोटी देण्याचे टक्केवारीमध्ये किरकोळ फेरफार करणे जरूर पडल्यास त्याचे अधिकार उपाध्यक्ष, व मुख्य कार्यकारी अधिकारी/प्रा. यांना देण्यात येत आहेत.
५) केवळ खास बाब म्हणून फक्त वरील प्रकरणामध्येच मंजूरी देण्यात येत आहे. इतर प्रकरणामध्ये पूर्वोदाहरण (इंग्रजी मजकूर) म्हणून याचा वापर करण्यास मान्यता समजण्यात येऊ नये.
६) कंत्राटदाराने मंडळाच्या विरुद्ध न्यायालयात दाखल केलेली याचिका काढून घेतल्यानंतरच सदर प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**Item No.** 14 **Resolution No.**

विषय : उस्मानाबाद व लातूर जिल्ह्यातील भूकंपग्रस्तांचे पुनर्वसन करण्यासंबंधी म्हाडातर्फे केलेल्या कार्यवाहीबाबत.

ठराव :

**Item No.** 15 **Resolution No.** 5036

विषय : नवीन चंद्रपूर शहराची विकास योजना

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३० (१) शासनास मंजूरीकरिता सादर करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, प्राधिकरणाच्या दि. २१-८-९३ रोजीचा ठराव क्रमांक ५००२ द्वारे प्रसिद्ध केलेल्या नवीन चंद्रपूर शहराच्या विकास आराखड्यावरील हरकती व सूचना ऐकून नियोजन समितीने दि. १३-१२-९३ रोजी अहवाल सादर केला. प्राधिकरणाने त्यावर निर्णय घेतला.

अ) हजर ४ सदस्यांच्या नियोजन समितीला तिचा अहवाल सादर करण्याची मुदत दि. २८-११-९३ ते १३-१२-९३ पर्यंत वाढवून देण्यास मंजूरी दिली.

ब) विकास आराखडा अहवाल व बांधकाम उपविधी व विकास नियंत्रण नियमावली शासनास अंतिम मंजूरीसाठी सादर करण्याची तारीख दि. २८-३-९४ पर्यंत वाढवून घेण्याची व हा प्रस्ताव शासनास सादर करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

क) नियोजन समितीच्या शिफारशीनुसार विकास योजनेमध्ये योग्य ते फेरबदल करून शासनास ती मंजूरीसाठी सादर करावा.

ड) विकास आराखडा शासनास सादर करून व विकास आराखड्याची अंमलबजावणी करण्यासाठी पुढील योग्य कार्यवाही करण्याचे अधिकार उपाध्यक्ष वा मुख्य कार्यकारी अधिकारी यांना देण्यात येत आहेत.

---

**Item No.** 16 **Resolution No.** 5037

विषय : वि. नि. प्रा/नवीन चंद्रपूर शहराची प्रारुप विकास योजना

विकास योजनेतील प्रस्तावित रस्ते व आरक्षणाखालील जमीन संपादन करण्याबाबत.

ठराव : एकमताने खालील निर्णय घेतले.

१) बाब टिप्पणीतील परिच्छेद ३ मधील अ, ब, क, ड, व ई मधील प्रस्तावित केलेली जमीन संपादन करण्यास मंजूरी देण्यात येते.

२) भूसंपादन करण्यासाठी लागणारी पुढील कार्यवाही तसेच जमीन संपादनाचा अग्रक्रम, खाजगी वाटाघाटीने संपादीत करावयाची जमीन व सार्वजनिक प्रयोजनासाठी राखून ठेवलेल्या जमिनीपैकी काही भाग मालकाला विकसित करून देण्यासाठी मानके व अटी ठरविणे व अनुमती देणे इत्यादी बाबतचे अधिकार उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी/प्रा. यांना प्रदान करण्यात येत आहेत. त्याचबरोबर परिच्छेद ई मध्ये नमूद केल्यानुसार २५ टक्केपेक्षा जास्त जमीन संपादित झालेली आहे. त्यांना पर्यायी जमीन वाटपाचे धोरण व अधिकार उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी/प्रा. यांना प्रदान करण्यात येत आहेत.

**Item No.** 17 **Resolution No.** 5038

विषय : गृहनिर्माण योजना राबविणेबाबत विविध उत्पन्न गटासाठीचे धोरण - नागरी जमीन कमाल धारणा कायद्याखाली प्राप्त झालेल्या जमिनीचा वापर.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, प्राधिकरणाचा ठराव क्रमांक १०/७८ दिनांक १६-१-१९७९ मध्ये नमूद केलेली विविध उत्पन्न गटांची टक्केवारी कायम ठेवून प्रादेशिक मंडळ हा घटक पकडून सर्वसाधारण अंमलबजावणी करावी. मात्र जमिनीच्या एका विशिष्ट तुकड्यावर योजना राबविण्यासाठी लागू करण्याचे बंधन रहाणार नाही. नागरीक जमीन कमाल धारणा कायद्याखाली प्राप्त झालेल्या जमिनीवर योजना राबविताना प्राधिकरणाने निर्धारित केलेली विविध उत्पन्न गटांची टक्केवारी लागू करता येणार नाही. प्राधिकरणाचे परिपत्रक क्र. एमएस एपीसी/५५, दि. ५-१-८८ पूर्णपणे रद्द करण्यात यावे व सविस्तर सुधारीत सूचना नियमित करण्यात याव्यात.

**Item No.** 18 **Resolution No.**

विषय : गृहनिर्माण महाप्रकल्पाचा दि. ३१-११-९३ पर्यंतचा प्रगती अहवाल.

ठराव :

**Item No.** 19 **Resolution No.**

विषय : निर्मलनगर गौशिया कम्पाउंड सहकारी गृहनिर्माण संस्थेची त्यांना पूर्वी वितरण झालेल्या भूखंड क्रमांक अ व ब मधील ड्रेनेज लाईन म्हणून ती जागा नव्याने वितरण करण्याची तसेच पूर्वी वितरण झालेल्या भूखंड क्रमांक क व ड मधील ड्रेनेज लाइन व नाल्याची जमीन वितरण करण्याची विनंती.

ठराव :

**Item No.** 20 **Resolution No.**

विषय : जुहू विलेपार्ले बस स्टेशन परिसरातील भास्कर गॅरेज जवळील ३०० चौ. मी. जागा शेल्विक गॅस एजन्सिज यांना गॅस गोडाऊनसाठी वितरण करणेविषयी.

ठराव :

**Item No. 21 Resolution No. 5039**

विषय : नागरीक शिक्षण संस्थेला टिळकनगर चेंबूर वसाहतील माध्यमिक शाळेसाठी वितरण करण्यात आलेल्या भूखंडाचा वापर माध्यमिक शाळेसह कनिष्ट महाविद्यालय, अभियांत्रिकी, औषध निर्माण वैद्यकीय महाविद्यालयासाठी करण्यास परवानगी देणे तसेच
२) सदरहू भूखंड ३० वर्षाऐवजी ९९ वर्षांच्या भाडेपट्टी करारासह
वितरण करण्यास मंजूरी मिळावी.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, टिळकनगर चेंबूर येथील भूखंड माध्यमिक शाळेसाठी आरक्षित असल्याने जर बृहन्मुंबई महानगरपालिका वरील भूखंड माध्यमिक शाळेव्यतिरिक्त कनिष्ट महाविद्यालय, अभियांत्रिकी, औषध निर्माण व वैद्यकीय महाविद्यालय बांधण्यासाठी परवानगी द्यायला तयार असेल तर त्यास म्हाडाची हरकत नाही.

**Item No. 22 Resolution No. 5040**

विषय : सन १९९३-९४ च्या अंदाजपत्रकातील मुंबई मंडळाच्या पुरवणी अंदाजपत्रकास प्राधिकरणाची मंजूरी मिळणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, बाब टिप्पणीसोबत जोडलेल्या वितरणपत्र 'अ' व 'ब' मधील मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या बाबींच्या पुरवणी खर्चाच्या तरतूदीस उपाध्यक्ष/प्रा. यांची दि. ? व दिनांक १६-११-९३ रोजी दिलेल्या प्रशासक? कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे.

| Item No. | 23 | Resolution No. | 5041 |
|---|---|---|---|

विषय : झोपडपट्टी सुधार मंडळाअंतर्गत म्हाडाच्या झोपडपट्ट्यांचा २.५ चटई निर्देशांक वापरून पुनर्विकास करण्याबाबत, प्रस्ताव कार्यान्वित करण्यासाठी.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

१) प्राधिकरणाच्या वतीने सध्या मुंबईमधील झोपडपट्ट्या, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या ताब्यात आहेत, त्यातील विकासास्तव सुसाध्य असतील अशा झोपडपट्ट्या जमिनीसह झोपडपट्टी सुधार मंडळाकडे पुनर्विकासासाठी हस्तांतरीत कराव्यात. झोपडपट्ट्यांच्या वसाहती जमिनीसह आपोआप हस्तांतरण न करता प्रत्येक प्रकरण गुणवत्तेच्या आधारे तपासून व निश्चित ठरवूनच जमिनी हस्तांतरीत कराव्यात.

२) प्राधिकरणाच्या जागेवरील झोपडीधारकांनी विकास नियमांतर्गत स्वतःच पुनर्बांधणी करावयाची ठरविली तर अशा पुनर्बांधणीस झोपडपट्टी सुधार मंडळाने ना हरकत प्रमाणपत्र द्यावे.

३) म्हाडाच्या झोपडपट्ट्यांबाबत २.५ चटई निर्देशांक वापरून पुनर्विकास करणे व त्यासाठी खाजगी वास्तुशास्त्रज्ञ नेमून १९९३-९४ या आर्थिक वर्षात पुनर्बांधणी प्रस्ताव कार्यान्वित करण्यासाठी सुसाध्य अहवाल प्राप्त करणे व या कामासाठी वास्तुशास्त्रांना सेवाआकार म्हणून '१६० - प्राधिकरण निधी' मधून रु. १ कोटींची तरतूद मान्य करावी.

४) सुसाध्य ठरणाऱ्या झोपडपट्ट्यांच्या पुनर्विकासाबाबतचे प्रस्ताव पुनर्बांधणीसाठी म्हणून कार्यान्वित करणे व मंजुरी दिलेल्या झोपडपट्ट्याबाबतच पुनर्विकासाचे काम प्रत्यक्षरित्या १९९४-९५ या आर्थिक वर्षात सुरू करावे व त्यासाठी '१६० प्राधिकरण निधी' मधून रु. १ कोटी तरतूदी उपलब्ध करावी.

| Item No. | 24 | Resolution No. | |
|---|---|---|---|

विषय : मुंबई बेटातील उपकरप्राप्त इमारतींचा विमा उतरविणेसंबंधी.

ठराव :

| Item No. | 25 | Resolution No. | 5042 |
|---|---|---|---|

विषय : प्राधिकरणाच्या ठराव क्र. ४०७७ अन्वये मुलुंड येथील भूखंड क्र. ३ चे वितरण पर्यायी निविदाधारकास करणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, मुलुंड येथील राखीव गांधी प्रकल्पाच्या अंतर्गत भूखंड क्रमांक ३ हा सर्वात जास्त निविदाधारकाने पैसे भरण्यास असमर्थता व्यक्त केल्याने दुसऱ्या क्रमांकावरील निविदाधारक भारती औद्योगिक विकास बँक यांनी प्रती चौ. मीटर चटई निर्देशकांस ४९५०/- रुपये या दराने वितरण करण्याच्या मा. अध्यक्ष/प्रा. व उपाध्यक्ष/प्रा. यांच्या निर्णयाबाबत प्राधिकरण अवगत आहे.

**Item No.** 26 **Resolution No.** 5043

विषय : नागरी नूतनीकरण योजना १८-२२-२६-३० 'अंधार चाळ' अनंत पवार मार्ग, टप्पा क्र. १ यामधील १६ गाळे समागृहासाठी देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, नागरी नूतनीकरण योजनेअंतर्गत अंधार चाळ टप्पा - १ मधील सोळा गाळे अंधार चाळ रहिवाशी संघास समागृहासाठी देण्यासाठी, चटई क्षेत्रफळाचा बाजार भाव दर चौ. फूटासा रु. ९००/- प्रमाणे देण्यास मान्यता देण्यात येत आहे.
मूळ विषयसूचीवरील विषय संपल्यानंतर पुरवणी विषयसूचीवरील खालील विषय चर्चेस घेण्यात आले.

**Item No.** 27 **Resolution No.** 5044

विषय : ओ. डी. ए. या ब्रिटिश शासनाच्या संस्थेकडून मिळणाऱ्या अर्थसहाय्याने प्राधिकरण शिक्षण केंद्र स्थापन करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, मिळणारे अर्थसहाय्य त्याची प्राधिकरणास उपयुक्तता प्रशिक्षणाचा कालबद्ध कार्यक्रम इत्यादि गोष्टी लक्षात घेता सदर प्रशिक्षण कक्ष तावडतोब कार्यान्वित करून देणे आवश्यक आहे. यामध्ये पूर्वीच्या मंजूर पदामध्ये झालेला बदल लक्षात घेता उर्वरित पदे मंजूर करण्यात यावीत आणि त्याचबरोबर एक वाहन देखील मंजूर करण्यात यावे आणि त्याकरिता लागणारा अंदाजे दरवर्षी आवर्ती खर्च रु. ७.४ लाख अनावर्ती खर्च आणि सुरुवातीला लागणारा वाहनावर रु २.५ लाख अनावर्ती खर्च वसतीगृहास लागणारे रु. २६ लाख अनावर्ती खर्च (येरवडा येथे होत असलेल्या बांधकामामधून ६ गाळे वर्ग करण्याकरिता) मंजूर करण्यात यावा. तसेच ओ. डी. ए. जसे दरवर्तील याप्रमाणे उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी/प्राधिकरण आणि समन्वय अधिकारी मुंबई मंडळाचे वास्तुशास्त्रज्ञ श्री. दारशेतकर आणि इतर ४ ते ५ अधिकारी यांना सिंगापूर गृहनिर्माण संस्था या ठिकाणी एका आठवड्याकरिता ओ. डी. ए. च्या खर्चाने दौरा करण्याकरिता परवानगी देण्यात येत आहे.

**Item No.** 28 **Resolution No.** 5045

विषय : ओशिवरा येथील सर्व्हे नं. ४१ (भाग) मधील भूखंडावर गृहनिर्माण महाप्रकल्प - २ अंतर्गत उच्च उत्पन्न गटाकरिता बांधावयाच्या गाळ्यांच्या बांधकामाकरिता निविदाबाबत.

ठराव : बहुमताने निर्णय घेतला की, ओशिवरा येथील गृहनिर्माण महाप्रकल्प - २ बाबत उपसमितीने शिफारस केल्यानंतर व प्राधिकरणांत झालेल्या चर्चेनंतर मे. बी. जी. शिर्के आणि कंपनी, मे. अबोड कन्स्ट्रक्शन प्रा. लि., मे. अंजठा बिल्डर्स आणि मे. युनिटी कन्स्ट्रक्शन कंपनी या चारही विकासकांबरोबर अंतिम वाटाघाटी केल्यानंतर कमी केलेल्या किंमतीच्या निविदा खालील तपशिलाप्रमाणे स्वीकारण्यात आल्या.

| अ. क्र. | विकासकाचे नाव | समुह क्रमांक | अंतिम वाटाघाटी केल्यानंतरची किंमत रु. | बांधकामाच्या क्षेत्रावर प्रति चौ. फू. वर रु. |
|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. |
| १. | मे. बी. जी. शिर्के आणि कंपनी | १ | ४,९२,०९,५३६/- | ५१९.९८ |
| २. | मे. अबोड कन्स्ट्रक्शन प्रा. लि. | २ | ७,१५,८२,०५६.७० | ४९०.०० |
| ३. | मे. अबोड कन्स्ट्रक्शन प्रा. लि. | ३ | ७,२३,५३,१४५.२० | ४९०.०० |
| ४. | मे. अंजठा बिल्डर्स | ४ | ८,५५,५९,७१६.९८ | ४९०.०० |
| ५. | मे. युनिटी कन्स्ट्रक्शन कंपनी | ५ | ७,०३,००,७५५.७० | ४९०.०० |
| ६. | मे. युनिटी कन्स्ट्रक्शन कंपनी | ६ | ११,१९,१६,५४८.०० | ४९०.०० |
| ७. | मे. बी. जी. शिर्के आणि कंपनी | ७ | १४,९०,२७,६८५.०० | ५२२.८० |

ठराव स्थायी होण्याची वाट न पहाता याबाबतची कार्यवाही त्वरीत सुरू करावी.

**Item No.** 29 **Resolution No.**

विषय : पुरवणी अर्थसंकल्पिय तरतूदींस उपाध्यक्ष/प्रा. यांची मान्यता घेतलेली प्रकरणे प्राधिकरणाच्या अवलोकनार्थ ठेवणेबाबत.

ठराव :

**Item No.** 30 **Resolution No.**

विषय : प्रादेशिक मंडळातील कर्मचाऱ्यांच्या/अधिकाऱ्यांच्या क्रीडा वृद्धीसाठी अनुदान मंजूर करणेबाबत (पुणे मंडळ).

ठराव :

**Item No.** 31 **Resolution No.** 5046

विषय : राजीव गांधी निवारा प्रकल्पास मार्च ९३ पासून पुढे मुदतवाढ मिळणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, राजीव गांधी झोपडपट्टी सुधार निवारा प्रकल्पांतर्गत १४८ पदांना कंत्राटी पद्धतीने कर्मचारी/अधिकारी नेमण्यास शासनाने परवानगी दिली आहे. या प्रकल्पाकडे सध्या असलेल्या व भविष्यात घेण्यात येणाऱ्या योजना लक्षात घेता या प्रकल्पाची मुदतवाढ किमान चार ते पाच वर्षे सुरू रहाण्याची शक्यता आहे. ही बाब लक्षात घेता दीर्घकाळाकरिता कंत्राटी स्वरूपाची पदे चालू ठेवणे इष्ट ठरणार नाही. यासाठी प्राधिकरणाच्या विविध विभागामध्ये/मंडळामध्ये जी पदे रिक्त होतील, त्या पदांवर खुल्या स्पर्धेद्वारे अथवा अन्य माध्यमातून थेट भरतीने नियुक्त्या न करता राजीव गांधी निवारा प्रकल्पाकडील कंत्राटी पद्धतीवरील पदांवरील कर्मचाऱ्यांना/अधिकाऱ्यांना नियमित करण्याचे अधिकार उपाध्यक्ष/प्रा. यांना देण्यात येत आहेत. मात्र असे करताना वरील कर्मचारी/अधिकारी यांचा वापर प्राधिकरणामध्ये प्रकल्प संपल्यानंतर, इतरत्र करण्यास वाव आहे याची खात्री करण्यात यावी. यापुढे प्रकल्पास ३ वर्षांची मुदतवाढ देण्यात यावी.

**Item No.** 32 **Resolution No.** 5047

विषय : नागरी नूतनीकरण योजना

१८-२२-२६-३० अंधार चाळ, अनंत गणात पवार मार्ग, टप्पा - १ योजनेअंतर्गत इमारतीची पुनर्बांधणी इमारतीच्या बांधकामाबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
मे. आर. एस. गुप्ता आणि कंपनी यांच्या मागण्याबाबत खालील पदाधिकाऱ्यांची समिती नियुक्त करण्यात येत आहे व समितीने काम पूर्ण होण्याच्या दृष्टीने याबाबत मे. गुप्ता आणि कंपनी यांच्याशी त्वरीत चर्चा व विचार विनिमय करून योग्य तो निर्णय घेण्याचा अधिकार प्राधिकरण या समितीला देत आहे.

समितीचे सदस्य

१) अध्यक्ष/प्राधिकरण
२) उपाध्यक्ष/प्राधिकरण
३) मुख्य अभियंता/प्राधिकरण (सर्वसाधारण)
४) श्री. विकास मंडारी, सदस्य/प्राधिकरण

| **Item No.** | **33** | **Resolution No.** | **5048** |
|---|---|---|---|

विषय : सर्व्हे नंबर ३८६, मुलुंड (पूर्व) येथे अंधेरी - घाटकोपर जोडरस्त्यावरील झोपडपट्ट्यांचे स्थलांतर करून बांधावयास १८५७ गाळे करार मे. क्लासिक कन्स्ट्रक्शन कं. यांचे दावे प्राधिकरणाने निकालात काढावेत अशा प्रकारचे उच्च न्यायालयातील आदेशानुसार सादर केलेली बाब टिप्पणी.

ठराव : एकमताने खालीलप्रमाणे निर्णय घेतला की,

१) म्हाडा नियुक्त संयुक्त समितीने विचारात घेतलेल्या बाबींचा समावेश पुढीलप्रमाणे.

१. देय सात दावे - रुपये २८.५२ लाख

व

२. अदेय दावे - इतर सर्व

ठरवून कंत्राट संपुष्टात आणण्यास संमती दिली.

उर्वरीत बाबींबाबत तद्नंतर संबंधित ठेकेदाराशी (क्लासिक कं. कं.) चर्चा करण्यात यावी, असे ठरले.

प्राधिकरणाच्या बैठकीच्या मूळ विषयसूची व पुरवणी विषयसूचीमधील विषयावर चर्चा झाल्यानंतर मा. अध्यक्ष/प्रा. यांच्या परवानगीने आयत्यावेळी विचारार्थ घेण्यात आलेला प्रस्ताव.

**Item No.** 34 **Resolution No.** 5049

विषय : भूकंपग्रस्त भागात इमारत निर्मिती केंद्र स्थापण्याबाबत राजस्थान आवास विकाससंस्थेने आपले कर्मचारी पाठवून सदरनिर्मिती केंद्रांना चालना देण्याबाबत देऊ केलेल्या सहकार्याबाबत व राजस्थान आवास विकास संस्थेच्या कर्मचाऱ्यांस प्राधिकरणातर्फे वेतन तसेच वाहन, रोजदारी भत्ता देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे लातूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील १० इ. नि. केंद्रांच्या कामास चालना देण्यासाठी राजस्थान आवास विकास संस्थेचे कर्मचारी व प्राधिकरणाचे कर्मचारी या इमारत निर्मिती केंद्रांच्या कामावर नेमण्याच्या उपाध्यक्ष/प्रा. यांच्या निर्णयास प्राधिकरणाची ही सभा सर्वानुमते मंजूरी देत आहे.

या कर्मचाऱ्यांचे मासिक वेतन, प्रवासभत्ता, रोजदारी भत्ता व इतर तत्सम भत्ते यापोटी जो काही खर्च होईल, तो खर्च ही निर्मिती केंद्र उभी राहिल्यावर प्राधिकरणास परत मिळेल या अटीवर प्राधिकरणाची ही सभा प्राधिकरणास हा खर्च प्राधिकरण निधीतून करण्यास मंजूरी देत आहे. अशाप्रकारे भूकंपग्रस्त भागात निर्मिती केंद्रांना चालना देण्यासाठी इतर कुठल्याही संस्था पुढे आल्या व त्यासंबंधी हुडको व महाराष्ट्र शासनाने त्यास मान्यता दिली व अशा संस्थांबाबतदेखील अशा प्रकारची व्यवस्था करावी लागली तर याच पद्धतीने करण्यासाठी प्राधिकरणाची ही सभा उपाध्यक्ष/प्रा. यांना सर्व अधिकार देण्यास मंजूरी देत आहे.

बैठकीपुढील विषय संपल्यानंतर उपाध्यक्ष/प्रा. यांनी प्राधिकरणाच्या निदर्शनास आणून दिले की, महाराष्ट्र स्टेट टेक्स्टाईल कॉर्पोरेशन लि. ने नागपूर येथील 'कौमुदी बॅंग्लो' या नावाने संबोधिलेली मालमत्ता ५८०६ चौ. मी. क्षेत्रफळाचा भूखंड व त्यावरील ७३५ चौ. फी. चे त्यावर अस्तित्वात असलेले बांधकाम विक्री करण्यासाठी काढले असून त्यासाठी निविदा मागविली आहे. प्राधिकरणाच्या वतीने महाराष्ट्र स्टेट टेक्स्टाईल कॉर्पोरेशन नागपूर येथील भूखंड आणि इमारत खरेदी करण्यासाठी निविदासह रु. १० लाख अनामत रक्कम भरण्यास उपाध्यक्ष/प्रा. यांनी मागितलेल्या परवानगीस एकमताने मान्यता देण्यात आली.

१३० वी बैठक अमरावती येथे दिनांक ३० डिसेंबर १९९३ रोजी होणार होती. त्याप्रमाणे अमरावती मंडळाने संपूर्ण तयारी केली होती. परंतु अमरावती मंडळाचे सभापती श्री. देवराज बोधरा यांना अचानक हृदयविकाराच्या उपचारासाठी दवाखान्यात भरती करावे लागले. त्यामुळे ही बैठक अमरावती ऐवजी मुंबई येथे घेण्यात आली. असे मा. अध्यक्ष/प्राधिकरण ह्यांनी सांगितले. श्री. बोधराजी, यांची तब्येत लवकर बरी व्हावी म्हणून प्राधिकरणाच्या वतीने शुभेच्छा व्यक्त करण्यात आल्या.

बैठकीसमोरील विषय संपल्यानंतर उपस्थितांनी मा. अध्यक्षांचे आभार मानल्यानंतर बैठकीचे कामकाज संपल्याचे जाहिर करण्यात आले.

**Meeting No.** **Special** **Meeting Date** **25-Feb-19**

**Item No.** **1** **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दि. ३१-१२-९३ रोजी झालेल्या १३० व्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे.

ठराव :

---

**Item No.** **2** **Resolution No.** **5050**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे सन १९९४-९५ चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक व सन १९९३-९४ चे सुधारित अंदाजपत्रक.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
प्राधिकरणाच्या सन १९९४-९५ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकावर व सन १९९३-९४ च्या सुधारित अंदाजपत्रकावर सविस्तर चर्चा होऊन दोन्ही अंदाजपत्रकात प्राधिकरणाची मंजुरी देण्यात येते.

---

**Item No.** **3** **Resolution No.** **5051**

विषय : स्टाफिंग पॅटर्न -

प्राधिकरण, संचालनालये व प्रादेशिक मंडळे यांच्याकरिता कर्मचारी वर्ग अनुसूची सन १९९४-९५.

ठराव : बहुमताने निर्णय घेतला की,
बाब टिप्पणात नमूद करण्यात आलेल्या सन १९९४-९५ या वित्तीय वर्षाकरिता कर्मचारी वर्ग अनुसूचीत मान्यता देण्यात येत आहे. त्याचप्रमाणे कर्मचारी वर्ग अनुसूचित आवश्यकतेनुसार किरकोळ बदल, पदांची अदलाबदल, पदे परिवर्तीत करणे (डायवर्शन), पदांचे फेरवाटप करणे (रिडिस्ट्रिब्युशन) पदांचे पुर्ननामभिकरण (रिडेसिग्नेशन) इ. बाबतचे अधिकार मा. उपाध्यक्ष/प्रा. यांना पूर्वीप्रमाणे प्रदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

---

**Item No.** 4 **Resolution No.** 5052

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणांतर्गत कामे करण्यासाठी मंडळाने कंत्राटदारांची नोंदणी करून मंडळाच्या स्वतःच्या मान्यताप्राप्त ठेकेदारांची यादी करणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
वर्ग ४ (१) ते ७ मधील सर्वसाधारण काम करणारे कंत्राटदार आणि वर्ग 'क' ते 'ई' विद्युत काम करणारे कंत्राटदार यांची नोंदणी संबंधित तांत्रिक अधिकाऱ्यांच्या शिफारशीवरून प्रादेशिक मंडळाच्या मुख्य अधिकाऱ्यांनी करावी.
वर्ग-३ आणि वर्ग-४ मधील कंत्राटदारांची नोंदणी संबंधित उपमुख्य अभियंता यांच्या शिफारसीवरून प्रादेशिक मंडळाच्या मुख्य अधिकाऱ्यांनी करावी. मात्र वर्ग ३ मधील नोंदणी करण्यापूर्वी संबंधी मुख्य अभियंता (प्राधिकरण) यांच्याशीदेखील सल्लामसलत करावी.
वर्ग (१) आणि वर्ग (२) मधील कंत्राटदाराची नोंदणी मुख्यअभियंता/प्रा., (सर्वसाधारण), मुख्य अभियंता/प्रा. (मु.मं.) आणि मुख्य अभियंता/प्रा. (नागपूर मंडळ), वित्त नियंत्रक/प्रा., यांच्या समितीने शिफारस केल्यानंतर उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी/प्रा., यांनी नोंदणी करावी. नोंदणी केल्यानंतर प्राधिकरण/संबंधित प्रादेशिक मंडळ यांच्या बैठकीत माहितीसाठी सादर करावे.

---

**Item No.** 5 **Resolution No.** 5053

विषय : प्राधिकरण आणि प्राधिकरणांतर्गत विविध संवर्गातील अधिकाऱ्यांना दैनंदिन कामकाजात निर्णय घेण्याचे अधिकार प्रदान करण्याबाबत.

संचालक, जा. बँ. प्र. आणि संचालक राजीव गांधी झोपडपट्टी सुधार व निवारा प्रकल्प यांस निविदा स्वीकृतीचे अधिकार देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे प्राधिकरणाने ठराव क्र. ४०४०, दिनांक २६/२/१९९३ रोजी घेतलेला निर्णय मुंबईमधील मंडळांव्यतिरिक्त इतर विभागाद्वारे जसे की, जागतिक बँक प्रकल्प व राजीव गांधी झोपडपट्टी सुधार व निवारा प्रकल्प याद्वारे करण्यात येणाऱ्या कामांनादेखील लागू आहे. हा प्रशासनाचा समज स्थायी करण्यात येत आहे. प्राधिकरणाने याबाबतीत परिपत्रक क्र. ? दिनांक २१-४-१९९३ अन्वये काढलेल्या आदेशास, कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे. जागतिक बँक प्रकल्प व राजीव गांधी झोपडपट्टी सुधार व निवारा प्रकल्पाची रु. ५०.०० लाखावरील व रु. २ कोटी पर्यंतच्या कामाच्या निविदा स्वीकृतीबाबत बाब टिप्पणीत नमूद केलेल्या समितीस नमूद केलेल्या अटी व शर्तीनुसार निविदा स्वीकृतीचे अधिकार प्रदान करण्यात येत आहेत. मात्र समितीचे अध्यक्ष उपाध्यक्ष असावे असेही मान्य करण्यात येत आहे.

---

**Item No.** 6 **Resolution No.** 5054

विषय : लातूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील भूकंपग्रस्तांच्या पुनर्वसन करण्यासाठी म्हाडातर्फे केलेल्या कार्यवाहीबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाब टिप्पणीत नमूद केलेल्या तपशिलवार माहितीची नोंद सुरु झाल्यास, उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी/प्राधिकरण यांचे एक वेगळे पथक या कामाकरिता निर्माण केले जाईल आणि पथकातील कर्मचारी अधिकाऱ्यांची संख्या/मुख्यालय इत्यादीबाबतचा निर्णय उपाध्यक्ष/प्रा., हे घेतील.

---

**Item No.** 7 **Resolution No.** 5055

विषय : सर्व्हे क. ३४३ (भाग) धारावी येथील नियोजित २४० गाळ्यांचे उर्वरित बांधकाम करण्यासाठी निविदा (फेझ-२, भाग - १).

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
सर्व्हे क. ३४३ (भाग) येथे नियोजित २४० गाळ्यांचा उर्वरित बांधकामासाठी (फेझ-२, भाग-१) मे. डिव्हाईन कन्स्ट्रक्शन कंपनी यांची रु. १,५२,४१,६७९.९८ (अंदाजित रकमेच्या म्हणजे रु. १,३३,८१,६३३/- च्या १३.९ टक्के जास्त) किंमतीची निविदा मंजूर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

---

**Item No.** 8 **Resolution No.**

विषय : धारावी, कल्याणवाडी येथील नेताजी गृहनिर्माण संस्थेच्या १९५ व्या निवासी गाळ्यांची व १० अनिवासी गाळ्यांचे उर्वरित बांधकाम करण्यासाठी निविदा.

ठराव :

---

**Item No.** 9 **Resolution No.**

विषय : सर्व्हे क. १३८, (भाग-२) येथे १८७२ संक्रमण/अल्प उत्पन्न गटासाठी (अंर्तबाह्य व पायाभूत सुविधासहीत) गाळे बांधणे - रिटेनिंग वॉल, कुंपण भिंतीचे बांधकाम आणि माती भरणी काम करण्याच्या निविदेस मंजूरी देणेबाबत.

ठराव :

---

**Item No.** 10 **Resolution No.**

विषय : राजीव गांधी झोपडपट्टी सुधार व निवारा प्रकल्प, नागरी नूतनीकरण योजना -

इमारत क. २३ आय ते २३ एम, धाकू प्रभूवाडी, केशवराव बोरकर मार्ग, माझगाव 'ई' विभाग या इमारतीच्या पुनर्बांधणीच्या कामाच्या निविदा मंजूरीबाबत.

ठराव :

**Item No.** **11** **Resolution No.** **5057**

विषय : म्हाडा कायदा १९७६ अन्वये संपादित जमिनीच्या रकमेस सहमती मिळणेबाबत. अधिकार प्रदान करणेबाबत.

ठराव : १) एकमताने निर्णय घेतला की, बाब टिप्पणीमधील परिच्छेद ४ मध्ये विशद केल्याप्रमाणे औरंगाबाद मंडळांतर्गत औरंगाबाद शहरात सी. टी. सर्व्हे क्र. २०७२१ या संपादित केलेल्या जमिनीस वाटाघाटीने निश्चित केलेला रु. ५९/- प्रति चौ. फू. हा दर शासनाने मान्य केलेला आहे. सदरहू शासन मान्यताप्राप्त दराने जमीन मालकांना विना व्याज (विदाऊट इन्टरेस्ट) रक्कम देण्यासाठी मंडळास परवानगी देण्यात येत आहे. स्थायीकरणाची वाट न पाहता कार्यवाही करावी.
२) महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण कायदा १९७६ कलम ४१ अन्वये नगरपालिका क्षेत्रात आणि नगरपालिका क्षेत्राबाहेर (ग्रामीण भागात) संपादित करण्यात येणाऱ्या जमिनीची रक्कम वाटाघाटीने ठरविल्यानंतर त्यास कलम ४४ (२) आणि कलम ५० (२) अन्वये सहमती देण्याचे व त्यानुसार शासनाकडे मान्यतेसाठी प्रस्ताव पाठविण्याचे अधिकार उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी/प्राधिकरण यांना प्रदान करण्यात येत आहेत. स्थायीकरणाची वाट न पहाता यापुढे कार्यवाही करावी.

**Item No.** **12** **Resolution No.** **5058**

विषय : महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातर्फे बुटीबोरी, जिल्हा नागपूर येथे प्रस्तावित केलेल्या औद्योगिक वसाहतीमध्ये कर्मचारी/कामगारांसाठी वसाहत निर्माण करण्याकरिता जमीन खरेदी करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाने प्रस्तावित केल्याप्रमाणे, बुटीबोरी, नागपूर येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळातर्फे संपादित केलेल्या जमिनीपैकी निवासी आरक्षित असलेल्या पट्ट्यातून २८ हेक्टर जमीन कर्मचारी/कामगार यांचेसाठी गृहनिर्माण प्रकल्प राबविण्यासाठी खालील नमूद केलेल्या अटींवर दर चौ. मी. ८०/- रुपये या दराने खरेदी करण्यास तत्वतः मान्यता देण्यात येत आहे.

१) जमीन खरेदी केल्यानंतर मंडळाने मालकी अभिलेखात नाव नोंदवून घ्यावे.
२) जमीन तांत्रिकदृष्ट्या गृहनिर्माण प्रकल्प राबविण्यासाठी सुस्थितीत असावी.
३) जमीन प्रदूषणमुक्त असावी.
४) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या विकास आराखड्यातील तरतुदीप्रमाणे कर्मचारी/कामगार यांचेसाठी गृहनिर्माण प्रकल्प राबविणे परवडण्यासारखे असावे.
५) जमिनीचा ताबा घेताना सदरहू जमीन अतिक्रमणमुक्त असावी.
६) महाराष्ट्र औद्योगिक व विकास महामंडळ नेहमी बहुमजली इमारतींचा आग्रह धरते. परंतु लोकांचा त्यास प्रतिसाद नसतो. म्हणून विक्री योग्य नकाशे, जे म्हाडा मंजूर करते त्यास महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने तात्काळ 'ना हरकत प्रमाणपत्र' द्यावे ह्या अटीवर जमीन घ्यावी.
७) शक्यतो दोन टप्प्यात जमीन विकत घेऊन बांधकाम हाती घ्यावे.

स्थायीकरणाची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी.

---

**Item No.** **13** **Resolution No.**

विषय : प्राधिकरण कर्मचारी कल्याणकारी योजनेअंतर्गत अधिकारी/कर्मचारी यांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेतील सभासदांच्या पात्रतेबाबत.

ठराव :

**Item No. 14 Resolution No. 5059**

विषय : म्हाडा जमिनीच्या किंमतीविषयक धोरणात सुधारणा करण्याबाबत.

संदर्भ :

१) प्राधिकरणाच्या दिनांक १६-११-१९९२ चा ठराव क्र. ३०९४.

२) प्राधिकरणाच्या दिनांक ३०-७-१९९३ चा ठराव क्र. ४०९४.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

१) रहिवाशी गटाचे भूखंड :

प्राधिकरणाच्या दिनांक १६.११.१९९२ च्या ठराव क्र. ३०९४ मधील परिशिष्ट १ (ए) अत्यल्प उत्पन्न गट, १ (बी) अल्प उत्पन्न गट व १ (सी) मध्यम उत्पन्न गट यांच्या किंमती काढण्याची पद्धत दिलेली आहे. (स्तंभ क्र. ६ अधिक ७ अधिक ८) त्यानुसार त्या भूखंडाची किंमत प्रथम काढावी व हुडकोकडून वेळोवेळी ठरविल्या जाणाऱ्या कमाल मर्यादेच्या धोरणाप्रमाणे भूखंडाच्या किंमतीची कमाल मर्यादा काढावी. हुडकोचे धोरण पूर्ण बांधलेल्या गाळ्यांच्या किंमतीची कमाल मर्यादा (सिलींग लिमिट) दर्शविणारे आहे. त्यामध्ये साधारणत: ३० टक्के ही भूखंडाची किंमत समजण्यात येते. त्याप्रमाणे या भूखंडाची कमाल मर्यादा किंमत काढण्यात यावी. या किंमतीपेक्षा प्राधिकरणाच्या उपनिर्दिष्ट धोरणाप्रमाणे काढलेली किंमत जास्त असेल तर ती हुडको पद्धतीने कमाल मर्यादेपर्यंत ठेवावी.

अशा पद्धतीने किंमतीतील फरकाची रक्कम (प्राधिकरणाच्या धोरणाप्रमाणे कमाल मर्यादेप्रमाणे बरोबर फरक) ही योजनेमधील उच्च उत्पन्न गट/अनिवासी स्वरुपातील भूखंड/तत्सम उपयोगासाठी असलेले भूखंड यांच्या किंमती मध्ये समायोजित करावी, जेणेकरून प्राधिकरणाचे आर्थिक नुकसान होणार नाही.

तसेच उच्च उत्पन्न गटातील निविदा न मागवता थेट वाटप करायचे झाल्यास, उदाहरण शासनाने रेग्युलेशन १६ (२) प्रमाणे वाटप केल्यास प्राधिकरण ठराव क्र. ४०९४, दि. ३०.७.९३ प्रमाणे आकारण्यात येणारी किंमत बाजार भावापेक्षा जास्त असू नये याची दक्षता घ्यावी.

(२.अ) सार्वजनिक रुग्णालयाचे भूखंड -

महाराष्ट्रातील मुंबई व्यतिरिक्त इतर ठिकाणच्या भूखंडाबाबत -
(आऊट साईड ऑफ बॉम्बे)

भूखंडाच्या किंमतीविषयक धोरणात परिशिष्ट-५ मध्ये ४(अ) व ४(सी) या सदराखाली दर्शविलेल्या सार्वजनिक रुग्णालय हा (हेल्थसाठी) भूखंडांना जी किंमत आकारावयाची आहे त्याऐवजी ती अनुक्रमांक ३ (सी) ने दर्शविलेल्या शैक्षणिक कारणाच्या भूखंडांना लावावयाच्या किंमतीप्रमाणे म्हणजे (स्तंभ क्रमांक ६ अधिक ७ अधिक ८) जमीन व जमिनीच्या विकासावरील प्रत्यक्ष झालेला खर्च व त्यावर १२.५ प्रतिशत प्रतिवर्ष व्याज आकारून व त्यामध्ये एक टक्का दराने वार्षिक भाडेपट्ट्याचे ८ टक्के दराने भांडवलीकरण रकमेचा समावेश करून भूखंडाचे अधिमूल्य काढावे व नंतर नाममात्र रुपया एक वार्षिक भाडेपट्टा आकारावा.

(२.ब) मुंबई विभागातील भूखंडाकरिता (बॉम्बे)

मूखंडाच्या किंमत विषयक धोरणातील परिशिष्टामधील परिच्छेद ४-अे व ४-सी या सदराखाली दाखविलेल्या मूखंडाची किंमत ठराव क्र. ३०९४, दिनांक १६.११.१९९२ प्रमाणेच वाचण्यात यावी व त्याप्रमाणे त्याची अंमलबजावणी करावी अथवा व्यक्तिगत प्रकरण गुणवत्तेनुसार तपासून प्राधिकरणास सादर करावे.

या उपयोगासाठी असलेल्या मूखंडाचा वापर मुंबई महानगरपालिकेला देताना टी.डी.आर./एफ.एस.आय.ची तपासणी करून टी.डी.आर. किंवा एफ.एस.आय. प्राधिकरणाला उपलब्ध होतो काय याची तपासणी करण्यात यावी व अशा मूखंडांचे वाटप विनामूल्य करावे.

**Item No.** **15** **Resolution No.** **5060**

विषय : गांधीनगर, वांद्रे (पूर्व) येथील निवासी/व्यापारी उपयोगासाठीच मूखंड बँक ऑफ महाराष्ट्राला वितरण करताना आलेले व्याज रद्द करणे विषयीची विनंती.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

गांधीनगर, वांद्रे (पूर्व) येथील निवासी/व्यापारी उपयोगासाठीचा मूखंड बँक ऑफ महाराष्ट्राला वितरण केलेला आहे. सदर मूखंडासाठी बँकेने उच्चतम दर रुपये २३,२००/- प्रति चौ. मी. अधिमूल्य देण्याचे निविदेत नमूद केले असून त्या दराने अधिमूल्याची होणारी रक्कम रु. ३,७०,८५,४३२/- (रु. तीन कोटी सत्तर लाख पंच्याऐंशी हजार चारशे बत्तीस) मंडळाकडे बँकेने प्रथम वितरण पत्राजे स्वीकृतीनंतर ५० टक्के रक्कम मरली असून उर्वरित रक्कम भरण्यास कोर्टातील दाव्यामुळे विलंब झाला असल्याने बँकेने सदर रक्कम दिनांक १३/९/१९९३ रोजी मरली आहे. या विलंब झालेल्या कालावधीसाठी मुंबई मंडळाने आकारलेले व्याज रु. ६४१,९२०/- ही रक्कम भरण्यास बँकेला कळविण्यात आलेले होते. सदर व्याजाची रक्कम भरण्यास सूट मिळावी, असे दिनांक २०/१२/१९९३ च्या पत्राद्वारे बँकेने मंडळास विनंती केली होती. म्हाडाला सदर मूखंडासाठी अधिमूल्याच्या प्रचंड दराने रक्कम मिळालेली असून सदर रक्कम सुमारे (तीन कोटी) भरण्यासाठी थोडा जास्तीचा अवधी देणे उचित ठरेल. वरील सर्व बाबींचा विचार करता प्राधिकरण एकमताने निर्णय घेत आहे की, व्याजाची रक्कम भरण्यास बँक ऑफ महाराष्ट्राला सूट देण्यात येत आहे.

**Item No. 16 Resolution No. 5061**

विषय : आकांक्षा मजूर सहकारी संस्था मजुरांच्या मुलांसाठी वेल्फेअर सेंटर, पाळणाघर, अंगणवाडी, इ. उपक्रमांसाठी नेहरूनगर, कुर्ला इमारत क. १३३ च्या बाजूस असलेली जागा मिळणेविषयी विनंती.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

नेहरूनगर, कुर्ला येथील इमारत क. १३३ च्या बाजूस सुमारे २६० चौ. मी. क्षेत्रफळाचा भूखंड आकांक्षा मजूर सहकारी संस्थेस प्राधिकरणाच्या अटी व शर्तीनुसार तसेच किंमती विषयी धोरणानुसार वितरण करण्यासाठी प्राधिकरणाकडे शिफारस करण्यास खालील अटींवर मंजूरी देण्यात येत आहे.

१. भूखंडावरील बांधकाम पूर्ण करण्यास मुंबई महानगरपालिकेकडून संजूरी घेण्याची जबाबदारी आकांक्षा मजूर सहकारी संस्थेची राहील.
२. दि. १६.११.१९९२ रोजी प्राधिकरणाने नक्की केलेल्या भूखंडाच्या किंमतीविषयक धोरणानुसार सदरहू भूखंडाची अधिमूल्य रक्कम, वार्षिक भाडेपट्टा रक्कम विधी शुल्क आकारले जाईल व ते एकरकमी पद्धतीने वसूल केल्यानंतरच भूखंडाचा ताबा संस्थेस देण्यात येईल.
३. सदर भूखंड ज्या कारणासाठी भूखंड वितरण करण्यात येणार आहे त्याशिवाय इतर कोणत्याही कारणासाठी वापरू नये.
४. मुंबई मंडळाच्या लेखी परवानगीशिवाय वरील भूखंडाचे हस्तांतरण किंवा भाड्याने देणे यासारखे व्यवहार करता येणार नाहीत. असे व्यवहार झाल्यास वरील भूखंडाचा ताबा अर्जदार संस्थेकडून परत घेण्यात येईल व त्यासाठी अर्जदार संस्थेस कोणतीही नुकसान भरपाई देण्यात येणार नाही.
५. सदर संस्थेने मुंबई सार्वजनिक न्याय कायदा १९५०/सोसायटीज रजिस्ट्रेशन ॲक्ट १८६० खाली नोंदणी करून घेणे आवश्यक राहील.

---

**Item No. 17 Resolution No. 5062**

विषय : प्रादेशिक मंडळातील कर्मचाऱ्यांना/अधिकाऱ्यांच्या क्रीडा वृद्धीसाठी अनुदान मंजूर करणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, प्रादेशिक मंडळातील अधिकारी कर्मचारी यांना क्रीडा वृद्धीसाठी मुंबईतील सर्व कार्यालयासाठी रु. २०,०००/- आणि बाहेरील प्रादेशिक मंडळासाठी प्रत्येकी रु. ५,०००/- याप्रमाणे क्रीडा समितीला अनुदान मंजूर करण्याचे अधिकार उपाध्यक्ष तथा मु. का. अ./प्रा. यांना प्रदान करण्यात येत आहेत.

**Item No.** 18 **Resolution No.** 5063

विषय : प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे अंतरिम वाढ मंजूर करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे शासनाच्या १९८८ च्या अधिसूचनेन्वये शासनाचे वित्त विभागाच्या क. वेपुर-१२९३/प्र.क.५०/सेवा-१०, दिनांक ११ जानेवारी, १९९४ चा शासन निर्णयाद्वारे दिनांक १६ सप्टेंबर, १९९३ पासून दरमहा रु. १००/- इतकी अंतरिम वाढ प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना शासनाच्या आदेशातील अटी व शर्तीच्या अधीन राहून शासनाची मान्यता मिळाल्यानंतर वाटपाची कार्यवाही करण्यात यावी.

---

**Item No.** 19 **Resolution No.** 5064

विषय : प्राधिकरणाच्या सेवेत असताना पदोन्नतीवरील नेमणूकीकरिता रुढ असलेली 'अन्वीक्षा कालावधी' पद्धत रद्द करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
प्राधिकरणाच्या दिनांक १५/७/१९८१ च्या ठराव क. ४१४ व दिनांक ३०/१२/१९८८ च्या ठराव क. १६०७ मध्ये वर्ग-१ आणि २ मधील अधिकाऱ्यांच्या व वर्ग ३ व ४ मधील कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीवरील नेमणूकीकरिता विहित केलेल्या २ वर्षांच्या/१ वर्षाच्या अन्वीक्षा कालावधीची अट या ठरावान्वये रद्द करण्यात येत आहे. तथापि, वर्ग-१ व वर्ग-२ मधील अधिकारी आणि वर्ग-३ व ४ मधील कर्मचाऱ्यांच्या सरळसेवा भरतीसाठी २ वर्षांची/१ वर्षाची परिविक्षा कालावधीची अट व त्यासंबंधीच्या इतर तरतुदी आहे तशाच कायम ठेऊन त्याची अंमलबजावणी यापुढेही चालू ठेवण्यात यावी. यापूर्वी वर्ग-१ व वर्ग-२ मधील अधिकाऱ्यांच्या वर्ग-३ व वर्ग-४ मधील कर्मचाऱ्यांच्या केलेल्या पदोन्नतीवरील नेमणूकीकरिता संबंधितांच्या आदेशात अंतर्भूत केलेली २ वर्षांची/१ वर्षाची अट वगळण्यात येत आहे.

**Item No.** 20 **Resolution No.** 5065

विषय : प्राधिकरणाच्या व प्रादेशिक मंडळांच्या कार्यालयातील क्षेत्रीय कामावरील अधिकारी/कर्मचाऱ्यांना मोटार सायकल/स्कूटर अग्रिम मंजूर करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाब टिप्पणीत दर्शविण्यात आल्याप्रमाणे सन १९९३-९४ च्या अंदाजपत्रकीय तरतुदीनुसार वाटप करण्यास आणि प्राधिकरणातील तसेच प्रादेशिक मंडळांच्या कार्यालयातील व संचालनालयाच्या कार्यालयातील क्षेत्रीय कर्मचाऱ्यांना/अधिकाऱ्यांना मोटार सायकल/स्कूटर अग्रिम मंजूर करण्याचे अधिकार बाब टिप्पणीत प्रस्तावित केल्याप्रमाणे खालील अधिकाऱ्यांना प्रदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे.
१) मुख्याधिकारी, प्रादेशिक मंडळे यांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील अधिकारी/कर्मचाऱ्यांपुरते अधिकार प्रदान करण्यात यावेत.
२) संचालक, राजीव गांधी प्रकल्प/जागतिक बँक प्रकल्प/प्रा. यांच्या त्यांच्या कार्यक्षेत्रातील अधिकारी/कर्मचाऱ्यांपुरते अधिकार प्रदान करण्यात यावेत.
३) सचिव/प्राधिकरण यांना प्राधिकरणातील कार्यालयात काम करणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांपुरते अधिकार प्रदान करण्यात यावेत.
ही सवलत फक्त क्षेत्रात काम करणाऱ्या आणि ५ वर्षे नियत आस्थापनेवर सतत सेवा पूर्ण झालेली आहे अशा अधिकारी/कर्मचारी यांनाच अनुज्ञेय राहील. परतफेडी बाबत ठराव क्र. ४००८, दिनांक २२.१२.१९९२ मध्ये नमूद केलेल्या शासकीय निर्णयानुसार कार्यवाही करावी.

**Item No.** 21 **Resolution No.** 5066

विषय : मा. श्री. टी. जी. देशमुख यांच्या उपचारासाठी प्राधिकरणाच्या वतीने खर्च करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
मा. अध्यक्ष/प्रा. हे कार्यालयीन कामानिमित्त पुणे येथे दौऱ्यावर असताना त्यांना अचानक हृदयविकाराचा झटका आल्याने पुणे येथे शासकीय रुग्णालयात त्यांच्यावर चालू असलेल्या उपचारासाठी वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती विशेष बाब म्हणून करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** 22 **Resolution No.** 5056

विषय : नागरी नूतनीकरण योजना

१८, २२, २६, ३० अंधार चाळ, अनंत गणपत पवार मार्ग, टप्पा - १, योजनेअंतर्गत इमारतींची पुनर्बांधणी इमारतीच्या बांधकामाबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
अंधार चाळ, टप्पा - १, मधील ३ इमारतींचे उर्वरित काम त्वरेने पूर्ण करण्याच्या दृष्टीने समितीने सुचविलेल्या शिफारसीप्रमाणे मंजूर करीत आहे. त्याप्रमाणे मे. गुप्ता आणि कंपनी १९९१-९२ च्या दरसूचीप्रमाणे (अनुज्ञेय वाढीसह) काम करण्यास मंजूरी प्रदान करण्यात येत आहे. कंत्राटदाराने वरील काम याच्यापुढे कोणत्याही अटी व मागणी न करता ६ महिन्यात पूर्ण करावे, व तसे अभिवचन त्यांचेकडून घेण्यात यावे. फरकाची रक्कम कामाची प्रगती पाहून संचालकाने योग्य हप्त्याने कंत्राटदारांना अदा करण्याची काळजी घ्यावी, स्थायीकरणाची वाट न पाहता कार्यवाही करावी.

**Item No.** 23 **Resolution No.**

विषय : शाळेसाठी भूखंड वितरणाबाबत यापूर्वी झालेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 24 **Resolution No.** 5067

विषय : विनिप्रा/सोलापूर - १

मजूर विकास नियोजन आराखड्यातील प्रस्तावित किरकोळ फेरबदलाबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
प्राधिकरणाच्या ठराव क्र. ३०५२ द्वारे सोलापूर-१ मधील आरक्षणे बदलण्याबाबत घेतलेल्या निर्णयावर म.प्रा.न.र. अधिनियमाच्या कलम ३७ (१) अंतर्गत प्राप्त झालेल्या नागरिकांच्या सूचना व हरकतींची सुनावणी करण्याचे अधिकार मुख्याधिकारी, पुणे मंडळ यांना प्रदान करण्यात येत आहेत. तसेच हा ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता याबाबत पुढील कार्यवाही करण्याचे अधिकार उपाध्यक्ष/प्रा. यांना देण्यास प्राधिकरण मंजूरी देत आहे.

**Item No.** 25 **Resolution No.** 5068

विषय : प्रकल्पाकडील अतिरिक्त निधी हुडको या वित्तीय संस्थेकडे गुंतवणूक करणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बँकेच्या सीओडी मधील गुंतवणूकीचे प्रचलित व्याज दर हे 'हुडको' कडील गुंतवणूकीपेक्षा कमी आहेत. अशी परिस्थिती वेळोवेळी उद्‌भवू शकते. या परिस्थितीत प्रकल्पाचे आर्थिक नुकसान होऊ नये म्हणून जेव्हा बँकेचे एचडीएफसीचे व्याजाचे दर 'हुडको'च्या व्याज दरापेक्षा कमी असतील तेव्हा मुद्दल रकमेची गुंतवणूक मर्यादा न ठेवता राजीव गांधी निवारा प्रकल्पाच्या निधीची हुडकोकडे गुंतवणूक करण्याचे अधिकार संचालक, राजीव गांधी निवारा प्रकल्प यांना प्रदान करण्यात येत आहेत.

**Item No.** 26 **Resolution No.** 5069

विषय : म्हाडा अधिनियम, १९७६, कलम ५२ अन्वये खाजगी जमीन खरेदी करणे.
मौजा कटोल, जिल्हा नागपूर येथील स. क्र. २०६/१, २०७/१ व २०८/१

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
मौजा कटोल, जिल्हा नागपूर स. क्र. २०६/१, २०७/१ व २०८/१ मधील श्री. दिनेश लीलाधर चाडक यांचे मालकीची १.९० हेक्टर जमीन प्रति चौ. फू. रु. ३.४४ या दराने (प्रति एकर रु. १,५०,०००/- या दराने) म्हाडा अधिनियम १९७६ च्या कलम ५२ अन्वये खरेदी करण्यास खालील अटींवर तत्वत: मान्यता देण्यात येत आहे.

१. प्रस्तावित जमीन पूर नियंत्रण रेषेत (फ्लड झोन) येत नाही, याची खात्री शासनाच्या संबंधित विभागाकडून करून घेणे.
२. सदरहू जमीन शेतीखाली असली तरी त्यात निवासी वापरासाठी योग्य ते फेरबदल करून घ्यावेत.
३. जमिनीस बाह्य सुविधांची सोय होईल, याची खात्री करावी.
४. जमिनीचे आजचे मालक श्री. चाडक यांचेकडे मालकी हक्क जमीन खरेदीने आला असल्यास जमिनीचे मूळ मालक आदिवासी नव्हते, याची खात्री करून घ्यावी.
५. सर्व प्रकारच्या नागरी सुविधा उपलब्ध करून दिल्यावर योजना परवडण्यासारखी असावी, याबाबत खात्री करावी.
६. जमीन ताब्यात घेताना त्यावर कोणतेही अतिक्रमण/बांधकाम नाही, याची खात्री करावी.
७. जमिनीबाबतचे कोणतेही प्रकरण न्यायप्रविष्ट नाही, याची खात्री करावी.

उपरोक्त १ ते ७ अटींची पूर्तता करून स्थायीकरणाची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** 27 **Resolution No.**

विषय : 'गृहनिर्माण महाप्रकल्प' दिनांक ३१/१/१९९४ पर्यंतचा प्रगती अहवाल.

ठराव :

**Item No. 28 Resolution No.**

विषय : सायन-कोळीवाडा, कनेक्टर रोड, कोकरी आगार, वडाळा येथे २.५० चटईक्षेत्र वापरून राबविण्यास यावयाची झोपडपट्टी स्थलांतर व पुनर्वसन योजना.

ठराव :

**Meeting No.** 131 **Meeting Date** 18-Apr-19

**Item No.** 1 **Resolution No.** 5070

विषय : मिठावाला चाळ, प्लॉट क्र. १००६, सयानी रोड, प्रभादेवी, जी.एल.विभाग येथील पुनर्बांधणी योजनेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
भूभाग क्र. १०० नगर रचना योजना क्र. ४, माहिम येथील मिठावाला चाळीच्या १४२१.०० चौ. मी. क्षेत्रफळाचा भूभाग राजीव गांधी प्रकल्पातर्फे नागरी नूतनीकरण योजनेअंतर्गत विकसित करण्यात यावा. ही योजना सध्याचे निकषाप्रमाणे राबविण्यात यावी. तथापि, सर्व भागधारकांकडून (उपकरप्राप्त तसेच उपकरप्राप्त नसलेल्या) १८० चौ. फू. चटईक्षेत्राचे गाळ्यासाठी प्रत्येकी रु. ४२,०००/- आकारण्यात यावे. ही रक्कम प्रत्येकी १४,०००/- रुपयांच्या ३ हप्त्यांत परंतु गाळ्याचा ताबा घेण्यापूर्वी वसूल करावी. त्याचप्रमाणे संबंधित संस्था/प्रवर्तकाबरोबर करार करण्यात यावा. या योजनेसाठी एच.डी.एफ.सी. या संस्थेकडून कर्जपुरवठा घेतल्यास एच.डी.एफ.सी. च्या धोरणाप्रमाणे किमान १० वर्षांच्या कालावधीमध्ये कर्जाची परतफेड करण्यात यावी. अन्यथा रा. गा. प्रकल्पाकडून दीर्घ मुदतीचे कर्ज देता येईल का हे तपासून पहावे.
सदर ठरावाच्या स्थायीकरणाची वाट न पाहता कार्यवाही करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

**Item No.** 2 **Resolution No.** 5071

विषय : धारावी, कल्याणवाडी येथील नेताजी गृहनिर्माण संस्थेच्या १९५ निवासी गाळ्यांचे व १० अनिवासी गाळ्यांचे उर्वरित बांधकाम करण्यासाठी निविदा.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
धारावी, कल्याणवाडी येथील नेताजी गृहनिर्माण संस्थेच्या १९५ निवासी व १० अनिवासी गाळ्यांच्या उर्वरित बांधकामासाठी मे. कॅनॉन इंजिनिअरींग कन्स्ट्रक्शन यांची (रु. ८७,२५,८६०.८०) बोली (अंदाजित रकमेच्या म्हणजे रु. ९४,७०,२२०/- च्या ७.८६ टक्के कमी) किंमतीची निविदा मंजूर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.
या बाब प्रकरणी कार्यवृत्ताचे स्थायीकरण होण्याची वाट न पाहता ठरावावर पुढील कार्यवाही करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

**Item No.** 3 **Resolution No.** 5072

विषय : मुंबई, ठाणे व पुणे येथील बैठ्या गाळ्यांच्या विक्री योजनेची अंमलबजावणी करण्याच्या संदर्भात मार्गदर्शक सूचना.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

प्राधिकरणाने दिनांक २१.१०.१९९२ च्या ठराव क्र. ३०७७ प्रमाणे इतर (सर्वसाधारण) या शीर्षकाखाली घेतलेल्या निर्णयात पुढीलप्रमाणे बदल करण्यास मान्यता देण्यात येत आहे. मूळ निर्णय असा आहे 'इ' व 'फ' मधील तरतुदी एकत्रित कराव्यात व विक्री किंमतीच्या दुप्पट अधिमूल्य अनिवासी वापरासाठी आकारावे. याऐवजी खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात यावी.

१) मुळातच अनिवासी उपयोगासाठी बांधलेले गाळे -

| | |
|---|---|
| अ) प्रारंभी अनिवासीसाठी असलेला गाळा अधिकृत लाभधारकाकडे असल्यास तसेच त्याचे हस्तांतरण कायदेशीर वारसाकडे झालेले असल्यास किंवा करावयाचे असल्यास | - निवासी विक्री किंमतीच्या तिप्पट. |
| ब) प्रारंभी अनिवासासाठी असलेला गाळा अधिकृत लाभधारकाने मंडळाची पूर्वपरवानगी न घेता अनधिकृतपणे हस्तांतरण झाले असल्यास | - निवासी विक्री किंमतीच्या पाचपट. |

२) मुळातच निवासी उपयोगासाठी बांधलेले गाळे.

| | |
|---|---|
| क) प्रारंभी निवासी वापरासाठी असलेला गाळा अधिकृत लाभधारकाने अनिवासीमध्ये रुपांतरित केलेला असल्यास | - निवासी विक्री किंमतीच्या तिप्पट. |
| ड) प्रारंभी निवासी वापरासाठी असलेला गाळा अनधिकृत लाभधारकाने अनिवासीमध्ये रुपांतरित केला असल्यास | - निवासी विक्री किंमतीच्या पाचपट. |

या प्रस्तावाप्रमाणे विक्री करीत असताना पुढील बाबी विचारात घ्याव्या.

१) गाळेधारकाने मूळ बांधकामात केलेला बदल पक्क्या (आर.सी.सी.) स्वरुपाचा असू नये.

२) अतिरिक्त बांधकाम अपर्टनंट लँडच्या बाहेर असल्यास ते अपर्टनंट लँड पर्यंत सीमित करावे.

३) अनुज्ञेय (पर्मिसीबल) असलेल्या चटईक्षेत्रापेक्षा जास्त चटईक्षेत्र व्यापले असल्यास ते ही सीमित करावे.

४) अशा अनिवासी वापरास शेजारील गाळेधारकांचे, वसाहतीमधील अन्य गाळेधारकांचे किंवा भाडेकरू संघटनांचे आक्षेप असू नयेत.

५) अशा अनिवासी वापरास महानगरपालिकेकडून (शॉप ॲन्ड एस्टॅब्लिशमेंट

ॲक्ट) विशिष्ट परवाना मिळालेला असावा.

६) निवासी गाळ्यांचा अनिवासी (व्यापारी) वापर निवासी गाळ्याच्या एकूण संख्येच्या १० टक्केपर्यंत किंवा सहकार कायद्याच्या तरतुदीमधील मर्यादेपेक्षा जास्त असू नये.

**Item No.** 4 **Resolution No.**

विषय : श्रीमती गुलाबी शेट्टी यांना डी. एन. नगर, अंधेरी, सर्व्हे क्र. १०६-अ, येथे दिलेल्या पर्यायी जागेबाबत.

ठराव :

**Item No.** 5 **Resolution No.** 5073

विषय : पंचवटी, नाशिक येथील १० दुकानांच्या गाळ्यांना प्रतिसाद नसल्याने ते भाडे खरेदी तत्वावर वाटप करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
नाशिक मंडळाने बांधलेल्या दिंडोरी रोड, पंचवटी, नाशिक येथील १० दुकानांच्या गाळ्यांना एकरकमी खरेदीस फारसा प्रतिसाद नसल्यामुळे ते नियम १६ नुसार निविदा मागवून स्वीकारण्यात येणाऱ्या अधिकतम किंमतीची/दराची निविदा रकमेपैकी रु. ७०,०००/- फक्त या रकमेसाठी भाडे खरेदी तत्वावर वाटप करण्यास खालील अटींच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे.

१) प्रत्येक दुकानाचा भाडे खरेदीचा हप्ता समान असावा म्हणून रु. ७०,००० च्या वरील जी रक्कम असेल ती आय.डी.पी. म्हणून वसूल करावी. (उदा. अधिकतम निविदा किंमत वजा रु. ७०,०००/ - आय.डी.पी.)

२) विक्री किंमतीपोटी शिल्लक राहिलेले रु. ७०,०००/- (१५ टक्के दराने) दरमहा रु. १,२४०/- प्रमाणे १० वर्षांच्या समान हप्त्यांत वसूल करावे.

३) या रकमेवर निवासी गाळ्यांच्या रकमेला लावण्यात येणाऱ्या १३.५० टक्के या दराऐवजी १५ टक्के दराने व्याज आकारावे.

४) निवासी व व्यापारी स्वरुपाच्या गाळ्याच्या भाडे खरेदीचा कालावधी एकाच वेळी संपावा म्हणून हप्ते फेडीचा कालावधी दिनांक १/४/१९९४ पासून दिनांक ३१/३/२००४ असा १० वर्षांचा असावा.

या ठरावाचे स्थायीकरण होण्यापूर्वी त्याबाबतची कार्यवाही तात्काळ करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** 6 **Resolution No.**

विषय : गृहनिर्माण महाप्रकल्पाचा दिनांक २८/२/१९९४ पर्यंतचा प्रगती अहवाल.

ठराव :

**Item No.** 7 **Resolution No.**

विषय : मूकंपग्रस्त पुनर्वसन प्रकल्पाबाबत अद्यावत माहिती तसेच पेठसंघवी येथील पूरग्रस्त पुनर्वसन प्रकल्प प्राधिकरणामार्फत राबविण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 8 **Resolution No.**

विषय : प्राधिकरणात कार्यरत असलेल्या वर्ग (१) आणि वर्ग (२) मध्ये पदोन्नतीनंतर अधिकाऱ्यांच्या होणाऱ्या बदल्यांची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 9 **Resolution No.** 5074

विषय : बँकॉक, थायलंड येथे १/२ जून, १९९४ रोजी इमारती व बांधकामाचे निरीक्षण मूल्यनिर्णेता, दुरूस्ती व परीरक्षा या विषयावर होणाऱ्या आंतरराष्ट्रीय परिषदेस श्री. पं. दो. वाणी, मुख्यअभियंता (२)/प्रा. व श्री डी. आर. हडदरे, उपमुख्य अभियंता (दक्षिण), मुं. इ. दु. व पु. मं. यांना उपस्थित रहाण्यास तसेच यासाठी होणाऱ्या खर्चास मंजूरी देणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बँकॉक, थायलंड येथे दिनांक १-२ जून, १९९४ रोजी इमारती व बांधकामाचे निरीक्षण, मूल्यनिर्णेता, दुरूस्ती व परीरक्षा या विषयावर होणाऱ्या आंतरराष्ट्रीय परिषदेस श्री. पं. दो. वाणी, मुख्य अभियंता/प्रा. (२२)/मुंबई व श्री. डी. आर. हडदरे, उपमुख्य अभियंता (दक्षिण), मुं. इ. दु. व पु. मंडळ यांना उपस्थित रहाण्यास मान्यता देण्यात येते. तसेच प्रत्येकी ६०० सिंगापूर डॉलर्स या व्यतिरिक्त प्रवास व रहाण्याचा खर्च मिळून प्रत्येकी अंदाजे रु. २५,०००/- इतक्या खर्चास मान्यता देण्यात येत आहे.
स्थायीकरणाची वाट न पाहता कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** **10** **Resolution No.** **5075**

विषय : मराठी रंगभूमी कलाकार, लोककलाकार व संबंधित घटकवर्ग यांचेसाठी विशेष गृहनिर्माण योजना राबविण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाने राबविलेल्या महागृहनिर्माण प्रकल्पामधील कलाकारांसाठी राखीव असलेले परंतु पहिल्या जाहिरातील वाटप न झालेले १२२ गाळे नियमातील तरतुदीनुसार सर्वसामान्य जनतेस वाटप न करता त्यांचे वाटप मराठी रंगभूमी कलाकार, लोककलाकार व त्यांचेशी संबंधित घटक व जे वर्ग गेल्या १५ वर्षांपासून रंगभूमी कलाकार व लोककलाकार व संबंधित घटक वर्ग असल्याबाबत संचालक, सांस्कृतिक कार्य, महाराष्ट्र शासन ज्यांच्याकडून दाखला आणतील व प्रचलित असलेल्या अटी व शर्ती यांची पूर्तता करतील, अशांसाठी गाळे वाटप विनियम १३ (२) अनुसार योजना तयार करून करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच या योजनेस विनियमातील तरतुदीनुसार त्यासाठी प्रथम शासनाची रीतसर मान्यता घ्यावी.
बैठकीचे कार्यवृत्त स्थायी होण्याची वाट न पाहता शासनाच्या मान्यतेसाठी प्रस्ताव पाठविण्यात यावा.

**Item No.** **11** **Resolution No.** **5076**

विषय : मुंबई बेटावरील पुनर्रचित इमारतीतील गाळ्यामध्ये अनधिकृतपणे रहाणाऱ्या रहिवाशांना नियमित करण्याबाबत म्हाडा विनियम १९८१ मध्ये करण्यात आलेल्या दुरुस्तीबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
पुनर्रचित इमारतीमधील निवासी गाळ्यांचे हस्तांतरण अनधिकृत व्यक्तींच्या नावे पुन्हा चालू ठेवण्यासाठी एकमताने ठराव संमत केला, त्यानुसार सदर योजनेचा पुन्हा दि. १/५/१९९४ पासून दिनांक ३१/७/१९९४ पर्यंत चालू ठेवावी व गाळे नियमित करण्यासाठी खाली दर्शविल्याप्रमाणे दंडाची रक्कम पूर्वीच्या दंडापेक्षा ५ टक्के वाढीव दर आकारून घेण्यात यावी.

निवासी गाळे

| अ. क्र. | क्षेत्रफळ | दंडाची रक्कम रुपये |
|---|---|---|
| १. | १८० चौ. फू. किंवा त्यापेक्षा कमी क्षेत्रफळ | १५,७५०/- |
| २. | १८१ चौ. फू. किंवा ते ३०० चौ. फू. क्षेत्रफळापर्यंत | २१,०००/- |
| ३. | ३०१ चौ. फू. क्षेत्रफळापेक्षा जास्त | २६,५००/- |

निवासी गाळेधारक ज्याचा वापर आज अनिवासी कारणासाठी करीत आहेत, ते महापालिकेच्या नियमाच्या अधीन राहून असेच गाळे नियमित करण्यात यावेत व त्यांना खालीलप्रमाणे पूर्वीच्या दंडात्मक रकमेच्या दुप्पट रक्कम घेऊन नियमित करण्याचा प्रस्ताव आहे. याप्रमाणे निवासी गाळे जर अनिवासी कारणासाठी वापरात येत असतील तर (महानगरपालिका नियमाच्या अधीन राहून व जे गाळे मुळातच अनिवासी आहेत त्यांचेसाठी गाळे अधिकृत करण्यासाठी खालीलप्रमाणे दर आकारण्याचा प्रस्ताव आहे.

अनिवासी गाळे

| अ. क्र. | क्षेत्रफळ | दंडाची रक्कम रुपये |
|---|---|---|
| १. | १८० चौ. फू. किंवा त्यापेक्षा कमी क्षेत्रफळाचे गाळे | ३०,०००/- |
| २. | १८१ चौ. फू. किंवा ते ३०० चौ. फू. क्षेत्रफळाचे गाळे | ४०,०००/- |
| ३. | ३०१ चौ. फू. पेक्षा जास्त क्षेत्रफळाचे गाळे | ५०,०००/- |

मृत रहिवाशांच्या कायदेशीर वारसांच्या संदर्भात (ब्लड रिलेशन) रु. १,०००/- इतकी हस्तांतरण फी घेऊन गाळे नियमित करण्यात येत आहेत व अनिवासी गाळ्यांकरिता ही प्रशासकीय फी रु. २,०००/- आकारण्यात यावी.
बैठकीच्या विषयसूचीवरील विषय संपल्यानंतर सर्वसाधारणपणे चर्चा करताना श्री. विरेंद्र बक्षी, सदस्य/प्रा., यांनी प्रतिपादन केले की, त्यांनी पत्र देऊन तीन विषय

प्राधिकरणाच्या विचारार्थ ठेवण्याबाबत विनंती केली होती. सदरहू पत्रामध्ये नमूद केलेले विषय प्राधिकरणाच्या आगामी बैठकीत विचारार्थ ठेवण्यात यावे, असे त्यांनी सुचविले.

महाराष्ट्र हाऊसिंग बोर्ड एम्प्लॉईज को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि. यांनी दिनांक १५.४.१९९४ च्या पत्रान्वये उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी/प्रा. यांना पत्र देऊन पतपेढीला प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांचे आर्थिक प्रश्न सोडविण्यासाठी कर्ज रुपाने २०.०० लाख रुपयाची रक्कम उपलब्ध करून देण्याबाबत विनंती केलेली होती. सदर पत्रावर अध्यक्ष/प्रा. यांनी निदेश दिले होते की, सदर विषयाबाबत प्राधिकरणाच्या दिनांक १८.४.१९९४ रोजी होणाऱ्या बैठकीत विचार विनिमय करण्यात यावा.

या संदर्भात संबंधित कार्यालयामार्फत सविस्तर बाब टिप्पणी प्राधिकरणाच्या विचारार्थ सादर करणे आवश्यक असल्यामुळे हा विषय आगामी बैठकीत विचारार्थ ठेवण्यात यावा, असे सांगण्यात आले.

कामकाज संपल्यानंतर उपस्थितांनी मा. अध्यक्षांचे आभार मानून बैठक संपल्याचे जाहिर करण्यात आले.

**Meeting No.** 132 **Meeting Date** 14-Jun-19

**Item No.** 1 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दि. १८-४-१९९४ रोजी झालेल्या १३१ व्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे.

ठराव :

---

**Item No.** 2 **Resolution No.** 5077

विषय : प्राधिकरणात कार्यरत असलेल्या वर्ग-१ व वर्ग-२ मध्ये पदोन्नतीवर अधिकाऱ्यांच्या होणाऱ्या बदल्यांची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, प्राधिकरणाचे परिपत्रक क्र. एसएच/एपीटी-१९९१/२४९६/प्र-७, दिनांक ६ मे १९९२ मध्ये अंशतः सुधारणा करण्यात येऊन पदोन्नतीवर सेवा वर्ग-१ व वर्ग-२ मधील जे अधिकारी व कर्मचारी रूजू होणार नाहीत त्यांची नावे पदोन्नतीच्या निवड सूचीमधून किमान तीन वर्षांकरिता कमी करण्यात यावीत. त्याचप्रमाणे अशा अधिकारी कर्मचाऱ्यांना पदोन्नतीसाठी किमान तीन वर्षे अपात्र ठरविण्यात यावे. प्राधिकरणाच्या वर्ग-१ आणि वर्ग-२ मधील अधिकाऱ्यांच्या दर तीन वर्षांनी विविध मंडळात नियमितपणे बदल्या करण्यात याव्यात. या आदेशाची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी. रीतसर मार्गाशिवाय बदली रद्द करून घेण्याचा प्रस्ताव केल्यास अशा अधिकारी/कर्मचाऱ्यांविरुद्ध शिस्तभंगाची कार्यवाही करावी. कार्यवृत्ताच्या स्थायीकरणाची वाट न पाहता सदर ठरावाची त्वरित अंमलबजावणी करण्यात यावी.

---

**Item No.** 3 **Resolution No.** 5078

विषय : मा. श्री. देवराज बोथरा, सभापती/अमरावती मंडळ यांच्या वैद्यकीय उपचारासाठी झालेल्या खर्चाची प्रतिपूर्ती विशेष बाब म्हणून मंजूर करणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, माननीय श्री. देवराज बोथरा, सभापती/अमरावती मंडळ हे कार्यालयीन कामानिमित्त दौऱ्यावर असताना अचानकपणे हृदयविकाराने आजारी झाल्यामुळे त्यांचेवर अमरावती येथील महावीर या खाजगी रुग्णालयात वैद्यकीय उपचारासाठी झालेल्या वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती विशेष बाब म्हणून मंजूर करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तथापि, प्राधिकरण अधिनियम १९७६ कलम - ८ (१) अन्वये शासनाकडे मंजूरीसाठी प्रस्ताव पाठविण्यात यावा.

---

**Item No.** 4 **Resolution No.**

विषय : प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना दिनांक १ जानेवारी १९९४ पासून सुधारित दराने महागाई भत्ता देण्याबाबत.

ठराव :

---

| **Item No.** | **5** | **Resolution No.** | **5079** |
|---|---|---|---|

विषय : खेरनगर, बांद्रा येथील मुंबई मंडळाच्या वसाहतीतील जनता एज्युकेशन सोसायटीस शाळेसाठी दिलेल्या इमारत क्र. ८ मधील ११ गाळ्यांतील अनधिकृत (शिक्षक) गाळेधारकांना नियमित करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाने दिनांक २४/११/९३ च्या ठराव क्रमांक १५३/१९३३ अन्वये घेतलेल्या निर्णयानुसार पुढील कार्यवाही करण्याचे संपूर्ण अधिकार उपाध्यक्ष/प्राधिकरण यांना प्रदान करण्यात येत आहेत.

| **Item No.** | **6** | **Resolution No.** | **5080** |
|---|---|---|---|

विषय : पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या अखत्यारीतील इचलकरंजी येथील सोशल वेल्फेअर सेंटरसाठी आरक्षित भूखंडाचे वितरणाबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या अखत्यारीतील इचलकरंजी येथील सर्व्हे क्रमांक ६०७ (भाग), ६०८ (भाग), ६१२ (भाग) भू-अभिन्यासातील 'सोशल वेल्फेअर सेंटर'साठी आरक्षित असलेला सुमारे ११४०.५० चौरस मीटर क्षेत्रफळाच्या भूखंडाचे वाटप म्हाडा (जमिनीचे वाटप) विनियम क्र. ५ व विनियम क्र. ३ मध्ये नमूद केलेल्या तरतुदीनुसार प्राप्त झालेल्या अर्जाची सोडत (लॉटरी) काढून खालील नमूद केलेल्या अटींच्या अधीन राहून वाटप करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१) भाडे पट्ट्याचा कालावधी प्रथम ३० वर्षांसाठी व त्यानंतर त्यावेळी लागू होणाऱ्या धोरणानुसार नूतनीकरण.

२) भूखंडाच्या अधिमूल्याची किंमत व वार्षिक भाडेपट्टा प्राधिकरणाच्या दि. १६.११.९२ च्या ठराव क्र. ३०९४ च्या जमिनीच्या किंमतीविषयक धोरणानुसार आकारावा.

३) भूखंडाचे संपूर्ण अधिमूल्य/किंमत मंडळास प्राप्त झाल्यानंतर व करारनामा झाल्यानंतरच भूखंडाचा ताबा देण्यात यावा.

४) भूखंडाची अधिमूल्य/किंमत भरण्यास ठराविक कालावधीपेक्षा जास्त विलंब संस्थेकडून झाल्यास १६ टक्के प्रतिशत दराने व्याज आकारावे.

५) भूखंडाचा वापर सामाजिक कल्याण उपयोगाबरोबर प्राधान्याने वसाहतीतील रहिवाशांसाठी, समाजमंदिर, बालवाडी, व्यायामशाळा इत्यादी तत्सम सुविधांसाठीच करावयाचा आहे.

६) या व्यतिरिक्त भूखंड वाटपाच्या नेहमीच्या अटी-शर्तीच्या अधीन राहून सदरहू बांधकामासाठी संबंधित स्थानिक खात्यांकडून पूर्व परवानगी घेण्यात यावी.

७) सदरहू भूखंडाचे सोडत काढून वाटप करण्यात येत असल्याचे महाराष्ट्र कामगार कल्याण केंद्रास माहितीसाठी कळविण्यात यावे.

| **Item No.** | **7** | **Resolution No.** | |
|---|---|---|---|

विषय : केंद्र शासनाच्या आरोग्य सेवा योजना या उपक्रमात ओशिवरा येथील २८ गाळ्यांच्या वितरणाबाबत.

ठराव :

**Item No.** 8 **Resolution No.** 5081

विषय : प्राधिकरणाचे गाळे काळजीवाहू तत्वावर देण्यासाठी आकारावयाची फी ठरविण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, प्राधिकरणाच्या गाळ्यात केअर टेकर ठेवण्यासाठी घ्यावयाच्या फीच्या दराबाबत प्राधिकरणाने ५७० क्रमांकाच्या ठरावान्वये घेण्यात आलेला निर्णय रद्द करून त्याऐवजी संबंधिताकडून खाली दर्शविल्याप्रमाणे (फक्त एकदाच) फी घेण्यास प्राधिकरण मान्यता देत आहे. हे दर ठराव पारित करण्याच्या दिनांकापासून लागू राहतील, त्याप्रमाणे अंमलबजावणी व्हावी.

| कालावधी | प्रस्तावित दर | |
|---|---|---|
| व | ३५० चौ. फूटावरील त्याखालील बांधकाम क्षेत्रफळाचा गाळा फी दर | ३५० चौ. फू. बांधकाम क्षेत्रफळाचा गाळी फी दर |
| १. पहिली २ वर्षे | रु. २००/- | रु. २५०/- |
| २. २ वर्षांपेक्षा जास्त व पाच वर्षांपेक्षा कमी | रु. ३५०/- | रु. ५००/- |
| ३. पाच वर्षांपेक्षा जास्त | रु. ५००/- | रु. ७५०/- |

**Item No.** 9 **Resolution No.**

विषय : अंदाजपत्रकातील तरतूद नसलेल्या खर्चासाठी पुरवणी अंदाजपत्रकीय तरतुदीस उपाध्यक्ष, प्राधिकरण यांची मान्यता घेतलेले प्रकरण प्राधिकरणाच्या अवलोकनार्थ ठेवणेबाबत.

ठराव :

**Item No.** 10 **Resolution No.** 5082

विषय : महाराष्ट्र हौसिंग बोर्ड एम्प्लॉईज, को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड यांना ठेव देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, महाराष्ट्र हौसिंग बोर्ड एम्प्लॉईज को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड यांना रुपये १८ लाख ठेव ११ प्रतिशत वार्षिक दराने व्याज आकारून पहिल्या दोन हप्त्यांची वसूली रु. १,००,०००/- प्रतिमहा व उर्वरित रक्कम रु. १६.०० लाख आठ समान हप्त्यांत परतफेड करण्याच्या अटीवर प्रस्तावास कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे.

| **Item No.** | **11** | **Resolution No.** | **5083** |
|---|---|---|---|

विषय : मुंबई बेटातील जुन्या इमारतींची संरचनात्मक दुरुस्तीसाठी हुडको कर्ज.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

१) हुडको या वित्त संस्थेकडून मुंबई बेटातील जुन्या इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीसाठी घेण्यात आलेले कर्ज व्याजासह त्वरित परत करण्यात यावे.

२) हुडकोचे कर्ज परत करण्यात येत असल्याने शासनाने हमी शुल्क माफ करावे. अशी विनंती शासनास करण्यात यावी.

३) हुडकोकडून घेतलेले कर्ज मुदतीआधी परत करण्यात येत असल्याने कर्ज परतावा. मुद्दल रक्कम रु. ९९३.०० लाख अधिक ३/९४ पर्यंतचे व्याज अधिक कर अधिक हमीशुल्क रक्कम रु. ३०.२१ लाख अधिक निर्णयापर्यंत आलेले कर्ज व त्यावरील व्याज इत्यादी रक्कम त्वरित परत करावी व व्याज इ. पोटीच्या रकमेचा बोजा प्राधिकरणाने तात्पुरता सोसावा व शासनाकडून सदर रक्कम मागणी करावी.

| **Item No.** | **12** | **Resolution No.** | **5084** |
|---|---|---|---|

विषय : सर्व्हे क्र. १५० ते १५३ (भाग) पिंपरी वाघीरे, जिल्हा पुणे येथील जमिनीवर ६०० सदनिकांच्या कामाच्या विभाजनास मंजूरी देणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, सर्व्हे क्र. १५० ते १५३ (भाग) पिंपरी पुणे वाघीरे येथील जमिनीवर ६०० सदनिकांच्या योजनेअंतर्गत बांधण्यात येणाऱ्या सदनिका मागणी अभावी रिक्त राहू नयेत याकरिता -

१) मागणीच्या प्रमाणात वेगवेगळ्या गटांतर्गत योजना पुणे मंडळाने टप्याटप्याने हाती घेण्यात याव्या.

पहिल्या टप्प्यामध्ये खालीलप्रमाणे योजना घेण्यात याव्या.

ग्रुप-१ २४० गाळे (एच टाईप) (३५० पैकी) रु. १,७१,४२,७४०/-

ग्रुप-२ ८० गाळे (ए.बी.सी. टाईप) (२४० पैकी) रु. १,४२,५१,०६२/-

२) एकाच प्रकारच्या सदनिका टप्प्याटप्प्याने बांधल्याने विक्री किंमतीत वाढ होईल म्हणून पुणे मंडळाने प्रस्तावित केलेल्या पहिल्या टप्प्यातील कामाच्या मागणीच्या आधारे योजना कमीत कमी टप्प्यात व लवकरात लवकर राबविण्यात यावी असे सुचविण्यात येत आहे.

**Item No.** 13 **Resolution No.** 5085

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणांतर्गत काम करण्यासाठी मंडळाने कंत्राटदारांची नोंदणी करून मंडळाचा स्वतःचा मान्यताप्राप्त ठेकेदारांची यादी करणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
समिती क्र. १ मध्ये वर्ग-१ व वर्ग-२ च्या नोंदणी/नूतनीकरण/श्रेणीवाढ करणे इत्यादींकरिता उपाध्यक्ष/प्राधिकरण यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेली समिती कायम करण्यात यावी.
समिती क्र. २ मध्ये समितीचे अध्यक्ष म्हणून मुख्य अभियंता/प्रा. यांचे ऐवजी संबंधित मंडळाचे मुख्य अधिकारी समितीचे अध्यक्ष राहतील. या समितीच्या स्तरावर स्थापत्य शाखेतील वर्ग-१, २, ३ व ४ आणि विद्युत शाखेतील वर्ग 'अ' व 'ब' अंतर्गत कंत्राटदारांची नोंदणी/नूतनीकरण/श्रेणीवाढ इत्यादीबाबत ही समिती निर्णय घेईल. मात्र वर्ग-१ व २ च्या कंत्राटदाराबाबत समिती क्रमांक २ शिफारस करील व वर्ग-१ व २ च्या कंत्राटदारांच्या नोंदणी/नूतनीकरण/श्रेणीवाढ इत्यादीबाबत उपाध्यक्ष/प्रा. यांचे अध्यक्षतेखाली नेमलेली समिती अंतिम निर्णय घेईल.
समिती क्रमांक ३ मध्ये स्थापत्य वर्ग - ४(अ), ५, ६, ७ व विद्युत वर्ग - क, ड व ई अंतर्गत कंत्राटदारांच्या नोंदणी/नूतनीकरण/श्रेणीवाढ इत्यादी करिता संबंधित मुख्य अधिकारी/प्रा. यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेली समिती कायम करण्यात यावी.
समिती क्रमांक १, २ व ३ च्या स्तरावर करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती अनुक्रमे प्राधिकरणाच्या/संबंधित मंडळाच्या बैठकीत सादर करण्यात यावी.

**Item No.** 14 **Resolution No.** 5086

विषय : पूरग्रस्त पुनर्वसन प्रकल्पांतर्गत वरूड येथील कंत्राटदार मे. भगवानदार गंगवानी यांनी वापरलेल्या अतिरिक्त सिमेंटबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
पूरग्रस्त पुनर्वसन प्रकल्पातील वरूड येथील कंत्राटदार मे. भगवानदास गंगवानी यांनी वापरलेल्या अतिरिक्त सिमेंट बाबत त्यांनी केलेल्या विनंती अर्जानुसार व या बाबींवर प्राधिकरणाचे उपाध्यक्ष, मुख्य अभियंता तसेच मुख्य अधिकारी/नागपूर मंडळ यांनी सर्वंकष विचार करून घेतलेल्या निर्णयानुसार अतिरिक्त खर्च झालेले सिमेंटची किंमत दंडात्मक (पुरवठा दर अधिक १५ टक्के जास्त) दराने नागपूर मंडळाने वसूल करण्यास प्राधिकरणाची ही सभा सर्वानुमते मंजूरी देत आहे.
या ठरावाच्या स्थायीकरणाची वाट न पाहता मुख्य अधिकारी/नागपूर मंडळ यांना याबाबतची कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** 15 **Resolution No.**

विषय : भूकंपग्रस्त पुनर्वसन प्रकल्पाबाबतचा अद्ययावत अहवाल.

ठराव :

**Item No. 16 Resolution No. 5087**

विषय : प्राधिकरणातर्फे राबविण्यात येणारा पवई येथील गृहनिर्माण महाप्रकल्प. विकासकाने दरवाजे व खिडक्यांकरिता सागवानी लाकडाऐवजी पर्यायी पॉलीनॉर्म चौकटीचा वापर करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, प्राधिकरणातर्फे राबविण्यात येणाऱ्या पवई येथील गृहनिर्माण महाप्रकल्पाकरिता इमारतींच्या दारे व खिडक्यांच्या चौकटीकरिता सागवानी लाकडाऐवजी पॉलीनॉर्म चौकटी वापरण्याच्या प्रस्तावास खालील अटींवर मान्यता देण्यात येत आहे.

या पर्यायी वापराकरता विकासक रु. १३५/- प्रति चौकट सूट देतील व ही सूटीची रक्कम त्यांच्या देयकामधून वसूल करण्यात यावी.

**Item No. 17 Resolution No.**

विषय : 'गृहनिर्माण महाप्रकल्प'
दिनांक ३०/४/१९९४ पर्यंतचा प्रगती अहवाल.

ठराव :

**Item No. 18 Resolution No. 5088**

विषय : इमारत क्र. १२२-१३०, ११४ डी आणि ई तोबावाणी चाळ, डॉ. आंबेडकर रोड 'ई' वॉर्ड येथील पुनर्रचना योजनेची निविदा स्वीकृतीबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, इमारत क्रमांक १२२-१३०, ११४ डी आणि ई, तोबावाणी चाळ, डॉ. आंबेडकर रोड, 'ई' वॉर्ड येथील पुनर्रचना योजनेसाठी प्राप्त झालेली मे. माय कन्स्ट्रक्शन कंपनी यांची मूळ अंदाजित रक्कम रुपये १,०२,२६,२२०/- यांचेवर दरसूची १९९२-९३ नुसार १४.५० टक्के जास्त व ९३-९४ दरसूचीनुसार ५.६२ टक्के जास्त दराची निम्नतम निविदा रुपये १,१७,०९,०२१/- स्वीकृत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

या ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्ताच्या स्थायीकरणाची वाट न पाहता त्वरित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**Item No. 19 Resolution No.**

विषय : मुंबईतील झोपडपट्टीतील नागरिकांना झोपडपट्टी सुधार मंडळाने बांधलेल्या सार्वजनिक सुविधा चांगल्या पद्धतीने देखभाल करण्यास प्रोत्साहन मिळावे, उत्तेजनपर पुरस्कार मिळावे म्हणून स्पर्धेच्या माध्यमातून आरोग्याचे रक्षण करणे व झोपडपट्टीचा मुंबईतील परिसर सुधारणा साध्य करण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 20 **Resolution No.** 5089

विषय : मुलुंड येथील उर्वरित बांधकाम करण्याबाबत कार्यकारी अभियंता यांनी कोटेशन पद्धतीने इमारतीनिहाय बांधकाम पूर्ण करण्याबाबत अवलंबिलेल्या कार्यपद्धतीस कार्योत्तर मान्यता देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, विशेष बाब म्हणून व भविष्यात पूर्व उदाहरण होऊ नये या अटीवर पुन:प्रस्थान योजनेतील मुलुंड येथील एकूण ५६ इमारतींपैकी मूळ कंत्राटदाराने काम बंद केल्याने, इमारतीचे उर्वरित बांधकाम त्वरेने पूर्ण करण्यात यावे. टप्पा क्रमांक १ व २ मधील २७ इमारतींचे काम पूर्ण करण्यास रुपये ३७.५० लक्षाचे खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे. तसेच टप्पा क्रमांक २ व ३ मधील इमारतींचे उर्वरित काम प्रस्तावित केल्याप्रमाणे सुमारे ९६.३० लक्ष रुपये पूर्ण करण्यास संजूरी देण्यात येत आहे.
या ठरावाच्या स्थायीकरणाची वाट न पाहता कार्यवाही करण्यात यावी.

**Item No.** 21 **Resolution No.** 5090

विषय : मोईवाडा गाव, जी. डी. आंबेकर मार्ग, परळ फ/द विभाग येथील होणाऱ्या पुनर्रचित इमारतीतील गाळ्यांच्या किंमती व त्याची वसुलीबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, मोईवाडा गाव, जी. डी. आंबेकर मार्ग, परळ फ/द विभाग येथील राजीव गांधी प्रकल्पातर्फे नागरी नूतनीकरण योजनेअंतर्गत नियोजित पुनर्रचित इमारतीतील गाळे मूळ रहिवाशांना प्रकल्पाचे सध्याचे निकषाप्रमाणे देण्यात येऊन त्यानुसार सर्व मूळ लाभधारकांना (उपकरप्राप्त व उपकरप्राप्त नसलेल्या) १८० चौरस फूट चटई क्षेत्रफळाच्या गाळ्यासाठी प्रत्येकी रु. ४२,०००/- आकारण्यात यावे व ही रक्कम प्रत्येकी रुपये ८,४००/- रुपयाच्या पाच हप्त्यांत परंतु पुनर्रचित इमारतीतील गाळ्यांचा ताबा देण्यापूर्वी वसूल करावी. याशिवाय महापालिका कर इत्यादी लाभार्थींनी भरावे. जे गाळे १८०.०० चौरस फूटापेक्षा जास्त क्षेत्रफळाचे आहेत, त्या गाळ्यांच्या लाभधारकांना त्याप्रमाणात अधिक परंतु पाच हप्त्यांत येणारी रक्कम गाळ्यांचा ताबा घेण्यापूर्वी भरावी लागेल. त्याप्रमाणे संबंधित संस्था/प्रवर्तकाबरोबर करार करण्यात यावा. ठरावाच्या स्थायीकरणाची वाट न पाहता याबाबतची कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येते.

**Item No.** 22 **Resolution No.** 5091

विषय : राजीव गांधी निवारा प्रकल्पांतर्गत नागरी नूतनीकरण योजनेअंतर्गत उपलब्ध होणाऱ्या गाळ्यांच्या विक्री दराबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, नागरी नूतनीकरण योजनांमधील अतिरिक्त क्षेत्रफळाकरिता गाळ्यांचे सुधारित दर बाब टिप्पणीसोबतच्या परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या एकूण ३५ ठिकाणी विखुरलेल्या इमारतीतील गाळ्यांसाठी प्राधिकरणाने मान्यता दिलेल्या दिनांकापासून लागू करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सुधारित दर अशा सर्व योजनांना लागू करण्यात यावेत.
या ठरावाच्या स्थायीकरणाची वाट न पाहता त्वरित कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| **Item No.** | **23** | **Resolution No.** | **5092** |
|---|---|---|---|

विषय : नागरी नूतनीकरण योजनेअंतर्गत 'सी' जयराम चाळ, इमारत क्रमांक १ व २ आचार्य दोंदे मार्ग, फ/दक्षिण विभाग, या इमारतीच्या रक्षणासाठी पहारेकऱ्यांच्या खर्चाला मंजूरी.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, नागरी नूतनीकरण योजनेअंतर्गत 'सी' जयराम चाळ, इमारत क्रमांक १ व २, आचार्य दोंदे मार्ग, फ/दक्षिण विभाग या इमारतीच्या रक्षणासाठी अतिरिक्त २१ महिने म्हणजे दिनांक १५/३/९३ ते दिनांक १४/१२/९४ पर्यंतच्या कालावधीसाठी होणाऱ्या खर्चाला मंजूरी देण्यात येत आहे.
ठरावाच्या स्थायीकरणाची वाट न पाहता कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| **Item No.** | **24** | **Resolution No.** | **5093** |
|---|---|---|---|

विषय : राजीव गांधी प्रकल्पांतर्गत सन १९९३-९४ मध्ये संक्रमण शिबिर कमी/उच्च उत्पन्न गटाचे गाळे बांधण्यासाठी संचालक, राजीव गांधी प्रकल्प यांनी दिलेल्या प्रश्शासकीय मान्यतेबाबत प्राधिकरणास सूचित करणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, संचालक/राजीव गांधी प्रकल्प यांनी बाब टिप्पणीत उल्लेखिलेल्या तीनही योजनांसाठी देण्यात आलेली प्रशासकीय मान्यतेबद्दलची माहिती प्राधिकरणाने नोंद करून घेतली आहे.

| **Item No.** | **25** | **Resolution No.** | **5094** |
|---|---|---|---|

विषय : 'उमरखाडी' येथील साईकृपा को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी (मर्यादित) या नोंदणीकृत संस्थेच्या कामकाजासाठी कार्यालय म्हणून २७१.०० चौ. फूटाचा गाळा वितरणाबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, उमरखाडी येथील साईकृपा या नोंदणीकृत सहकारी सोसायटीत १८०.०० चौरसफूटाऐवजी तेथील पुनर्रचित इमारतीतील २७१.०० चौरस फूटाचा गाळा बांधकामाच्या दराने सदरहू संस्थेने सर्व सदस्यांकडून समप्रमाणात किंमत वसूल करून प्राधिकरणाने भरणा करावी.
कार्यवृत्त स्थायी करण्याची वाट न पाहता सदरहू ठरावाची अंमलबजावणी त्वरित करण्यात यावी.

| **Item No.** | **26** | **Resolution No.** | **5095** |
|---|---|---|---|

विषय : मूखंड क्र. ७८, ना. म. जोशी मार्ग, लोअर परेल, येथील ३३४, ३३६-अ, आमची सावली को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी या मूखंडावरील नियोजित पुनर्बांधणी योजनेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, 'आमची सावली' को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी, ना. म. जोशी मार्ग, लोअर परेल, ग/दक्षिण्ण विभाग, या योजनेचा राजीव गांधी प्रकल्पातर्फे नागरी नूतनीकरण योजनेअंतर्गत विकास करण्यात यावा ही योजना सध्याचे निकषाप्रमाणे राबविण्यात यावी, तथापि सर्व लामधारकांकडून १८०.०० चौरस फूट चटई क्षेत्रफळाचे गाळ्यासाठी प्रत्येकी रुपये ४२,००० अधिक ५,००० बरोबर ४७,०००/- आकारण्यात यावे, ही रक्कम तीन हप्त्यांत परंतु गाळ्यांचा ताबा घेण्यापूर्वी वसूल करावी.

अ) प्रथम हप्ता : १९,०००/- रुपये
ब) दुसरा हप्ता : १४,०००/- रुपये
क) तिसरा हप्ता : १४,०००/- रुपये

याप्रमाणे संबंधित संस्थेबरोबर करार करण्यात यावा. अंतिम किंमत न बदलता आवश्यकता असल्यास हप्त्यामध्ये संचालक/राजीव गांधी प्रकल्प फेरफार करू शकतील. कार्यवृत्ताच्या स्थायीकरणाची वाट न पाहता त्वरित कार्यवाही करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

| **Item No.** | **27** | **Resolution No.** | **5096** |
|---|---|---|---|

विषय : 'मेरवान बिल्डींग', टप्पा - ३ चे बांधकाम करण्याबाबत, नागरी नूतनीकरण योजनेतील ऑफ-परेरा-मेरवान, १३-१५-१७-२१-अे, २१-बी, २३-२७ तुकाराम जावजी मार्ग, डी विभाग, मुंबई.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, 'मेरवान' इमारत तुकाराम जावजी मार्ग, डी विभाग, राजीव गांधी प्रकल्पातर्फे नागरी नूतनीकरण योजनेअंतर्गत नियोजित पुनर्रचित इमारतीतील गाळे मूळ रहिवाशांना प्रकल्पातील सध्याचे निकषाप्रमाणे देण्यात येऊन त्यानुसार सर्व लामधारकांकडून १८० चौरस फूट चटई क्षेत्रफळाच्या गाळ्यासाठी प्रत्येकी रुपये ४२,०००/- आकारण्यात यावेत. मात्र ही रक्कम प्रत्येकी रुपये ८,४००/- रुपयाच्या पाच हप्त्यांत परंतु पुनर्रचित इमारतीतील गाळ्यांचा ताबा देण्यापूर्वी वसूल करण्यात यावी. जे गाळे १८० चौरस फूटापेक्षा जास्त क्षेत्रफळाचे आहेत, त्या गाळ्यांच्या लामधारकांना गाळ्यांच्या क्षेत्रफळानुसार किंमत आकारण्यात यावी व ही रक्कमही पाच हप्त्यांत गाळ्यांचा ताबा देण्यापूर्वी वसूल करावी.
वरीलप्रमाणे संबंधित संस्था/प्रवर्तकाबरोबर करार करण्यात यावा.
सदर ठरावाच्या स्थायीकरणाची वाट न पाहता कार्यवाही करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

**Item No.** 28 **Resolution No.** 5097

विषय : 'श्री सूर्यतुंड महापुरुष' को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी (मर्यादित) या सोसायटीला कार्यालयीन कामकाज करण्यासाठी एक गाळा वितरित करणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, 'श्री सूर्यतुंड महापुरुष' को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी (मर्यादित) माझगाव, मुंबई या संस्थेस कार्यालयीन कामकाजासाठी २३० चौरस फूटाचे क्षेत्रफळ असलेल्या एका गाळ्याचे वितरण करण्यास मान्यता देण्यात येत आहे. १८० चौरस फूटास बांधकामाची किंमत व त्यावरील क्षेत्रफळासाठी या इमारतीस लागू असलेल्या बाजारभावाप्रमाणे (रुपये ८०० प्रति चौरस फूट) किंमत सदरहू संस्थेने सर्व सदस्यांकडून सम प्रमाणात वसूल करून प्राधिकरणाकडे भरणा करावी.
या ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायी होण्याची वाट न पाहता करण्यात यावी.

**Item No.** 29 **Resolution No.** 5098

विषय : 'औदुंबर' या सहकारी गृहनिर्माण संस्थेला कार्यालयीन कामकाजासाठी एक गाळा वितरित करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, 'औदुंबर' सहकारी गृहनिर्माण संस्था (मर्या.) मुंबई या संस्थेला त्यांच्या कार्यालयीन कामकाजासाठी त्या इमारतीतील एक गाळा २०७ चौरस फूट आकारमान असलेल्या गाळ्यांचे वितरण करण्यास मंजूरी देण्यात येत आहे. त्यापोटी १८० चौरस फूटापर्यंत क्षेत्रास बांधकाम किंमत व १८० चौरस फूटाहून अधिक असलेल्या क्षेत्रफळासाठी प्राधिकरणाने ठरविलेल्या बाजारभावाप्रमाणे दर आकारावा व ही रक्कम सदरहू संस्थेने सर्व सदस्यांकडून सम प्रमाणात वसूल करून प्राधिकरणाकडे भरणा करावी. प्रति चौ. फूटास रु. ९००/- हा दर लागू करण्यात यावा.
ठरावाच्या स्थायीकरणाची वाट न पाहता कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** 30 **Resolution No.**

विषय : नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या कामकाजासंबंधी चर्चा.

ठराव :

**Item No.** 31 **Resolution No.** 5099

विषय : जागतिक बँक प्रकल्प विभागातील कंत्राटी पद्धतीवर कार्यरत असलेले अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवाबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
१) जागतिक बँक प्रकल्प विभागाच्या आस्थापनेवरील प्रत्यावर्तित करण्यात आलेल्या विविध संवर्गातील १३८ पदे प्राधिकरणाच्या आस्थापनेवर कायमची वळती करण्यास मान्यता देण्यात येते.
२) तसेच जागतिक बँक प्रकल्पात कंत्राटी पद्धतीवर/अन्य पद्धतीवर कार्यरत असलेल्या १५८ अधिकारी/कर्मचारी यांना प्राधिकरणात कामाची निवड विचारात घेऊन गरजेप्रमाणे पुनर्नेमणूक करण्यास आवश्यक असणारी १५८ विविध संवर्गातील पदे प्राधिकरणाच्या आस्थापनेवर वळती करण्यास मान्यता देण्यात येते.
३) प्रकल्प संपुष्टात आणण्यापूर्वी कंत्राटी पद्धतीवर/अन्य पद्धतीवर कार्यरत असलेले सर्व अधिकारी/कर्मचारी यांना प्रथम रीतसर नोटीस देऊन त्यांची सेवा संपुष्टात आणण्यात यावी व परिच्छेद (१) व (२) बाबत शासनास सविस्तर प्रस्ताव पाठवून अवगत करावे. स्थायीकरणाची वाट न पाहता कार्यवाही करावी.

---

**Item No.** 32 **Resolution No.** 5100

विषय : विशेष नियोजन प्राधिकरण/नवीन चंद्रपूर

नवीन चंद्रपूर शहराचा विकास आराखडा शासनास सादर करण्याची मुदत वाढविण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, नवीन चंद्रपूर शहराचा विकास आराखडा शासनास महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमाच्या कलम ३०(१) अंतर्गत सादर करण्याची मुदत दिनांक २८.३.१९९४ पासून २७.९.९४ पर्यंत वाढविण्यात मंजूरी देण्यात येत आहे व त्यानुसार शासनास पुढील मंजूरीसाठी प्रस्ताव पाठविण्यात यावा, असे ठरविण्यात आले.
तसेच या ठरावाच्या स्थायीकरणाची वाट न पाहता यावर मुख्य कार्यकारी अधिकारी/प्राधिकरण यांनी पुढील कार्यवाही करावी.

---

**Item No.** 33 **Resolution No.** 5101

विषय : सानेगुरुजी, तीन डोंगरी, गोरेगाव येथील गलिच्छवस्ती निर्मूलन योजनेअंतर्गत बांधलेल्या ४०० गाळ्यांच्या मलनिःस्सारण व भूमिगत गटार व्यवस्थेची दुरुस्ती.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, मुंबई मंडळाने पारित केलेला ठराव क्रमांक १५६/१९६७ अन्वये सानेगुरुजी नगर, गोरेगाव (प.) मुंबई येथील गलिच्छवस्ती निर्मूलन योजनेअंतर्गत ४०० गाळ्यांच्या सामूहिक सुविधांच्या दुरुस्तीसाठी मंडळाकडे प्राप्त होणाऱ्या महसूल जमेच्या रकमेमधून इमारतींचे अभिहस्तांतरण करून घेण्याच्या अटींवर सुविधांची दुरुस्ती करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.
सदरहू ठरावाच्या स्थायीकरणाची वाट न पाहता अंमलबजावणी करण्यात यावी.

| **Item No.** | **34** | **Resolution No.** | **5102** |
|---|---|---|---|

विषय : पांचपाखाडी, ठाणे येथील स. क्र. १५०, १५१ (भाग), १५२ (भाग), १५३ (भाग) व १६५ (भाग) भूखंडाबाबत पोलीस कर्मचाऱ्यांकरिता गृहप्रकल्प.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, ज्याप्रमाणे मुंबई मंडळाने शिक्षकांसाठी विशेष घटक योजना राबविली होती. त्याप्रमाणे स. क्र. १५०, १५१ (भाग), १५२ (भाग), १५३ (भाग) व १६५ (भाग) यावर कोकण मंडळाने पोलीसांसाठी विशेष घटक योजना राबविण्यास तत्वतः मंजूरी देण्यात येत आहे. याबाबत शासनाच्या मंजूरीसाठी प्रस्ताव पाठविण्यात यावा.

| **Item No.** | **35** | **Resolution No.** | **5103** |
|---|---|---|---|

विषय : राजीव गांधी निवारा प्रकल्पांतर्गत सन ९४-९५ मध्ये स. क्र. ३४३ (भाग), धारावी कल्याणवाडी येथील भूखंडावर कुंपण भिंत बांधणे, माती भरणी कामे करणे व सुरक्षा व्यवस्था नेमणे यासाठी.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, संचालक/राजीव गांधी प्रकल्प यांनी बाब टिप्पणीत उल्लेखिलेल्या योजनांसाठी देण्यात आलेली प्रशासकीय मान्यतेबद्दलची प्राधिकरणाने नोंद घेतली.

| **Item No.** | **36** | **Resolution No.** | **5104** |
|---|---|---|---|

विषय : कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयाच्या इमारतीबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, बाब टिप्पणीत नमूद केलेली वस्तुस्थिती विचारात घेऊन जून महिन्यापासून शाळा सुरू होत असल्याने कर्मवीर भाऊराव पाटील या शिक्षण संस्थेस संक्रमण शिबिरातील यापूर्वी वितरित करण्यात आलेले १६ गाळे परत घेऊन चाळ क्रमांक १२६, १२७, १२८ व १३० मधील एकूण ३२ गाळे तात्पुरत्या स्वरुपात भाडे तत्वावर वितरित करण्यास मान्यता देण्यात येत आहे. कार्यवृत्ताच्या स्थायीकरणाची वाट न पाहता कार्यवाही करावी.
प्राधिकरणाच्या विषयसूचीवरील सर्व विषय संपल्यानंतर माननीय अध्यक्ष/प्राधिकरण यांच्या परवानगीने आयत्यावेळी खालील विषय चर्चेसाठी व निर्णयासाठी घेण्यात आले.

**Item No.** 37 **Resolution No.** 5105

विषय : म्हाडामध्ये व्यावसायिक प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

१) प्राधिकरणाचा ठराव क्र. ५०४४ दिनांक ३१/१२/९३ नुसार मंजूर झालेल्या प्रस्तावातील खर्चाच्या तपशीलाव्यतिरिक्त इतर बाबी कायम ठेवून या बाब टिप्पणीच्या प्रस्तावात नमूद केल्यानुसार म्हाडाचे व्यावसायिक प्रशिक्षण केंद्र, गृहनिर्माण भवन, आगरकर नगर, पुणे येथील म्हाडाच्या इमारतीमध्ये किरकोळ फेरफार करून ६,००० चौ. फूट जागेत कार्यान्वित करण्यास आणि त्यासाठी म्हाडातर्फे यापुढे अनावर्ती खर्च रु. २२.१७ लाख व प्रतिवर्षी आवर्ती रु. ९.७५ लाख म्हाडाच्या निधीतून करण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

२) त्याचप्रमाणे हे व्यावसायिक प्रशिक्षण केंद्र कार्यान्वित करण्यासाठी सदर इमारतीमध्ये किरकोळ बदल दुरुस्ती, बांधकाम इ. तसेच इतर साहित्य सामान, वाहने इत्यादींची पूर्ती करून सदर केंद्र योग्य रित्या कार्यान्वित करण्याबाबत पुणे मंडळामार्फत उचित कार्यवाही करण्यात यावी.

३) याव्यतिरिक्त उक्तनुसार म्हाडाचे उपरोक्त व्यावसायिक प्रशिक्षण केंद कार्यान्वित करणे व चालविणे तेथे आवश्यक कर्मचारी वर्ग नेमणे यासाठी वेळोवेळी कराव्या लागणाऱ्या सर्व प्रकारच्या तत्सम कामे आणि खर्चाबाबत निर्णय घेण्याचे व त्यासाठी आवश्यक खर्चास मंजूरी देण्याचे अधिकार मा. उपाध्यक्ष/प्रा. यांना प्रदान करण्यात येत आहेत. कार्यवृत्ताच्या स्थायीकरणाची वाट न पाहता कार्यवाही करावी.

बैठकीतील विषय संपल्यानंतर मा. सचिव, गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग यांचे मा. अध्यक्ष/प्रा. यांना उद्देशून लिहिलेले अ. शा. पत्र क्र. एचएसजी-१०९४/३४/सचिव, दि. ७ जून १९९४ च्या प्रती प्राधिकरणाच्या माहितीसाठी सादर करण्यात आल्या. सदर पत्रासोबत मंत्रालय आणि विधी मंडळ वार्ताहरसंघ यांच्याकडून प्राप्त झालेल्या दि. ७ जून १९९४ च्या पत्राची प्रत प्राधिकरणाच्या माहितीसाठी बैठकीत देण्यात आली. सदरहू विषयाच्या संदर्भात मुख्य अधिकारी/मुंबई मंडळ यांनी पत्रातील मजकूराचा आशय बैठकीत विशद करून सांगितला. पत्रकारांना सदनिकांचा ताबा न देता १६ टक्के व्याज आकारण्यात यावे याबाबत सचिव/गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग यांनी सदर पत्र बैठकीसमोर ठेवण्यासाठी विनंती केलेली आहे. मुदतीत सदनिकांचे बांधकाम पूर्ण न होणे, पाणी, वीज वेळेवर न मिळणे इत्यादी बाबींमुळे सदनिकांचा ताबा वेळेवर देता येणे शक्य होत नाही. याबाबत ताबा न देता व्याज आकारणीच्या संदर्भात धोरणात्मक निर्णय घेणे गरजेचे आहे. आगामी बैठकीत याबाबत निर्णय घेण्यासाठी सविस्तर बाब टिप्पणी सादर करण्यात यावी असे बैठकीत सुचविण्यात आले. त्याप्रमाणे मुख्य अधिकारी/मुंबई मंडळ यांनी आगामी बैठकीत सविस्तर बाब टिप्पणी निर्णयासाठी सादर करावी. तूर्त मा. सचिव/गृहनिर्माण यांना या संदर्भात वरीलप्रमाणे कळविण्यात यावी.

सर्वसाधारण चर्चा करताना डॉ. मटकर, सदस्य/प्राधिकरण यांनी सांगितले की, संक्रमण शिबिराबाबत एक पत्र मा. अध्यक्ष/प्राधिकरण यांना एक महिन्यापूर्वी पाठविण्यात आले होते. सदरहू पत्रावर मंडळाचे मुख्य अधिकारी यांचे अभिप्राय मागवून उपाध्यक्ष/प्राधिकरण यांचे स्तरावर या संदर्भात चर्चा करण्यासाठी बैठक आयोजित करण्यात येईल, असे उपाध्यक्ष/प्राधिकरण यांनी सांगितले.

बैठकीचे कामकाज संपल्यानंतर उपस्थितांनी मा. अध्यक्षांचे आभार मानून बैठक

संपल्याचे जाहीर करण्यात आले.

**Meeting No.** **133** **Meeting Date** **30-Aug-1**

**Item No.** **1** **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दि. १४-६-१९९४ रोजी झालेल्या १३२ व्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे.

ठराव :

**Item No.** **2** **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या बैठक क्र. ११७ (दिनांक १८.९.१९९२) ते विशेष बैठकीपर्यंत (दि. २५.२.१९९४) झालेल्या बैठकीत घेतलेल्या निर्णयावर केलेल्या कार्यवाहीची माहिती.

ठराव :

**Item No.** **3** **Resolution No.** **5106**

विषय : प्राधिकरणाच्या संगणीकरणाचे काम करणाऱ्या राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्राच्या (एन. आय. सी.) कर्मचाऱ्यांची रहाण्याची तात्पुरती सोय करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्राच्या (एन. आय. सी.) कर्मचाऱ्यांची रहाण्याची तात्पुरती सोय होण्यासाठी मुंबई मंडळाच्या वसाहतीमध्ये प्राधिकरण कर्मचाऱ्यांसाठी सेवानिवासस्थानासाठी म्हणून असलेल्या गाळ्यांपैकी ३ गाळे ११ महिन्यांच्या 'संमती आणि परवानगी' (लिव्ह ॲन्ड लायसन्स) तत्वावर खालील अटींच्या अधीन राहून राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्राच्या प्राधिकरणाच्या संगणीकरणाचे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१) ११ महिन्यांच्या कालावधीसाठी किंवा एन.आय.सी. या संस्थेला विक्री करावयाच्या गाळ्याबाबत शासनाकडून आदेश प्राप्त होईपर्यंत याबाबत आधी जे घडेल त्या कालावधीपर्यंत राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्राच्या कर्मचाऱ्यांकडून योग्य ती 'संमती आणि परवानगी' (लिव्ह ॲन्ड लायसन्स) करार प्राधिकरणातील विधी सल्लागार यांच्या सहाय्याने व संबंधितांच्या खर्चाने करून व ३ गाळे सेवानिवासस्थान म्हणून वाटप करावेत.

२) त्या गाळ्यांच्या वापरापोटी त्यांच्याकडून दरमहा नियमानुसार आर्थिक भाडे अधिक सेवाआकार एवढी रक्कम घेण्यात यावी.

३) तीन महिन्यांचे आर्थिक भाडे अधिक सेवाआकार एवढी अनामत रक्कम म्हणून प्रत्येक गाळ्यापोटी घेण्यात यावी.

४) प्रत्येक महिन्याचे भाडे वेळच्या वेळी भरले नाही तर प्राधिकरणाच्या प्रचलित नियमाप्रमाणे दंड आकारण्यात यावा.

५) ११ महिन्यांनंतर गाळ्याचा ताबा सोडला नाही तर पुढील काळासाठी आर्थिक भाडे अधिक सेवाआकार यांच्या तिप्पट दराने भाडे वसूल करावे व गाळे खाली करून घेण्यासाठी निष्कासन कारवाई चालू करावी.

६) ११ महिन्यांनंतर मुदत वाढवून देण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी/प्रा. यांना राहतील.

७) याशिवाय प्रचलित असलेल्या अटी व शर्ती लावण्यात याव्यात.

**Item No.** 4 **Resolution No.** 5107

विषय : बैठ्या गाळ्यांच्या विक्री योजनेची अंमलबजावणी.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

बैठ्या गाळ्यांच्या विक्री योजनेसंबंधी मुंबई मंडळाने सादर केलेल्या प्रस्तावावर प्राधिकरणाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला.

१) अल्प उत्पन्न गटातील सदनिकांकरिता (आनंद नगर, सांताक्रुझ, सिद्धार्थ नगर, गोरेगाव व राजेंद्र नगर, बोरिवली) शासनाच्या १९८७ च्या निर्णयाची तंतोतंत अंमलबजावणी व्हावी.

२) अल्प उत्पन्न गटातील सदनिका वगळून इतर सर्व सदनिकांसाठी मूळ किंमतीत शासन निर्णयाप्रमाणे २० टक्के सूट देण्यात यावी.

३) वाढीव चटईक्षेत्राकरिता सन १९८७ च्या होणाऱ्या किंमतीच्या ५० टक्के भाग घेऊन त्या रकमेवर दिनांक १ जानेवारी, १९८८ पासून प्रत्यक्ष ही रक्कम भरेपर्यंत दरवर्षी ५ टक्के सरळ व्याजाने वाढ करण्यात यावी.

४) सर्व अनधिकृत सदनिकाधारकांकडून (अल्प उत्पन्न गटातील सदनिका वगळून) रुपये १०,०००/- इतकी दंडाची रक्कम आकारण्यात यावी व त्यानंतर अशा अनधिकृत सदनिकाधारकांना, अधिकृतऽ सदनिकाधारकांप्रमाणेच समजण्यात यावे.

५) ज्या सदनिकांचा अनिवासी वापर होत आहे व सदनिका अधिकृत भाडेकरूंच्या ताब्यात असेल तर मूळ सदनिकांच्या किंमतीच्या तीनपट रक्कम आकारण्यात यावी व ज्या सदनिका अनधिकृत रहिवाशांच्या ताब्यात आहेत अशा अनधिकृत रहिवाशांकडून अनिवासी वापरापोटी मूळ सदनिका किंमतीच्या पाचपट रक्कम आकारण्यात यावी. अशा प्रकरणात मूळ किंमतीत २० टक्केची सवलत राहणार नाही.

६) ही योजना दिनांक २ ऑक्टोबर, १९९४ पासून कार्यान्वित करण्यात यावी. प्रत्येक भाडेकरूकडून सदनिकांची विक्री किंमत रक्कम भरण्याकरिता त्यांना १२ महिन्यांचा कालावधी दिला जाईल. या कालावधीत ते सोयीस्कर हप्त्यात देय असलेली रक्कम भरू शकतील व त्यांचेकडून कोणत्याही प्रकारचे व्याज आकारले जाणार नाही. मात्र दिनांक २/१०/१९९५ पासून शिल्लक असलेल्या रकमेवर ६ टक्के सरळ दराने व्याज आकारले जाईल व लाभार्थींना उरलेली रक्कम भरण्याकरिता दिनांक २ ऑक्टोबर, १९९५ पासून जास्तीत जास्त २ वर्षांचा कालावधी अनुज्ञेय राहील. हाच सिद्धांत अनधिकृत व्यक्तींकडून आकारण्यात येणारा दंड म्हणजे १०,०००/- रुपये रकमेकरिता तसेच सदनिकेच्या अनिवासी वापराबद्दल लागू राहली.

७) उर्वरित चटईक्षेत्राकरिता (बॅलन्स एफएसआय) देय असणाऱ्या रकमा दिनांक १ जानेवारी, १९८८ पासून दरवर्षी ६ टक्के सरळ व्याजाने वाढविण्यात येईल व ज्या तारखेपर्यंत लाभार्थींकडून या रकमेचा प्रत्यक्ष भरणा होईल त्या तारखेपर्यंत हे व्याज (६ टक्के सरळ व्याज) चालू राहील.

८) भाडेकरूंनी प्राधिकरणाला देय असलेल्या सर्व रकमांचा भरणा केल्यानंतर त्या तारखेपासून त्यांचेकडून भाडे वसूल केले जाणार नाही.

तथापि, त्यास महानगरपालिका कर, लीज रेंट, सेवा आकार इ. मासिक आकार भरावे लागतील.

९) प्रत्येक वसाहतीमध्ये सर्व भाडेकरुंनी मालकी योजना स्वीकारेपर्यंत व प्राधिकरणाला देय असणाऱ्या सर्व रकमांचा भरणा करेपर्यंत त्या वसाहतीच्या संपूर्णपणे पुनर्बांधणीची/पुनर्विकासाची परवानगी मुंबई मंडळाकडून दिली जाणार नाही.

प्राधिकरणाच्या आगामी बैठकीत कार्यवृत्त स्थायी होण्याची वाट न पाहता मा. अध्यक्ष/प्रा. यांची कार्यवृत्तास मान्यता मिळाल्यानंतर सदर निर्णयाची अंमलबजावणी त्वरित करण्यात यावी.

**Item No. 5 Resolution No. 5108**

विषय : नागपूर मंडळाच्या भंडारा येथील ९६ ई.डब्ल्यू.एस. गाळ्यांपैकी गाळा क्र. ९३ चे फेरवाटप श्री. पा. आ. तिजारे यांना गाळा क्र. २१ च्या बदल्यात करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

नागपूर मंडळाच्या भंडारा येथील वसाहतीमधील गाळा क्र. २१ (९६) ई.डब्ल्यू.एस.चे गाळेधारक श्री. पा. आ. तिजारे यांच्याकडून थकबाकीच्या कारणावरुन काढून घेण्यात आलेल्या गाळ्याच्या बदली भंडारा येथील गाळा क्र. ९३(९६) ई.डब्ल्यू.एस. हा गाळा, त्या गाळ्याच्या विक्रीची संपूर्ण किंमत व अन्य देणी एकरकमी वसूल करुन श्री. तिजारे यांना अपवाद म्हणून वाटप करण्यास मान्यता देण्यात येते. तसेच भविष्यात हा निर्णय अन्य कोणत्याही ठिकाणी उदाहरण म्हणून दाखविता येणार नाही.

**Item No. 6 Resolution No. 5109**

विषय : प्राधिकरणाच्या महसूली जमा रकमा परत करण्याबाबतचे अधिकार प्रदान करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

१) महसूली जमा रकमेतून रुपये ५,०००/- पर्यंत रक्कम परत करण्याचे अधिकार प्रादेशिक मंडळाच्या मुख्याधिकाऱ्यांना प्रदान करण्यात येत आहेत. मात्र याबाबत कार्यवाही केल्याबद्दलचा अहवाल प्राधिकरणास प्रतिमास सादर करावा.

२) महसूली जमा रकमेतून रु. ५,०००/- वरील रक्कम परत करण्याचे अधिकार उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी यांना प्रदान करण्यात येत आहेत.

मा. अध्यक्ष/प्रा. यांच्या अनुपस्थितीत मा. उपाध्यक्ष/प्रा. यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीचे कामकाज पुढे चालू ठेवण्यात आले.

**Item No.** 7 **Resolution No.** 5110

विषय : विशेष नियोजन प्राधिकरण - १, सोलापूर मंजूर विकास आराखड्यामधील किरकोळ फेरबदल प्रस्ताव शासनास अंतिम मंजूरीसाठी पाठविण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ मधील तरतुदीनुसार विशेष नियोजन प्राधिकरण, सोलापूर - १ च्या मंजूर विकास आराखड्यात सुचविण्यात आलेल्या किरकोळ फेरबदल प्रस्ताव संदर्भात प्राधिकरणाच्या ठराव क्र. ५०६७ प्रमाणे मुख्याधिकारी, पुणे मंडळाने सुनावणी घेऊन सादर केलेल्या अहवालास हे प्राधिकरण मान्यता देत असून सदरहू किरकोळ फेरबदलाचा प्रस्ताव पुढे शासनास अंतिम मंजूरीसाठी पाठविण्यास सूचित करीत आहे. तसेच हा ठराव पुढील अंतिम बैठकीत स्थायी होण्याची वाट न पाहता मुख्य कार्यकारी अधिकारी/प्रा. यांना याबाबतची पुढील कार्यवाही करण्यास प्राधिकरण मंजूरी देत आहे.

**Item No.** 8 **Resolution No.** 5111

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणांतर्गत काम करण्यासाठी मंडळाने कंत्राटदारांनी नोंदणी करून मंडळाच्या स्वतःच्या मान्यताप्राप्त ठेकेदारांची यादी करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
प्राधिकरणाचा निर्णय क्र. ५०८५, दिनांक १४/६/१९९४ मधील समिती क्र. २ मध्ये 'मुख्याधिकारी हे समितीचे अध्यक्ष आहेत' त्याऐवजी 'ते समितीचे निमंत्रक' अशा बदलास मान्यता देण्यात येत आहे. या निर्णयाच्या स्थायीकरणाची वाट न पाहता त्वरित अंमलबजावणी करून पुढील कार्यवाही करण्यात यावी.

**Item No.** 9 **Resolution No.** 5112

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाने महानगरीय विकास प्राधिकरण संघाचे सदस्यत्व रद्द करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाने महानगरीय विकास प्राधिकरण संघाचे ठराव क्र. २०६६, दिनांक २३/४/१९९२ अन्वये सदस्यत्व स्वीकारण्याचा निर्णय रद्द करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** 10 **Resolution No.**

विषय : भूकंपग्रस्त पुनर्वसन प्रकल्पाबाबतचा अद्यावत अहवाल.

ठराव :

**Item No.** 11 **Resolution No.** 5113

विषय : म्हाडातील कार्यप्रणालीचे संगणीकरण करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

१) म्हाडाच्या संगणीकरणाचे काम एन.आय.सी. या संस्थेकडे सोपविण्यास प्राधिकरण मंजूरी देत आहे.

२) म्हाडाच्या कार्यप्रणालीचे संगणीकरणासाठी जागतिक बँकेने उपलब्ध करून दिलेल्या व शासनाने अनुमती दिलेल्या रक्कम रु. ४०.०० लाख अनुदानाव्यतिरिक्त अधिक होणाऱ्या रक्कम रु. ५.०० लाखापेक्षा अंदाजित केलेल्या खर्चास तसेच त्यापेक्षा अधिक होणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास प्राधिकरण मंजूरी देत आहे.

३) संगणक खरेदी करणे, निविदा मागविणे तसेच या संदर्भात एन.आय.सी. बरोबर करण्यात येणाऱ्या करारातील तरतुदी अंतिम करणे व त्या अनुषंगाने वेळोवेळी घेण्यात येणारे निर्णय घेण्याचे अधिकार उपाध्यक्ष/प्रा. यांना प्रदान करण्यात येत आहेत.

४) जागतिक बँकेने दिलेले रु. ४०.०० लाखाचे अनुदान सप्टेंबर, १९९४ च्या आत खर्च करण्याच्या दृष्टीने निविदा मागविण्याचा कालावधी १० दिवसांचा करण्यास प्राधिकरण मंजूरी देत आहे.

५) वरील बाबींची तातडीने अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने ठराव पुढील बैठकीत स्थायीकरणाची वाट न पाहता त्वरित अंमलबजावणी करून पुढील कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

---

**Item No.** 12 **Resolution No.** 5114

विषय : सर्व्हे क्र. ९३ (भाग) देवनार येथील भूखंडासाठी स्थावर सुरक्षा एका वर्षापेक्षा जास्त काळाकरिता वाढविणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

१) मे. जैन कन्स्ट्रक्शन कंपनी यांना सर्व्हे क्र. ९३ (भाग) देवनार येथील स्थावर सुरक्षा व्यवस्थेचे काम दिनांक ८/१/१९९४ ते ७/१/१९९४ या कालावधीसाठी सध्याच्याच रु. ७,८६०/- प्रति महिना या दराने व कराराच्या अटी व शर्तीवर वाढवून देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२) अतिक्रमणाबाबत न्यायप्रविष्ट प्रकरणे निकाली काढणे, संबंधितांशी वाटाघाटी करून अतिक्रमण दूर करण्यासाठी तोडगा काढणे, उपलब्ध जागेवर सुधारित आराखडा तयार करणे, याबाबत सविस्तर माहिती प्राधिकरणाच्या आगामी बैठकीपासून प्रत्येक बैठकीत संचालक, राजीव गांधी प्रकल्प यांनी सादर करावी.

कार्यवृत्ताच्या स्थायीकरणाची वाट न पाहता सदर ठरावाप्रमाणे त्वरित कार्यवाही करावी.

---

**Item No.** 13 **Resolution No.** 5115

विषय : राजीव गांधी झोपडपट्टी सुधार व निवारा प्रकल्प, नागरी नूतनीकरण योजना -

इमारत क्र. २३-आय ते २३-एम, धाकू प्रभू वाडी, केशवराव बोरकर मार्ग, माझगाव 'ई' विभाग या इमारतीच्या पुनर्बांधणीच्या कामाच्या निविदा मंजूरीबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
डी. पी. वाडी (ऑफ बिल्डींग) नागरी नूतनीकरण बांधकामासाठी दिनांक २२/१०/१९९३ रोजी निविदा मागविण्यात आल्या होत्या. अनुक्रमे (१) मे. साय कन्स्ट्रक्शन कंपनी, २) मे. स्वस्तिक कन्स्ट्रक्शन कंपनी, ३) मे. आर. एस. गुप्ता ॲन्ड कंपनी यांच्याकडून प्राप्त झालेल्या सर्व निविदा नामंजूर करण्यात येत आहेत. या ठरावाची स्थायीकरणाची वाट न पाहता अंमलबजावणी करण्यात यावी.

**Item No.** 14 **Resolution No.** 5116

विषय : पंतप्रधान अनुदान प्रकल्प (सध्या राजीव गांधी झोपडपट्टी सुधार व निवारा प्रकल्प) अंतर्गत सर्व्हे क्र. १३८, मानखुर्द येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत बांधलेले गाळे अतिरिक्त गाळ्यांविषयी धोरण.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
पंतप्रधान अनुदान प्रकल्पाच्या सर्व्हे क्र. १३८ मानखुर्द येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेखाली बांधलेल्या अतिरिक्त गाळ्यांची विक्री बाब टिप्पणीत नमूद केलेल्या रु. ७६०/- प्रति चौ. फूट विक्री दराने विक्री करण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते. कार्यवृत्ताच्या स्थायीकरणाची वाट न पाहता सदर ठरावाची अंमलबजावणी तात्काळ करण्यात यावी, असे ठरविण्यात आले.
सचिव, गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग आणि श्री. विकास भंडारी, सदस्य/प्रा. यांना काही महत्वाच्या कामानिमित्त लवकर जायचे असल्यामुळे बैठकीचे मा. अध्यक्ष यांचे सूचनेवरून विषयसूचीवरील बाब क्रमांक १३३/१९ बाबतचा प्रस्ताव विचारार्थ घेण्यात आला.

**Item No.** 15 **Resolution No.**

विषय : 'गृहनिर्माण महाप्रकल्प'

ठराव :

**Item No.** 16 **Resolution No.**

विषय : नागपूर मंडळाच्या कामकाजाचा आढावा आणि

ठराव :

**Item No.** 17 **Resolution No.**

विषय : नाशिक मंडळाच्या कामकाजाचा आढावा

ठराव :

**Item No.** **18** **Resolution No.** **5118**

विषय : मिलिंद इंडस्ट्रियल को-ऑपरेटिव्ह प्रोड्युसर सोसायटी लि., टागोर नगर, विक्रोळी या संस्थेस वितरित करण्यात आलेल्या भूखंडालगतची अनधिकृत व्यापलेली जागा नियमित करण्याबाबतची विनंती.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

मिलिंद इंडस्ट्रियल को-ऑप-प्रोड्युसर सोसायटी लि., टागोर नगर, विक्रोळी या उत्पादक सहकारी संस्थेस वितरित करण्यात आलेल्या भूखंडालगतचा १९७७ पासून अनधिकृतपणे व्यापलेलला १५५.३४ चौ. मी. क्षेत्रफळाचा भूखंड त्या ठिकाणी सध्या मंडळाची कोणतीही योजना नसल्यामुळे प्राधिकरणाच्या दि. १६/११/९२ च्या जमिनीच्या किंमती विषयक धोरणातील २ (अे) प्रमाणे जमिनीच्या बाजारभावाच्या १०० टक्के किंवा जमिनीच्या निवासी वापराच्या बाजारभावाच्या दुप्पट दराने येणारा दर यामधील जो जास्त दर येईल त्याप्रमाणे अधिमूल्य आकारण्यात यावे व ही रक्कम आकारून शिवाय दंड म्हणून वरीलप्रमाणे येणाऱ्या अधिमूल्याच्या रकमेच्या ५० टक्के रक्कम आकारण्यात यावी.

भाडेपट्ट्याच्या ३० वर्षांचा कालावधी संस्थेस पूर्वी वितरित केलेल्या भूखंडाच्या भाडेपट्ट्याच्या कालावधीप्रमाणे दि. १/४/१९८० पासून भरण्यात यावा व प्राधिकरणाच्या भूखंड वितरणाबाबतच्या इतर अटी व शर्तीचे पालन करण्यात यावे.

**Item No.** 19 **Resolution No.** 5117

विषय : जागतिक बँक प्रकल्प राबविण्यासाठी मिळणारे अर्थसहाय्य बंद झाल्यावर उर्वरित कामाची विल्हेवाट लावण्याबाबत कर्मचारी वर्ग स्थानापन्न करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बहुमताने खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.
१) प्रकल्पाची मुंबई गलिच्छ वस्ती व सुधारणा मंडळाच्या अधिकारक्षेत्रात येणारी झोपडपट्टी सुधारणेची उर्वरित सर्व कामे मुंबई गलिच्छ वस्ती सुधारणा मंडळाकडे वर्ग करण्यात यावीत व त्यासाठी लागणारे (प्रपत्र-१) मधील दर्शविण्यात आलेले ३३ अधिकारी/कर्मचारी यांची पदस्थापना मुंबई गलिच्छवस्ती व सुधारणा मंडळाकडे वर्ग करण्यात यावी.
२) महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या अधिकार क्षेत्रात येणारी प्रकल्पाची उर्वरित मिळकत व्यवस्थापन/तांत्रिक/वित्त इ. कामे मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाकडे वर्ग करण्यात यावीत व त्यासाठी लागणारा प्रपत्र-२ मध्ये दर्शविण्यात आलेला विविध संवर्गातील १५३ अधिकारी/कर्मचारी यांना मुंबई गृहनिर्माण मंडळात पदस्थापित करावे.
३) कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या कार्यक्षेत्रात येणारी मिळकत व्यवस्थापन/तांत्रिक/वित्त विभागाची व गलिच्छ वस्ती सुधार मंडळाची उर्वरित सर्व कामे पार पाडण्यासाठी कोंकण मंडळाकडे वर्ग करण्यात यावी व त्यासाठी लागणारा प्रपत्र-३ मध्ये दर्शविण्यात आलेला विविध संवर्गातील २२ अधिकारी/कर्मचारी यांना कोंकण मंडळाकडे पदस्थापना देण्यात यावी.
४) प्रपत्र-४ मध्ये दर्शविण्यात आलेल्या अधिकारी/कर्मचारी वर्गापैकी सहाय्यक अर्थतज्ञ हे पद कमी करून (ज्याची प्राधिकरणास गरज नाही) इतर पदे वाहनचालकांच्या पदासह प्राधिकरणाकडे वर्ग करण्यात यावीत व प्रकल्पातील संगणक म्हाडाकडे वर्ग करण्यात येऊन तो चालू ठेवण्यासाठी लागणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांची पदे निर्माण करून ती भरण्याची कार्यवाही करावी.
५) जागतिक बँक प्रकल्पाच्या माध्यमातून बी.यु.डी.पी. प्रकल्प राबविताना निर्माण झालेली मालमत्ता, दायित्व ज्यामध्ये स्थावर व जंगम मालमत्तेचा समावेश आहे तेसव सर्व प्राधिकरणाकडे वर्ग करण्यात यावे.
६) प्रकल्पातील विविध संवर्गातील एकूण ४५ अधिकारी/कर्मचारी यांना बाब टिप्पणीत प्रस्तावित केल्याप्रमाणे सेवामुक्तीची नोटीस देण्याची कार्यवाही संचालक/जा. बँ. प्र. यांचे स्तरावर करण्यात यावी. भविष्यात गरजेप्रमाणे त्यांच्या वयाचा विचार न करता त्यांना पुनर्नियुक्ती देण्याचा विचार करण्यात येईल.
७) उपरोक्त मुद्दे क्र. १ ते ५ मध्ये प्रस्तावित करण्यात आलेली कार्यवाही करण्यासाठी प्राधिकरण, मुंबई गृहनिर्माण मंडळ, कोंकण गृहनिर्माण मंडळ आणि मुंबई गलिच्छ वस्ती सुधारणा मंडळ यांच्या आस्थापनेवर नियुक्ती असलेली पदे उपयोगात आणावी व अधिकारी/कर्मचाऱ्यांची त्याप्रमाणे त्या पदावर पदस्थापना करावी. ज्या मंडळात पपदे उपलब्ध नसतील त्या त्या संवर्गातील रिक्त पदे प्राधिकरणाच्या व इतर मंडळाच्या आस्थापनेवरून वर्ग करण्यात यावी किंवा प्राधिकरणाच्या आस्थापनेवर राखीव ठेवण्यात आलेली पदे मुक्त करून उपयोगात आणावी, अथवा सम दर्जाची पदे उपलब्ध नसल्यास जागतिक बँक प्रकल्पातील पदे वळती करून त्या पदावर पदस्थापना देण्यात यावी.

८) वर नमूद केलेल्या अधिकारी/कर्मचारी संख्येमध्ये तफावत राहण्याची शक्यता आहे म्हणून निर्णयाची यथायोग्य अंमलबजावणी करताना आवश्यक ते फेरबदल करण्याचे अधिकार उपाध्यक्ष/प्रा. यांना प्रदान करण्यात येत आहेत.
९) स्थायीकरणाची वाट न पाहता ठरावाच्या अनुषंगाने त्वरित कार्यवाही कार्यवाही करण्यात यावी व त्या अनुषंगाने शासनास अहवाल पाठवावा.

**Item No.** **20** **Resolution No.**

विषय : प्राधिकरणाच्या वसाहतीतील शैक्षणिक उपयोगासाठी असलेल्या भूखंडाच्या वाटपाबाबत.

ठराव :

**Item No.** **21** **Resolution No.** **5119**

विषय : सर्व्हे क्र. ३८६ (भाग), मुलुंड (पूर्व) येथील इमारती व भूखंडासाठी स्थावर सुरक्षा एक वर्षाकरिता वाढविणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
सर्व्हे क्र. ३८५ (भाग), मुलुंड (पूर्व) येथील स्थावर व्यवस्थेचे काम दिनांक १३/९/१९९४ ते १२/९/१९९५ या कालावधीसाठी रु. ११,२५०/- प्रतिमाह या दराने व कराराच्या इतर अटी व शर्तीच्या अधीन राहून वाढवून देण्यास मान्यता देण्यात येते.
कार्यवृत्ताच्या स्थायीकरणाची वाट न पाहता या ठरावाच्या अनुषंगाने त्वरित कार्यवाही करण्यात यावी.

**Item No.** **22** **Resolution No.** **5120**

विषय : पंतप्रधान अनुदान प्रकल्प (सध्या राजीव गांधी झोपडपट्टी सुधार व निवारा प्रकल्प) अंतर्गत सर्व्हे क्र. ३४३ (भाग) धारावी येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत बांधलेले गाळे.

अतिरिक्त गाळ्यांविषयी धोरण

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
पंतप्रधान अनुदान प्रकल्पाच्या सर्व्हे क्र. ३४३ (भाग) येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेखाली बांधलेल्या अतिरिक्त गाळ्यांच्या विक्रीबाबत बाब टिप्पणीत नमूद केलेल्या विक्री दराने (रु. १,४००/- प्रति चौ. फू. जोत्याचे क्षेत्रफळ) विक्री करण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.
कार्यवृत्ताच्या स्थायीकरणाची वाट न पाहता या ठरावाच्या अनुषंगाने त्वरित कार्यवाही करण्यात यावी.
बैठकीच्या विषयसूचीवरील विषय संपल्यानंतर उपस्थितांनी आभार प्रदर्शन करून बैठकीचे कामकाज संपल्याचे जाहीर करण्यात आले.

**Meeting No.** 134 **Meeting Date** 17-Oct-19

**Item No.** 1 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दि. ३०-८-१९९४ रोजी झालेल्या १३३ व्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे.

ठराव :

---

**Item No.** 2 **Resolution No.** 5121

विषय : श्शासकीय कर्मचाऱ्यांनी आकस्मिक निकडीच्या प्रसंगी खाजगी रुग्णालयात घेतलेल्या औषधोपचारांच्या खर्चाच्या प्रतिपूर्तीबाबत मार्गदर्शक तत्वे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग क्र. एमएजी/१०९२/१६९२/सीआर-२३३/आरोग्य-७, दिनांक १९.१२.१९९२ व शासन निर्णय क्र. एमएजी-१०९१/३४५६/सीआर-३२०/९१/आरोग्य-७, दिनांक १४.१.१९९३ व शासन निर्णय क्र. एमएजी/१०९१/३४५६/सीआर-३२०/९१/आरोग्य-७, दिनांक २२/४/१९९३ मधील मार्गदर्शक तत्वे सहपत्र 'अ' मध्ये अंतर्भूत करून सदर निर्णयातील अटी व शर्तींच्या अधीन राहून वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्तीची तत्वे प्राधिकरणाच्या अधिकारी/कर्मचारी यांना लागू करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच प्रादेशिक मंडळातील अधिकारी/कर्मचारी यांच्या वैद्यकीय खर्च प्रतिपूर्तीची प्रकरणे मंजूर करण्याचे अधिकार मुख्याधिकारी यांना व प्राधिकरण आणि प्रकल्प यामधील अधिकारी/कर्मचारी यांच्या वैद्यकीय खर्चाची प्रकरणे मंजूर करण्याचे अधिकार सचिव/प्रा. यांना प्रदान करण्यास मान्यता देण्यात येत आहेत.
त्याचप्रमाणे वैद्यकीय खर्च प्रतिपूर्तीची प्रकरणे सहपत्राच्या मार्गदर्शक तत्वात अंतर्भूत होणार नाहीत, याबाबतचे निर्णय घेण्याचे संपूर्ण अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी/प्रा. यांना राहतील.

**Item No.** 3 **Resolution No.** 5122

विषय : श्रीमती जयश्री डोळस, वरिष्ठ लिपिक यांच्या मुलावर केलेल्या मूत्रपिंडारोपणाच्या शस्त्रक्रियेसाठी झालेल्या वैद्यकीय खर्चाची परतफेड करण्याबाबत.

ठराव : विशेष बाब म्हणून एकमताने खालील निर्णय घेतले.
१) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग एमएजी/१०८४/४१५७/सीआर-१५६/पीएच-९ अे, दिनांक २९/४/१९८५ मधील परिच्छेद-५ बी मध्ये नमूद केलेल्या शासन मान्यताप्राप्त रुग्णालयाच्या यादीमध्ये पी. डी. हिंदुजा या रुग्णालयाचा समावेश नसल्याने सदर रुग्णालयात श्रीमती डोळस यांचे मुलावर मूत्रपिंडरोपण शस्त्रक्रियेसाठी व त्या अनुषंगाने वैद्यकीय उपचारासाठी झालेल्या खर्चाची संपूर्ण परतफेड करण्यास विशेष बाब म्हणून मान्यता देण्यात येत आहे.
२) विशेष बाब म्हणून सदर खर्चास मंजूरी देताना भूतपूर्व गृहनिर्माण मंडळ १९६८ मधील २ (इ) (४) मध्ये २१ वर्षाखालील अवलंबित असलेल्या मुलांसाठी वैद्यकीय खर्चाची परतफेड करण्यासाठी अनुज्ञेय ठरविण्यात आलेली वयाची अट, श्रीमती डोळस यांची आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन विशेष बाब म्हणून गुणवत्तेच्या निकषावर शिथिल करण्यास मान्यता देण्यात येत आहे.
३) शासन निर्णय एमएजी/१०९२/१३७९/सीआर-१७४, दिनांक २०.७.१९९२ मधील तरतुदीनुसार मूत्रपिंडरोपण शस्त्रक्रियेसाठी स्वतःचे मूत्रपिंड दान केल्याबद्दल श्रीमती डोळस यांचेसाठी झालेल्या खर्चाची प्रतिपूर्ती करण्यात यावी.
४) शासन निर्णय दिनांक २०.७.१९९२ मधील मूत्रपिंड दान करण्यासाठी करण्यात येणाऱ्या शस्त्रक्रियेसाठी होणारा खर्च प्राधिकरणाच्या अधिकारी/कर्मचारी यांनाही अनुज्ञेय ठरविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** 4 **Resolution No.** 5123

विषय : श्री. एस. जी. मटाई, वरिष्ठ सहाय्यक/प्रा. यांच्या पत्नीच्या आजारासाठी झालेल्या वैद्यकीय खर्चाची परतफेड करण्याबाबत.

ठराव : १) एकमताने निर्णय घेतला की, श्री. एस. जी. मटाई, वरिष्ठ सहाय्यक यांना त्यांच्या पत्नीच्या गर्भपाताच्यावेळी कराव्या लागलेल्या शस्त्रक्रियेसाठी झालेल्या वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती प्राधिकरणाच्या दिनांक २२/४/१९९१ च्या आदेशासोबतच्या सहपत्र 'अ' मधील मार्गदर्शक तत्वांच्या अधीन राहून मंजूर करण्यास विशेष बाब म्हणून मान्यता देण्यात येत आहे.
२) वैद्यकीय नियमावली १९६८ मधील विनियम परिच्छेद-२ (इ) (२)(३) मध्ये दुरुस्ती करण्यासाठी शासनाच्या मंजूरीसाठी प्रस्ताव पाठविण्यात यावा.

**Item No.** 5 **Resolution No.** 5124

विषय : श्री. दि. सु. वैद्य, उपलेखापाल/मुंबई मंडळ यांनी अधिक्षक, मुंबई मंडळ या पदाचे अतिरिक्त कार्यभार सांभाळल्यामुळे अतिरिक्त वेतन मंजूर करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, श्री. वि. सु. वैद्य, उपलेखापाल, मुंबई मंडळ यांनी त्यांच्या स्वतःच्या पदाच्या व्यतिरिक्त अधिक्षक/मुंबई मंडळ या पदाचा अतिरिक्त कार्यभार सांभाळल्याबद्दल त्यांना एक वर्षानंतरचा म्हणजे दिनांक १/४/१९९१ पासून ते दिनांक ११/७/१९९३ पर्यंत (दिनांक १५/६/९२ ते २०/६/९२ हा रजेचा कालावधी वगळून) या वाढीव कालावधीकरिता अधिक्षक या उच्च पदाच्या सुधारित संभाव्य वेतनाच्या १० टक्के दराने किंवा दरमहा रु. ५००/- प्रमाणे एवढ्या मर्यादेपर्यंत अतिरिक्त वेतन मंजूर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** 6 **Resolution No.** 5125

विषय : श्री. फुलचंद मुन्ना सिल्हे, माजी मुकादम, पुणे मंडळ

नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीनंतर केलेल्या नोकरीचा कालावधी रीतसर करण्याबाबत.

ठराव : बाब टिप्पणीतील परिस्थितीचा विचार करून प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला की, श्री. फुलचंद मुन्ना सिल्हे, सेवानिवृत्त माजी मुकादम/पुणे मंडळ यांना दिनांक ३१/७/१९८६ (म. नं.) रोजी सेवानिवृत्त करून त्यांच्या सेवानिवृत्तीनंतरचा दिनांक १/८/१९८६ ते दिनांक २५/५/१९८७ (म.नं.) पर्यंत ९ महिने व २५ दिवस अधिक झालेला सेवेचा कालावधी पुनर्नियुक्ती म्हणून मानण्यात यावा. त्या कालावधीसाठी त्यांना पुनर्नियुक्तीचे वेतन व इतर फायदे लागू असलेल्या नियमानुसार देण्यात यावेत.

**Item No.** 7 **Resolution No.** 5126

विषय : प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना स्थानिक पूरक भत्ता व घरभाडेभत्ता देण्यासाठी वर्गीकृत शहरे/गावे यांचे पुनर्वर्गीकरण.

ठराव : शासनाच्या वित्त विभागाच्या दि. २/९/१९९३ च्या निर्णयातील तरतुदी प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना त्यातील तरतुदींच्या अधीन राहून लागू करण्यास उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी/प्रा. यांच्या मान्यतेने निर्गमित केलेल्या आदेश क्र. एमएच/एएलएच-१०८७/२८०६/(४३२)/प्र. १४, दिनांक ७/२/१९९४ अन्वये केलेल्या कार्यवाहीची प्राधिकरणाने नोंद घेतली.

**Item No.** 8 **Resolution No.** 5127

विषय : श्रीमती गुलाबी शेट्टी यांना अंधेरी, डी. एन. नगर, स. क्र. १०५-अ येथे दिलेल्या पर्यायी जागेबाबत.

ठराव : श्रीमती गुलाबी एन. शेट्टी यांचे सदरहू जागेवर जितक्या आकारमानाचे झोपडे होते, तितक्याच आकारमानाचा भूखंड तिला वितरित करण्यात करण्यात यावा, असा प्राधिकरणाने निर्णय घेतला.

**Item No.** 9 **Resolution No.** 5128

विषय : मौजे येरवडा, तालुका-पुणे येथील स. क्र. १०-ब अधिक १४-अ अधिक १६ अधिक १७-ब अधिक १८-ब अधिक २५-ब अंतर्गत सहकारी भूखंड क्र. २ 'महमद सिद्दीकी शहाबाद सहकारी गृहरचना संस्था मर्यादित' या संस्थेस देणेबाबत.

ठराव : निर्णय घेतला की, ३२ अतिक्रमणदारांना पर्यायी जागा देण्यासाठी आवश्यक तेवढ्या क्षेत्राविषयीचा सविस्तर प्रस्ताव, प्रकल्प अहवालासह पुणे मंडळाने प्राधिकरणाकडे सादर करावा व त्या प्रस्तावावर मा. उपाध्यक्ष/प्रा. यांनी नियमानुसार योग्य तो निर्णय घ्यावा आणि अशी प्रकरणे भविष्यात उद्‌भवणार नाहीत याची पुणे मंडळाने दक्षता घ्यावी.

**Item No.** 10 **Resolution No.** 5129

विषय : नागपूर विनाकी येथील ३२४ गाळे या अल्प उत्पन्न गट योजनेतील गाळेधारकांनी गाळ्यांच्या किंमतीच्या प्रारंभिक हप्त्याची उर्वरित ५० टक्के रक्कम दोन वर्षांच्या मुदतीच्या आत भरणा न केल्याने त्यावर व्याज आकारण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, प्राधिकरणाच्या दि. ३१/१२/९३ च्या ५०२८ क्रमांकाच्या ठरावान्वये जे गाळेधारक आरंभी भरावयाच्या रकमेपैकी उर्वरित रक्कम दिनांक ३१/३/१९९४ च्या पूर्वी भरतील त्यांचेकडून नियमानुसार १६ टक्के दराने व्याज न घेता ते १०.५० टक्के या योजनेच्या दराने घ्यावे, असा निर्णय घेतलेला आहे. कमी व्याजाने पैसे स्वीकारण्यासाठी देण्यात आलेली दिनांक ३१/३/१९९४ ही मुदत दिनांक ३१/३/१९९५ पर्यंत वाढवून देण्यास मान्यता देण्यात येते. तसेच प्राधिकरणाच्या मूळ ठरावात विशेष काही किरकोळ स्वरुपाची दुरुस्ती करावयाची असेल व त्यामुळे प्राधिकरणाच्या मूळ ठरावात विशेष स्वरुपात बदल होत नसेल तर अशा प्रकरणी योग्य ती दुरुस्ती करण्याबाबत तात्काळ निर्णय घेण्याचे अधिकार मा. उपाध्यक्ष/प्रा. यांना प्रदान करण्यास मान्यता देण्यात येते. मात्र त्यानंतर ती बाब प्राधिकरणाच्या बैठकीपुढे ठेवून त्यास प्राधिकरणाची कार्योत्तर मान्यता घेणे आवश्यक आहे. सदर ठरावाची आगाऊ बैठकीत स्थायीकरणाची वाट न पाहता अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्यात येते.

**Item No.** 11 **Resolution No.** 5130

विषय : एम. आय. डी. सी., चंद्रपूर येथे नागपूर मंडळाने बांधलेल्या व मागणी नसलेल्या ५८ एम. आय. जी. अधिक २९ एल. आय. जी. गाळ्यांच्या वाटपाबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, एम. आय. डी. सी., चंद्रपूर येथे नागपूर मंडळाने बांधलेले मध्यम उत्पन्न गट व अल्प उत्पन्न गटाच्या गाळ्यांना सामान्य जनतेकडून मागणी नाही व भविष्यात मागणी येण्याची शक्यता कमी वाटत असल्यामुळे या गाळ्यांच्या बांधकामापोटी प्राधिकरणाचा गुंतून पडलेल्या निधीची सोडवणूक करण्याच्या दृष्टीने या गाळ्यांचे वाटप चंद्रपूर येथील मे. निपन डेन्रो इस्पात लि. किंवा लॉयड मेटल्स किंवा त्या भागात असणाऱ्या/येणाऱ्या औद्योगिक कंपन्यांशी वाटाघाटी करून या मागणी नसलेल्या गाळ्यांची विक्री करणे किंवा भाड्याने देणे तसेच विक्र किंमत किंवा भाड्याचे दर अंतिमरित्या निश्चित करण्याचे अधिकार प्राधिकरणाचे उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी/प्रा. यांना देण्यात येत आहेत.

| **Item No.** | **12** | **Resolution No.** | **5131** |
|---|---|---|---|

विषय : मुंबई मंडळाच्या नेहरू नगर, कुर्ला (पूर्व) येथील वसाहतीमध्ये विद्युत सब-स्टेशनकरिता २० फूट बाय २० फूट क्षेत्रफळाचा भूखंड वितरण करणेबाबत.

ठराव : मुंबई मंडळाच्या दिनांक २८.१.१९९४ रोजीच्या बैठक क्र. १५५ मध्ये मुंबई मंडळाने केलेल्या ठराव क्र. १५५/१९४८ च्या अनुषंगाने नेहरू नगर, कुर्ला (पू) या मंडळाच्या जुन्या वसाहतीतील विद्युत पुरवठ्यात सुधारणा होण्याची आवश्यकता लक्षात घेऊन 'मुंबई उपनगर विद्युत पुरवठा उपक्रमास' २० फूट बाय २० फूट क्षेत्रफळाचा भूखंड 'विद्युत उपकेंद्रासाठी' नेहमीच्या नियत शर्ती व अटीनुसार नाममात्र १/- रुपया वार्षिक भाड्याने देण्याबाबतचा मुंबई मंडळाचा प्रस्ताव मान्य करण्यात येत आहे.

| **Item No.** | **13** | **Resolution No.** | **5132** |
|---|---|---|---|

विषय : मुंबईतील विविध वसाहतीतील विविध योजनांतर्गत दीर्घकाळापासून रिक्त असलेल्या गाळ्यांचा वापर 'सेवानिवासस्थान' म्हणून करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेण्यात आला की, मुंबईतील विविध वसाहतीतील विविध योजनांतर्गत दीर्घकाळापासून विखुरलेल्या स्वरुपात रिक्त असलेल्या व बाब टिप्पणीतील तपशीलांकित केलेल्या ९२ गाळ्यांची म्हाडाच्या प्रतिक्षायादीवरील कर्मचारी/अधिकाऱ्यांना प्राधान्यावर सोडत पद्धतीने मालकी हक्काने विहित अटी व शर्तीच्या अधीन राहून विक्री करण्यास मान्यता देण्यात येत आहे. या योजनेबाबतचे मार्गदर्शक तत्व निश्चित करण्याचे अधिकार उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी/प्रा. यांना देण्यात येत आहे.

| **Item No.** | **14** | **Resolution No.** | |
|---|---|---|---|

विषय : नागपूर मंडळाच्या कामकाजाचा आढावा माहितीसाठी.

ठराव :

| **Item No.** | **15** | **Resolution No.** | **5133** |
|---|---|---|---|

विषय : गलिच्छ वस्ती निर्मूलन योजनेखाली भूतपूर्व गृहनिर्माण मंडळाला दिलेले कर्ज व भांडवली अर्थसहाय्य (कॅपिटल सब्सिडी) जास्त प्राप्त झालेल्या भांडवली अर्थसहाय्याच्या रकमेवरील दंडनीय व्याज शासनास प्रदान करणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, शासन स्तरावर झालेल्या विलंबाबदल म्हाडाला दंडनीय व्याज लावू नये व याबाबत शासनाकडे पाठपुरावा करावा व शासनाकडून निर्णय प्राप्त होईपर्यंत दंडनीय व्याज शासनास प्रदान करण्याची कार्यवाही स्थगित ठेवावी.

| **Item No.** | **16** | **Resolution No.** | |
|---|---|---|---|

विषय : नाशिक मंडळाच्या कामकाजाचा आढावा माहितीसाठी.

ठराव :

**Item No.** **17** **Resolution No.** **5134**

विषय : हुडको अर्थसहाय्यित योजनांसाठी दिनांक १/४/१९९४ पासून अंमलात आणलेली सुधारित प्रमाणपद्धती.

ठराव : हुडको अर्थसहाय्यित दिनांक १/४/१९९४ पासून अंमलात आलेली सुधारित प्रमाणपद्धती संबंधी प्राधिकरणाने नोंद घेतली व प्राधिकरण राबवित असलेल्या निरनिराळ्या उत्पन्न गटातील योजनांसाठी कौटुंबिक मासिक उत्पन्नाचे दर, गाळ्यांची/भूखंडांची कमाल किंमत/कर्जाची कमाल रक्कम, व्याजाचा दर, परतफेडीचा कालावधी यासंबंधित हुडकोची १/४/१९९४ पासून अस्तित्वात आलेली प्रमाणपद्धती प्राधिकरणाने अवलंबन करण्यास मान्यता दिली.

---

**Item No.** **18** **Resolution No.**

विषय : 'गृहनिर्माण महाप्रकल्प'

दिनांक ३१/८/१९९४ पर्यंतचा प्रगती अहवाल.

ठराव :

---

**Item No.** **19** **Resolution No.** **5135**

विषय : स. क्र. १८१ (भाग) ९० फुटी रस्ता धारावी येथे २.५ चटईक्षेत्र निर्देशकांचा वापर करून राजीव गांधी झोपडपट्टी सुधार व निवारा प्रकल्पाच्या पुनर्बांधणी योजनेअंतर्गत नियोजित गृहनिर्माण संस्था.

ठराव : संचालक, राजीव गांधी प्रकल्प यांनी बाब टिप्पणीत उल्लेखिलेल्या चारही योजनांसाठी देण्यात आलेल्या प्रशासकीय मान्यतेबद्दलची प्राधिकरणाने नोंद केली.
मा. अध्यक्ष/प्राधिकरण यांच्या परवानगीने आयत्यावेळी विचारार्थ घेण्यात आलेले विषय.

---

**Item No.** **20** **Resolution No.** **5136**

विषय : श्री. निंबुलाल आर. वरई या अपंग व्यक्तीस प्रतिक्षानगर, सायन बस डेपोजवळ दूधविक्री केंद्राच्या बाजूला टेलिफोन बुथसाठी ६ बाय ४ फुटाचा भूखंड देण्याबाबत.

ठराव : उपरोक्त विषयाच्या प्रस्तावावर सहानुभूतीपूर्वक विचार करून प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला की, श्री. निंबुलाल आर. वरई या अपंग व्यक्तीस प्रतिक्षानगर, सायन बस डेपोजवळ दूधविक्री केंद्राच्या बाजूला टेलिफोन बुथ ठेवण्यासाठी ६ फूट बाय ४ फूट आकारमानाचा भूखंड वितरित करण्याबाबत मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाने ठराव क्र. १५९/१९९१ दिनांक ३०.६.१९९४ अन्वये घेतलेल्या निर्णयास प्राधिकरण या ठरावाद्वारे मान्यता देत आहे. ही मान्यता प्रचलित अटी व शर्तींच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

---

**Item No.** 21 **Resolution No.** 5137

विषय : अभ्युदयनगर, काळाचौकी या वसाहतीतील शासकीय कर्मचाऱ्यांच्या सेवानिवासस्थान इमारतीमध्ये रहाणाऱ्या औद्योगिक कामगारांना गाळ्यांची/मालकी हक्काने विक्री करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, मुंबई मंडळाच्या अभ्युदयनगर, काळाचौकी येथील शासकीय कर्मचाऱ्यांना सेवानिवासस्थाने म्हणून वाटप केलेल्या अर्थसहाय्यित औद्योगिक गृहनिर्माण योजनेतील इमारत क्र. २, ४, ५, ६, १३, १७, १८, २३, २४, २६, २७, व २९ ते ३३ या बहुमजली इमारतीत राहणाऱ्या (२२१) औद्योगिक कामगारांना त्यांचे सध्या राहत असलेले गाळे शासनाच्या दिनांक ५/४/१९७९ च्या निर्णय क्र. सार्वजनिक बांधकाम विभाग व गृहनिर्माण विभाग क्र. एचएससी/११७१/३२७९१/(६८४) डेस्क-१९ नुसार दि. १/४/१९८० पासून मालकीहक्काने विक्री करण्यास मान्यता देण्यात येत आहे. या गाळ्यांची विक्री पुढील अटी विचारात घेऊन करण्यात यावी.

१) शासन पत्र क्र. एचएसजी/११७९/१०२७३/डी-५, दि. ७.८.१९८१ नुसार इमारतींची दुरुस्ती झालेली असल्यास वटाव १० टक्के द्यावा. दुरुस्ती झालेली नसल्यास वटाव सरसकट ३० टक्के द्यावा. मुंबई मंडळाने ही बाब तपासून त्यानुसार वटावाची सवलत द्यावी.

२) विक्रीची किंमत अधिक थकबाकी मिळून भरावयाच्या एकूण रकमेपैकी सुरुवातीस भरावयाच्या ३० टक्के रकमेवर व्याज आकारू नये. तथापि देकारपत्र निर्गमित केल्यानंतर ठरलेल्या मुदतीत ही रक्कम भरली नाही तर विलंब कालावधीसाठी त्या रकमेवर विहित दराने व्याज आकारणी करून त्यासह एकूण रक्कम वसूल करावी.

३) सुरुवातीस भरावयाची विक्री किंमतीची ३० टक्के रक्कम वजा करता उर्वरित ७० टक्के (विक्रीची किंमत) १५ वर्षांच्या माडेखरेदी हप्त्याने मार्च, १९९५ पर्यंत भरण्यास अनुमती द्यावी.

४) विक्री योजनेच्या अन्य अटी व शर्ती त्याच राहतील.

---

**Item No.** 22 **Resolution No.**

विषय : भूकंपग्रस्त पुनर्वसन प्रकल्पाबाबतचा अद्यावत अहवाल.

ठराव :

---

**Item No.** 23 **Resolution No.** 5138

विषय : प्राधिकरणातर्फे नजिकच्या भविष्यकाळात हाती घेतल्या जाणाऱ्या गृहनिर्माण महाप्रकल्पासाठी बांधकाम व्यवस्थापन सल्लागारांची अद्यावत निवडसूची तयार करणेबाबत समिती गठित करणे.

ठराव : मुंबई मंडळाने बांधकाम व्यवस्थापन सल्लागारांची यादी अद्यावत करण्यासाठी मुंबई मंडळाने नव्याने मागविलेल्या अर्जावर विचार करून प्राधिकरणास योग्य त्या शिफारसी करण्यासाठी खालील सदस्यांची समिती गठित करण्यात यावी.

१) मुख्य अभियंता/प्रा. (सर्वसाधारण)
२) मुख्य अभियंता/प्रा. (मुंबई)
३) मुख्याधिकारी/मुंबई मंडळ
४) श्री. व. द्वा. देसाई (भूतपूर्व मुंबई मंडळाचे सदस्य व बाहेरील तांत्रिक सल्लागार)
५) वरिष्ठ वास्तुशास्त्रज्ञ/प्रा.
६) उपमुख्य अभियंता/महाप्रकल्प/मुंबई मंडळ, सदस्य, सचिव.

श्री व. द्वा. देसाई यांस या समितीवर काम करणे व मार्गदर्शन करण्यासाठी त्यांची फी व इतर अनुषंगिक कार्य (वाहनभत्ता इ.) मंजूर करण्याचा अधिकार उपाध्यक्ष/प्रा. यांना प्राधिकरण देत आहे. तसेच वरील सदस्यांशिवाय काही व्यावसायिक सल्लागारांचा समावेश करावयाचा असल्यास मुख्य अभियंता/प्राधिकरण (मुंबई) यांनी उपाध्यक्ष/प्रा. व अध्यक्ष/प्रा. यांचेशी विचारविनिमय करावा व त्यानुसार समिती गठित करावी.

आलेले सीलबंद लखोटे उघडणे, अर्जाची प्राथमिक छाननी करून ठेवणे व माहिती गुणवत्ता तक्त्यात भरणे यासाठी उपाध्यक्ष/प्रा. यांनी उपमुख्य अभियंता/महाप्रकल्प, मुंबई मंडळ यांना याबाबत प्रदान केलेल्या अधिकारासही प्राधिकरण कार्योत्तर मंजूरी देत आहे.

---

**Item No.** 24 **Resolution No.**

विषय : 'गृहनिर्माण महाप्रकल्प'

दि. ३०.९.१९९४ पर्यंत प्रगती अहवाल.

ठराव :

**Item No.** 25 **Resolution No.** 5139

विषय : जुहू-विलेपार्ले बस स्टेशन परिसरातील भास्कर गॅरेज जवळील ३०० चौ. मी. योजना शेल्बीक गॅस एजन्सीस यांना गॅस सिलेंडर गोडाऊनसाठी वितरण करणेविषयी.

ठराव : या विषयावर चर्चेअंती प्राधिकरणाने मुंबई मंडळाच्या शेल्बीक गॅस एजन्सीला गॅस सिलेंडर गोडाऊनसाठी जागा वितरित करण्याच्या मूळ प्रस्तावात बदल करून प्रस्तावात जागेच्या परिसरातील रहिवाशांचे आक्षेप अथवा हरकत नसल्यास व तसेच ज्वालाग्राही पदार्थ/वस्तूंचा साठा करणे इत्यादी बाबतच्या प्रचलित नियमान्वये व एक्स्प्लोजिव्हज् ॲक्टनुसार संबंधित अर्जदाराने परवानगी घेतली आहे किंवा नाही, याची खात्री करून घ्यावी. सध्या रस्त्यालगत गॅस सिलेंडर ठेवली जात असल्यामुळे तात्पुरती सोय म्हणून प्रस्तुत जागेवर कोणताही हक्क प्रस्थापित केला जाणार नाही या अटीसह इतर विहित अटी व शर्तीच्या अधीन राहून अकरा महिन्यांच्या भाडेतत्वावर तात्पुरती परवानगी देण्यात यावी.

**Item No.** 26 **Resolution No.**

विषय : ज्ञानेश्वर नगर, शिवडी, वडाळा येथील भाडेकरूंच्या ज्ञानेश्वरनगर रामन सहकारी गृहनिर्माण संस्थेस भूखंड देणेबाबत.

ठराव :

**Item No.** 27 **Resolution No.**

विषय : मुंबई घरदुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या अंतर्गत बांधण्यात येणाऱ्या पुनर्रचित इमारतीमधील अतिरिक्त गाळ्यांचे वाटप.

ठराव :

**Meeting No.** 135 **Meeting Date** 03-Jan-19

**Item No.** 1 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दि. १७-१०-१९९४ रोजी झालेल्या १३४ व्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे.

ठराव :

**Item No.** 2 **Resolution No.** 5140

विषय : श्री. डी. पी. कांबळे, माजी आमदार यांना उन्नतनगर, गोरेगाव येथे इ. क्र. ४९ व ५६ च्या मागे ८ फूट बाय ८ फूट आकारमानाचा भूखंड शिलाई काम अथवा इस्त्री कामाच्या वापरासाठी देणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
मुंबई मंडळाने श्री. डी. पी. कांबळे, माजी आमदार यांना उन्नत नगर, गोरेगाव येथील इमारत क्र. ४९ व ५६ च्या मागे असलेला ८ फूट बाय ८ फूट क्षेत्रफळाचा भूखंड देण्याची केलेली शिफारस विचारात घेऊन श्री. डी. पी. कांबळे यांना सदर भूखंड नेहमीच्या विहित अटी व शर्ती तसेच खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता केल्यास भाडेपट्ट्याने वितरण करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१) संबंधित इमारत क्र. ४९ व ५६ च्या सहकारी गृहनिर्माण संस्थांकडून तत्संबंधीचा ना-हरकत दाखला अर्जदाराने प्रथम सादर करावा.
२) प्रचलित किंमती विषयक धोरणाप्रमाणे किंमत आकारावी.
३) मुंबई महानगरपालिकेकडून संबंधित व्यवसाय चालविण्यासाठी ना हरकत दाखला अर्जदाराने मिळवावा.
४) वरील १ ते ३ बाबींची पूर्तता केल्यानंतरच जमिनीचा ताबा देण्यात यावा.

**Item No.** 3 **Resolution No.** 5141

विषय : ज्ञानेश्वर नगर, शिवडी, वडाळा येथील उच्च उत्पन्न योजनेअंतर्गत ज्ञानेश्वरी को-ऑप-हो. सोसायटी (म) यांना वितरीत केलेल्या गाळ्यांच्या किंमतीबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
ज्ञानेश्वर नगर, शिवडी-वडाळा येथील ज्ञानेश्वरी को-ऑप-हाऊसिंग सोसायटी (म) या संस्थेस देण्यात आलेल्या उच्च उत्पन्न गटाच्या ४० गाळ्यांचे वाटप करण्यास ३ वर्षे विलंब लागला त्यात गाळेधारकांचा काहीच दोष नसल्यामुळे गाळ्यांच्या विक्री किंमती निश्चित करताना विलंबाच्या ३ वर्षाच्या कालावधीवर लावण्यात आलेले व्याज माफ करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| **Item No.** | **4** | **Resolution No.** | **5142** |
|---|---|---|---|

विषय : माहिम येथील मच्छिमार वसाहतीतील गलिच्छ वस्ती निमूर्लन योजनेअंतर्गत गृहनिर्माण मंडळाने बांधलेल्या इमारत क्र. २२ मधील अशासकीय कर्मचाऱ्यांना सेवानिवासस्थान म्हणून दिलेले गाळे मालकी हक्काने देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
माहिम येथील मच्छिमार नगर या वसाहतीतील इमारत क्र. २२ मध्ये शासकीय कर्मचाऱ्यांना सेवानिवासस्थान म्हणून दिलेले ४० गाळे शासनाने दिलेल्या त्यांच्या दिनांक ९-३-१९९३ च्या आमाप - १९८९/५५३६/कार्यासन-४, क्रमांकाच्या आदेशानुसार विक्री करण्यास मान्यता देण्यात येते. या गाळ्यांच्या थकबाकीपोटी येणे असलेली रक्कम शासनाच्या संबंधित विभागाकडून वसूल करण्याची कार्यवाही मुंबई मंडळाने अग्रक्रमाने करावी. तथापि, ही रक्कम शासनाने न दिल्यास ती देण्याची जबाबदारी संबंधित गाळेधारकांची किंवा गाळेधारकांच्या संस्थेची राहील अशी अट विक्री देकारपत्रात घालण्यात यावी.

| **Item No.** | **5** | **Resolution No.** | **5143** |
|---|---|---|---|

विषय : पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या अखत्यारीतील लोकमान्यनगर, पुणे या वसाहतीतील समाज मंदिराच्या विक्रीबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, लोकमान्य नगर, पुणे या वसाहतीमध्ये असलेली समाज मंदिराची इमारत जशी आहे त्या स्थितीत खालील अटींच्या अधीन राहून विक्री करण्यास मान्यता देण्यात येते.

१) या इमारतींची विक्री तेथील भाडेकरूंच्या सहकारी संस्थांच्या १८५० च्या सोसायटीज रजिस्ट्रेशन कायदा किंवा १९५० च्या सार्वजनिक विश्वत कायद्याखाली नोंदणीकृत असलेल्या महासंघास करावी.

२) महासंघास ती नको असल्यास त्यांचे ना-हरकत प्रमाणपत्र घेऊन त्याची विक्री १८६० च्या सोसायटीज रजिस्ट्रेशन कायदा किंवा १९५० च्या सार्वजनिक विश्वस्त कायद्यानुसार नोंदणीकृत वसाहतीमधील स्थानिक रहिवासी संघ/संस्थांना जाहीररीत्या विहित पद्धत अनुसरून करावी.

३) प्राधिकरणाने त्यांच्या दिनांक २/६/१९९३ च्या ४०७६ क्रमांकाच्या ठरावान्वये मुंबईतील कार्यालयीन इमारती विक्री करण्यासाठी मूळ भाडेकरूंना १५० प्रति चौ. फू. या सुधारीत दरास मान्यता दिली आहे. त्या दराने इमारतीची विक्री किंमत काढावी व त्या किंमतीत इमारतीखालील जमिनीचे क्षेत्र व देण्यात येणाऱ्या अनुलग्न जमिनीच्या क्षेत्राची किंमत व तिच्या विकासाचा खर्च योजनेच्या व्याजाच्या दराने अद्यावत करून येणारी जमिनीची किंमत वरील किंमतीत मिळून येणारी रक्कम संबंधित संस्थेकडून समाजमंदिराची विक्रीची किंमत म्हणून घ्यावी.

४) या इमारतीचा वापर वसाहतीमधील तेथील रहिवाश्यांच्या धार्मिक, सांस्कृतिक, लग्नविधी इ. प्रयोजनासाठी भाड्याने देण्यासाठी करण्यात यावा.

५) वार्षिक रु. १/- याप्रमाणे नाममात्र भुईभाडे घ्यावे.

**Item No.** 6 **Resolution No.** 5144

विषय : नागरी नूतनीकरण योजनेअंतर्गत पुनर्रचित केलेल्या 'शिवस्मृती' इमारतीतील (मुंबई सेंट्रल) अतिरिक्त अनिवासी गाळ्यांच्या वाटपाबाबत व किंमतीबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, 'शिवस्मृती' सहकारी संस्थेने ग्राहक संस्था स्थापन करून ती नोंदणीकृत करून घ्यावी व अधिकृत शिधावाटप नियंत्रकामार्फत प्राधिकृत शिधावाटप दुकान म्हणून मान्यताप्राप्त करून घ्यावी. आणि नंतरच या अतिरिक्त अनिवासी गाळ्याचे वाटप त्यांना करण्यात यावे.
२. सदरहू अनिवासी गाळ्यांची विक्री किंमत आजच्या सुधारीत बाजारभावाने निश्चित करून त्याप्रमाणे आकारण्यात यावी.

**Item No.** 7 **Resolution No.**

विषय : पुनर्रचित इमारतीतील निवासी/अनिवासी गाळ्यांची हस्तांतरणे नियमित करण्यासाठी मुदतवाढ देण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 8 **Resolution No.** 5145

विषय : सिटी स. नं. २०७२१, औरंगाबाद या जमिनीच्या मूल्यांकनाबाबत जमीनमालकांची व्याजाबाबतची मागणी.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, औरंगाबाद येथील सि. स. क्र. २०७२१ यामधील ज्या ०.५० हेक्टर जादा जमिनीचा दर ट्रीब्युनलच्या निवाड्याानुसार रु. ३६० प्र. चौ. मी. निश्चित करण्यात आलेला आहे. या जमिनीचा सदरहू दराने येणाऱ्या एकूण किंमतीवर दि. ५-३-१९८१ पासून म्हणजे प्रत्यक्ष ताबा घेतलेल्या दिनांकापासून म्हाडा अधिनियमाचे ४८ मधील तरतुदीनुसार व्याजाची रक्कम जमीन मालकास अदा करण्यास शासनाची पूर्वपरवानगी घेण्याच्या अटीवर मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** 9 **Resolution No.**

विषय : पान्यम सिमेंट कंपनीविरुद्ध रु. ४,६८,४१२/- इतक्या रकमेच्या वसुलीकरीता दाखल केलेल्या विशेष दिवाणी दावा क्र. २१२/९१ मध्ये तडजोड करण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 10 **Resolution No.** 5146

विषय : दिंडोशी, मालाड येथे उच्च उत्पन्न गट योजनेअंतर्गत ५६ गाळ्यांचे बांधकाम निविदा स्वीकृतीसाठी विचार करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, दिंडोशी, मालाड येथील उच्च उत्पन्न गट योजनेअंतर्गत ५६ गाळ्यांच्या बांधकामासाठी मागविण्यात आलेल्या निविदेमध्ये नवीन स्पेसिफिकेशन आणि सुधारीत डिझाईन तसेच नकाशे यामध्ये आवश्यक ते फेरबदल करण्यात येऊन, नवीन प्रकल्प तयार करण्यात येऊन पुन्हा निविदा मागविण्यात मान्यता देण्यात येत आहे.

| **Item No.** | **11** | **Resolution No.** | **5147** |
|---|---|---|---|

विषय : पुनर्वसन योजना भूकर क्र. १५७ कांदिवली (प) येथील स्थावर व जंगम मालमत्तेच्या सुरक्षा व्यवस्थेसाठीचा कालावधी वाढवून मिळणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, राजीव गांधी झोपडपट्टी सुधार व निवारा प्रकल्पाच्या भूकर क्र. १५७ कांदिवली (प) येथील गलिच्छ वस्ती पुनर्वसन योजनेअंतर्गत बांधलेल्या गाळ्यांपैकी अतिरिक्त गाळे तसेच विकसित भूखंड योजनेकरीता दिलेल्या मलनिस्सारण, पाणी पुरवठा व्यवस्था, रस्ते, गटारे व या व्यतिरिक्त असलेला रिकामा भूखंड इत्यादी सुरक्षेसाठी लागणारे सुरक्षाव्यवस्थेकरीता दिनांक १-१०-१९९४ ते ३०-९-१९९५ पर्यंतच्या कालावधीसाठी लागणारे रु. ९६,००० (रु. शहाण्णव हजार मात्र) इतक्या खर्चास मान्यता देण्यात येत आहे.
सदर खर्चाची रक्कम ही योजनेच्या एकूण खर्चास समाविष्ट करून राजीव गांधी प्रकल्पाच्या निधीतील शीर्षक खाते क्र. १२५ अन्वये उपलब्ध करण्यात येईल. त्यामुळे सदर ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता याबाबतची कार्यवाही त्वरीत सुरू करावी.

| **Item No.** | **12** | **Resolution No.** | **5148** |
|---|---|---|---|

विषय : मंत्रालयातील सहाय्यक व राज्य शासनाकडील लघुलेखन (नि. श्रे.) यांना मंजूर केलेले रु. १६४०-२९०० ही सुधारीत वेतनश्रेणी प्राधिकरणातील वरिष्ठ सहाय्यक व लघुलेखक (नि. श्रे.) या संवर्गातील कर्मचाऱ्यांना लागू करणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, शासनाच्या वित्त विभागाने दिनांक २२/४/१९९४ च्या वेपुर - १२९०/प्र.क्र.७४/सेवा - १० या क्रमांकाच्या शासन निर्णयानुसार मंत्रालयातील सहाय्यक व राज्य शासनाकडील लघुलेखक (निम्नश्रेणी) या पदांना दिनांक १ जानेवारी, १९८६ पासून मंजूर केलेले रु. १६४०-६०-२६००- द.रो. - ७५-२९०० ही पुन्हा सुधारीत वेतनश्रेणी प्राधिकरणातील लघुलेखक (नि. श्रे.) या संवर्गास उक्त शासन निर्णयामधील अटी व शर्तीच्या अधीन राहून लागू करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच प्राधिकरणातील अधिक्षक/सहाय्यक मिळकत व्यवस्थापन व लेखापाल (वर्ग-२) व संवर्गाच्या रु. १६४०-२९०० या वेतनश्रेणीत पुन्हा सुधारणा करण्यात आली नसल्याने तूर्त वरीष्ठ सहाय्यक आणि विधी सहाय्यक या संवर्गास उपरोक्त वेतनश्रेणी देण्याचा प्रश्न प्रलंबित ठेवून अधिक्षक/सहाय्यक मिळकत व्यवस्थापक व लेखापा, वर्ग-२ या संवर्गास रु. २०००-३२०० ही पुन्हा सुधारीत वेतनश्रेणी मंजूर करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यासाठी व त्याबरोबर मंत्रालयातील सहाय्यकांना मंजूर करण्यात आलेली रु. १६४०-२९०० ही पुन्हा सुधारीत वेतनश्रेणी प्राधिकरणातील 'विधी सहाय्यक' संवर्गास देण्याबाबत शासनाचे मार्गदर्शन मिळविण्यासाठी मान्यता देण्यात येत आहे.

| **Item No.** | **13** | **Resolution No.** | |
|---|---|---|---|

विषय : प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना दि. १/७/१९९४ पासून सुधारीत दराने महागाई भत्ता देण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 14 **Resolution No.** 5149

विषय : सफाई कामगारांच्या ताब्यातील मुंबईमधील विविध वसाहतीतील सेवानिवासस्थाने (१५६ गाळे) विक्री करण्याबाबत.

ठराव : एकमताने खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून मुंबई मंडळाच्या अखत्यारीत असलेल्या विविध वसाहतींमधील १५६ गाळ्यांपैकी १०५ गाळ्यांमध्ये रहात असलेल्या सफाई कामगारांना हे गाळे मालकी हक्काने विक्री करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१) एखाद्या इमारतीत एखाद-दुसरा गाळा सेवानिवासस्थान म्हणून दिलेला असल्यास अशा तुटकपणे दिलेल्या गाळ्यांची विक्री कर्मचाऱ्यांना दिलेल्या गाळ्यांचाही समावेश असावा. ~~मात्र अशा कर्मचाऱ्यांची~~ प्राधिकरणात २० वर्षे सेवा झाली असली पाहिजे. ज्यांची किमान २० वर्षे सेवा झालेली नाही त्यांना किमान तेवढी सेवा झाल्यानंतर गाळ्यांची विक्री करण्यात यावी.

२) ज्या ठिकाणी एखाद्या इमारतीतील सर्व गाळे सेवानिवासस्थाने म्हणून देण्यात आले आहेत ते गाळे विकण्यात येऊ नयेत. मध्यम उत्पन्न गट व उच्च उत्पन्न गट यांच्यासाठी बांधलेल्या इमारतीतील सेवानिवासस्थाने म्हणून दिलेले गाळेदेखील तुटकपणे दिलेले असले तरी ते विकण्यात येऊ नयेत.

३) ज्या कर्मचाऱ्याला सेवानिवास्थान म्हणून दिलेला गाळा विकण्यात आला आहे त्याला प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांसाठी असलेले २ टक्के राखीव गाळे/भूखंड मिळण्याकरीता अपात्र समजण्यात यावे किंवा प्राधिकरणाकडून कर्मचाऱ्यांना वाटप करण्यात यावयाच्या भूखंडाच्या बाबतीत सहकारी संस्थांना समासद म्हणून नोंदवून घेण्यात अपात्र समजण्यात आवे.

४) ज्या ठिकाणी सेवानिवास्थाने कार्यालयीन इमारतीत आहेत, ती कार्यालयीन इमारतींच्या विक्रीसाठी प्राधिकरणाने घालून दिलेल्या मार्गदर्शक सूचनांस अनुसरून विकण्यात यावीत.

५) गलिच्छ वस्ती निमूर्लन योजनेखालील इमारतीत सेवानिवासस्थाने म्हणून दिलेले गाळे सध्या विकण्यात येऊ नयेत. या गाळ्यांच्या विक्रीच्या प्रश्नावर या योजनेखालील इमारतींची विक्री करण्याच्या संबंधात शासनाचे आदेश प्राप्त झाल्यानंतर निर्णय घेण्यात यावा.

६) सेवानिवासस्थानांची विक्री प्रत्यक्ष किंमत आकारून करण्यात यावी. औद्योगिक कामगार व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक यांच्यासाठी बांधलेल्या गाळ्यांची विक्रीची किंमत काढण्यासाठी जी तत्वे निश्चित करण्यात आली आहेत त्या तत्वांच्या आधारे सेवानिवासस्थानांच्या विक्रीची किंमत निश्चित करण्यात यावी. किंमतीत कोणत्याही प्रकारची सूट देण्यात येऊ नये.

७) मृत कर्मचाऱ्याचा वारस सेवानिवासस्थानात रहात असल्यास त्याची विक्री करण्यात यावी.

८) सेवानिवासस्थान म्हणून दिलेला गाळा हा पोटभाड्याने दिलेला आढळल्यास किंवा अनधिकृतपणे व्यापलेला असल्यास त्याची विक्री करण्यात येऊ नये तर असा गाळा रिकामा करून घेण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी. मात्र ज्या कर्मचाऱ्याला तो गाळा सेवानिवासस्थान म्हणून देण्यात आलेला असेल त्याला यापुढे सेवानिवासस्थान किंवा २ टक्के राखीव गाळ्यांमधून गाळा मिळण्यास अपात्र ठरविण्यात यावे.

९) सफाई कामगारांना विक्री योजनेनुसार सेवानिवासस्थान त्यांचे मालकीचे झाल्यावर

त्यांनी मंडळाच्या वसाहतीतील साफसफाईचे कामकाज करणे बंद करू नये अथवा कामात हयगय करू नये. वसाहतीतील साफसफाईच्या कामकाजात कोणताही व्यत्यय व अडचणी निर्माण केल्या जाणार नाहीत, असे हमीपत्र सफाई कामगाराला द्यावे लागेल.

१०) सफाई कामगारांची सेवानिवासस्थाने बैठ्या स्वरूपातील गाळे असून तेथे चटईक्षेत्र उपलब्ध असण्याची शक्यता आहे. लाभार्थी आजी/माजी कर्मचाऱ्यामार्फत ज्यावेळी या निवासस्थानाच्या पुनर्विकास करण्याचा प्रस्ताव प्राप्त होईल त्यावेळी त्यांचेकडून बाजारभावाच्या ५० टक्के किंमत वसूल करून अतिरिक्त चटईक्षेत्र त्यांना उपलब्ध करून देता येईल. मात्र त्यांना हा प्रस्ताव मान्य नसल्यास या मिळकती पुनर्विकास म्हाडामार्फत करण्यात येऊन त्यांना सध्या असलेल्या आकारमानाचे गाळे किंवा शासकीय आदेशानुसार आवश्यक असलेले किमान आकारमानाचे गाळे त्या त्या वेळी व त्या त्या परिस्थितीमध्ये प्राधिकरण ठरवील त्या पद्धतीने उपलब्ध करून दिले जातील.

---

**Item No.** 15 **Resolution No.**

विषय : तपस्वी महिला सर्व औद्योगिक उत्पादक सहकारी संस्था (म) या संस्थेला अभ्युदय नगर, काळाचौकी येथे स्वस्त दराने आद्यपदार्थ विक्री केंद्रासाठी व रास्त भाव धान्य दुकानासाठी भूखंड वितरण करणेबाबत.

ठराव :

---

**Item No.** 16 **Resolution No.** 5150

विषय : नॅशनल हायड्रो इलेक्ट्रिक पॉवर कॉर्पोरेशन लिमिटेड यांना त्यांच्या अधिकाऱ्यांच्या निवासस्थानासाठी आरामनगर, वर्सोवा, अंधेरी येथील तीन गाळ्यांचे वितरण करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, आरामनगर, वर्सोवा, अंधेरी येथील 'अ' भूखंडावरील २८ गाळ्यांच्या इमारतीतील ३ गाळे प्रति चौरसफूटास रु. १,४५०/- या दराने नॅशनल हायड्रो इलेक्ट्रिक पॉवर कॉर्पोरेशन (एन. एच. इ. पी. सी.) या संस्थेस एकरकमी विक्री तत्वावर देण्यास मान्यता देण्यात येत आहे. हा दर दिनांक ३१ मार्च, १९९५ पर्यंत लागू राहील.

---

**Item No.** 17 **Resolution No.**

विषय : 'गृहनिर्माण महाप्रकल्प' दिनांक ३१-११-१९९४ पर्यंतचा प्रगती अहवाल.

ठराव :

**Item No.** 18 **Resolution No.** 5151

विषय : म्हाडा सदनिका व झोपडपट्टी ओळखपत्र पती/पत्नीच्या संयुक्त नावे वितरण करण्याचा शुभारंभ महाराष्ट्र राज्याचे मा. मुख्यमंत्री श्री. शरदचंद्र पवार यांच्या शुभहस्ते दिनांक १५-८-१९९४ रोजी म्हणजेच भारताच्या ४८ व्या स्वातंत्र्यदिनी करण्यात आला. त्याप्रित्यर्थ झालेल्या खर्चाला कार्योत्तर मंजूरी मिळण्याविषयी.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, म्हाडाच्या सदनिका व झोपडपट्टी ओळखपत्रे पती/पत्नीच्या संयुक्त नावे वितरण करण्याचा शुभारंभाचा कार्यक्रम दिनांक १५-८-१९९४ रोजी करण्यात आला. त्या प्रित्यर्थ रु. ३३,८६५.४५/- इतका खर्च झाला आहे. या खर्चाला प्राधिकरण कार्योत्तर मंजूरी देत आहे. त्याचप्रमाणे सदरहू खर्च हा मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ व राजीव गांधी प्रकल्प यांनी समप्रमाणात सोसावा.

**Item No.** 19 **Resolution No.** 5152

विषय : म्हाडाच्या स. नं. ७ व ८ वांद्रे (पूर्व) मुंबई या व्यापारी उपयोगाच्या भूखंडाच्या वितरणाबाबत.

ठराव : (इंग्रजी मजकूर)

**Item No.** 20 **Resolution No.** 5153

विषय : २८० एम. आय. जी. मामटी-परसोडी त्रिमूर्तीनगर, नागपूर येथील गाळेधारकांच्या समस्येबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, २८० मध्यम उत्पन्न गट, त्रिमूर्ती नगर, मामटी-परसोडी येथील गाळ्यांची किंमत निश्चित करताना जमिनीची किंमत (अधिमूल्य) म्हणून आकारण्यात आलेल्या रु. १५,४८,०६६/- या रकमेत अधिमूल सुविधावरील रक्कम रु. २,२५,५०५/- अंतर्भूत केलेली असून ती प्राधिकरणाच्या धोरणानुसार बरोबर नाही म्हणून ती वजा करून येणाऱ्या रु. १३,२२,५६१/- या अधिमूल्यावर वार्षिक अडीच टक्के या दराने भाडेपट्टी आकारावी व आतापर्यंत भाडेपट्ट्यापोटी घेतलेली रक्कम पुढील भाडेपट्ट्यापोटी घ्यावयाच्या रकमेत समायोजित करण्यास मान्यता देण्यात येते. तसेच अशा प्रकरणी निर्णय घेण्याचे अधिकार उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी/प्रा., यांना देण्यात येत आहे.

**Item No.** 21 **Resolution No.** 5154

विषय : पुणे मंडळाच्या अखत्यारीतील इचलकरंजी येथील 'सोशल वेल्फेअर सेंटर'साठी आरक्षित भूखंडाच्या वाटपाच्या फेरविचाराबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

१) महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ, पुणे यांनी केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने प्राधिकरणाने दिनांक १४/६/१९९४ च्या बैठकीत, जाहिरातीद्वारे प्राप्त झालेल्या अर्जाची सोडत काढून वाटप करावे. याबाबतचा उक्त भूखंडाबाबतचा केलेले ठराव क्रमांक ५०८० रद्द करण्यात येत आहे आणि संबंधित ११४०.५० चौ. मी. क्षेत्रफळाच्या भूखंडाचे वाटप 'महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ, पुणे' यांना नेहमीच्या प्रचलित अटी-शर्तीच्या अधीन राहून करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२) भाडेपट्ट्याचा कालावधी प्रथमतः ३० वर्षासाठी व त्यानंतर त्यावेळी लागू होणाऱ्या धोरणानुसार नूतनीकरण.

३) भूखंडाच्या अधिमूल्याची किंमत व वार्षिक भाडेपट्टा प्राधिकरणाच्या दिनांक १६/११/१९९२ च्या ठराव क्र. ३०९४ च्या जमिनीच्या किंमतीविषयक धोरणानुसार आकारावे.

४) भूखंडाचे अधिमूल्य/किंमत भरण्यास ठराविक कालावधीपेक्षा जास्त कालावधी संस्थेकडून झाल्यास १६ टक्के प्रतिशत दराने व्याज आकारावे.

५) भूखंडाचे संपूर्ण अधिमूल्य/किंमत मंडळास प्राप्त झाल्यानंतरच भूखंडाचा रितसर ताबा संस्थेस देण्यात यावा.

६) भूखंडाचा वापर सोशल वेल्फेअर सेंटरसाठीच करावा.

---

**Item No.** 22 **Resolution No.**

विषय : भूकंपग्रस्त पुनर्वसन प्रकल्पाचा अद्यावत प्रगती अहवाल.

ठराव :

---

**Item No.** 23 **Resolution No.** 5155

विषय : आरामनगर, वर्सोवा येथे लोकसेवक मंडळास एल्डर्स (होम) बांधण्यासाठी भूतपूर्व महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळाने वाटप केलेल्या भूखंडाबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, आरामनगर, वर्सोवा येथील २,३०६ चौ. मी. क्षेत्रफळाचा जो भूखंड लोकसेवा मंडळ या संस्थेस वितरित करण्यात आलेला आहे. त्यावर वृद्धाश्रमासाठी लागणाऱ्या १०० खाटांची १० मजली इमारत बांधण्यासाठी संस्थेला लागणारा भूखंड संस्थेकडे लागणारा भूखंड संस्थेकडे ठेवण्यात यावा व उर्वरित भूखंड प्राधिकरणाच्या ताब्यात घेऊन प्राधिकरणाच्या जागा वाटपाच्या प्रचलित धोरणानुसार निकाली काढावा. या प्रकरणी कार्यवाही करताना उक्त संस्थेच्या सदस्यांबरोबर चर्चा करून त्यांच्याकडून तपशीलवार प्रस्ताव घेण्यात यावा.

याबाबतचे निर्णय घेण्याचे अधिकार उपाध्यक्ष/प्रा., यांना देण्यात येत आहेत.

---

**Item No.** 24 **Resolution No.**

विषय : स. क्र. ९३ (भाग) देवनार येथील भूखंडावर धारावी येथील कातडी प्रक्रिया उद्योगाचे पुनर्वसन करण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 25 **Resolution No.**

विषय : राजीव गांधी निवारा प्रकल्पांतर्गत नागरी नूतनीकरण योजनेअंतर्गत उपलब्ध होणाऱ्या अतिरिक्त गाळ्यांच्या विक्री दराबाबत.

ठराव :

**Item No.** 26 **Resolution No.** 5156

विषय : सर्व्हे क्र. ३४३ (भाग) धारावी येथे बांधण्यात येत असलेल्या २४० गाळ्यांसाठी (सुधारीत १२० गाळे) चांगली वैशिष्टे (बेटर स्पेसिफिकेशनस्) वापरल्याने लागू होणारा वाढीव दर कंत्राटदारास देणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, स.क्र. ३४३ (भाग) धारावी येथील बांधण्यात येत असलेल्या २४० गाळ्यांसाठी (सुधारीत १२० गाळे) चांगली वैशिष्ट्ये (बेटर स्पेसिफिकेशनस्) लागू होणारा वाढीव दर मे. डीव्हईन कन्स्ट्रक्शन कंपनी यांना मूळ कामाऐवजी नव्याने करण्यात येणाऱ्या कामासाठी खालीलप्रमाणे दर देण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

"नव्याने वसूल करण्यात आलेल्या कामाचे दर हे निविदेतील संबंधित मूळ कामाच्या दरानुसार (१३.९ टक्के जास्त) व त्याबरोबर नियमित दरवाढ (रेग्युलर एस्कलेशन) देण्यात यावी. या व्यतिरिक्त मूळ कामाची दरसूची (९२-९३) व नवीन सुधारीत कामाची दरसूची (९३-९४) यातील असलेला फरक देण्यात यावा."

या ठरावाची कार्यवाही इतिवृत्ताच्या मान्यतेची वाट न पाहता करण्यात यावी.

**Item No.** 27 **Resolution No.**

विषय : पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या कामकाजाचा आढावा.

ठराव :

**Item No.** 28 **Resolution No.** 5157

विषय : निजामपूर, भिवंडी येथील कोकण मंडळाच्या गाळ्यांची लिलावांद्वारे विक्री करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, निजामपूर, भिवंडी येथे अल्प उत्पन्न गट व मध्यम उत्पन्न गट योजनेअंतर्गत बांधण्यात आलेल्या गाळ्यांपैकी, जे गाळे अनेकवेळा जाहिरात देऊनसुद्धा विक्री झालेले नाहीत, अशा रिक्त गाळ्यांची विहीत अटी व शर्तींच्या अधीन राहून विक्री करण्याचे अधिकार उपाध्यक्ष/प्रा. यांना देण्यात येत आहे.

**Item No.** 29 **Resolution No.**

विषय : पवई येथील गृहनिर्माण महाप्रकल्प - १ मध्ये उच्च उत्पन्न गटाच्या सदनिकांचे फिनिशिंग बाबींमध्ये करावयाचे फेरबदलास व त्यासाठी विकासकास द्यावयाच्या जादा कामाच्या बाबी व बाबवार जादा दरास प्राधिकरणाची मंजूरी मिळणेबाबत.

ठराव :

---

**Item No.** 30 **Resolution No.**

विषय : ओशिवरा येथील गृहनिर्माण महाप्रकल्पामध्ये उच्च उत्पन्न गटाच्या सदनिकांच्या फिनिशिंग बाबींमध्ये करावयाचे फेरबदल तसेच इमारतींना शोभिवंत इलेव्हेशन ट्रीटमेंट देण्याबाबत व त्यासाठी विकासकांना द्यावयाच्या ज्यादा कामाच्या बाबी व द्यावयाच्या दराबाबत प्राधिकरणाची मंजूरी मिळणेबाबत.

ठराव :

---

**Item No.** 31 **Resolution No.** 5158

विषय : ओशिवरा येथील गृहनिर्माण महाप्रकल्प - २ अंतर्गत बांधण्यात येणाऱ्या वसाहतीमधील अनिवासी गाळ्यांचे निवासी गाळ्यांमध्ये रुपांतर करण्यास मान्यता देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, ओशिवरा येथे गृहनिर्माण महाप्रकल्प - २ अंतर्गत एकूण ७ समुहामध्ये ४२ इमारतींचे बांधकाम उच्च उत्पन्न गट योजनेअंतर्गत हाती घेण्यात आले आहे. त्यामध्ये रस्त्याला लागून असलेल्या इमारतीतील तळमजला व पहिला मजला यामध्ये अनिवासी गाळ्यांचा अंतर्भाव प्रस्तावित आहे. निवासी व अनिवासी अशा मिश्र वापरामुळे लोकांची इमारतीत ये-जा वाढेल व तेथील रहिवाश्यांना शांतता मिळणार नाही व याचा परिणाम गाळ्यांच्या मागणीवर होईल. म्हणून प्रस्तावित केल्याप्रमाणे ओशिवरा येथील गृहनिर्माण महाप्रकल्प - २ मधील अनिवासी गाळ्यांचे निवासी गाळ्यांत रुपांतर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

---

**Item No.** 32 **Resolution No.** 5159

विषय : व्यावसायिक विकास केंद्र, पुणे (पी. डी. सी.) यासाठी सहाय्यक ग्रंथपाल हे पद निर्माण करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील कनिष्ठ सहाय्यकेच्या संवर्गातील रु. १२००-२३०० या वेतनश्रेणीतील एक राखीव पद मोकळे करून त्यात नामाभिधान त्याच वेतनश्रेणीत सहाय्यक ग्रंथपाल असे करून व व्यावसायिक विकास केंद्र, पुणे मंडळाच्या आस्थापनेवर परिवर्तित करण्यास मान्यता देण्यात येत आहे. त्याचप्रमाणे कार्यवृत्त स्थायी होण्याची वाट न पाहता सदर पद सरळसेवा भरतीने भरण्याची कार्यवाही करण्यात यावी.

---

**Item No.** 33 **Resolution No.** 5160

विषय : प्राधिकरणाच्या वसाहतीत उद्यान विकसित करण्याच्या दृष्टीने उद्यानविद्यावेत्ता (हॉर्टीकल्चरीस्ट) व सहाय्यक उद्यानविद्यावेत्ता (असिस्टंट हॉर्टीकल्चरीस्ट) ही पदे निर्माण करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, कार्यकारी अभियंता या रु. ३०००-४५०० या वेतनश्रेणीतील एक राखीव पद मोकळे करून त्याचे नामाभिधान त्याच वेतनश्रेणीत उद्यानविद्यावेत्ता (हॉर्टीकल्चरीस्ट) तसेच उप-अभियंता या रु. २०००-३५०० या वेतनश्रेणीतील एक राखीव पद मोकळे करुन त्याचे नामाभिधान त्याच वेतनश्रेणीतील सहाय्यक उद्यानविद्यावेत्ता (असिस्टंट हॉर्टीकल्चरीस्ट) असे करुन ही दोन्ही पदे प्राधिकरणाच्या आस्थापनेवर निर्माण करण्यास मान्यता देण्यात येते.

**Item No.** 34 **Resolution No.** 5161

विषय : कस्टम संचालनालयातील व आयकर विभागातील अधिकारी/कर्मचारी यांना निवासी गाळे देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, कस्टम व आयकर या केंद्र शासनाच्या विभागाच्या अधिकारी/कर्मचारी यांच्या निवासाची गैरसोय दूर करण्यासाठी गाळेवाटप विनियम ६(३) अनुसार खालील दर्शविलेले गाळे राखून ठेवून त्यांचे वाटप करण्यास मान्यता देण्यात येते. तसेच कोणत्या विभागात किती गाळे वाटप करावेत याबाबतचे अधिकार प्राधिकरणाचे मा. उपाध्यक्ष/प्रा., यांना देण्यात येत आहेत.

| अ. क. | स्थळ | योजनेचे नाव | क्षेत्रफळ | इमारत/ गाळे | वर्ष | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | पवई लेक | उच्च उत्पन्न गट | ८९४ चौ.फू. | १/५२ | १२/९५ | प्रत्येकी २६ गाळे |
| २. | पवई लेक | उच्च उत्पन्न गट | ५१० चौ.फू. (प्रत्येक इमारत २८ गाळे) | २/५५ | १२/९५ | प्रत्येकी १ इमारत |
| ३. | कांदिवली | अल्प उत्पन्न गट | २४० चौ.फू. (एक विंग ५३) | १/५३ | ५/९५ | एक विंग |

**Item No.** **35** **Resolution No.** **5162**

विषय : म्हाडामध्ये व्यवसाय प्रशिक्षण केंद्र स्थापन करणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, म्हाडाचे पुणे येथील व्यवसाय प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्याबाबत कामचे स्वरूप व उपलब्ध कालावधी कमी असल्याकारणामुळे बाब टिप्पणीतील परिच्छेद-४ मध्ये उल्लेखिल्या नेहमीच्या नियमास अनुसरून नसलेल्या परंतु कामाचे हित लक्षात घेता वाटाघाटीनुसार दिलेल्या कामाबाबत व अंतर्गत सजावटीसाठी खाजगी वास्तुशास्त्रज्ञाची नेमणूक व त्यांचे ठरविलेले व्यावसायिक शुल्क इत्यादी पूर्ण केलेल्या कार्यवाहीस कार्योत्तर संजूरी देण्यात येत आहे.

**Item No.** **36** **Resolution No.**

विषय : मुंबई बेटावरील जुन्या उपकरप्राप्त इमारतीच्या पुर्नबांधणी/पुर्नविकास योजना राबविण्यासाठी सहकारी संस्था/मालक यांना संक्रमण शिबिरामधील गाळे तात्पुरत्या स्वरूपावर उपलब्ध करून देण्याबाबत.

ठराव :

**Meeting No.** **Special** **Meeting Date** **20-Mar-19**

**Item No.** **1** **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दि. ३-१-१९९५ रोजी झालेल्या १३५ व्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे.

ठराव :

**Item No.** **2** **Resolution No.** **5163**

विषय : प्राधिकरणाचे सन १९९५-९६ या वर्षाचे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक.

ठराव : प्राधिकरणाच्या सन १९९५-९६ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकावर व सन १९९४-९५ च्या सुधारीत अंदाजपत्रकावर सविस्तर चर्चा होऊन दोन्ही अंदाजपत्रकास प्राधिकरणाची मंजूरी देण्यात आली.

**Item No.** **3** **Resolution No.** **5164**

विषय : प्राधिकरण व प्रादेशिक मंडळे यांचे कर्मचारी वर्ग अनुसूची वित्तीय वर्ष १९९५-९६.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, बाब टिप्पणीत नमूद करण्यात आलेल्या सन १९९५-९६ या वित्तिय वर्षाकरिता कर्मचारी वर्ग अनुसूचित मान्यता देण्यात येत आहे. त्याचप्रमाणे कर्मचारी वर्ग अनुसूचित आवश्यकतेनुसार किरकोळ बदल, पदांचे पुनर्नामनिकरण (रिडेसिग्नेशन), पदांची अदलाबदल, आवश्यकतेनुसार पदे राखीव गटात समाविष्ट करणे, पदांचे फेरवाटप (रिडिस्ट्रिब्युशन), पदे परावर्तित करणे (डायव्हर्शन), राखीव गटातील पदे कार्यान्वित करणे (ॲक्टिव्हेट) इत्यादींबाबतचे अधिकार उपाध्यक्ष/प्राधिकरण यांना प्रदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** **4** **Resolution No.** **5165**

विषय : म्हाडा सदनिका व झोपडपट्टी ओळखपत्रे पती/पत्नीच्या संयुक्त नावे वितरण करण्याचा शुभारंभ महाराष्ट्र राज्याचे मा. मुख्यमंत्री श्री. शरदचंद्र पवार यांच्या शुभहस्ते दिनांक १५.८.९४ रोजी स्वातंत्र्यदिनी करण्यात आला. या कार्यक्रमावर आधारित महासंचालक, माहिती आणि जनसंपर्क विभाग, महाराष्ट्र शासन यांनी जनतेला दाखविण्यासाठी व्हिडिओ फिल्म तयार करून त्याच्या २५० व्हीएचएस प्रती करून घेतल्या त्याप्रित्यर्थ २३,७५०/- रु. इतका खर्च झाला. त्या खर्चाची प्राधिकरणाने शासनाला प्रतिपूर्ती करावयाची आहे. या खर्चाला प्राधिकरणाची कार्योत्तर मंजूरी मिळण्याविषयी.

ठराव : सदर प्रस्तावावर चर्चा करून प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला की, शासनातर्फे म्हाडाच्या कार्यक्रमावर आधारित जिल्ह्याजिल्ह्यातून दाखविण्यासाठी व्हिडिओ फिल्म्स तयार करण्यात आली आणि त्या फिल्म्सच्या २५० व्हीएचएस प्रती करून घेतल्या त्या प्रित्यर्थ रु. २३,७५०/- इतका खर्च शासनाला झाला. त्या खर्चाची प्रतिपूर्ती करण्यास प्राधिकरण कार्योत्तर मंजूरी देत आहे. प्राधिकरणाने पुढे असाही निर्णय घेतला की, या खर्चाची प्रतिपूर्ती राजीव गांधी झोपडपट्टी सुधार व निवारा प्रकल्पातर्फे करण्यात यावी.

**Item No.** 5 **Resolution No.** 5166

विषय : शासनाच्या २ टक्के स्वेच्छाधिकारातील गाळे/भूखंडाचे वाटप शासनास कळविल्यापासून ६ महिन्यांच्या आत शासनाकडून करण्यात न आल्यास ते सर्वसामान्य प्रवर्गातील लाभार्थींस करण्याबाबत विनियमात सुधारणा करण्याविषयी.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, प्राधिकरणाचा निधी त्वरित मोकळा होण्यासाठी शासनाच्या स्वेच्छाधिकारास वाटपासाठी राखून ठेवलेल्या गाळे/भूखंडाचे वाटप योजनेतील इतर गाळे/भूखंडाबरोबर होणे आवश्यक आहे. त्यासाठी योजनेतील इतर गाळे/भूखंडाच्या वाटपाची जाहिरात देण्यापूर्वी साधारणत: सहा महिन्यांपेक्षा जास्त कालावधी असताना त्या गाळे/भूखंडातून शासनाच्या २ टक्के स्वेच्छाधिकारात वाटप करावयाच्या गाळे/भूखंडाचे लाभार्थी कळविण्यासाठी शासनास विनंती करावी व त्यानंतर सहा महिन्यांपर्यंत शासनाने लाभार्थी न कळविल्यास त्या गाळ्यांचे वाटप योजनेतील इतर गाळ्यांबरोबरच जाहिरात देऊन सर्वसाधारण प्रवर्गातील लाभार्थींना वाटप करण्यासाठी आणि त्यासाठी गाळेवाटप विनियम-१६ व जमीन वाटप विनियम-१६ मध्ये आवश्यक ती सुधारणाही करण्यास मान्यता देण्यात येते. विनियमात सुधारणा करण्याबाबतचा मसुदा विधी सल्लागार/प्राधिकरण यांनी तयार करून द्यावा व शासनाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात यावा.

**Item No.** 6 **Resolution No.** 5167

विषय : नागपूर मंडळातील रविनगर येथील व्यापारी संकुलातील १ ते ४ क्रमांकाचे हॉल नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ सेकंडरी स्टील टेक्नॉलॉजी, नवी दिल्ली यांना विक्री करण्यास मान्यता देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, रविनगर नागपूर व्यापारी संकुलात बांधलेल्या व्यापारी स्वरुपाच्या हॉल टाईप गाळे म्हणजे ८ हॉलपैकी ४ हॉल अनेक प्रयत्न करूनही मागणी येत नसल्यामुळे नागपूर मंडळाने या गाळ्यांच्या विक्रीसाठी सप्टेंबर १९९४ रोजी निश्चित केलेल्या रु. १३,९२,०५७/- किंमतीएवढी किंमत घेऊन दिनांक ३१ मार्च, १९९५ पूर्वी नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ सेकंडरी स्टील टेक्नॉलॉजी या संस्थेस वाटप करण्यास मान्यता देण्यात येते. ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्ताच्या स्थायीकरणाची वाट न पाहता त्वरित करण्यात यावी.

**Item No.** 7 **Resolution No.** 5168

विषय : ओशिवरा येथील गृहनिर्माण महाप्रकल्प - २ गट क्र. ५ व ६ मध्ये फिनिशिंग बाबींमध्ये करावयाचे फेरबदल तसेच इमारतींना शोभिवंत इलेव्हेशन ट्रीटमेंट देण्याबाबत व त्यासाठी विकासकांना द्यावयाच्या जादा कामाच्या बाबी व दरांना प्राधिकरणाची संजूरी मिळणेबाबत.

ठराव : बहुमताने निर्णय घेतला की, ओशिवरा येथील इमारतींवर अतिरिक्त होणारा खर्च हा गटनिहाय मूळ निविदा किंमत (एस्कलेशन ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर वगळून) अधिक १५ टक्के कमाल मर्यादा ठेऊन त्याप्रमाणे खर्च करण्यास प्राधिकरण मुंबई मंडळास परवानगी देत आहे.

**Item No.** 8 **Resolution No.** 5169

विषय : पवई येथील गृहनिर्माण महाप्रकल्प-१ मध्ये उच्च उत्पन्न गटाच्या सदनिकांचे फिनिशिंग बाबींमध्ये करावयाचे फेरबदलास व त्यासाठी विकासकास द्यावयाच्या जादा कामाच्या बाबी व बाबवार जादा दरास प्राधिकरणाची मंजूरी मिळणेबाबत.

ठराव : बहुमताने निर्णय घेतला की, पवई येथील महाप्रकल्पावर योजनेच्या एकूण निविदा किंमत (एस्कलेशन अॅन्ड इन्फ्रास्टक्चर वगळून) अधिक १५ टक्के अतिरिक्त खर्चाची मर्यादा ठेऊन खर्च करण्यास मुंबई मंडळास प्राधिकरण मंजूरी देत आहे.

**Item No.** 9 **Resolution No.**

विषय : विभागीय चौकशी पूर्ण करून शिक्षा म्हणून सेवेतून काढून टाकण्यात आल्यामुळे माजी उप-अभियंता श्री. जैन यांनी त्या विरुद्ध प्राधिकरणास अपिल सादर केले आहे त्याचे अवलोकन करून त्याबाबत निर्णय घेणे.

ठराव :

**Item No.** 10 **Resolution No.** 5170

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण आणि ह्युमन सेटलमेंट मॅनेजमेंट इन्स्टिट्यूटमधील परस्पर सहकाराच्या कराराचा कालावधी मार्च, १९९६ पर्यंत वाढविणेबाबत.

ठराव : बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे प्राधिकरणाची ही सभा प्राधिकरण व एच. एस. एस. आय. या संस्थेमधील प्राधिकरणाच्या ठराव क्र. ४०६३ दिनांक ८.४.१९९३ अन्वये झालेल्या कराराची मदत यापुढे दिनांक ३१.३.१९९६ पर्यंत वाढविण्यास एकमताने मंजूरी देत आहे व ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त स्थायी होण्याची वाट न पाहता करण्यास सुद्धा मान्यता देण्यात येत आहे.
बैठकीच्या विषयसूचीवरील विषय विचारार्थ घेण्यात आल्यावर व प्रस्तावावर उक्तानुसार निर्णय झाल्यानंतर उपस्थितांचे आभार मानून बैठकीचे कामकाज संपल्याचे मा. अध्यक्षांकडून जाहिर करण्यात येत आहे.